## प्रकरण तिसरे

## साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांची आशयसूत्रे आणि वैशिष्ट्ये


३.१ प्रास्ताविक

३.२ वि.स.खांडेकरांच्या 'ययाति'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.३ श्री.ना.पेंडसेंच्या 'रथचक्र'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.४ रणजित देसाईंच्या 'स्वामी'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.५ गो.नी.दांडेकरांच्या 'स्मरणगाथा'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.६ व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सत्तांतर'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.७ आनंद यादवांच्या 'झोंबी'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.८ विश्वास पाटीलांच्या 'झाडाझडती'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.९ नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.१० रंगनाथ पठारेंच्या 'ताम्रपट'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.११ राजन गवसांच्या 'तणकट'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.१२ त्र्यं.वि.सरदेशमुखांच्या 'डांगोरा : एक नगरीचा'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.१३ सदानंद देशमुखांच्या 'बारोमास'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.१४ आशा बगेंच्या 'भूमी'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.१५ श्याम मनोहरांच्या'उत्सुकतेने मी झोपलो'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

३.१६ निष्कर्ष

३.१७ समारोप

३.१८ संदर्भ आणि टिपा

# प्रकरण तिसरे
# साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांची आशयसूत्रे आणि वैशिष्ट्ये

## ३.१ प्रास्ताविक

साहित्य अकादमीने सन १९५५ पासून ते आजमितीस चौदा मराठी कादंबऱ्यांना या पुरस्काराने पुरस्कृत केलेले आहे. साहित्य अकादमीने 'ययाति', 'स्वामी', 'रथचक्र', 'स्मरणगाथा', 'सत्तांतर', 'झोंबी', 'झाडाझडती', 'राघववेळ', 'ताम्रपट', 'तणकट', 'डांगोरा : एका नगरीचा', 'बारोमास', 'भूमी', आणि 'उत्सुकतेने मी झोपलो' या अतिशय दर्जेदार आणि सर्वोकृष्ट कादंबऱ्यांना या पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. या चौदा कादंबऱ्यांनी केवळ मराठी साहित्यातच नव्हे तर अखिल भारतीय पातळीवरही स्वतःचा ठसा उमटविलेला आहे. या सर्वच कादंबऱ्यांच्या आशयसूत्रांमध्ये नाविन्यपूर्णता आणि प्रयोगशीलता आहे. या कादंबऱ्यांचे आशयविश्व खूपच व्यापक असून ते अखिल मानवजातीला आपलेसे करणारे आहे. कादंबरी वाङ्मयप्रकारांच्या उपप्रकारांचे प्रातिनिधिक दर्शन या पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधून घडते. मराठी कादंबरीला अलिकडेच १६० वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्याचबरोबर साहित्य अकादमीच्या स्थापनेला सुद्धा सन २०१४ मध्ये ६० वर्षे पूर्ण झालेली आहेत. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या अभ्यासामुळे मराठी कादंबरीचा एक कालपट (इतिहास) आपल्या नजरेसमोर उभा राहण्यास निश्चितच मदत होईल. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त या मराठी कादंबऱ्या समाजातील ज्वलंत प्रश्नांशी निगडित आहेत. या कादंबऱ्या म्हणजे मराठी कादंबरी वाङ्मयातील बदलत्या स्थित्यंतराचे प्रातिनिधिक रूप आहे. विस्तार भयास्तव या चौदा कादंबऱ्यांच्या आशयसूत्रातील ठळक व निवडक गोष्टींचाच विचार या प्रकरणात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कादंबऱ्यांनी एक स्वतंत्र आकृतीबंध निर्माण केलेला आहे. या चौदा कादंबऱ्यांतील आशयसूत्रांचा आणि त्या कादंबऱ्यांच्या ठळक वैशिष्ट्यांचा विचार आपणाला या प्रकरणात करावयाचा आहे.

## ३.२ वि.स.खांडेकरांच्या 'ययाति'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'ययाति' ही वि.स.खांडेकर यांची सन १९५९ साली प्रसिद्ध झालेली लोकप्रिय पौराणिक कादंबरी आहे. विष्णु सखाराम अर्थात भाऊसाहेब खांडेकर यांच्या एकूण साहित्यकृतींच्या रत्नमाळेतील 'ययाति'चे स्थान मेरूमण्यासारखे आहे. 'ययाति'ला सन १९६० साली साहित्य अकादमी पुरस्कार आणि सन १९७४ साली ज्ञानपीठ पारितोषिक लाभलेले आहेत. त्यांनी चित्रपटकथा, लघुनिबंध, रूपककथा, कादंबरी आणि समीक्षा इत्यादी अनेक वाङ्मय प्रकार हाताळलेले आहेत. त्यांना 'पद्मभूषण' (१९६८), 'भारतीय ज्ञानपीठ' (१९७६) आणि 'शिवाजी विद्यापीठ डी.लिट्.' ही पदवी इत्यादी अनेक पुरस्कार आणि मानसन्मान लाभलेले

आहेत. आजमितीस 'ययाति'वर पुष्कळ समीक्षा झालेली आहे. 'ययाति' ही खांडेकरांच्या कादंबरी लेखनातील सर्वात श्रेष्ठ व प्रातिनिधिक अशी कादंबरी आहे. 'ययाति'ला खांडेकरांच्या साहित्यातील आणि अर्वाचीन मराठी साहित्यातील एक महत्त्वाची कादंबरी मानले जाते. वि.स.खांडेकर यांच्या चिंतनशील प्रवृत्तीचा आणि काव्यात्म प्रतिभेचा 'ययाति' हा कलात्मक आविष्कार आहे.

मराठी कादंबरी, लघुकथा, ललित निबंध आणि समीक्षा या सर्वच क्षेत्रात वि.स.खांडेकर यांनी मोलाची भर घातलेली आहे. 'ययाति' ही कादंबरी महाभारतातील आदिपर्वाच्या ७० ते ८० या अध्यायात आलेल्या 'ययाति' या हस्तिनापूरच्या सम्राट नहुषाच्या दुसऱ्या पुत्राच्या कथेवर आधारलेली पौराणिक कादंबरी आहे. 'ययाति'ला देवयानीपासून यदू व तुवर्सू आणि शर्मिष्ठेपासून अनू, द्रह्यू व पुरू अशी मुले होतात. 'ययाति'ला वार्धक्य प्राप्त झाल्यानंतर तो आपल्या मुलांना म्हणतो की, 'मला शुक्राचार्यांच्या शापवाणीमुळे आणि यज्ञयागासाठी व्रतस्थ राहावे लागल्यामुळे आयुष्यभर मी उपभोगात तृप्त झालेलो नाही. त्यामुळे तुम्ही माझे वार्धक्य घेऊन मला तुमचे तारुण्य द्या अशी विनंती करतो. तेव्हा सर्वात धाकटा पुरू आपले तारुण्य देऊन बापाचे वार्धक्य स्वीकारतो. ययाति एक हजार वर्षे तारुण्याचा उपभोग घेतो. त्यानंतर मात्र पुरुला तारूण्य परत करून तो वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करतो. पुराणातील ययातिचा कादंबरीसाठी वापर करताना वि.स.खांडेकरांनी तो आजच्या भोगलंपट, संयमशून्य मानवाचा प्रतिनिधी असा प्रतीकरूपाने उभा केलेला आहे. भोगाची विफलता दाखवणे हा त्यांचा मुख्य हेतू आहे. वि.स.खांडेकरांनी 'ययाति'मध्ये माणसाच्या भोगवादातून उद्‌भवणाऱ्या विनाशाचे उत्कट दर्शन घडविलेले आहे.

पुराणकथांमध्ये जे भव्य-भीषण संघर्ष आढळतात, त्यांचे मंथन करण्याची अंगभूत शक्ती वि.स. खांडेकरांच्या चिंतनात आढळते. जीवन जसे एका दृष्टीने क्षणभंगुर आहे, तसेच ते दुसऱ्या दृष्टीने चिरंतन आहे. याची त्यांना जाणीव असल्यामुळेच एका पौराणिक कथेच्या आधाराने एक सर्वोत्तम ललितकृती कशी निर्माण करता येते, याचा आदर्श वस्तुपाठच 'ययाति'च्या रूपाने वि.स.खांडेकरांनी घालून दिलेला आहे. 'ययाति'मध्ये वि.स.खांडेकरांनी कामुक, लंपट, स्वप्नातही त्याला संयम ठाऊक नाही असा ययाति; अहंकारी, महत्त्वाकांक्षी, मनात दंश धरणारी आणि प्रेमभंगाने अंतरंगात द्विधा झालेली देवयानी, स्वतःच्या सुखाच्या पलीकडे सहज पाहणारी आणि ययातिवर शरीरसुखाच्या, वासनातृप्तीच्या पलीकडच्या प्रेमाचा वर्षाव करणारी शर्मिष्ठा आणि निरपेक्ष प्रेम हाच ज्याचा स्वभावधर्म होऊन बसला आहे असा विचारी, संयमी व ध्येयवादी कच या चार प्रमुख पात्रांमधील परस्परप्रेमाची विविध स्वरूपे या कादंबरीत समर्थपणे चित्रित झालेली आहेत.

ययाति, देवयानी आणि शर्मिष्ठा या तीन पात्रांच्या आत्मनिवेदनातून 'ययाति'चे कथानक उभे राहते. ययाति हा लंपट, कामासक्त आहे पण त्याचबरोबर तो हळवा, भावनाप्रधान आणि स्वप्नाळूही आहे.

ययातिला खऱ्या प्रीतीची तीव्र ओढ आहे. खांडेकरांची शर्मिष्ठा ही त्याची प्रेमतृष्णा तृप्त करते. त्यासाठी खांडेकरांनी देवयानी ही संतापी, चंचल, उथळ अशी उभी केलेली आहे. कच हे मुळ कथेतले पात्र खांडेकरांच्या 'ययाति'मध्ये शांतीचा प्रतिनिधी म्हणून उभे राहते, तर यती हा वैराग्याचे प्रतीक बनतो. ययातिच्या भोगासक्तीचे मूळ त्याच्या आईकडून झालेल्या वात्सल्याच्या अतृप्तीत होते असेही वि.स. खांडेकरांनी दाखवलेली आहे. 'ययाति' या कादंबरीच्या संदर्भात वि.स.खांडेकर म्हणतात- "ही कादंबरी ययातिची कामकथा आहे, देवयानीची संसारकथा आहे. शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तिगाथा आहे, हे लक्षात घेऊन वाचकांनी ती वाचावी."[१] अशी अपेक्षा स्वतः वि.स.खांडेकरांनीच प्रकटपणे व्यक्त केलेली असून हेच त्यांच्या या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे असे म्हणावयास हरकत नाही.

वि.स.खांडेकरांची 'ययाति' ही पुराणातील ययाति राजाची एका मोठ्या पुरूवंशातल्या सम्राटाची जीवनगाथा असली, तरी शेवटी ती एका सम्राटाची जीवन कहाणी न बनता ती एक कौटुंबिक कथा बनलेली आहे. भोगाच्या अतिरेकी मार्गावर फरफटत, घरंगळत गेलेल्या सामान्य माणसाची ही कथा आहे. 'ययाति'चे स्वरूप पौराणिक असले, तरी तिची बीजे त्यांच्या आधीच्या सामाजिक कादंबऱ्यातही दिसतात. वि.स. खांडेकर हे 'ययाति'मध्ये एकूण मानवी जीवनालाच ग्रासून टाकणाऱ्या प्रश्नांनी अस्वस्थ होऊन लेखनाला प्रवृत्त झालेले आहेत. 'ययाति'मागील लेखनप्रेरणा आणि भूमिका समजून घेण्यासाठी 'ययाति'ला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला, तेव्हा त्याचा स्वीकार करताना दिनांक-२६ फेब्रुवारी, १९७६ साली वि.स.खांडेकरांनी केलेले भाषण या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. त्या भाषणात ते म्हणतात, "हा माझा वैयक्तिक सन्मान नसून सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व या गुणांनी संपन्न असलेल्या मराठी सर्जनशील साहित्याचा एक प्रतिनिधी म्हणून तो मला लाभला आहे. (रामायण-महाभारत या दोन ग्रंथांनी) सात्त्विक मनोविनोदनाच्या जोडीने जीवनविषयक तत्त्वज्ञानाची शिकवण देऊन मानवी व नैतिक मूल्यांनी तिचे (भारतीय जनतेचे) मत सुसंस्कारित केलेले आहे. 'मानव हा एक अंध, क्रुर शक्तीच्या हातातले कळसूत्री बाहुले आहे, असे मानणे म्हणजे त्याच्या ठिकाणी जी दिव्य ठिणगी आहे तिचे अस्तित्व नाकारणे होय .....' हे (आत्म्याचे) पोषण प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या प्रयत्नानेच करायला हवे. त्यासाठी प्रेम, करूणा, पराक्रम इत्यादी चिरंतन मूल्यांवर तिची पूर्ण श्रद्धा असायला हवी. केवळ श्रद्धा असून चालणार नाही, ही श्रद्धा दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची त्या व्यक्तीने शिकस्त करायला हवी. या श्रद्धेच्या जोडीला बदलत्या समाज-व्यवस्थेच्या आव्हानांना अभिप्रेत असलेली समता, आर्थिक न्याय, सामाजिक न्याय इत्यादी मानवी मूल्यांचाही व्यक्तीने भावनिक स्वीकार केला पाहिजे."[२] वि.स.खांडेकरांच्या या मताच्या आधारे त्यांनी 'ययाति' ही कादंबरी का लिहिलेली असावी याची आपणास कल्पना येण्यास हारकत नाही.

'ययाति' ही स्वतंत्र पौराणिक कादंबरी असल्याचा निर्वाळा मराठीतील अनेक प्रथितयश समीक्षकांनी दिलेला आहे. परंतु या संदर्भात स्वतः वि.स.खांडेकर म्हणतात- "'ययाति' ही शुद्ध पौराणिक कादंबरी नाही. पुराणातल्या एका उपाख्यानातील कथासूत्राचा आधार घेऊन लिहिलेली स्वतंत्र कादंबरी आहे."[३] याचाच अर्थ खांडेकरांच्या 'ययाति'ची कथा महाभारतातल्या कथेपेक्षा लौकिकातील प्रचलित पुराणकथेच्या अंगाने जाणारी आहे. पौराणिक कथाभागात आशयदृष्ट्या एक महत्त्वाची भर वि.स.खांडेकरांनी घातलेली आहे. मूळ कथेतील ययाति हजारो वर्षे उपभोग घेऊनही अतृप्त राहिलेला आहे आणि त्यातून तो-

"न जातु काम : कामानामुपभोगेन शाम्यति

हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते । "('ययाति',पृ.३९४)

(कामेच्छा ही अधिकाधिक उपभोगाने शांत होत नाही. यज्ञातील अग्नी हविर्द्रव्यांमुळे (आहुतींमुळे) जसा अधिकच भडकतो, तसेच कामेच्छेचे आहे.) एवढेच नकारात्मक सत्य सांगतो. पण जीवनात तृप्ती, शांती कशी प्राप्त होईल ते भावात्मक सत्य खांडेकरांनी 'ययाति'मध्ये दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कच आणि शर्मिष्ठा यांच्या रूपाने ययातिच्या प्रश्नांना उत्तर देण्याचा वि.स.खांडेकरांनी प्रयत्न केलेला आहे.

वि.स.खांडेकरांनी 'ययाति'मध्ये जीवनविषयक कूटांनी मूढ झालेला आणि अध:पतनाच्या वाटेला लागलेला ययाति आत्मविकासाच्या मार्गाला कसा येतो याची ही कहाणी सांगितलेली आहे. ययातिच्या या जीवनकहाणीत वास्तव आणि आदर्श यांचे मिश्रण आहे. ययातिच्या जीवनाचे अर्थात 'ययाति' कादंबरीचे- १) ययातिचे यौवनराज्यकालीन जीवन, २) विवाहोत्तर देवयानीच्या सहवासातील जीवन (याच काळात त्यांच्या जीवनात शर्मिष्ठा येते), ३) देवयानी बरोबरचा संसार संपूर्णपणे विस्कटल्यानंतरचे (तसेच शर्मिष्ठाही दूर निघून गेल्यानंतरचे) वाहवत गेलेले बेबंद जीवन आणि ४) शर्मिष्ठेचे निरपेक्ष प्रेम, पुरूचा त्याग, कचाचे उदात्त जीवन व संजीवक स्नेह यांच्या प्रत्ययाने त्याचे झालेले अंतर्बाह्य परिवर्तन असे चार विभाग करण्यात आलेले आहेत.

'ययाति' हा हस्तिनापूरचे सम्राट नहुषमहाराजांचा सुपुत्र आणि राजकुमार आहे. त्याचा मोठा भाऊ यति हा ब्रह्मर्षी होऊन घरातून निघून गेलेला असतो. सम्राट नहुषमहाराजाला ययातिने भव्य-दिव्य पराक्रम केला पाहिजे असे वाटत असते. म्हणूनच ययातिचे बाबा त्याच्या (ययातिच्या) आईला म्हणतात, "आपला ययु श्रेष्ठ वीर झाला पाहिजे. त्यानं एक नि दोन नाहीत. शंभर अश्वमेध करायला हवेत! आपल्या पूर्वजांपैकी पुरूरवामहाराजांनी उर्वशीसारख्या अप्सरेला आपल्या भजनी लावलं होतं. मी स्वतः देवांचा पराभव केला आहे. इंद्रपदावर आरूढ होण्याचा आनंद उपभोगला आहे, ही परंपरा ययूनं चालवायला हवी." ('ययाति',पृ.६) पहिल्या भागातील अशा घटनाप्रसंगातून ययातिचे पूर्वजीवन कसे संस्कारित होत जाते आणि कसे घडत जाते हे पहावयास मिळते. 'ययाति'ला आरंभी जाणतेपणीच जीवनातील स्वार्थीपणाची

ओळख होते. आईच्या कलिका नावाच्या आवडत्या दासीचे दुध पिऊन ययाति लहानाचा मोठा होतो. स्वत:चे सौंदर्य नष्ट होईल म्हणून आईदेखील आपल्याला अंगावर पाजीत नाही ही बाब त्याच्या लक्षात आल्यावाचून राहत नाही. 'ययाति' हा कलिकेला विचारतो की, 'तिनं (आईने) मला आपलं दूध का पाजलं नाही?' तेव्हा कलिका माझ्या कानात कुजबुजली, 'मूल अंगावर पाजलं, की बायकांचं रूप कोमेजून जातं, म्हणे!'('ययाति',पृ.८) या घटनेमुळेच आईच्या प्रेमाचा संकेत, वात्सल्य, ममता आणि जिव्हाळा या गोष्टीं-वरील श्रद्धेला प्रथमच तडा जातो.

पणजोबा पुरूरवा (पराक्रमी) आणि वडील नहुषमहाराज (शूर) या दोघांप्रमाणे आपणही काही तरी अद्‌भूत आणि अपूर्व करून दाखविण्याची ययातिची महत्त्वाकांक्षा असते. म्हणूनच तो मल्लविद्या, धनुर्विद्या, अश्वारोहण आणि युद्धकलेत तरबेज बनतो. नगरदेवतांच्या वार्षिक उत्सवाच्या शेवटीच्या दिवशी तो अश्वावर आरोहण होण्याच्या स्पर्धेत मोठ्या उत्साहाने सहभागी होतो. परंतु पाचवी फेरी संपत आलेली असताना मोहाच्या एका क्षणामुळे ययातिची घोड्यावरली मांड किंचित ढिली झालेली असल्यामुळे त्या तापट प्राण्याने ययातिला हवेत भिरकावून दिलेले असते. या दरम्यानच्या काळात आजारपणात अलका त्याची सेवा शुश्रूषा करीत असते. त्यावेळी तो तिचा उपभोग घेतो. आयुष्यातील पहिल्या स्त्रीसुखाचा ओझरता स्पर्श त्याला अलकेपासून मिळतो.

'ययाति' हा आपले शौर्य प्रकट करण्यासाठी आणि अश्वमेधासाठी आर्यावर्तात भ्रमण करण्यासाठी जातो. याच कालावधीत ययाति हा यतीच्या अर्थात त्याच्याच परागंदा झालेल्या थोरल्या भावाच्या सहवासात येतो. सर्व शरीरोपभोगांशी वैर मांडणाऱ्या यतीच्या सहवासामुळे ययातिला जीवनाच्या एका वेगळ्या आणि विकृत तत्त्वज्ञानाची ओळख होतो. तसेच कचाच्या सहवासात आल्यानंतर जीवनाचे एक वेगळे दर्शन ही त्याला घडते.

ययातिच्या वडिलांना अर्थात नहुषमहाराजांना अंगिरस ऋषींने शाप दिलेला असतो. एकदा अंगिरस ऋषींच्या आश्रमात असताना 'या नहुषराजाची मुलं कधीही सुखी होणार नाहीत' ही शापवाणी ऐकल्यानंतर ययाति हा आपल्या बाबांना यापूर्वी कधी कोणी शाप दिला आहे का? असा प्रश्न अंगिरस ऋषीला विचारतो. तेव्हा अंगिरस ऋषी हे ययातिला म्हणतात, "मी, कच, तुझा पिता-आपण सारे आपापल्यापरीने शापित आहोत. कुणाला पूर्वजन्मीचं कर्म भोवतं, कुणाला आईबापांच्या दोषांची फळ चाखावी लागतात. कुणी स्वभावदोषांमुळे दु:खी होतो, कुणाला परिस्थितीच्या शृंखलात बद्ध होऊन जीविताचा प्रवास करावा लागतो."('ययाति',पृ.५९) असे मार्मिक उत्तर देऊन अंगिरस ऋषी हे ययातिला मानवी जीवनातील दु:खाची अटळता आणि अपरिहार्यता पटवून देतात. नहुष महाराज आजारी पडल्यानंतर त्याच्या वेदना ययातिला पहावणार नाहीत. म्हणून त्याची रवानगी अशोकवाटिकेत केलेली असते. मनाच्या या ताणलेल्या स्थितीतच

त्याला एका स्त्री-पुरुषसंबंधात मुरलेल्या मुकुलिका नावाच्या दासीचा सहवास मिळतो. अगस्त ऋषींना बाबांनी उन्मत्तपणाने लाथ मारली होती. इंद्राणीकडे भोगदासी म्हणून पाहण्यापर्यंत त्यांचा उन्माद परा-कोटीला पोहचलेला असतो. त्यामुळे अगस्त्य ऋषी त्यांना 'हा नहुष आणि याची मुलं कधीही सुखी होणार नाहीत!'('ययाति',पृ.८५) असा शाप देतात. याच काळात त्याला कचदेवाचे मैत्रीपूर्ण पत्र आल्यामुळे हे पत्र वाचून ययाति खूपच अस्वस्थ होतो.

नहुष महाराजांच्या मृत्यूनंतर अंगिरस ऋषी हे ययातिला सांत्वनपर पत्र लिहितात. ययातिला आतापर्यंतच्या आयुष्यातील अत्यंत प्रिय आदरणीय आणि आधार असणाऱ्या व्यक्तीचा हा मृत्यू असतो. यौवनोन्मुख ययातिला घडलेले हे पहिले मृत्यूचे दर्शन आहे. मृत्यू, त्यापासून पलायन, दुःख विस्मरण, त्यासाठी स्त्रीचा उपभोग अशा नानाविध परस्परविरोधी अनुभवांतून ययाति जात असतो. देवपक्षाला संजीवनी विद्येचा लाभ व्हावा म्हणून संजीवनी विद्या संपादन करण्यासाठी कच हा दैत्यगुरू शुक्रचार्याच्या आश्रमात रहावयास जातो. त्यानंतर आईशी वार्तालाप करून यतीचा शोध घेण्यासाठी घराबाहेर पडलेल्या ययातिच्या आयुष्यात त्याची बालमैत्रीण पुन्हा एकदा पुनरागमन करते. परंतु या भेटीच्या दरम्यान या दोघां-मधील नात्यांमध्ये बदल झालेला असतो. ययाति हा अलकेचे मस्तक थोपटून तिला म्हणतो, "वेडी कुठली! तू माझी बहीण आहेस! तुझ्या आईचं दूध मी प्यालो आहे. आहे ना ठाऊक?"('ययाति',पृ.११०) अशाप्रकारे भाऊ-बहिणीच्या उत्कट स्वरूपांच्या नात्यात त्याचे रूपांतर होते. पण राजमातेच्या रूपाने उपस्थित असलेल्या व्यवहारी, निर्दय जगाला हे स्निग्ध आणि कोवळे नाते मान्य नाही. पुन्हा एकदा अत्यंत क्रूरपणे पण तितक्याच थंडपणे राजमाता अलकेला त्याच्यापासून दूर लोटते. अलकासोबतचे ययातिचे निरागस बाल्य, मनाची सरलता, कोमलता आणि उत्कट प्रेमशक्ती दूरू निघून जाते. राजमाता अलकेला विष प्राशन करायला लावते. राजमाता ययातिच्या या स्त्रीलंपटपणाबद्दल त्याला उपरोधपूर्ण स्वरात म्हणतात, "तुझा काही दोष नाही, बाबा, यात. दोष आहे माझ्या दैवाचा! तुमच्या घराण्याच्या रक्तातच आहे हे! सुंदर स्त्री दिसली, की....."('ययाति',पृ.११५-११६) या राजमातेच्या उद्‌गारातून ययातिच्या भोगलंपटवृत्तीवर लेखकांने नेमकेपणाने प्रकाश टाकलेला आहे. याच दरम्यान कचाला संजीवनी विद्या मिळालेली असते. देवपक्षातले मृत सैनिक जिवंत होऊ लागल्यामुळे दैत्यांनीच युद्ध थांबवलेले असते.

'ययाति'च्या दुसऱ्या भागात ययातिचे वैवाहिक जीवन, देवयानी बरोबरचे सहजीवन आणि शर्मिष्ठेच्या निरपेक्ष प्रेमाची कहाणी सांगितलेली आहे. देवयानीही दैत्यगुरू शुक्राचार्याची कन्या आहे. देवयानी ही शुक्राचार्याची अतिशय आवडती मुलगी असल्यामुळे ते तिचा सर्व हट्ट पुरवित असतात. शुक्राचार्याकडे संजीवनी विद्या शिकण्यासाठी आलेल्या कचावर तिचे प्रेम जडते. परंतु कचदेव तिच्या प्रीतीचा अव्हेर करतात आणि देवयानीला म्हणतात, "देवयानी, राक्षसांनी मला मारून, जाळून, माझ्या

हाडांची पूड मद्यात घालून, ती दारू शुक्राचार्यांना पाजली. त्यामुळे त्यांच्या हृदयाच्या मर्मस्थानी मला प्रवेश मिळाला. जगात दुसऱ्या कुणालाही ठाऊक नसलेला संजीवनी मंत्र मी तिथं आत्मसात केला! पण त्यामुळं मी तुझा भाऊ झालो. ज्या पोटात तू वाढलीस, त्याच पोटात मीही-"('ययाति',१२२) असे म्हणून तिच्या प्रेमाला नकार दर्शवितो. कचदेवसुद्धा देवयानीला 'कोणताही ऋषीपुत्र तुझं पाणिग्रहण करणार नाही!" ('ययाति',पृ.१२२) असा निर्दयपणे शाप देतात. कचाला शेवटपर्यंत देवयानीचे मन कधीच समजून येत नाही.

शर्मिष्ठा ही वृषपर्व महाराजांची मुलगी आणि ययातिची प्रेयसी आहे. नगरातील वसंतोत्सवात देवयानी आणि शर्मिष्ठा या दोघीही जलक्रीडा करीत असतात. या जलक्रीडेच्या स्पर्धेत शर्मिष्ठा पैज जिंकून अनावधानाने गडबडीत देवयानीचे वस्त्र (कचाने भेट म्हणून दिलेले वस्त्र) परिधान करते. या वस्त्र प्रकरणामुळे दोघींमध्ये भांडणे होतात आणि या दोघींच्या भांडणातील झोंबाझोंबीमुळे देवयानी विहिरीत पडते. त्याच वेळेस शिकारीसाठी अरण्यात गेलेल्या ययातिला तहान लागल्यामुळे तो पाणी पिण्यासाठी विहिरीच्या जवळ जातो. विहिरीत पडलेल्या देवयानीला ययाति वाचवतो. परस्परांना पाहताच देवयानी आणि ययाति दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडतात. या दोघांच्या विवाहाच्या सोहळ्याची तयारी स्वतः शुक्राचार्य करतात. शर्मिष्ठेच्या अपराधाबद्दल वृषवर्प महाराज पदर पसरून देवयानीची क्षमा मागतात. देवयानी ही हस्तिनापूरची सम्राज्ञी बनते. शर्मिष्ठेने देवयानीचा अक्षम्य अपराध केल्यामुळे "शर्मिष्ठेनं माझी दासी झालं पाहिजे! या हस्तिनापूरच्या महाराणीची दासी झालं पाहिजे! दासी म्हणून माझी सेवा करायला आत्ताच्या आत्ता माझ्या बरोबर हस्तिनापूरला आलं पाहिजे."('ययाति',पृ.१४१) अशी शिक्षा देवयानी शर्मिष्ठेला करते.

दैत्यराज वृषपर्व्याची राजकन्या आणि देवयानीची सखी शर्मिष्ठा ही राक्षसकुळाचा नाश होऊ नये म्हणून ययाति-देवयानी यांच्या विवाहानंतर ती हस्तिनापूरच्या राजगृहात दासी म्हणून रहावयास तयार होते. एका क्षत्रिय राजकन्येला (शर्मिष्ठा) एका ब्राह्मणकन्येची दासी म्हणून देवयानीच्या हाताखाली राबावे लागते. 'राजमाता ही सामुद्रिक शास्त्रात पारंगत असलेल्या ज्योतिषाला देवयानी आणि शर्मिष्ठा यांच्या हस्तरेषा पहायला लावते. तेव्हा तो ज्योतिष शर्मिष्ठेचा मुलगा सिंहासनावर बसेल.'('ययाति',पृ.१५३) अशी भविष्यवाणी वर्तवितो. क्षत्रिय राजकन्या असलेली शर्मिष्ठा ययातिला खूपच आवडत असते.

ययाति आणि देवयानी यांच्यावर चांदण्याचा वर्षाव करीत पतिपत्नींचे मीलन घडवून आणणारी मधुरात्र उगवलेली असते. ज्या दैवाने देवयानीला सिंहासनावर नेऊन बसविलेले असते, त्यानेच शर्मिष्ठेला सिंहासनावरून खाली ओढलेले असते. ययातिला शर्मिष्ठेनी बनवलेले विडे फार आवडतात. परंतु मधुचंद्राच्या रात्री दाराबाहेर उभ्या असलेल्या शर्मिष्ठेच्या हातातील पानाचे तांबूलतबक उडवून त्यातील चार-पाच विडे देवयानी पायदळी तुडवून शर्मिष्ठेचा अपमान करते. मधुचंद्राच्या रात्री ययातिने माध्वी अर्थात

दारू प्राशन केल्यामुळे देवयानी त्याला अंगालाही हात लावू देत नाही. कारण या दारूपायीच तिच्या बाबांची (शुक्राचार्य) संजीवनी विद्या गेलेली असते. अगस्त्य ऋषीच्या शापवाणीमुळे आणि अलकेच्या मृत्यूचा सूड घेऊन आईला अद्दल घडविण्यासाठीच ययाति हा ब्राह्मणकन्या असलेल्या देवयानीशी लग्न करतो. त्याचे देवयानीपेक्षाही शर्मिष्ठेवरच जीवापाड प्रेम असते. शुक्राचार्यांनी देवयानीला फारच लाडात वाढवलेले असते. देवयानीला सासरी पाठविताना शुक्राचार्य ययातिला उपदेश करताना म्हणतात, "राजा, देवयानी माझी एकुलती एक मुलगी आहे. तिचं सुखं, तेच माझं सुख, हे कधीही विसरू नकोस. ती सदैव प्रसन्न राहील, असं कर. पुन्हा मोठं तप करून संजीवनीसारखी अलौकिक सिद्धी मी मिळवणार आहे. माझा आशीर्वाद ही जगातली एक अत्यंत मोठी शक्ती आहे, हे अहोरात्र ध्यानात ठेव. मात्र मी जितका थोर, तितकाच कोपिष्ट ब्राह्मण आहे. विचारी पुरुषांना महाविषारी सर्पापेक्षा, अतितीक्ष्ण शस्त्रांपेक्षा किंवा ज्वाळां-च्या जिभा चाटीत चोहींकडे पसरत जाणाऱ्या प्रज्वलित अग्नीपेक्षा तपस्वी ब्राह्मणाची भीती अधिक वाटते. सर्प एकाला दंश करतो, शस्त्र अनेकांना यमसदनाची वाट दाखवितं. अग्नी उभं गाव जाळतो, पण जर का ब्राह्मण एकदा क्रुद्ध झाला, तर तो सर्व राष्ट्राचा संहार करू शकतो. वृषपर्व्याला मला कसं शरण यावं लागलं, शर्मिष्ठा नाक मुठीत धरून देवयानीची दासी कशी झाली. हे तू डोळ्यांनी पाहिलं आहे. तेव्हा देवयानीला दुःख होईल, असं काहीही, केव्हांही करू नकोस. तिचं दुःख हेच माझं, हे तू विसरू नकोस!" ('ययाति',पृ.१६७)असा उपदेश करतात. अशा प्रसंगी राजगृही जाणाऱ्या नववधूला वडील माणसांची सेवा कशी करावी. पतीला सुख होईल, अशा रीतीने वागणे हा पत्नीचा कसा धर्म आहे, सवती असल्या तरी सुद्धा त्यांचा मत्सर न करता गुण्यागोविंदाने कसे राहावे हे सासरी जाणाऱ्या मुलीला सांगितले जाते. परंतु या ठिकाणी शुक्राचार्य स्वतः हा उपदेश आपली मुलगी देवयानी ऐवजी जावई ययातिला करतात.

प्रीती हा कोणत्याही भीतीतून किंवा दुःखातून मुक्त होण्याचा एक सहजसुलभ मार्ग आहे. परंतु देवयानी ही ययातिची भूक कधीच भागवू शकली नाही. म्हणूनच ययाति म्हणतो, "देवयानीसारखी सुंदर पत्नी मिळूनही मी मनाने भुकेला राहिलो, हे सत्य आहे-त्रिवार सत्य आहे."('ययाति',पृ.१८०)

वि.स.खांडेकरांच्या 'ययाति'ला सन १९७४ सालचा अखिल भारतीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट असा ज्ञानपीठ पुरस्कार लाभला. २६ फेब्रुवारी, १९७६ रोजी त्यांना नवी दिल्ली येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'भारतीय ज्ञानपीठ' हा पुरस्कार त्यांना प्रदान करीत असताना त्यांना दिलेल्या प्रशस्तिपत्रकात 'ययाति'चे महत्त्व स्पष्ट करताना पुढील समर्पक शब्दांत त्याचे वर्णन केलेले आहे. "भारतीय ज्ञानपीठ का यह १९७४ का साहित्य-पुरस्कार श्री.विष्णु सखाराम खाण्डेकर को उनके मराठी उपन्यास 'ययाति' के लिए समर्पित किया जाता है जिसे १९५८-१९६७ के बीच प्रकाशित भारतीय भाषाओं के सर्जनात्मक साहित्य में विधिवत् सर्वश्रेष्ठ निर्णित और घोषित किया गया है ।

अग्रवर्ती मराठी लेखकों मे आधी शताब्दी से अधिक से प्रतिष्ठित, श्री.खाण्डेकर साहित्यिक निष्ठा और दायित्व भावना के समर्थक-प्रतीक के रूप में सामने रहे हैं। उनके काव्य-साहित्य और गद्य को गांधीवाद आणि समाजवाद के समन्वय की एक ऐसी अनूठी परिकल्पना ने आलोकित किया है जो अपनी सशक्तता से महाराष्ट्र एवं, अनुवादों के माध्यम से, देश मे अनगिनत पाठकों के दृष्टिकोण को दिशा देते आये है। प्रतिकूल परिस्थिति, अस्वास्थ्य और अब दृष्टि-विहीनता के रहते भी खाण्डेकरजी ने साहित्यिक और सांस्कृतिक गति-विधियों के साथ संगति रखी है। और भारत की नवचेतना एवं प्रगतीशीलता के दृढ समर्थक बने रहे हैं।

'ययाति' उनकी उत्कृष्ट रचना है जिसमें कथा और काव्य, मनोविज्ञान और दर्शन ताना-बाना बनकर समाये है; और जिसकी विषयवस्तु समकालीन भी है कालातीत भी, भारतीय भी हैं सार्वभौतिक भी। इसके मुख्य चरित्र जिवन्तता के प्रतीक हैं और उनके पुरातन प्रतिमानों में अगाध अर्थवत्ता अनुप्रणीत करने मे खाण्डेकर सफल हुए हैं। एक प्राचीन मिथक का आधुनिक वाग्भंगी द्वारा 'ययाति' में नवसर्जन करके उन्होने एक चिरस्थायी संदेश आज के मानव जगत् को दिया है जो एक श्रान्त-क्लान्त दानव की नाई आत्मा का बहिष्कार किये हुए भौतिक में ग्रस्त हैं ।"[४]

'ययाति'ला वि.स.खांडेकरांच्या वाङ्मयीन जीवनात विशेष महत्त्व आहे. 'ययाति' हीच वि.स. खांडेकरांची प्रायः अखेरची, त्यांच्या कादंबरीलेखनाचा उत्कर्ष साधणारी त्यांची प्रातिनिधिक कादंबरी म्हणावयास हरकत नाही. परंतु स्वतः वि.स.खांडेकर हे 'ययाति' या कादंबरीच्या संदर्भात दिनांक २५ सप्टेंबर, १९७० ला साहित्य अकादमीची फेलोशिप स्वीकारताना केलेल्या आपल्या भाषणात म्हणतात- "'ययाति'मध्ये माझ्या कलेचा परमोत्कर्ष गाठला आहे असे म्हटले जाते. पण मी तेवढ्यावरच संतुष्ट नाही. अजूनही नव्या मूल्यांची जाणीव प्रकर्षाने करून देण्याची माझी उमेद आहे, अन् परमेश्वरकृपेने आयुष्य लाभले तर मी निश्चित नवीं कलाकृती निर्मू शकेन." [५]

कचाला अद्दल घडविण्यासाठी आणि राजवैभवावर व सम्राज्ञी पदावर ताबा मिळविण्यासाठीच देवयानी ही ययातिबरोबर लग्न करते. ययाति हे तिच्या इच्छापूर्तीचे एक साधन असते. त्यामुळेच देवयानी वायूलहरीप्रमाणे वागून ययातिच्या आईचा अधिक्षेप करते आणि शर्मिष्ठेला सतत पशुवत वागणूक देण्याचा प्रयत्न करते. माणसाच्या पोटात शिरण्याचा मार्ग त्याच्या हृदयातून असतो हे देवयानीला माहितच नसते.

देवयानी आणि ययाति यांच्या विवाहानंतरच्या पहिल्या नगरोत्सवात उर्वशीपुरूर्वस आणि ऋग्वे-दातील अगस्त्य-लोपामुद्रा या कथांनी कार्यक्रम मोठ्या थाटामाटात पार पडतो. याच दरम्यान देवयानी आणि ययाति यांच्या संसारवेलीवर फुल उमलणार असते. नहुष महाराजांच्या मृत्यूनंतर उत्तरेकडच्या सीमेवर दस्यूंचा त्रास वाढलेला असल्यामुळे हे आक्रमण थोपविण्यासाठी स्वतः ययाति मोहिमेवर जावयास

निघतात. ययाति मोहिमेवर निघालेला असताना त्याला औक्षण करावयाच्या प्रसंगी देवयानीला तिच्या वडिलांचे पत्र आलेले असते. म्हणून राजमाता ही शर्मिष्ठेला ययातिला ओवाळण्यास सांगते. शुक्राचार्याची तपश्चर्या सफल होण्यासाठी देवयानी त्यांच्या अभीष्टचिंतनाकरिता यज्ञ करते. अमात्यांच्या सल्ल्याने सर्व प्रमुख ऋषींना निमंत्रण पाठवते. अगस्त्य आणि अंगिरस असे काही प्रमुख ऋषी सोडले तर इतर सर्वच ऋषीगण या यज्ञाला उपस्थित राहतात. ययातिला मोहिमेवर जाताना शर्मिष्ठेने ओवाळून औक्षण केल्यामुळे संतप्त झालेल्या देवयानीने यज्ञासाठी आलेल्या ऋषिमुनींच्या व्यवस्थेसाठी अशोकवाटिकेमध्ये शर्मिष्ठेची रवानगी केलेली असते.

यज्ञानंतर राजगृहात एकेदिवशी कचदेव आणि यती हे देवयानी आणि ययातिला भेटायला येतात. देवयानीला आशीर्वाद देत असतानाच तिला वारा घालीत उभ्या असलेल्या शर्मिष्ठेकडेच कचाचे लक्ष जाते. तो एकदम उद्गारतो, 'राजकन्ये, तू? नि इथं?'('ययाति',पृ.१९६) शर्मिष्ठा ही देवयानीची दासी बनल्याची हकिकत ऐकून कचाला धक्काच बसतो. त्याचवेळी उन्मनी अवस्थेतील तापशाने (यतीने) देवयानीला, " 'ए! तुझी ही दासी मला देशील?' म्हणजे मी तिला पुरुष करून टाकतो."('ययाति',पृ.१७७) शर्मिष्ठेबद्दल असे उद्गार काढल्यानंतर देवयानीला आनंदाच्या उकळ्या फुटतात. राजमाता त्या तापश्याला राजवाड्या-बाहेर हाकलून लावण्यास अमात्याला सांगते. तेवढ्यात यतीची ही विटंबना न पाहवल्यामुळे ययाति ओरडतो. "'हा माझा थोरला भाऊ आहे! याचं नाव यति!' त्याच्या अंगाला हात लावू नका! या सिंहासनावर त्याचा अधिकार आहे!"('ययाति',पृ.१९७) तेव्हा राजमाता सर्व शिष्टाचार सोडून यतीला कडकडून मिठी मारून धाडकन खाली जमिनीवर कोसळतात.

ययातिचे हे उद्गार तिला वेडेपणाचे वाटल्यामुळे देवयानीचा क्रोधाग्नी भडकतो. त्यामुळे ती यतीच्या व्यवस्था राजवाड्याऐवजी अशोकवाटिकेत करायला लावते. अशोकवाटिकेत यती हा सदैव शर्मिष्ठेच्या मागे मागे लागतो. मध्यरात्री सगळीकडे निजानीज झाल्यावर यती हळूच शर्मिष्ठाच्या शय्येपाशी जातो. त्याच्या हाताचा शर्मिष्ठेला स्पर्श होताच ती भीतीने ओरडते. तेव्हा खिडकीतून उडी टाकून तो बाहेर पळून जातो. कचदेवही शर्मिष्ठेला 'तिच्या दास्यातून मुक्त कर' अशी देवयानीला विनंती करतात. मात्र त्याची ही विनंती देवयानीने उडवून लावल्यामुळे कचदेवही भृगुपर्वताकडे देवयानीच्या दुराग्रही वर्तनाला कंटाळून आणि यतीच्या हकिकतीने दुखावून राजवाड्यातून निघून जातात. शर्मिष्ठेनी केलेल्या आत्म-बलिदानाबद्दल कचदेव तिला म्हणतात, "ताई, पत्नी होण्यापूर्वीच तू आई झालीस! साऱ्या दानवकुलाची आई झालीस! ज्या आत्मशक्तीने हा त्याग केलास, ती तुझ्या ठायी सतत वाढत राहो, एवढाच मी तुला आशीर्वाद देतो."('ययाति',पृ.२३२) अशा शब्दात कचदेवांनी शर्मिष्ठेची थोरवी सांगितलेली आहे. शर्मिष्ठेला चित्रकलेचा नाद असल्यामुळे ती ययाति महाराजांचे सुंदर चित्र रेखाटते. अशोकवाटिकेत शर्मिष्ठा या

चित्राकडेच पाहूनच दिवस कंठत असते. ययातिचे देवयानीपेक्षाही शर्मिष्ठेवरच खूप प्रेम असल्यामुळे "तुझ्या प्रेमाचा मार्ग काट्याकुट्यांनी भरलेला आहे. पण या काट्यांखाली फुलं आहेत-सुगंधी फुलं आहेत, हे विसरू नकोस!"('ययाति',पृ.२४१) असा सल्ला ययाति हा शर्मिष्ठेला देतात.

देवयानी ही शुक्राचार्याच्या अभीष्टचिंतनासाठी शुक्राचार्याला भेटायला गेल्यानंतर ययाति एका मध्यरात्री भुयारातून शर्मिष्ठेच्या दालनात जातो. ययाति आणि शर्मिष्ठेच्या मिलनानंतर शर्मिष्ठेला दिवस जातात. देवयानी राक्षस राज्यातून परत आल्यानंतर शर्मिष्ठेला दिवस गेल्याची बातमी तिला कळते. याप्रसंगामुळे देवयानी ही शर्मिष्ठेचा 'व्यभिचारिणी' म्हणून उल्लेख करते. परंतु देवयानीने खोदून खोदून विचारल्यानंतर 'एका ऋषीच्या कृपेने' दिवस गेल्याचे शर्मिष्ठा तिला सांगते. नंतर देवयानी प्रसूत होऊन तिला मुलगा होतो, त्याचे 'यदु' असे नामकरण करण्यात येते. त्यानंतर काही दिवसांनी शर्मिष्ठाही प्रसूत होऊन तिलाही पुत्ररत्न प्राप्त होते आणि त्याचे 'पुरू' असे नामकरण केले जाते. राजवाड्यातील ज्योतिषी देवयानीपुत्र 'यदु' दुर्दैवी असल्याचे आणि शर्मिष्ठेचा पुत्र 'पुरू' हा चक्रवर्ती राजा होईल असे भविष्य वर्तवितो. पुरूच्या हातावरील चक्रवर्तीपदाची चिन्हे पाहून देवयानीचा क्रोधाग्नी भडकतो. देवयानी ही शर्मिष्ठा आणि पुरूला राजमहालाच्या भुयारात कोंडून ठेवते. तुझ्या चोरट्या प्रियकराचे नाव मला उद्या सकाळपर्यंत समजले पाहिजे, असा दम देवयानी ही शर्मिष्ठेला देते. या प्रकारामुळे ययातिसुद्धा खूपच हतबल झालेला असतो. तो शर्मिष्ठेला म्हणतो, "शमा, मला क्षमा कर. आज तुझ्या-माझ्या लाडक्या पुरू-साठी मला काही करता येत नाही. पण उद्या-उद्या.................."('ययाति',पृ.२५७) असे शर्मिष्ठेला आश्वासन देतो. राजधानीत देवयानीचे नृत्य सुरू असताना ययाति मात्र भुयारातून माधवच्यावतीने शर्मिष्ठा आणि पुरू यांची सुखरूपपणे सुटका करतो. शर्मिष्ठा बाळाला घेऊन माधवच्या रथातून दूर निघून जाते. हस्तिनापूरपासून दूरवर एका पडक्या देवळापाशी भर पावसात शर्मिष्ठा आणि पुरूला सोडून माधव हस्तिनापूराकडे रवाना होतो. असा दुर्दैवी प्रसंग शर्मिष्ठेवर ओढावलेला असतानासुद्धा शर्मिष्ठा माधवमार्फत ययाति महाराजांना निरोप धाडते. शर्मिष्ठा म्हणते, "शर्मिष्ठा सदैव आपल्या हृदयात महाराजांच्या पावलांची पूजा करीत राहील. मृत्यूच्या दारातसुद्धा ! त्यांची आज्ञा ती कधीही मोडणार नाही आणि- 'आणखी काय?' 'आणि माझा पुरू कुठंही असला, तरी त्याच्या मस्तकावर त्यांचा वरदहस्त सतत असावा! महाराजांच्या आशीर्वादानं-'('ययाति',पृ.२६६) या शर्मिष्ठेच्या उद्‌गारावरून तिच्या ययातिवरील निरपेक्ष प्रेमाची प्रचिती आपणाला आल्याशिवाय राहत नाही.

शर्मिष्ठेला निरोप देऊन ययाति राजवाड्यात देवयानीचे वसंतनृत्य, भिल्लीणनृत्य आणि वर्षानृत्य पाहावयास जातो. देवयानीच्या दिलखेचक अदाकारीमुळे कलावंत-प्रेक्षकांमधून गौरवदर्शक टाळ्यांचा

कडकडाट होतो. ययातिसुद्धा देवयानीचे हे नृत्यनिपूण कौशल्य पाहून भारावून जातो आणि देवयानीला लहानसा सुंदर रत्नमालेचा नजराणा बहाल करतो.

'ययाति'च्या तिसऱ्या भागात लेखक वि.स.खांडेकरांनी ययातिचा मित्र माधव यांच्या मृत्यूची करुणकहाणी सांगितलेली आहे. नृत्य संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी देवयानीला शर्मिष्ठा आणि पुरू यांच्या पलायनाचे रहस्य समजते. शर्मिष्ठा आणि पुरू यांना दूरच्या पडक्या देवळापाशी सोडून आल्यानंतर या घटनेनी माधवचे कोमल हृदय भीतीने आजारी पडते. मुकुलिका नावाची दासी पाच-सहा दिवस माधवची सेवा शुश्रुषा करते. पण या आजारपणातच माधवचे दुर्दैवी निधन होते. काही दिवसानंतर माधव आणि त्याची वाग्दत्त वधू माधवी यांचे लग्न होणार असते. माधवची पुतणी तारकासुद्धा काकाच्या मृत्यूनंतर एकटी पडते. माधवच्या मृत्यूचा ययातिच्या जीवनावर फार मोठा परिणाम झालेला असतो. यानंतरच्या पुढच्या काळात ययातिच्या आयुष्यात भयाण पोकळी निर्माण झालेली आहे. त्याचे अधःपतनाकडे जाणे वेगाने सुरु झालेले आहे. या पुढच्या काळात ययातिने राज्यकारभारातून पूर्णपणे लक्ष काढलेले असून तो स्वैराचारी आणि निर्बंध भोगजीवनात बुडत जातो. मद्य आणि मदिराक्षीच्या मोहापायी तो आपले स्वभान विसरून जातो. देवयानीवर रागावलेला विलासमग्न ययाति हस्तिनापूरच्या राज्यावर परचक्र आलेले असतानाही त्याच्याकडे लक्ष देण्याइतकाही भानावर नाही. मद्यधुंद अवस्थेत ययाति एकेदिवशी देवयानीच्या महालात प्रवेश करतो. परंतु ययातिच्या अतिरेकी मद्यपानाला आणि त्याच्या बेधुंद भोगविलासी जीवनाला कंटाळलेली व संतापलेली देवयानी ही ययातिला 'मी तुला कधीही स्पर्श करणार नाही!'('ययाति',पृ.२९०) अशी शपथ घ्यायला लावते. देवयानीने तोडलेला(अपमानित झालेला) आणि शर्मिष्ठाला दुरावलेला ययाति पूर्णपणे एकाकी होतो. यानंतरचे ययातिचे भोगविलासी जीवन बेलगामपणे सुरुच राहते.

शर्मिष्ठेला हस्तिनापूर सोडून १८ वर्षे उलटलेली असतात. या अठरा वर्षांनंतर ती आता पुन्हा हस्तिनापूरकडे पुरूच्या शोधात निघालेली आहे. शर्मिष्ठा ही राजकन्या असुनसुद्धा देवयानीच्या दास्यत्वामुळे या अठरा वर्षांत तिला अनेक संकटांचा सामना करावा लागलेला आहे. आश्रित शर्मिष्ठेला एका पापी माणसाच्या बाका प्रसंगालासुद्धा सामोरे जावे लागलेले आहे. परंतु सुडाच्या भावनेनी पेटलेली देवयानी ही शर्मिष्ठा आणि पुरू यांचा अनन्वित छळ करण्यासाठी त्या दोघांना पकडून हस्तिनापूरला महाराणींच्या समोर हजर करणाऱ्या माणसाला मोठं बक्षीस जाहीर करते. या दवंडीने घाबरलेली शर्मिष्ठा रानावनात एकटीच भटकत असताना तिला यतीचे दर्शन घडते. शर्मिष्ठा ही यतीला 'या अभागिनीच्या एकुलत्या एक आशेला तुमचा आशीर्वाद असू द्या' असा पुरूसाठी आशीर्वाद मागते. तेव्हा 'वहिनी, काही काळजी करू नकोस तू. तुझा पुरू आज वनवासी असला, तरी उद्या हस्तिनापूरच्या सिंहासनावर बसेल.'('ययाति',पृ.३१०) असा आशीर्वाद ते शर्मिष्ठेला देतात. शर्मिष्ठेने ययातिवर अतिशय उत्कट, निरपेक्ष आणि पवित्र प्रेम केलेली

असूनही त्याची फार मोठी विपरित किंमत शर्मिष्ठेला मोजावी लागलेली आहे. जीवनाविषयीच्या सदोष समजुतीमुळे यतीने संसाराची आणि त्यातल्या दु:खाची बाळपणीच धास्ती घेतलेली असते. हिमालयाच्या पायथ्याशी पुरू आणि शर्मिष्ठा यांच्या राहण्याची व्यवस्था करून यतिधर्माचे पालन करण्यासाठी यती निघून जातो. कारण याच दरम्यान जिवंत मनुष्य नुसत्या मंत्राने कसा मारता येईल ही विद्या संपादन करण्यासाठी शुक्राचार्य तपश्चर्या करायला बसलेले असतात. कचदेव सुद्धा शुक्राचार्याच्या या विध्वंसक शक्तीला आळा घालण्यासाठी महातप करत असतो. मध्यंतरी एकदा यती हा शर्मिष्ठेला भेटून तिची विचारपूस करून राजमातेच्या निधनाची वार्ता तिला सांगतो.

पुरू सोळा वर्षांचा झाल्यानंतर तो कोणी साधा कुमार नसून, हस्तिनापूरचा राजपुत्र असल्याचे रहस्य शर्मिष्ठा त्याला सांगते. तेव्हा पुरू हा आपल्या आईला (शर्मिष्ठा) म्हणतो, "आपण दोघं हस्तिनापूरला जाऊ या. महाराजांना भेटू या. मी महाराजांना म्हणेन, 'मी तुमचा मुलगा आहे. तुमच्यासाठी वाटेल ते दिव्य करायला तयार आहे, पण माझ्या या आईचे असे हाल करू नका!'"('ययाति',पृ.३१६-३१७) अशी विनवणी करू इच्छितो. परंतु हे रहस्य कुणालाही न सांगण्याविषयी शर्मिष्ठेने पुरूला शपथ घातलेली असते. हिमालयीन वातावरणात पुरूला अनेक सवंगडी भेटतात. पुरू हा सोनेरी केस असलेल्या अलका या वनकन्येच्या प्रेमात पडतो. दस्यूंनी उत्तरेकडे फार मोठा उठाव करून हस्तिनापुराकडे चाल केलेली असल्यामुळे युवराज यदु मोठे सैन्य घेऊन त्या दस्यूंशी लढण्याकरिता निघलेला असतो. या चकमकीत यदू आणि त्याच्या बरोबरीचे काही शूर सैनिक यांना दस्यू कैद करून घेऊन जातात. या युद्धात यदुचा पराभव झाल्यामुळे ही गोष्ट देवयानीच्या जिव्हारी लागते. कारण हस्तिनापूरावर आक्रमण झालेले असतानासुद्धा ययाति हा मद्यपान आणि स्त्रीसंग यात आकंठ बुडालेला असतो. हस्तिनापूरावर परचक्र आलेले असताना पुरू हा यदुच्या मदतीला धावून जातो आणि शत्रूंच्या तावडीतून सुखरूपपणे युवराज यदूला सोडवून आणतो.

'ययाति'चे स्वरूप पौराणिक असले, तरी तिची बीजे त्यांच्या आधीच्या सामाजिक कादंबऱ्यांतही दिसतात. 'ययाति'चा आशय समकालाला कवेत घेऊन, त्याला ओलांडून, शाश्वताच्या क्षितिजाला स्पर्श करू पाहणारा आहे. या दृष्टीने 'ययाति' ही स्वतंत्र पौराणिक कादंबरी आहे. या संदर्भात सु.रा.चुनेकर यांनी नोंदविलेला अभिप्राय अतिशय महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, "पौराणिक कथाभागात आशयदृष्ट्या एक महत्त्वाची भर खांडेकरांनी घातली आहे. मूळ कथेतील ययाति हजारोवर्षे उपभोग घेऊनही अतृप्त-काम राहिला आहे, आणि त्यातून तो 'न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति/हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते।।' एवढे नकारात्मक सत्य सांगतो. पण जीवनात तृप्ती, शांती कशी प्राप्त होईल ते भावात्मक सत्य खांडेकरांनी 'ययाति'त दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. 'ययाति'ला शरीरोपभोगाची मर्यादा समजलेली

आहे, पण तो टाकून काय करावे ते त्याला कळत नाही. ("माणूस म्हणून सुखाने जगण्याचा प्रयत्न करताना आपण राक्षस तर झालो नाही ना? या शंकेने मी व्याकुळ होऊन गेलो होतो. पण मंदाराचा मार्ग सोडून कुठे जायचे हे मला कळत नव्हते."('ययाति',पृ.४०१) अनेक प्रश्नांनी तो व्याकूळ झाला आहे. आपले कुठे चुकले हे त्याला कळत नाही. जेव्हा 'निरपेक्ष प्रेमा'चा त्याला साक्षात्कार होतो, अनुभवाने प्रत्यय येतो तेव्हा त्याला शांती लाभते. 'निरपेक्ष प्रेम' हे त्याच्या प्रश्नांना, अशांतीला उत्तर आहे. 'निरपेक्ष प्रेम' ही शब्दसंहती कादंबरीत पुन्हा पुन्हा आली आहे. तो 'ययाति'च्या गाभ्याचा मंत्र आहे. कच आणि शर्मिष्ठा यांच्या रूपाने ययातिच्या प्रश्नांना उत्तर देण्याचा खांडेकरांनी प्रयत्न केला आहे."[६] 'ययाति' लिहिताना खांडेकरांच्या मनात वर्तमान जीवन आणि वर्तमान आशय त्यांना अभिप्रेत आहे.

शुक्राचार्यांची तपश्चर्या सफल होऊन भगवान शंकरांनी संजीवनीसारखीची एक अद्‌भुत विद्या त्यांना बहाल केलेली असते. देवयानी राजधानीत यदुच्या राज्याभिषेकाची जय्यत तयारी सुरू करते. कच-देवांनी सुद्धा कठोर तपश्चर्या करून संजीवनी विद्येसारखीच विद्या संपादन केलेली असते. सोनेरी केस असलेल्या अलका नावाच्या तरुणीशी ययाति हा कामक्रीडा करीत असतानाच त्याच्या महालाच्या बाहेर देवयानी आणि शुक्राचार्य त्याला भेटण्यासाठी जातात. पण ययातिचा तो अवतार पाहून शुक्राचार्य त्याला म्हणतात, "मर्कटा, मी पृथ्वीमोलाचं रत्न मोठ्या विश्वासानं तुझ्या स्वाधीन केलं; अन् ती गारगोटी आहे, असं मानून तू ते दूर भिरकावून दिलंस!"('ययाति',पृ.३७२) असे म्हणून देवयानीला आयुष्यभर दु:खात ठेवल्याबद्दल ययातिला शाप देतात. शुक्राचार्य ययातिला शाप देताना म्हणतात, "शर्मिष्ठेसारख्या दासीकडं कामुकतेनं पाहण्याची इच्छा तुझ्या डोळ्यांना पुन्हा होऊ नये, म्हणून मी त्यांच्यात चांगलं अंजन घालणार आहे. यौवन आंधळं असतं! यौवनानं तुला मोहवश केलं! होय ना? मग माझा तुला एवढाच शाप आहे - हे तुझं यौवन या क्षणी नष्ट होवो! भगवान महेश्वराच्या कृपेनं लाभलेल्या नव्या विद्येचं स्मरण करून, हा शुक्र एवढीच इच्छा करीत आहे, की माझ्यासमोर उभा असलेला हा पापी ययाति या क्षणी जख्ख म्हातारा होवो."('ययाति',पृ.३७४) ही शुक्राचार्यांची शापवाणी झाल्यानंतर ययातिचे ते गलितगात्र वृद्धाचे रूप पाहून देवयानी फारच दु:खी होते. देवयानी ही शुक्राचार्यांना करुण स्वरात म्हणते, "बाबा, यांच्याकडं बघवत नाही मला. यांना पुन्हा तरुण करा. याचं पहिलं रूप यांना परत द्या."('ययाति',पृ.३७५) देवयानीच्या या विनवणी-वरून शुक्राचार्य त्याला उ:शाप देतात आणि म्हणतात, "तुझ्या वार्धक्याचा स्वीकर करायला तुझ्याच कुळातला, तुझ्याच रक्ताचा कुणीही तरुण आनंदानं पुढं आला, तर तू इच्छा करशील, त्या क्षणी ते वार्धक्य त्याच्याकडं जाईल. त्याचं तारुण्य तुला मिळेल. मात्र एक लक्षात ठेव. तुझं ते उसनं तारुण्य तुझ्या मृत्यूनंच त्या तरुणाला परत मिळेल. दुसऱ्या कोणत्याही मार्गानं नाही. माझं स्मरण करून, तीनदा 'हे तारुण्य मी परत

करीत आहे' असं म्हटलंस, की तू मृत होऊन पडशील-"('ययाति',पृ.३७५) असा उःशाप ययातिला शुक्राचार्य देतात.

या उःशापामुळे ययाति सर्वप्रथम यदुला आपले वृद्धत्व देऊन त्याचे तारुण्य मागतो. यदुच्या स्पष्ट नकारानंतर तो पुरूला त्याचे तारुण्य मागतो. युद्धानंतर यदु आणि पुरू एकत्र आलेले असतात. पुरूने आपली संपूर्ण कहाणी सर्वांना सांगितलेली आहे. तो ययातिला म्हणतो, "बाबा, राजकन्या असून, आपल्या कुळासाठी दासी झालेल्या आईचा मी मुलगा आहे. मी आपलं वार्धक्य घ्यायला तयार आहे."('ययाति', पृ.३८०) यानंतर ययाति अधिकच सुंदर तर पुरू जख्ख म्हातारा दिसू लागतो. याचवेळेस शमिष्ठा पुरूचा शोध घेत राजवाड्यात आल्यानंतर पुरूची झालेली ही अवस्था बघून त्याला कवटाळून विलाप करू लागते. अनिर्बंध वासनेच्या अतिरेकामुळे ययातिने पितृधर्म, वात्सल्य आणि माणुसकी लाथाडलेली आहे. परंतु त्याचवेळी कचानेही तप करून शुक्राचार्यासारखीच विद्या मिळविलेली असल्यामुळे त्या सिद्धीच्या बळावर एका क्षणात पुरूचे यौवन त्याला परत दिले जाते. मध्यंतरीच्या अठरा वर्षातील कडू-गोड अनुभवांमुळे ययाति, देवयानी आणि शर्मिष्ठा यांना चुकांची जाणीव झालेली असते. यतीच्या आगमनानंतर त्यालाही राजसिंहासनापेक्षा मृगाजिनच श्रेष्ठ वाटू लागते. पुरूही देवयानीजवळ यदुलाच राजा होऊ दे म्हणून विनवणी करतो. पुरूच्या त्यागामुळे विरघळलेली देवयानी त्याच्या त्यागाने आणि प्रेमाने भारावून जाते आणि पुरूला म्हणते, "पुरू, पुढं सिंहासनावर कुणी बसायचं, ते महाराज ठरवतील-प्रजा ठरवेल. पण जगातली सारी राज्यं ज्याच्यावरून ओवाळून टाकावीत, असं राज्य तू मला दिलंस. तुझ्यासारख्या त्यागी, पराक्रमी मुलानं आई म्हणून मला हाक मारली, पुरू हे प्रेम करायला तुला कुणी शिकवलं? मला हे कुणी लहानपणी शिकवलं असतं, तर फार बरं झालं असतं! आता तुझ्यापासून मी ते शिकणार आहे. वडिलांचं वार्धक्य तू आनंदानं घेतलंस, भावासाठी सिंहासनावरचा आपला हक्क तू आनंदानं सोडलास. पुरू, मला दुसरं काही नको. तुझं हे प्रेम करण्याचं बळ तेवढं मला दे."('ययाति',पृ.३९३) पुरूच्या राज्याभिषेकाच्या दिवशी देवयानी, शर्मिष्ठा आणि ययाति वानप्रस्थाला निघून जातात. राजा झालेल्या पुरूला आशीर्वाद देताना म्हणतात, "तुझ्या नावानं हे कुळ प्रसिद्ध होवो. तुझ्या पराक्रमाप्रमाणं तुझा त्यागही वाढत राहो."('ययाति',पृ.३९४)

वि.स.खांडेकरांनी 'ययाति'मध्ये स्त्री-पुरुष संबंधाचा अचूकपणे वेध घेतलेला आहे. यासंदर्भात डॉ.प्रल्हाद वडेर यांनी नोंदविलेली प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे. डॉ.प्रल्हाद वडेर म्हणतात, "स्त्री-पुरुष संबंधाचं चित्रण करणारी त्यांची आणखी एक कादंबरी म्हणजे 'ययाति'. शर्मिष्ठा आणि ययातिच्या नात्याचं समर्थन करताना कादंबरीअखेर आलेल्या मनोगतात खांडेकर म्हणतात, 'सत्तर टक्के जोडपी संसार करतात तो तडजोड करीत, दुःख आतल्या आत गिळत! त्यांचे संसार सुखाचे वाटतात पण त्यात प्रीतीची उत्कटता नसते. जसं अहंकारी, महत्त्वाकांक्षी, मनात दंश धरणाऱ्या, सूडानं पेटलेल्या देवयानीचं पहिलं उत्कट प्रेम

कचावरच होतं. ययातिशी तिनं लग्न केलं ते महत्त्वाकांक्षेनं प्रेरित होऊन, त्याच्या प्रेमात पडून नव्हे. अशा स्थितीत शर्मिष्ठेचं त्यागी, निरपेक्ष प्रेम ययातिला मोलाचं वाटणं स्वाभाविकच!' 'पतीला पत्नीकडून जे प्रेम हवं असतं, त्यात जी आर्तता, उत्कटता, उदात्तता लागते ती देवयानीकडून त्याला न मिळता शर्मिष्ठेकडून मिळते.' असं खांडेकर म्हणतात. पण या दोघींना ययातिकडून काय मिळतं किंवा काय मिळायला हवं हा प्रश्न मात्र कादंबरीत बिनमहत्त्वाचा! देवयानी अहंकारी, मत्सरी आणि शर्मिष्ठा खांडेकरांना आदर्श वाटणाऱ्या स्त्रीचे सगळे गुण घेऊन येणारी. साहजिकच 'ययाति' कादंबरीत शर्मिष्ठेचं चित्रण ते अधिक सहृदयतेने करतात. तिच्या त्यागी, निरपेक्ष प्रेमाचं महत्त्व मानतात. तिच्या त्यागी, उदात्त, सेवाभावी रूपासमोर देवयानीच्या हट्ट, अहंकार, औद्धत्याचे विरोधी रंग येतात, त्यामुळे शर्मिष्ठेचा त्याग अधिकच भव्य होतो."[७]

ययातिने उत्तरार्धात अधःपतनाचे अंतिम टोक गाठलेले आहे. आपल्या भोगलालसेपायी आपल्या तरुण मुलाचे, पुरूचे तारुण्यही, आपले वार्धक्य त्याला देऊन घेण्याइतका तो निर्ढावलेला आहे. कचाच्या तपसामर्थ्यानंतर सर्वच अनिष्ट टळते. अधःपतनाचे अंतिम टोक गाठल्यानंतर ययातिच्या उपरतीचा आरंभ सुरु होतो. पुरू आणि शर्मिष्ठा यांच्या निरपेक्ष प्रेमाचा त्याला दिव्य साक्षात्कार होतो. देवयानीमध्ये सुद्धा फार मोठे परिवर्तन होऊन तिलाही तिच्या विपरित वागण्याचा पश्चाताप होतो. त्यामुळेच ययाति, देवयानी आणि शर्मिष्ठा हे तिघेही राज्य पुरूच्या स्वाधीन करून वानप्रस्थाला निघून जातात.

प्रा.चंद्रकांत बांदिवडेकर हे वि.स.खांडेकरांच्या 'ययाति' या कादंबरीच्या गुणदोषांबद्दल संमिश्र अशी प्रतिक्रिया व्यक्त करतात. प्रा.चंद्रकांत बांदिवडेकर हे म्हणतात की, "खांडेकरांच्या कादंबरीत महानतेचे गुण कमी आहेत. त्यांची पात्रं सामान्य (mediocre) वाटतात. तांत्रिक चुकाही खूप आहेत, पण या सर्व लेखनात खांडेकरांच्या चिंतनशील मनाचा प्रत्यय येतो. त्यांचं चिंतनही फारसं मौलिक नाही. पण त्या चिंतनाच्या पाठीमागे प्रतीत होणारे व्यक्तित्व अतिशय प्रामाणिक, विलक्षण भावनाप्रधान आणि समाजाबद्दल अपार कळवळा असणारं आहे. माणसाच्या भोगवादातून संभवणाऱ्या विनाशामुळे ते अतिशय अस्वस्थ झालेले आहेत. मानवाने सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करावी म्हणून ते तिळतिळ तुटताना दिसतात. चक्रव्युहात केंद्रभागी राहून मोडक्या रथाच्या चक्रानं शेवटपर्यंत लढत राहणाऱ्या अभिमन्यूचे श्रेयान्मुख व्यक्तित्व ज्या अर्थानं भारावून टाकतं त्या अर्थानंच खांडेकरांचं लेखकीय व्यक्तित्व भारावून टाकतं. नंतरच्या पौराणिक कादंबऱ्यांच्या निमितीला 'ययाति' पुष्कळ अंशी कारण झाली आहे हे तिचं मोठेपण सिद्धच आहे."[८] मानवी जीवनातील नानाविध दुःखे, त्यातील कारुण्य यांनी खांडेकर मुळापासून अस्वस्थ आहेत. आणि या दुःखांतून मानव जातीची मुक्तता कधी, कशी होईल याचे चिंतन त्यांनी 'ययाति'मध्ये केलेले आहे. सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व या त्रिपुटीचे ते उपासक आहेत.

'ययाति'मध्ये खांडेकरांनी अतिशय व्यापक आणि मोठ्या जीवनाशयाला स्पर्श केलेला आहे. 'ययाति' लिहिताना ज्या अस्वस्थतेने खांडेकर प्रेरित झाले आहेत, ती अस्वस्थता प्रांजळ आणि मोलाची आहे. वर्तमानकालीन जीवनाच्या अधोगतीने ते बेचैन झालेले आहेत. 'ययाति' म्हणजे वि.स.खांडेकरांच्या चिंतनशील प्रवृत्तीचा आणि काव्यात्म प्रतिभेचा कलात्मक आविष्कार आहे. 'ययाति' ही मराठी साहित्यातील एक अतिशय मौलिक अशी कलाकृती आहे.

## ३.३ श्री.ना.पेंडसेंच्या 'रथचक्र'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'रथचक्र' ही श्रीपाद नारायण पेंडसे यांची अतिशय गाजलेली आणि आवडती कादंबरी आहे. श्रीपाद नारायण पेंडसे यांनी विविध वाङ्मयप्रकार हाताळलेले असले तरी ते एक श्रेष्ठ दर्जाचे कादंबरीकार म्हणूनच ओळखले जातात. श्री.ना.पेंडसे हे १९५० नंतरच्या मराठी कादंबरीकारांमध्ये एक बिनीचे कादंबरीकार आहेत. 'एल्गार', 'हद्दपार', 'गारंबीचा बापू', 'हत्या' इत्यादी अनेक प्रादेशिक कादंबऱ्या त्यांनी लिहिलेल्या आहेत. 'रथचक्र' ही त्यांची सातवी कादंबरी सन १९६२ साली प्रसिद्ध झाली आणि तिला सन १९६३ साली साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला आहे. मराठी कादंबरीविश्वाचा विचार करावयाचा झाल्यास 'रथचक्र' ही मराठी कादंबरी वाङ्मयाच्या विश्वातील एक महत्त्वाची कांदबरी आहे. 'एका आईने आपल्या मुलाचे भले होण्याकरिता केलेली धडपड आणि त्यात तिचा झालेला जय-पराजय' हे 'रथचक्र'चे सर्वसामान्यपणे आदिम तत्त्वाकडे जाणारे कथासूत्र आहे. 'नियतीबरोबर टक्कर देणाऱ्या कर्णाचे 'रथचक्र' पृथ्वी सतत गिळते आणि कर्णाचा भव्योदात्त अंत होतो' ही मूळ दैवीकथा आहे. पेंडशांनी हा नियतीचा व माणसाचा संघर्ष एका सामान्य स्त्रीच्या संघर्षाच्या माध्यमातून 'रथचक्र'मध्ये सांगितलेला आहे. सामान्य स्त्रीजीवनाचे चक्र नियतीशी संघर्ष करताना पदोपदी चिखलात रुतत जाते आणि ती स्त्री पराभूत होऊन निरर्थक जीवन संपवू पहाते, हे 'रथचक्र' चे कथानक आहे.

'रथचक्र' ही दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकलेल्या अबलेची करुण कथा आहे. संन्याशी वृत्तीच्या नवऱ्यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीत होणाऱ्या अवहेलनेचे दु:ख आयुष्यभर पदरी घेऊन जगणाऱ्या कोकणातील एका स्त्रीची ही करुणकथा आहे. कोकणातल्या ब्राह्मणाचे बुडते कुळ, दारिद्र्याने आणि भांडणांनी विरत चाललेली ब्राह्मणांची घरे, कोकणातील माणसांच्या श्रद्धा आणि अंधश्रद्धा हे विषय श्री.ना.पेंडशांच्या कादंबऱ्यांमध्ये पुन:पुन्हा येतात. कोकणातल्या जुन्या वळणाच्या मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील स्त्रीची ही शोकांत कहाणी आहे. कोकणातल्या एका ब्राह्मण कुटुंबातील कोंदटलेल्या वातावरणात जगणारी एक ब्राह्मण 'अनामिका' ही 'रथचक्र'मधील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. पेंडशांची ही नायिका अनामिका असून ती कर्मदरिद्री आहे. 'रथचक्र' कादंबरी पूर्वीच्या श्री.ना.पेंडसेंच्या सर्व कादंबऱ्या या नायकप्रधान आहेत. मात्र 'रथचक्र' ही त्यांची पहिलीच नायिकाप्रधान कादंबरी आहे. 'रथचक्र' ही शोकात्म परिणाम साधणारी कांदबरी

आहे. त्यामध्ये संयुक्त कुटुंबात राहणाऱ्या ब्राह्मण स्त्रीची परवड कशी होती त्याचे चित्रण केलेले आहे. 'रथचक्र'च्या मुळ कथाबाजीविषयी श्री.ना.पेंडसे लिहितात- "दोन वर्षाच्या अजाण मुलाच्या गळयात तिच्या काकूने गोवऱ्याची माळ घातल्यामुळे आईच्या मनाची झालेली तडफड"[१] हे 'रथचक्र'चे मुख्य कथासूत्र आहे. याच कथाबीजाचा विस्तार होऊन 'रथचक्र'ची मूळ कल्पना सुचलेली आहे. नायिकेचे संघर्षमय जीवन हेच कथानकामध्ये पेंडसे यांनी प्रत्ययकारीपणे रेखाटलेले आहे. अनामिकेच्या वाट्याला पेंडसेनी सर्व प्रकारची दुर्दैवे घातलेली आहेत. हिचा नवरा साधू होऊन परागंदा झालेला, स्वतःला काहीही शिक्षण नाही. एकत्र कुटुंबात दीर-जावांच्या आश्रयाने ती राहते. एका संन्यासी वृत्तीच्या विद्रुप थोट्या माणसाबरोबर एका रात्रीच्या क्षणभर सुखाची चव सोडली तर तिला शारीरिक सुख असे कधीच मिळत नाही. चार पोरं पदरी टाकून तिचा नवरा पळून जातो. मुलांचे हित जपणे हेच तिच्या जीवनाचे ध्येय बनलेले असते.

एकत्र कुटुंबात जेवढं दुःख स्त्रीच्या वाट्याला येणं शक्य आहे, तेवढं सर्व दुःख पेंडशांनी तिच्या ओटीत टाकलेले आहे. हिची थोरली जाऊ मात्र हिच्यावर मनापासून माया करते. मात्र धाकटी आणि मधली जाऊ दोघीही हिला चहाडखोर, लावालाव्या करणारी म्हणून टोचत राहतात. एका शेजारच्या काकाशिवाय हिच्याबद्दल कोणालाही सहानुभूती नाही. हिचा थोरला मुलगा हातातून निसटलेला आणि काकांच्या हातातील बाहुले बनून आगरात खपणारा आहे. तिचा धाकटा मुलगा अतिशय बुद्धिमान आणि हुशार असतो. शिक्षणात विलक्षण गती असलेल्या या मधल्या मुलाचे आयुष्य मार्गी लागावे, पुढे त्यांने शिकावे म्हणून मुलाला आणि दोन मुलींना घेऊन शिक्षणासाठी ती तालुक्याला जाते. कारण या घरामध्ये शिक्षण या वस्तूशी लखनौवाला सोडला तर कुणाचाही फारसा संबंध नसतो. त्यामुळे शिक्षणाला महत्त्व न देणाऱ्या कुटुंबापासून नायिका दुरावते. तालुक्याला बिऱ्हाड करून राहताना घरातल्या आणि बाहेरच्या विरोधाला तोंड देत चिवटपणे, निश्चियाने ती जगू लागते. थोरली जाऊ हिला घर सोडून तालूक्याला जाण्यापूर्वी सांगते की, "तुम्हांला एक सांगून ठेवत्ये. या घराचे वासे पोकळ झाले आहेत. 'खुशाल जा' म्हणतील. तेवढीच चार तोंड खायला कमी! तुम्ही मात्र निवाऱ्याला मुकाल."('रथचक्र',पृ.५३) वास्तविक शिक्षणाचे पूर्ण वावडे असलेल्या घरात राहूनही आणि स्वतः अशिक्षित असूनही मुलाच्या शिक्षणाबद्दल तिला वाटणारी विलक्षण ओढ असामान्य आहे. या साऱ्या प्रवासात तिला थोरल्या जाऊचा फार मोठा आधार लाभतो. नवऱ्याने पदरात काहीच सुख टाकलेले नाही पण ज्या मुलाचा उत्कर्ष ही तिची एकमेव आशा असते. तोही तिला शेवटी अपयशच देतो. बापाच्या 'पादुका' घेऊन घरातून तो पळून जातो.

'लखनौवाला' दीर हा नायिकेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्याच्या शिक्षणामुळे त्याला जे व्यवहारी वळण लाभले आहे त्याबद्दल तिला हेवा वाटतो. ज्या घराने तिला विवाहप्रसंगी दागिने ही खोटे घातले, त्या घरात अनेक दुःख सहन करीत असताना घरातून बाहेर पडून मुलाला शिक्षण देऊन मोठा करण्याची एकच

जिद्द ती मनात बाळगते. तिचा मुलगा तालुक्यात पहिला नंबर काढतो. पण या बाईचे दुर्दैव एवढे मोठं की जिल्ह्यात पहिला येणाऱ्या या मुलाचे कौतुक करणारे कोणीचे या कुटुंबात नसते.

पेंडशांची ही अभागिनी नायिका (अनामिका) कोणत्या नक्षत्रावर जन्मलेली आहे हे निश्चितपणे सांगता येत नाही. 'रथचक्र'मधील या दुर्दैवी व दुःखी नायिकेबद्दल प्रा.चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, "पेंडशांची नायिका अनामिक आहे. (या नामकरणाच्या चर्चेला फारसा अर्थ नाही) ती येते तीच दुःखाच्या, दुर्भाग्याच्या आणि वंचनेच्या चक्रव्यूहात अडकून तडफडत. ही जन्मापासून दुर्दैवी. हिच्या वाट्याला सर्व-प्रकारची दुर्दैवं पेंडशांनी घातली आहेत. आईविना ही पोर आत्याकडे वाढलेली. वारा गेल्यामुळे तोंड वाकडे झालेली. अनेक स्थळं काही ना काही कारणाने हातातून निसटलेली. शेवटी विवाह होतो तो तडकाफडकी, एका संन्याशी वृत्तीच्या विद्रुप थोट्या माणसाबरोबर-एका रात्रीच्या क्षणभर सुखाची चव सोडली तर तिला शारीरिक सुख असं कधी मिळत नाही. मात्र चार पोरं पदरात येतात. एकूण मामला असा- या संबंधाविषयी तिला आरंभी भीती वाटे, पुढे तिरस्कार वाटू लागला. कारण 'ढोराच्या कातडीला स्पर्श करावा, आसपास आकुंचन व्हावं आणि दुसऱ्या क्षणी स्पर्शाचा मागमूस राहू नये-' रतिसुख मिळालं नाही पण पोरांचं लेंढार आणि न मिळवणाऱ्या नवऱ्याची बायको म्हणून जावांचा दुस्वास या गोष्टी तिच्या वाट्याला आल्या. यात भर म्हणून चौथ्या मुलीच्या वेळीच नवरा घर सोडून संन्यासी झाला आणि त्याची जबाबदारी हिच्या माथ्यावर मारली गेली."[१०]

तिचे संबंध एकत्र कुटुंबात जसे इतर माणसांबरोबर बिघडलेले असतात. तसे या मुलांबरोबरही सरळ आणि स्नेहाचे राहिलेले नसतात. हिच्या जीवनात सुखाचे क्षण असे येतच नाहीत आणि आले तर दुःखाची वावटळे घेऊनच येतात. धाकटा मुलगा हिच्यावर, "आई, तु लावालाव्या करतेस, सर्वांशी भांडतेस, खोटे बोलतेस" असे म्हणतो. एकदा ती लखनौवाल्याला पत्र लिहिण्यास सांगते पण मुलाला ही गोष्ट अजिबात पटत नाही. म्हणून तो म्हणतो, "माझं शिक्षण झालं नाही तरी चालेल. ह्या माणसाची मेहेरबानी मला नको. सख्ख्या भावांना जो घरगड्यासारखा राबवतो. त्याचं थोबाड पाह्यची सुद्धा इच्छा नाही." ('रथचक्र',पृ.८८) त्याचे हे शब्द ऐकून ती दुःखी होती. हा मुलगाही शेवटी घरच्याच वळणावर जाणार या गोष्टीची तिला धास्तीच वाटत राहते. आता नवऱ्याप्रमाणेच हा ही पळून जाणार नाही ना? असा प्रश्न तिला सतत भेडसावात असतो. म्हणूनच पेंडसे लिहितात, "संर्पदशाच्या ठिकाणी कोंबड्या लावाव्यात त्याप्रमाणं आपल्या आयुष्याची गत झाली आहे हे तिच्या लक्षात आलं. तो दिवस तिच्या आयुष्यातील महत्त्वाचा होता. जणू ते विष खरोखर तिच्या अंगात भिनू लागलं. तिचं स्वरूप पालटलं, मन पालटलं. तिला कसला ताळतंत्र राहिला नाही. गुदमरलेली उष्णता खरजेच्या रूपानं सर्वांगावर फुटावी त्याप्रमाणं तिची अवस्था झाली.

आयुष्यातील एक गाठ तिला सोडविता आली नाही. आणि तिनं अनेक निरगाठी निर्माण केल्या." ('रथचक्र',पृ.८१)

शेवटी तिने मौनीबुवाच्या पादुकांची पूजा करून पराभव पत्कलेला आहे. पण तो पराभवही तिने आपल्या मुलांसाठी पत्करलेला आहे. तिच्या पाठीमागे नवऱ्याची पुण्याई आहे असे काकासकट सर्वच मानतात. नवऱ्याच्या पुण्याईची सावली तालुक्यालाही हिच्या पाठीमागे येते. प्रत्येक वेळी नियती तिची अशी निराशाच करीत असते. शेवटच्या टप्प्यात नियतींने तिला सतत फरफटत आणि ओढत नेलेले आहे. थोटीच्या साहाय्याने ती नरवणकरांकडे नोकरी करीत असते. परंतु त्या ठिकाणी काम करून करून शेवटी ती आजारी पडते. उदरनिर्वाहासाठी शेवटी ती हातातल्या पाटल्या विकायला जाते. पण त्या पाटल्या पितळेच्या असल्याचे सोनार सांगतो. म्हणजेच पुन्हा नियती तिच्या प्रयत्नामध्ये अंधार निर्माण करते. शेवटी घरातील डब्यातल्या आठिळ्या शिजायला घालते. परंतु मुली ते खाण्यास नकार दर्शवतात. या बाईमध्ये निबरपणाच्या पातळीवर येणारा व्यवहारीपणा आहे. मुलीला वाण्याच्या घरी खायला प्यायला मिळत आहे तेव्हा ती त्याकडे कानाडोळा करते. मुलाच्या फॉर्मचे पैसे कोठून आले याची चौकशी ही जिद्दीची बाई करीत नाही. कृष्णाबाईकडून भरपूर अन्न आणि कापडचोपड मिळत असते याचाही ती अधिक खोलात जाऊन वेध घेत नाही.

'रथचक्र'चा शेवट मात्र आश्चर्यजनक संगतीपूर्ण झालेला आहे. नायिकेच्या आत्महत्येची इच्छा पूर्ण होत नाही. आत्महत्या करण्यापूर्वी पितळेचं स्त्रीधन द्रोणात काढून तिला सासरच्या माणसांबद्दल विचार व्यक्त करायचा असतो. पण उडी मारण्याच्या आधीच ती घसरून पडते. तिने जसे जीवन निबर व्यवहारीपणाने घट्ट पकडून ठेवले होते तशीच रहाटाची माळ तिच्या हातात होती. पण तिला मरणाचंही स्वातंत्र्य नव्हतं व धैर्यही नव्हतं. दुसऱ्याच्या मदतीशिवाय वर येणंही अशक्य होतं. तिच्या सर्वच जीवनावरचं हे प्रतीकात्मक भाष्य अगदी औचित्यपूर्ण आहे.

'कृष्णाताई' ही श्री.ना.पेंडसे यांची वादग्रस्त व्यक्तिरेखा आहे. वाङ्मयीन कारणांव्यतिरिक्त ज्या वाङ्मय बाह्य कारणांमुळे 'रथचक्र'ला अमाप प्रसिद्धी लाभलेली आहे. त्यातील एक महत्त्वाचे कारण 'कृष्णाताई' ही व्यक्तिरेखा आहे. कृष्णाताई ही अ-भारतीय वाटते येथपासून तो सारे कृष्णाताई प्रकरणच अश्लील वाटते येथपर्यंत वेगवेगळे आक्षेप घेण्यात आलेले आहेत. जितक्या जोरकसपणे या व्यक्तिरेखेवर टीका झालेली आहे. तितक्याच हिरिरीने तिचे समर्थनही करण्यात आलेले आहे. नायिकेला व्यथित आणि दुःखी करणारी बातमी स्वतः हेडमास्तरच मुलगा आणि कृष्णाताई संबंधाविषयी नायिकेला घरी येऊन सांगतात. कृष्णाताईसंबंधी माहिती असूनही आपल्याच सुखासाठी मुलाला तिथे कामाला ठेवल्याचा कबुली जबाब ती देते. या संदर्भात प्रा.चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, "मुलाची आई कृष्णाबाई प्रकरणी त्याच्या

बाजुनं उभी राहू शकत नाही. कारण ती मुलाला समजून घेऊ शकत नाही. ती ताकद तिच्यामध्ये नसते. या प्रकरणात आईसारखं ही वागली नाही. त्याचा आघात मुलाच्या मर्मावर बसला. या सर्व प्रसंगातून तिचं रूप जे उभं राहातं ते जीवनाची फारशी समज नसलेली संवेदनाजड स्त्री असंच राहातं."[११]

'रथचक्र'चे पेंडशांच्या इतर कादंबऱ्याच्या तुलनेत एक वेगळे वैशिष्ट्य असे की, पेंडशांच्या भावजीवनाशी अतिशय जवळचे नाते सांगणारी ही कादंबरी आहे. डॉ.रवींद्र शोभणे हे 'रथचक्र' कादंबरीच्या सामर्थ्याबद्दल लिहितात की, "पेंडशाची 'रथचक्र' ही त्यांच्या कादंबरीविश्वापुरतीच नव्हे तर एकूणच मराठी कादंबरीविश्वात मैलाचा दगड ठरणारी, तंत्र आणि आशयाचे संमिश्र पोत विणणारी अशी एक श्रेष्ठ कलाकृती ठरते. लेखकाचे अनुभवविश्व त्यांच्या भावविश्वाशी एवढे जवळचे नाते सांगणारे असूनही पेंडशांनी निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या ताटस्थाचे पुरेपूर भान ठेवले आहे. अभिजात वाङ्मयात जाणवणारा संयम हे 'रथचक्र'चे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. कृष्णाताईसारखी व्यक्तिरेखा निर्माण करून पेंडशांनी मराठी साहित्यातील सोवळेपणाला विलक्षण धक्का दिलेला आहे आणि कलावंताच्या कलास्वातंत्र्याच्या मर्यादा अधिक विस्तृत केलेल्या आहेत. उद्धव शेळकेंच्या 'धग' नंतर मराठी कादंबरीतील आई ही फक्त आई न राहता ती आपले नाते आदिमतत्त्वाशी शोधण्याचा प्रयत्न करणारी कादंबरी म्हणून 'रथचक्र'चा अतिशय गौरवपूर्वक उल्लेख करता येईल."[१२]

तालुक्यावरून 'ती' घरी परत जाते त्यावेळी थोरल्या जाऊला देवाज्ञा झालेली आणि मोठ्या मुलाची बायको कर्ती झाल्याचे समजते. आता आपल्या आयुष्याला काहीच अर्थ उरलेला नाही म्हणून ती विहिरीत उडी टाकण्याचा प्रयत्न करते. आत्महत्येच्या प्रयत्नात रहाट हाती लागल्यामुळे त्या रहाटाला गच्च धरून ती जीवन मृत्यूच्या काठावर उभी राहते.मन मारत जगत राहणारी, काहीशा निरंगी व्यक्तित्त्वाची नायिका तिच्या तसल्याच राखाडी आयुष्याचे प्रत्यावर्तन फ्लॅशबॅक व पूर्वस्मृतीचे कथन या पद्धतीने चित्रण करणारी ही कादंबरी पेंडशांच्या तंत्रावरील व शैलीवरील प्रभुत्त्वाचे दर्शन घडवते. कोकणातील प्रदेश, तेथील ब्राह्मण संस्कृती यांचे चित्रण 'रथचक्र'मध्ये आलेले असले तरी, प्रादेशिकतेच्या मर्यादा ओलांडणारी ही कादंबरी 'ती' आणि 'थोरली' यांच्या आयुष्याच्या निरर्थकतेचे गहिरे पीळ उलगडत राहते. पेंडशांच्या प्रवाही निवेदनाचे आणि प्रत्ययकारी जिवंत भाषेचे प्रत्यंतर 'रथचक्र'मध्ये जागोजागी पाहावयास मिळते. 'रथचक्र' ही श्री.ना. पेंडसे यांची आशयाच्या आणि कलात्मकतेच्या दृष्टीने अतिशय यशस्वी ठरलेली कादंबरी आहे. ह्या कादंबरीचा आशयच मुळात आदिम तत्त्वाला स्पर्श करणारा असा आहे. श्री.ना.पेंडसेंच्या 'रथचक्र'ने मराठी कादंबरीविश्वाला नवी दिशा दिलेली आहे.

'रथचक्र'ची नायिका नियतीशी सतत हुतूतूचा खेळ खेळत राहते. नायिकेची अखेर शोकात्म रूप धारण केल्याचे आढळते. तिच्या या शोकात्मिकेला स्वतः नायिकाच जबाबदार आहे. या संदर्भात श्रीमती

म.गं.नातू यांनी नोंदविलेला अभिप्राय लक्षात घेणे योग्य ठरेल. त्या म्हणतात, "श्रद्धा आणि विवेक हा 'रथचक्र'च्या संघर्षाचा कणा आहे."[१३] तिची अश्रद्ध क्रियाशीलता आणि तिच्या नवऱ्याची श्रद्धामय क्रियाशीलता यांच्या परस्पर विरोधी विणीने 'रथचक्र'चा पोत विणला गेलेला आहे. 'रथचक्र'ची नायिका या अश्रद्धेमुळेच भारतीय जनमानसाला पटणे कठीण आहे.

थोडक्यात, मराठी कादंबरीस एक नवे परिमाण 'रथचक्र' या कादंबरीमुळे लाभलेली आहे. या सदंर्भात श्री.ना.पेंडसे यांनी 'रथचक्र'च्या संदर्भात व्यक्त केलेला अभिप्राय अतिशय बोलका आहे. लेखक श्री.ना.पेंडसे म्हणतात, "कादंबरीच्या विविध अंगांचा विचार 'रथचक्र' लिहीपर्यंत मी केला नव्हता. माझ्या कादंबऱ्यापुरतं बोलाचयं तर 'रथचक्र' ही माझी सर्वात यशस्वी कादंबरी असं मी मानतो. सुदैवाने तिची उपेक्षा झाली नाही. त्याचं एक प्रत्यंतर म्हणजे या कादंबरीची पहिली आवृत्ती संपायला पुरी दोन वर्षंही लागली नाहीत. खपाच्या दृष्टीने माझ्या कादंबऱ्यातील हा उच्चांक आहे. 'रथचक्र'च्या वाट्याला हे श्रेय आलं ह्याला अनेक कारणं आहेत. त्यांपैकी एक महत्त्वाचं कारण असं की ह्या कादंबरी भोवती मोठं वादंग माजलं. तिच्यातील ओंगळ शब्द काहींना खटकले. काहींना 'कृष्णाबाई' अश्लील वाटली, तर काहींना तंत्राचा अतिरिक्त जाच मी स्वतःवर लादून घेतला असं वाटलं. काहींना कांदबरीतील लेखकाचा अलिप्तपणा प्रमाणाबाहेर झाला आहे असं वाटलं. काहींना मराठी कादंबरीच्या विकासाने 'रथचक्र'मुळे एक नवा टप्पा गाठल्यासारखं वाटलं, तर काहींना हे विधान अतिश्योक्तीचं वाटलं."[१४] श्री.ना.पेंडसे यांच्या 'रथचक्र' या कादंबरीने मराठी प्रादेशिक कादंबरीच्या क्षेत्रात मोलाची भर घातलेली आहे.

## ३.४ रणजित देसाईंच्या 'स्वामी'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'स्वामी' ही रणजित देसाई यांची कादंबरी सन १९६२ मध्ये प्रकाशित झालेली असून तिला सन १९६४ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला आहे. मराठीमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली व रसिकमान्यता पावलेली कादंबरी म्हणून 'स्वामी'चा उल्लेख केला जातो. रणजित देसाईंनी 'स्वामी'(१९६२), 'बारी'(१९७७), 'पावनखिंड'(१९८१), 'लक्ष्यवेध'(१९८४), 'श्रीमानयोगी'(१९८४), 'माझा गाव'(१९८६), 'राजा रविवर्मा' (१९८६) आणि 'राधेय' (१९८६) इत्यादी सुप्रसिद्ध कादंबरी लिहिलेल्या आहेत. सन १९७३ साली त्यांना 'पद्मश्री' हा किताब मिळालेला आहे. त्यांच्या 'स्वामी' आणि 'श्रीमानयोगी' या दोन ऐतिहासिक कादंबऱ्यांनी प्रसिद्धीचे उच्चांक मोडलेले आहेत. त्यांच्या 'स्वामी' या कादंबरीने तर ऐतिहासिक कादंबरीची स्वतंत्र परंपराच निर्माण केलेली आहे. माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांच्या कर्तृत्वाचे आणि कर्तबगारीचे चित्र 'स्वामी'मध्ये प्रभावीपणे रेखाटण्यात आलेले आहे.

पानिपतच्या पराभवानंतर खचलेल्या मराठी दौलतीला सावरण्याची मोठी जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतलेल्या माधवराव पेशव्यांची आणि त्यांच्या मृत्यूनंतर पतीसह सती गेलेल्या त्यांच्या पत्नी रमाबाई यांची ही चरित्रगाथा 'स्वामी'मध्ये वर्णिलेली आहे. मराठी ऐतिहासिक कादंबऱ्यांत मानदंड ठरणारी आणि ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित करणारी कादंबरी म्हणून 'स्वामी'चा उल्लेख केला जातो. 'स्वामी'च्या निर्मितीस कारणीभूत ठरलेल्या प्रेरणांचा शोध घेत असताना माधवराव पेशव्यांनी सन १९४८ मध्ये गांधी हत्येच्या निमित्ताने झालेल्या जाळपोळीच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी लिहिण्याचा विचार मनात आल्याचे एका मुलाखतीत स्पष्ट केलेले आहे. तसेच 'स्वामी' ही कादंबरी आपल्याला इ्वाईगच्या 'मेरी क्वीन ऑफ स्कॉट्स' आणि 'मेरी अँटोनेट' या दोन चरित्रांवरून सुचल्याचाही उल्लेख त्यांनी 'ललित'मधील 'चौकश्या'त स्पष्ट केलेले आहे.

रणजित देसाईंच्या 'स्वामी'चे कथानक जुलै १७६१ ते नोव्हेंबर १७७२ या एकूण अकरा वर्षांचे आहे. 'स्वामी'चे कथानक तीन भागामध्ये विभागलेले असून माधवराव पेशव्यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी पेशवाईची वस्त्रे परिधान केली येथपासून ते अठ्ठाविसाव्या वर्षापर्यंत म्हणजेच माधवरावांच्या मृत्यूपर्यंतचा काळ 'स्वामी'मध्ये शब्दबद्ध केलेला आहे. 'स्वामी'मध्ये माधवराव पेशवे ही व्यक्तिरेखा आणि या व्यक्ति-रेखेचे भावजीवन हाच अनुभव केंद्रस्थानी आहे. माधवराव पेशवे ही व्यक्ती इतिहासातील असल्यामुळे आणि त्या काळातील पेशवाईमधील कौटुंबिक कलह, नागपूरकर भोसले, निजाम आणि हैदर यांच्याशी संबंधित राजकारण व लढाया इत्यादींचा अपरिहार्यपणे उल्लेख 'स्वामी'मध्ये आलेला आहे. माधवरावांच्या पहिल्या दरबाराच्या प्रसंगाने कादंबरीची सुरुवात होऊन माधवरावांच्या चितेवर रमाबाई बसलेल्या आहेत या प्रसंगाने कादंबरीचा शेवट झालेला आहे. माधवरावांचे खाजगी जीवन, पतीपत्नींमधील आर्त-व्याकूळ प्रेमबंध, त्यातून निर्माण होणारे ताण अथवा युद्ध या सर्व गोष्टींमुळे ही कादंबरी नाट्यपूर्ण आणि रंजक बनलेली आहे. या कादंबरीतील माधवराव-रमाबाई यांचे भावजीवन हे सर्वात महत्त्वाचे कल्पित आहे. म्हणूनच माधवराव-रमाबाई यांच्या भावजीवनाची शोकान्तिका हेच या कादंबरीचे आशयसूत्र आहे.

रणजित देसाईंनी 'स्वामी' ही कादंबरी लिहिण्यासाठी अथक परिश्रम घेतलेले आहेत. याविषयी प्रस्तावनेत त्यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया लक्षात घेणे योग्य वाटते. ते लिहितात," 'स्वामी'चा विषय मला सोपा वाटला. अनेक जाहीर भाषणांमधून मी याविषयी बोललो आहे. ऐतिहासिक कथा लिहिणं आणि कादंबरी लिहिणं आणि तीही एका जीवनावर, ही अत्यंत अवघड गोष्ट. जेव्हा मी कादंबरी लिहू लागलो, तेव्हा मला हा अवघडपणा जाणवू लागला. अस्वस्थपणानं मी अनेक ठिकाणं पालथी घातली. अनेकांच्या

भेटी घेतल्या. या फिरण्यातून, भेटीतून 'स्वामी' साकारत गेली."[१५] रणजित देसाईंनी 'स्वामी'च्या लेखनाचे आव्हान लीलया पेलल्यामुळेच तिला उदंड प्रतिसाद मिळालेला आहे.

'स्वामी'मध्ये माधवराव पेशव्यांचे चित्र रेखाटताना इतिहासाशी पूर्णपणे इमान राखलेले आहे. रियासतकार सरदेसाईंनी "मराठी राज्याचा माधवराव पेशवा हा दैदिप्यमान अलंकार होय." असे म्हटलेले आहे. रणजित देसाईंनी 'स्वामी'मध्ये हाच गौरव साकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सोळा वर्षाचे माधवराव पेशवे हे खऱ्या अर्थाने पेशवे झाल्याचे दर्शविणाऱ्या या प्रसंगानंतर येणाऱ्या शहाण्णव प्रसंगातून ही कादंबरी साकार झालेली आहे. 'स्वामी'मधील काही प्रसंग हे कौटुंबिक पेचप्रसंगाचे आणि सुखसंवादाचे आहेत. तर काही प्रसंग हे राजकारणाच्या संदर्भातील आणि रणांगणांवरचे आहेत. माधवरावांच्या कुटुंबातील व राजकीय वातावरणातील व्यक्तींचे स्वभावदर्शन लेखकांने मोठ्या कौशल्याने घडविलेले आहे. माधवराव पेशवे ही या कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. रामशास्त्र्यांचा स्पष्टवक्तेपणा व न्यायनिष्ठुरता, आनंदीबाईला रमाबाईंविषयी वाटणारा सूक्ष्म मत्सर आणि राघोबाच्या विलासीपणाविषयी मनात असणारी खंत, मल्हारराव होळकरांची स्वामीनिष्ठा व धोरणीपणा असे ऐतिहासिक व्यक्तींचे नानाविध स्वभावविशेष रणजित देसाई यांनी मोठ्या कौशल्याने साकार केलेले आहेत.'स्वामी' कादंबरीच्या प्रारंभी -

"मांगा करें अबसे दुवा हिजरे यार की
आखिर तो दुष्मनी है, असर को दुवा के साथ"('स्वामी',प्रास्ताविक,पृ.५)

हा शेर दिलेला आहे. कादंबरीच्या शेवटी रोगाने जर्जर झाल्यामुळे शारीरिक आणि फंदफितुरीमुळे मानसिक अशा दोन्ही बाजूने कोंडी झाल्याने माधवराव अतिशय हळवे बनतात. माधवरावांच्या या अवस्थेतील मनाच्या भावनिक आंदोलनाचे रेखाटन लेखकाने यशस्वीपणे केलेले आहे. पेशवाईच्या ढासळलेल्या प्रतिष्ठेला पुन्हा मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी लढवलेले डावपेच, त्याकामी त्यांना झालेला त्रास, त्यातूनही स्वकर्तृत्वाच्या बळावर निजाम, हैदर यांच्यावर केलेली मात आणि सर्व करत असताना प्रकृतीकडे झालेले दुर्लक्ष, क्षयासारख्या जीवघेण्या रोगाचा शरीरात झालेला प्रवेश इत्यादींचे वर्णन करताना माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वातील रंगछटा लेखक कौशल्याने रेखाटतात. सुप्रसिद्ध इतिहासकार ग्रँट डफ हे माधवरावांच्या मृत्यूबद्दल म्हणतात, "या तरुण पेशव्याचा अकाली मृत्यू म्हणजे मराठी साम्राज्याच्या जिव्हारी बसलेला घाव, त्यापुढे पानपताचा आघात काहीच नाही."[१६] माधवरावांचा मृत्यू हा पेशवाईवर झालेला मोठा आघात आहे, हे ग्रँट डफ सारख्या अभ्यासकानेही मान्य केलेले आहे.

रणजित देसाईंनी माधवरावांचे कौटुंबिक जीवन भावनात्मकतेने चित्रिलेले आहे. माधवरावांना पानिपतावरील विश्वासरावांच्या मृत्यूने आणि पानिपतच्या अपयशानंतर अनाहूतपणे पेशवेपद मिळालेले

आहे. माधवरावांना पेशवेपद मिळाल्यानंतर पेशवाईची विस्कटलेली घडी पूर्ववत करताना स्वतःच्या व्यक्तिगत सुख-दुःखाकडे अधिक लक्ष देण्यास वेळ मिळालेला नाही. या धावपळीतून राजयक्ष्म्यासारख्या दुर्धर असहाय रोगाने पछाडल्यानंतरही त्यांना राज्याच्या कल्याणाचीच अधिक काळजी आहे. म्हणूनच माधवराव पेशवे हे त्यांचे आराध्य दैवत असलेल्या श्री गजाननाला साकडे घालताना म्हणतात, "गजानना, आता तूच समर्थ आहेस. आता मी थकलो. आता तुझ्याखेरीज आश्रयाचं ठिकाण नाही. तुझ्या आशीर्वादानं तुंगभद्रेपासून अटकेपर्यंत परत राज्य उभं राहिलं, पण ते अद्यापि स्थिरस्थावर झालं नाही. राज्य उपभोगा-साठी नको, पण दौलतीसाठी आणखीन चार वर्ष मिळाली, तरी अधुरी राहिलेली स्वप्न साकार होऊन राज्य स्थिरस्थावर होऊ शकेल. ते आता तुझ्या हाती आहे. तूच आमच्या मस्तकी चढविलेला यशाचा तुरा आज तुझ्या पायांशी ठेवला आहे. जे यश मिळालं, जे हातून घडलं, ते सारं तुझंच आहे. जे होणार आहे, तेही तुझ्याच इच्छेनं घडू दे."('स्वामी',पृ.३३७) या त्यांच्या उद्‌गारातून त्यांची राजनिष्ठा आणि कर्तव्यनिष्ठा कशा स्वरूपाची होती याची आपणाला कल्पना आल्याशिवाय राहत नाही.

रणजित देसाईंनी 'स्वामी'च्या पहिल्या भागात माधवराव पेशव्यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी पेशवाईची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर लगेचच त्यांनी निजामावर पहिली स्वारी केली. या स्वारी-पासूनच माधवरावांचे आणि राघोबादादा यांच्यात वैमनस्य सुरु झाले. राक्षसभुवनच्या लढाईत पेशव्यांचा फार मोठा विजय होतो इथपर्यंतचा इतिहास कथित केलेला आहे. या पहिल्या भागामध्ये लेखकांने माधवराव आणि राघोबादादा यांच्यातील वैराचा पूर्वरंग व माधवरावांच्या कर्तृत्वाची ओळखही करून दिलेली आहे. 'स्वामी'च्या त्यानंतरच्या १४१ पृष्ठांच्या दुसऱ्या विभागामध्ये राघोबांना कैद करण्याची माधवरावांवर आलेली पाळी आणि कनकपुरास भोसल्यांशी झालेल्या तहापर्यंतची हकिकत सांगितलेली आहे. वयाच्या चोविसाव्या वर्षापर्यंतच्या या सर्व उलाढालीत माधवराव पेशवे जो सावधपणा आणि मुत्सद्देगिरी दाखवितात तो वाखाणण्याजोगा आहे. तर 'स्वामी'च्या शेवटच्या ११६ पृष्ठांच्या तिसऱ्या भागात माधवराव आणि रमाबाई यांच्या दांपत्य जीवनाचे भावपूर्ण चित्र रेखाटण्यात आलेले आहे. राघोबांची फितुरी आणि कैद या घटनेला ह्या भागात गौण स्थान देण्यात आलेले आहे. रमा-माधवांचे कौटुंबिक जीवन अतिशय भावोत्क-टपणे रंगविलेले आहे. रमाबाई ह्या माधवरावांशी समरस झालेल्या आहेत. माधवरावांचे कर्तृत्व आणि कर्तव्य हेच तिचे भावविश्व आहे. माधवरावांचे प्रेमाचे आणि मन मोकळे करण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे रमाबाई ह्या आहेत. म्हणूनच राज्याच्या कर्तव्यात पूर्णपणे यशस्वी झालो परंतु कौटुंबिक जीवनात मात्र आपण पूर्णपणे अपयशी ठरल्याची खंत माधवराव हे रमाबाईजवळ व्यक्त करतात. पेशवाईची धुरा सांभाळत असताना माधवरावांना रमाबाईंकडे लक्ष देता आले नाही. याबद्‌दलची खंत व्यक्त करताना

रमाबाईला म्हणतात, "राजे म्हणून राज्याची जबाबदारी पेलत असता पती ह्या नात्यानं केवढं लक्ष तुझ्याकडे दिलं? पण रमा, मी ते मुद्दाम केलं नाही. ती उसंतच मिळाली नाही. जेव्हा मिळेल, अशी आशा वाटली, तेव्हा ह्या व्याधीनं गाठलं. कशी कल्पना यावी, की वयाच्या अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी सारं आटोपेल? राज्याची स्वप्नं साकार झाली, पण संसाराची स्वप्नं तशीच राहून गेली. आता त्यांना काही अर्थ उरलेला नाही......."('स्वामी',पृ.३९८) अशाप्रकारे आपल्या मृत्यूची समीपता आलेली असतानाही या जन्मामध्ये आपल्या पत्नीवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी तिच्या सहवासाची अपेक्षा व्यक्त करतात.

माधवराव पेशव्यांनी अस्ताव्यस्त झालेल्या, विखुरलेल्या राज्यात अवघ्या अकरा वर्षात एकसूत्रीपणा आणलेला आहे. राज्याची विस्कटलेली घडी बसविताना त्यांना बालपण आणि तारुण्याची आठ-दहा वर्षे या यज्ञकुंडात आहुतीसारखी टाकावी लागलेली आहेत. रमाबाईलाही प्रारंभापासून ते शेवट-पर्यंत या यज्ञाची झळ सोसावी लागलेली आहे. पेशव्यांची परंपरा नसतानाही रमाबाईंनी सती जाऊन समर्पणाची, त्यागाची आणि बलिदानाची उत्तुंग झेपच घेतलेली आहे. लेखकाने माधवराव पेशव्यांच्या या एकटेपणाचा आणि अपयशाचा बऱ्यापैकी वेध घेतलेला आहे. पेशवाईचे राज्य स्थिरस्थावर करणारा आणि मराठेशाहीचे मोठेपण मिरविणारा हा पेशवा वैयक्तिक जीवनात मात्र खूपच अपयशी ठरलेला आहे.

माधवराव पेशवे हे आपल्या पत्नीसमोर आपल्या आयुष्याचा लेखाजोखा मांडताना म्हणतात, "तुझ्यासारखे सात्त्विक, सुंदर प्रेम दाराशी असूनही त्यापर्यंत आमचे हात पोहोचू शकले नाहीत. आज नौबती झडताहेत, त्या राज्याच्या यशाच्या, माझ्या नव्हेत. प्रत्येक मनुष्य आपल्या आयुष्याकडे पाहूनच जीवनाचे यश-अपयश अजमावतो. ते माप हाताशी धरले. तर अपयशाखेरीज तुझ्या पतीच्या हाती काहीही राहिले नाही. तो एकटा जन्माला आला, अखेरपर्यंत एकटा राहिला. आशा राहिली, ती फक्त तुझ्या सोबतीची. तेवढी मिळाली, तरी पुष्कळ मिळालं........"('स्वामी',पृ.४०७) रणजित देसाईंनी रमा-माधव यांची अपुरी राहिलेली प्रेमगाथा चित्रात्मक शैलीतून उभी केलेली आहे. अकालीच प्रौढ झालेले माधवराव आणि शैशवातून प्रौढतेकडे विकसित होत जाणारी रमा यांच्या तरल प्रेमाचे प्रगाढ आणि प्रौढ होत जाणारे हे रूप देसाईंनी तितक्याच समर्पक पद्धतीने रेखाटलेले आहे. "अल्लड रमेचे, प्रौढ प्रेयसीचं आणि समर्पित पत्नीचे हे शोकान्त चित्रण 'स्वामी' या कादंबरीच्या भावसमृद्धतेतले एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच ही कादंबरी म्हणजे रणजित देसाई या कलावंताच्या रोमँटिक वृत्तीला जाणवलेले, हवे असलेले जे रमा-माधव यांचे सहजीवन त्याची ही एक स्वतंत्र इतिहासाहून वेगळी अशी भावकादंबरी आहे."[१७] असे व.दि.कुलकर्णी यांनी म्हटलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्याबद्दल माधवरावांच्या मनात असणारा नितांत आदर, माधवरावांचे पत्नीवरील उत्कट प्रेम, मृत्यूशय्येवर वावरत असताना त्याविषयी केलेले चिंतन आणि शेवटी अल्पवयातच झालेले देहावसान, पतीवरील प्रेमापोटी रमाबाईंनी केलेले सहगमन इत्यादी बाबींचे अतिशय सुरेख वर्णन 'स्वामी'मध्ये रणजित देसाईंनी केलेले आहे. 'स्वामी' या कादंबरीच्या तिसऱ्या भागात रमाबाई आणि माधवराव यांच्या सहजीवनाची मीमांसा करताना प्रा.द.भि.कुलकर्णी म्हणतात, "अंतःकरणात आप्तां-बद्दलचे प्रीतिमूल्य जपणारा, पण कर्तव्यनिष्ठ व म्हणून करडा, कठोर झालेला माधवराव आणि पतीबद्दल निरपेक्ष प्रेम असणारी आणि आत्मसमर्पणाने दुसऱ्या जन्मीही त्याच्यावर प्रेम करावयास निघालेली रमा-यांच्यात कादंबरीच्या तिसऱ्या अखेरच्या भागात नैतिक उंची गाठण्याची एक 'उदात्त' स्पर्धाच लागते."[१८] असे गौरवोद्गार ज्येष्ठ समीक्षक द.भि.कुलकर्णी यांनी काढलेले आहेत. त्याचा प्रत्यय आपणाला 'स्वामी' या कादंबरीच्या उत्तरार्धात पानापानांवर पहावयास मिळतो.

रणजित देसाईंची 'स्वामी' ही व्यक्तिकेंद्रित कादंबरी आहे. माधवराव ही त्यातील प्रमुख व्यक्तिरेखा असून ते पेशवेपदावर असलेले मराठी राज्याचे स्वामी आहेत. तर त्यांच्या धर्मपत्नी असलेल्या रमाबाई ह्या गृहस्वामी आहेत. 'स्वामी'मधील माधवराव ही आजवरच्या त्यांच्या सर्व व्यक्तिरेखांतील एक सर्वश्रेष्ठ व्यक्तिरेखा आहे. परंतु माधवरावांची व्यक्तिरेखा उभी करताना इतर व्यक्तिरेखांकडेही रणजित देसाईंनी दुर्लक्ष केलेले नाही. चंचल मनाचा, लंपट नि कुटिल राजकारणी राघोबादादा, पतिनिष्ठ, सोशीक, त्यागी आणि साध्वी रमाबाई, न्यायनिष्ठुर व निःस्पृह रामशास्त्री, घरभेद्यांचे राजकारण करणारा धूर्त सखारामबापू, पोरसवदा, अपरिपक्वबुद्धी असणारा नारायणराव आणि त्यांच्या पत्नी गंगाबाई इत्यादी अनेक व्यक्तिरेखा स्वयंपूर्ण आणि ठसठशीतपणे रंगविलेल्या आहेत.

'स्वामी' ही ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली व्यक्तिप्रधान कादंबरी असल्यामुळे पेशव्यांच्या काळातील राजे-राण्या, सरदार-दरकदार, पालख्या-मेणे, दरबार-महाल, हुजरे-मुजरे इत्यादी घटना, प्रसंगांच्या साहाय्याने लेखकाने उत्कृष्ट वातावरणनिर्मिती केलेली आहे. श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या राज्याचे, दरबाराचे आणि वाड्याचे चित्रण करताना 'श्रीमंतीचे' दर्शन जास्तीत जास्त प्रभावीपणे कसे घडविता येईल याकडे रणजित देसाईंनी विशेष लक्ष दिलेले आहे. तसेच 'स्वामी'च्या यशात इतर घटकांबरोबरच तिच्या भाषाशैलीचाही मौलिक वाटा आहे. वर्तमान आणि इतिहासाची सांगड घालणारी मोहक भाषाशैली हेही 'स्वामी'च्या लोकप्रियतेचे एक महत्त्वाचे कारण आहे. उत्कृष्ट प्रसंगचित्रण,वातावरण-निर्मिती कौशल्य, चिंतनशील स्वगत, नाट्यपूर्ण संवाद, विचारप्रवर्तक वाक्ये, शब्दा-शब्दांतून जाणवणारे सूचकतेचे सामर्थ्य ही 'स्वामी'तील भाषाशैलीची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत.

माधवराव पेशव्यांचा मृत्यू व रमाबाईंचे सहगमन याचे विस्तृत वर्णन कादंबरीच्या शेवटच्या पंचवीस-तीस पानांत आलेले आहे. रमा-माधवांचा अंत आणि त्यामुळे उपस्थितांना झालेला शोकही आपल्या हृदयाला भिडल्याशिवाय राहत नाहीत. म्हणूनच ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा हे "'स्वामी' ह्या कादंबरीस एक दर्जेदार शोकांतिका"[१९] असे म्हणतात. 'स्वामी'ने मराठी ऐतिहासिक कादंबरीकडे वर्तमानाच्या दृष्टिकोनातून कसे पाहावे याचा दृष्टिकोन दिलेला आहे. वर्तमानातील जीवनसंस्कृतीचे धागे माधवराव-रमाबाईंच्या भावकहाणीशी कादंबरीकाराने जुळविले हे 'स्वामी'चे फार मोठे यश आहे. माधवरावांच्या कर्तृत्वाच्या शोधातून रमा-माधवाच्या भावकथेचा घेतलेला शोध हे सुद्धा 'स्वामी'चे उल्लेखनीय यश आहे. रणजित देसाईंनी माधवरावांच्या ऐतिहासिक-सार्वजनिक जीवनाप्रमाणेच त्याचे खाजगी आणि कौटुंबिक जीवनही 'स्वामी'मध्ये सांगितलेले आहे.

रमाबाई सती जाण्याच्या तयारीला लागल्याचे वर्णन करताना त्यातील प्रत्येक शब्द न् शब्द करुणरसात आकंठ बुडाल्याचे जाणवते. परंतु सतीच्या प्रसंगाचे करुणरसपूर्ण वर्णन मात्र अधिक लक्षणीय आणि परिणामकारकरित्या रेखाटले गेलेले आहे. कादंबरीच्या शेवटी येणाऱ्या या वर्णनाबरोबरच 'स्वामी' कादंबरीचा शेवट करताना रणजित देसाई लिहितात, "चिता चोहोबाजूंनी धडधडत होती. ज्वाला वर चढत होत्या. चितेभोवती हिरवे टोकदार वासे घेऊन उभे असलेले राखणदार, ढोलकरी चकित नजरेने त्या ज्वालांकडे पाहत होते. नगारे, ढोलकीवाले, टिपऱ्या सरसावून उभे होते. फुटणाऱ्या लाकडांखेरीज काही आवाज कानांवर येत नव्हता. पाहता पाहता ज्वाला धडाडू लागल्या........... काही दिसेनासे झाले. क्षणभर दर्शन झाले ते ज्वालांच्या सोबतीने फडफडणाऱ्या रेशमी श्वेतपदराचे!"('स्वामी',पृ.४१३) रमाबाईंच्या या सती जाण्याच्या वर्णनातून लेखकाने पावित्र्य, मांगल्य, त्याग, निष्ठा, श्रद्धा प्रकट होत असतानाच अग्नीची दाहकता आणि भयानकताही लेखकाने रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'स्वामी' कादंबरीच्या लोकप्रियतेचे वर्णन करताना म.श्री.दीक्षित म्हणतात, "'स्वामी' कादंबरीचा एकाच शब्दाने गौरव करायचा, तर मी तिला थोरल्या माधवराव पेशव्यांची चरित्रगंगा म्हणेन."[२०] अशा शब्दांत गौरव केलेला आहे. रणजित देसाईंच्या 'स्वामी' कादंबरीस पुरस्कार देऊन साहित्य अकादमीने ऐतिहासिक कादंबरीच्या काहीशा उपेक्षित दालनाकडे लक्ष वेधल्यामुळे या महत्त्वाच्या ऐतिहासिक कादंबरीचे दालन समृद्ध व संपन्न होण्यास निश्चितच मदत झालेली आहे.

## ३.५ गो.नी.दांडेकरांच्या 'स्मरणगाथा'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'स्मरणगाथा'ही गो.नी.दांडेकर यांची सन १९७३ साली प्रकाशित झालेली आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. गो.नी.दांडेकर हे मराठीतील एक अतिशय नामांकित साहित्यिक आहेत. त्यांनी मराठी साहित्यात प्रादेशिक कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या आणि चरित्रात्मक कादंबऱ्या अशा अनेक प्रकारच्या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. सन १९८१ साली अकोला येथे झालेल्या ५० व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. 'शितू', 'पडघवली', 'पवनाकाठचा धोंडी', 'पूर्णमायची लेकरे', 'माचीवरला बुधा' या त्यांच्या उल्लेखनीय प्रादेशिक कादंबऱ्या आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, संगीतिका, चरित्र,आत्मचरित्र, ललित साहित्य, प्रवासवर्णन स्थलवर्णन इत्यादी वाङ्मयप्रकारांमध्ये भरीव असे योगदान दिलेले आहे. त्यांच्या साहित्याला अनेक मानसन्मान आणि पुरस्कार लाभलेले आहेत. त्यांच्या 'स्मरणगाथे'ला साहित्य अकादमी पुरस्कार, केळकर पारितोषिक, अत्रे पारितोषिक असे मानाचे पुरस्कार मिळालेले आहेत. गो.नी.दांडेकरांच्या 'स्मरणगाथा'ने मराठी साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविलेले आहे. 'स्मरणगाथा' या आत्मचरित्रात्मक कादंबरीला लोकमान्यतेबरोबरच राजमान्यताही मोठ्या प्रमाणात मिळालेली आहे.

गोपाळ नीलकंठ दांडेकर या व्यक्तीचे वयाच्या तिशीपर्यंतचे आयुष्य अतिशय गतिमान स्वरूपात 'स्मरणागाथे'त ग्रंथित झालेले आहे. या ३० वर्षाच्या काळातील आणि तेही बाराव्या-तेराव्या वर्षी घरातून पळून गेल्यानंतरच्या काळात दांडेकरांनी घेतलेले जीवनानुभव जगावेगळे आहेत. घरातून पळून गेल्यानंतरच्या ३० वर्षापर्यंतच्या काळ म्हणजे दुःख आणि वेदनेचा प्रवास आहे. या काळातील त्यांचा प्रवास म्हणजे त्यांच्यासाठी दाही दिशा मोकळ्या असल्या तरी हा त्यांचा एकाकी प्रवास आहे. 'स्मरणगाथे'त त्यांचे पूर्वायुष्य शब्दबद्ध झालेले आहे. या पूर्वायुष्यात त्यांनी जीवनाशी दिलेला लढा, त्यातूनच स्वतःच्या व्यक्तित्वाची जडणघडण, माणसांच्या अनेक तऱ्हा अनेक नमुने आणि निसर्गाची विशाल पार्श्वभूमी आणि जीवनव्यवहाराकडे पाहणारी निकोपदृष्टी या सगळ्यांतून ही 'स्मरणगाथा' साकार होते. निरलसपणे कष्ट करणारा, जीवनावर प्रेम करणारा आणि एक हरहुन्नरी युवक गो.नी.दांडेकरांच्या रूपाने 'स्मरणगाथे'मध्ये पहावयास मिळतो.

गो.नी.दांडेकरांनी लहानपणापासून ते वयाची तिशी उलटेपर्यंतच्या स्मृतींचेंच निवेदन 'स्मरणगाथे' मध्ये केलेले आहे. कोकणातील गुडघे हे दांडेकरांचे मुळ गाव आहे. त्यांचे वडील नीलकठं दांडेकर हे उदरनिर्वाहासाठी विदर्भातील परतवाड्याला शिक्षक म्हणून जातात. विदर्भातील परतवाड्यामध्ये जन्मलेल्या दांडेकरांचे बालपणही परतवाड्यातच जाते. ब्रिटीश राजवटीत मिशनऱ्यांच्या वास्तव्याचे एक प्रमुख ठिकाण असलेल्या या गावाचे, कुटुंबाचे, तेथील परिसराचे, सामाजिक, सांस्कृतिक वातावरणाचे वर्णन करीतच या आत्मकथनाला प्रारंभ होतो. प्रारंभी आपले वडील दादा यांच्या व्यक्तिमत्त्वावर लक्ष केंद्रित करून नंतर

बहिण माई हिने केलेल्या राष्ट्रभक्तीच्या संस्कारांचे वर्णन केलेले आहे. नीलकंठ दांडेकरांचे चित्र बुद्धिमान, करारी, काहीसे विक्षिप्त परंतु निर्भय असलेले आणि डोळे फिरल्यावर कफनी घालून विक्षिप्तपणे भटकणारे असे व्यक्तिचित्र कोणताही आडपडदा न ठेवता दांडेकरांनी सहज शैलीत रेखाटलेले आहे. त्यांचा स्वभाव अतिशय लहरी असून एकदा तिकीट न काढता नाटक पाहायला जातात. तेव्हा व्यवस्थापकाने तिकिटासाठी आडविल्यानंतर भर रस्त्यात शीर्षासन घालतात. त्यासंदर्भात दांडेकर लिहितात- "दादा शब्द काही बोलले नाहीत. भर रस्त्याच्या मधोमध ते उभे राहिले. मग त्यांनीं फेटा, कफनी हे सगळं उतरून माझ्याजवळ दिलं, अन नुसता लंगोटा लावलेल्या स्थितीत रात्री साडेदहाच्या सुमारास ते तिथं शीर्षासन करून उलटे उभे राहिले."('स्मरणगाथा',पृ.४९) मलंगवेषात म्हणजे गळ्यात रंगबेरंगी मण्यांची माळ घालून, हाती कवटी घेऊन चाललेले निळोदादा आणि त्यांच्या मागे पिकदाणी आणि पंखा घेऊन फिरणारे स्वतः बाल दांडेकर ही चित्रे फारशी सुखावह नसली तरी यांचे चित्रण दांडेकरांनी प्रामाणिकपणे केलेले आहे.

कोकणाविषयी नीळोदादाला आकर्षण, परंतु भावाशी भांडण होताच त्याचक्षणी घराबाहेर पडणारे निळोदादा आणि त्यांच्या करारी पत्नींचे सुरेख चित्रण त्यांनी रेखाटलेले आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला गुंतवून घेतलेल्या दांडेकरांच्या सद्गुरू स्वयंप्रकाश आत्मा या काकांचे चित्रणही लक्षणीय आहे. किटाळात गोवले गेल्याने वडिलांना परतवाडा व तेथील शाळेचे काम सोडावे लागते. त्यानंतर त्यांचे कुटुंब नागपूरला राहावयास येते. एक दिवस महात्मा गांधीच्या 'एका वर्षात स्वराज्य' या घोषणेने भारावून राष्ट्रीय चळवळीत भाग घेण्यासाठी बारा वर्षाचे अजाण गो.नी.दांडेकर हे घराबाहेर पडून मुंबईला जातात. त्या-नंतरच्या सतरा वर्षात केलेल्या विलक्षण, कडू-गोड, खारट-तुरट अनुभवांचे वाचकाला थक्क करणारे कथन 'स्मरण-साखळीं'च्या स्वरूपात या पुस्तकात गुंफलेले आहे. 'स्मरणगाथे'च्या गुणसंपन्नतेबद्दल द.न. गोखले म्हणतात, "एका वैचित्र्यवेड्या, हठयोगी, भरकटलेल्या पण सद्वृत्तिप्रवण जिवाची ही खरीखरी कहाणी आहे."[२१] 'स्मरणगाथे'चे सूक्ष्मपणे अवलोकन केल्यास द.न.गोखले यांचा अभिप्राय रास्त असल्याची खात्री पटते.

घरातून पळून गेल्यानंतरचे दांडेकरांचे जीवनानुभव मात्र अतिशय विदारक, दुःखद आणि यातनांनी भरलेले आहेत. पोटासाठी त्यांना पुणे, नाशिक आणि नगर जिल्ह्यातील अकोला अशा अनेक ठिकाणी भटकंती करावी लागलेली आहे. त्या काळात अनेक भयंकर प्रसंग त्यांच्यावर कोसळलेले आहेत. मिरवणुकीसमोर दांडपट्टा खेळणाऱ्या पहिलवानाने तलवारीच्या वारासरशी लिंबू कापावे म्हणून ते डोक्यावर ठेवून त्याला बसावे लागले. सुंता करणाऱ्या मुसलमानाच्या सापळ्यात सापडावे लागले आणि गुरे राखीत त्यांच्यामागे धावावे लागले. मिठाच्या सत्याग्रहाची चळवळ, गांधीजींचे दर्शन यांने भारावून गेलेल्या या गोनीदांना चळवळीतल्या खडतर संघर्षाचे आव्हान पेलत नाही. अशा परिस्थितीत माई-दादा काय म्हणतील

आणि घरी कोण्या तोंडाने परतावे या जाणिवेतून त्यांची दिशाहीन भटकंती सुरु होते. पोटासाठी वणवण करीत, कोणाचा ना कोणाचा आश्रय घेत, नाना प्रकारची कामे करीत प्रसंगी उपासमार वा भीक मागून खाण्याचे प्रसंग सोसत गोनीदा हे प्रवाहपतितासारखे हिंडत राहतात. दांडेकरांनी घरी परतायच्या वाटा आपल्याच हाताने पुसुन टाकलेल्या असतात. याकाळातील सारे कडू अनुभव दांडेकरांनी कोणताही आडपडदा मनात न ठेवता सहजशैलीत सांगितलेले आहेत. या भटकंतीत अकोल्याला गणपतबुबा जोशी या सज्जनाने या मुलाला सांभाळले. परंतु गणपतबुवांनी ठेवलेल्या कृष्णाबाई या स्त्रीने गोनीदांना घराबाहेर पडावयास लावले. त्यांनतर दांडेकर निवृत्तीबुवा धनगराबरोबर किन्हवलीला जातात आणि त्याठिकाणी त्यांना संत गाडगेबाबा भेटतात. संत गाडगेबाबा भेटल्यानंतर एका अर्थी त्यांच्या दिशाहीन भ्रंमतीला भक्कम आधार मिळतो. संत गाडगेबाबांचा शिष्य झाल्यानंतर ते खऱ्या अर्थाने सन्मार्गाला लागतात.

संत गाडगेबाबांच्या पंथात गेल्यानंतर गाडगेबाबांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी त्यांच्या जनजागरणाच्या कामात स्वतःला झोकून देतात. संत गाडगेबाबा हे दांडेकरांना महानंदस्वामींच्या ताब्यात देतात. देहूला संत गाडगेबाबांच्या धर्मशाळेत बनूताई या विधवेच्या मार्गदर्शनाखाली कीर्तनाचे पहिले धडे घेतल्यावर दांडेकरही स्वतंत्रपणे कीर्तन करून संत गाडगेबाबांच्या विचारांचा प्रसार करू लागतात. या संदर्भात दांडेकर लिहितात- "असं रात्री बारा-दोन वाजेपर्यंत कीर्तन होई. बनूताई हेडमास्तर. ती सांगे तीं तीं मुलं कीर्तनाला उभी राहात. पंधरा मिनिटं अर्धा तास बोलत. तिचा इशारा झाला कीं खाली बसत. शेवटी मी उभा राही. अडचण अशी होई, कीं मीं बोलायचं ठरवलेलं असे तें दुसराच कुणी बोलून जाई." ('स्मरणगाथा',पृ.१८९) अशाप्रकारे त्यांनी सप्ताह करून गावभोजने घालून संत गाडगे महाराजांच्या मागे खराटा फिरवून मैदाने लोटून, तीन-चार हजार खेडुतांपुढे कीर्तन करतात. इंद्रिय दमनासाठी अघोरी उपायांचा प्रयोग करतात. पण स्वभावात एक हठयोगी, अतिरेकी छर असल्यामुळे सुंभाचा करदोटा आणि काथ्याची लंगोटी करून ते वापरतात. दांडेकर हे संत गाडगेबाबांना धर्मशाळेच्या बांधकामात मदत करतात. एका सप्ताहात संत गाडगेबाबांच्या अगोदर स्वतः गो. नी. दांडेकर लाडू खातात आणि संयम सुटला म्हणून स्वतःच्या हाताची शीर कापून काढतात. त्यांनतर आळंदी-देहूला वारकरी शिक्षण संस्थेत दाखल होतात. भागानगरच्या सत्याग्रहातही सामील होतात. धुळ्याला श्रीधरशास्त्री पाठकांच्या पायापाशी शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान (शांकर वेदान्त) शिकण्यासाठी जातात. श्रीधरशास्त्री पाठक त्यांना "तुझी जात समृद्ध भक्ताची आहे; सहृदय साधकाची आहे. हे सारं भाष्यादिक वाचून तुला उपयोग होणार नाही."('स्मरणगाथा'पृ.४३५) असा मौलिक सल्ला देतात. तेथून त्यांना नर्मदा परिक्रमा करण्याची स्फुर्ती झाल्यानंतर ते नर्मदा परिक्रमेस निघतात.

नर्मदा परिक्रमा करीत असताना अनेक जीवघेण्या प्रसंगांचा सामना त्यांना करावा लागला. घनदाट अरण्यात एकट्याने, केवळ पंचाजोडी नि गीताभाष्य बरोबर घेऊन ती परिक्रमा करताना या युवकाने कितीतरी प्रसंग स्वतःवर ओढवून घेतलेले आहेत. अनेक घटना-प्रसंग चित्रित करून ही परिक्रमा दांडेकर अधिकच देखणी व जिवंत करतात. यातील महाराजजी आणि गाणारी मुलगी यांची सांगितलेली कथा मोठी लक्षणीय आहे. नर्मदेच्या पाण्यात उतरलेली वस्त्रहीन कन्या आणि तिचा नग्नदेह पाहून दांडेकरांच्या मनात आलेले विचार त्यांच्या सत्प्रवृत्त मनाची आंदोलने यांचे प्रकटीकरण आहे. तिचे वर्णन करताना दांडेकर लिहितात-"जशी एखाद्या शैलमंदिराच्या उपत्यकेंत कोरलेली पुष्ट नवोढा. अनावृत्ता. आइन्यांत रूप निरखीत असलेली. नारीदेहाचं ते अकलंक, निष्पाप दर्शन घडतांक्षणी मनी उसळणारे विकार हळूंहळूं ठांईच बसले. विझले. म्हणू लागलों- रेवाकन्ये! तूं आपल्या अनावृत्त शरिराचं जें दर्शन घडवलंस, ते पाहातांच पहिल्या क्षणीं तर चित्तवृत्ती अनावर झाल्या."('स्मरणगाथा',पृ.४५३) असे अनुभव आणि नर्मदेची रेखाटलेली वर्णनेही दांडेकरांच्या अभिव्यक्तीचाच एक भाग म्हणून येतात. आजारामुळे परिक्रमा सोडून श्रीधरशास्त्रींच्या सांगण्यावरून पुढे ते उपनिषदाचे अध्ययन करतात.

'स्मरणगाथे'मध्ये अनेक घटनाप्रसंगाचे वैविध्य आणि वैपुल्य आहे. 'स्मरणगाथे'मध्ये अनेक स्थळे आणि विविध स्वभावाची माणसे बघता बघता साकार होतात. 'स्मरणगाथे'त अगदी सहजासहजी प्रतिबिंबित झालेली अनंत निसर्गचित्रे आणि अनेक लहानमोठ्या माणसांची रेखाटलेली क्षणचित्रे यामुळे तिचे सामर्थ्य वाढलेले आहे. त्यातून निसर्गाची व माणसांची होणारी विविधरंगी आणि बहुढंगी ओळख केवळ अपूर्वच आहे.

श्रीधरशास्त्रींच्या जवळ ब्रह्मसूत्रे, दशोपनिषदे शिकता-शिकताच पुढे दांडेकर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एकनिष्ठ सेवक आणि संघाचा प्रचारक बनतात. नर्मदा परिक्रमेच्या अगोदर श्रीधरशास्त्रींच्या सांगण्यावरून नागपूरला जाऊन येतात. दांडेकराच्या निघून जाण्यामुळे त्यांच्या वडिलांनी अफू खाऊन आत्महत्या केलेली असते. माईही निधन पावलेल्या असतात. तर आई खाणवळ चालवत असते. आईला भावाला भेटून दांडेकर परत श्रीधरशास्त्रींकडे आलेले असतात. दांडेकरांनी 'स्मरणगाथे'चा शेवट काव्यात्मक पद्धतीने केलेला आहे. दांडेकर लिहितात- "तेराव्या वर्षी घरून पळालो. आज तिसावं वर्ष आहे. सतरा वर्षे धांवलो पडलों. 'पुनः उठून धडपडत चालूं लागलो. न दमता. न खचता.'

"आलो येथवरी पाउलापाउलीं
वरतीं शीतळ वडाची साउली
सांवळी साउली देखिली रेखिली
म्हणेन म्हणतों एखादें गाणें

कधीं काळींचे एकटवाणें

नका होऊं गोळा एकला असूं द्या

छपराखालती मजला बसूं द्या..... "

जीवनाविषयीं मी अतिशय कृतज्ञ आहे." (पृ.५५७-५५८)

'स्मरणगाथे'च्या शेवटी लेखक गो.नी.दांडेकरांनी लिहिलेली ही कविता म्हणजे वय वर्षे तेरा ते 'स्मरणगाथा' लिहिली तेव्हापर्यंतच्या जीवनासंबंधीची चिंतनशील मनाची कलात्मक नोंद आहे.

दांडेकरांची स्मरणशक्ती अफाट आहे, यात शंकाच नाही. त्याशिवाय गतायुष्यातील इतके प्रसंग, इतक्या समूहांच्या बोली, अध्ययनातील इतके भाग आणि गाणी, अभंग,ओव्या यांची एवढी विविधसृष्टी लेखनाच्या वेळी लख्खपणे आठवणे शक्यच नाही. सुमारे तीस वर्षांच्या काळातील विदर्भापासून, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक, महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवन, भटकंतीत योगायोगाने भेटलेली माणसे, स्वातंत्र्यपूर्व सामाजिक, आर्थिक चळवळी आणि जीवनव्यवहाराचे सुरेख वर्णन याठिकाणी पाहावयास मिळते. दांडेकरांची भाषाशैली सहज, प्रवाही आणि वाचकाला खिळवून ठेवणारी आहे. त्याचबरोबर त्या आत्मचरित्रातील रसरशीत जीवननाट्य चकित करणारे आहे. अनेक माणसांची जिवंत व्यक्तिचित्रे, लेखनातले ताजेपण, निसर्गाची बहुरंगी रूपे, प्रसंगानुसार, प्रदेशानुसार वाक-णारी, वळणारी बोलींची रूपे आणि निवेदनातील तन्मयता हे या 'स्मरणगाथे'चे विलोभनीय विशेष आहेत.

## ३.६ व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सत्तांतर'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

व्यंकटेश माडगूळकर हे कथाकार, कादंबरीकार आणि नाटककार म्हणून सुप्रसिद्ध आहेत. 'माणदेशी माणसे' आणि 'बनगरवाडी' ही त्यांची पुस्तके अतिशय गाजलेली आहेत. प्रतिभेची अलौकिक देणगी लाभलेल्या सांगली जिल्ह्यातील 'माडगूळ' या छोट्या गावात जन्मलेल्या व्यंकटेश दिगंबर माडगूळकरांनी केवळ मराठी साहित्यसृष्टीतच नव्हे तर जगभरातील साहित्यात स्वतःचा ठसा उमटविलेला आहे. आपल्या आगळ्यावेगळ्या रसाळ शैलीतून रसिकाला माणेदशी माणसांची देणगी देणारे साहित्यिक म्हणजे व्यंकटेश माडगूळकर होय. सन १९८३ साली आंबेजोगाई येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले आहे. त्यांच्या 'सत्तांतर'या १९८२ साली प्रकाशित झालेल्या कादंबरीला सन १९८३ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांची 'सत्तांतर' (१९८२) ही अत्यंत उल्लेखनीय आणि आशयदृष्ट्या वेगळी कादंबरी आहे. मानवी जीवनाइतकाच प्राणीजीवनात मनापासून रस घेणाऱ्या व्यंकटेश माडगूळकरांनी ही कादंबरी वानरांच्या विश्वासंबंधी लिहिलेली आहे. वानरांच्या तीन प्रकारच्या कळपांमधल्या सत्तास्पर्धेचे चित्रण यांत आहे. वानरांचा दैनंदिन व्यवहार, वागण्याच्या तऱ्हा, सवयी, आपापसातले संघर्ष यांचे

बारकाईने कलेले चित्रण व्यंकटेश माडगूळकरांनी या कादंबरीतून मांडलेले आहे. सामाजिक, राजकीय परीघातील मानवी संस्कृतीच्या सत्तासंघर्षाची औपरोधिकता व्यंकटेश माडगूळकरांनी या कादंबरीतून मांडलेली आहे. एका वानर परिवारातील सत्तांतर दाखवण्याच्या निमित्ताने 'सत्तांतर'मध्ये व्यंकटेश माडगूळकरांनी मानवाच्या जैविक, मूलभूत आणि आदिम प्रेरणांचा शोध घेतलेला आहे. 'सत्तांतर'च्या सुरुवातीला इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांच्या 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या ग्रंथातले एक अवतरण आलेले आहे. "मनुष्य हा पशुकोटीतला प्राणी आहे व त्याचे जवळचे सगेसोयरे पशू म्हणजे वानर होत."('सत्तांतर',पृ.४) त्यामुळेच व्यंकटेश माडगूळकरांनी मानवाच्या या प्राचीन सगेसोयऱ्यांची आदिम सत्ताकांक्षा आणि त्यातून उफाळलेला रक्तरंजित संघर्ष प्रतीकात्मक स्वरूपात 'सत्तांतर'मध्ये मांडलेला आहे.

'सत्तांतर' या कादंबरीला रुढ अर्थाने नायक, नायिका आणि संवाद नाहीत. 'सत्तांतर'मध्ये फक्त वानरांच्या दोन टोळ्यांमध्ये चालणाऱ्या संघर्षाचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण आहे. प्रत्येक टोळीचे जंगलातील क्षेत्र, टोळ्यांची परस्परांच्या हद्दीत चालणारी घुसखोरी, नरानरांतले, माद्यामाद्यांतले संबंध, सर्व वानरांची जंगलातील हिंस्त्र प्राण्यांपासून आणि शिकाऱ्यापांसून स्वतःच्या टोळीचा बचाव करण्याची धडपड, टोळीचे नायकत्व आणि टोळीतील माद्या मिळवण्यासाठी वानरांना कराव्या लागणाऱ्या हाणामाऱ्या यांचे विलक्षण परिणामकारक दर्शन या छोट्याशा कादंबरीत आहे.

'सत्तांतर' ही वानर आणि मनुष्य यांच्या काम आणि सत्ताकांक्षेच्या समान आंतर्बंधांची कथा आहे. माणसाचा पूर्वज 'वानर' या प्राण्याला केंद्रस्थानी ठेवून माणसाच्या आणि प्राण्यांच्या मूलभूत आदिम प्रवृत्तीचा ताकदीने वेध घेणारी ही कादंबरी आहे. 'सत्तांतर' या कादंबरीच्या वेगळेपणा आणि मोठेपणाविषयी मराठीतील ज्येष्ठ समीक्षक प्रा.चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात की, "वानर या प्राण्याविषयीच्या सामुग्रीचा उपयोग करून व्यंकटेश माडगूळकरांनी एक सुदंर कलाकृती मराठीला दिली. वानर या प्राण्याच्या जगाचं इतकं समर्थ व सुंदर, रोचक आणि विश्वसनीय चित्रण मराठीत तर प्रथमच आलं आहे आणि त्याला कादंबरीचा घाट देऊन लिहिली गेलेली ही पहिलीच भारतीय कृती असावी."[२२] प्रा.चंद्रकांत बांदिवडेकरांच्या या विधानांचा मतितार्थ लक्षात घेतल्यासही 'सत्तांतर' ही अनेक अर्थांनी मराठीतील एक अपूर्व कादंबरी असल्याचे दिसून येते.

'सत्तांतर'ही मराठीतील एक वेगळ्या धर्तीची कादंबरी आहे. परंतु व्यंकटेश माडगूळकरांची 'सत्तांतर' ही कादंबरी सारा हर्डीबाईंच्या 'लंगुर्स ऑफ अबु : फिमेल ॲन्ड मेल स्ट्रॅटिजी ऑफ रिप्रॉडक्शन' या पुस्तकावरून बेतल्याचा आरोप मराठीतील अनेक समीक्षकांनी केलेला आहे. मात्र व्यंकटेश माडगुळकरांनी 'सत्तांतर'च्या दुसऱ्या आवृत्तीला अप्रतिम प्रस्तावना लिहून तथाकथित आरोपांना अत्यंत

प्रभावीपणे उत्तर दिलेले आहे. 'सत्तांतर'मध्ये सत्तांतर म्हणजे टोळीचा एक नायक जाऊन तेथे दुसरा नायक प्रस्थापित होणे, हे 'सत्तांतर' कसे घडते हे 'सत्तांतर' ह्या कादंबरीचे कथानक आहे. तथापि वानरांच्या या कथेतून मानवी जीवनातील वृत्तिप्रवृत्तींचाही प्रतीकात्मक पातळीवर प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. शक्ती हाच सत्तेचा आधार असतो. आणि स्पर्धेत जे टिकून राहतात तेच सत्ता उपभोगतात, जे टिकत नाहीत त्यांचा विनाश होतो हे 'सत्तांतर' या कादंबरीच्या लेखनाचे मुख्य सूत्र आहे. एक राज्यकर्ती टोळी, तिची शेजारी टोळी आणि स्वतःची टोळी वा भूमी नसलेल्या भटक्या पेंढाऱ्यांची झुंड यांच्यातील आंतरसंबंध ही 'सत्तांतर' या कादंबरीची संघर्ष चौकट आहे. सर्व टोळ्यांना थरकापवणारा ढाण्या वाघ किंवा त्यालाही मारू पाहणारा शिकारी ही या संघर्ष चौकटीला बाहेरून प्रभावित करणारी सत्ताकेंद्रे आहेत. मुडा, लालबुड्या आणि मोगा या वानर नायकांच्या तिन्ही टोळ्यांचे परस्परसंबंध व त्यातून घडून येणारे सत्तांतर हे या कादंबरीचे बाह्यकेंद्र आहे.

मुडा या वानराची एक टोळी जंगलात वास्तव्य करीत असते. या टोळीच्या शेजारी लालबुड्याचीही एक टोळी राहत असते. या दोन्ही टोळ्यात प्रेम व भांडणे सतत होत असतात. मोगा हा नव्या दम्याचा नर आपल्या पाच-सहा तरुण सहकाऱ्यांना घेऊन मुडाच्या टोळीवर हल्ला करतो. त्या हल्ल्यातच लालबुड्याचा मृत्यू होतो आणि त्याच्या टोळीचा प्रमुख होण्यासाठी मुडा व मोगा यांच्यात संघर्ष चालू होतो. त्यात मोगा हा मुडाला लांब पळवून लावतो. मोगा टोळीचा नायक बनतो. लुटारू, गटप्रमुखाला पुन्हा टोळीप्रमुख सत्ताधीशांचा दर्जा लाभतो आणि सत्तेसोबत येणारे देवदुर्लभ सुखोपभोगही त्याच्या वाट्याला येतात. लालबुड्याच्या मृत्यूनंतर टोळीची सत्ता बळकावण्यासाठी मुडा आणि भटके पेंढारी यांच्यात संघर्ष होऊन भटके ती स्पर्धा जिंकतात. शेवटी सत्ताभ्रष्ट झालेल्या मुडाचा पोर तरणीच्या पोटात वाढत राहतो. 'जगला वाचला तर तो सहा वर्षाचा होऊन मोगाला घायाळ करून टोळीचा मालक होणार आणि स्वतःचे राज्य स्थापणार.'('सत्तांतर',पृ.७७) या टप्प्यांवर 'सत्तांतर'चे कथानक थांबते. परंतु खऱ्या अर्थाने ते एका नव्या संघर्ष नाट्याचे सुतोवाचच असते.

शब्द आणि रेषा यांच्या साहाय्याने व्यंकटेश माडगूळकरांनी मूक वानरांची लोकविलक्षण कथा बोलकी केलेली आहे. 'सत्तांतर'ला पानगळीच्या जंगलाचा विशाल चित्रफलक लाभलेला आहे. वानरे, कांचनमृग, वाघ, बिबटे, रानकुत्री, मगरी, अजगर, चितळहरणे, सांबर, मोर, दयाळ, होले, हरेल, कोकिळा, बुलबुल, ट्रीपॉय बाज, गिधाडे अशा पशुपक्ष्यांनी ते गजबजून गेलेले आहे. या जंगलात मुडा व लालबुड्या यांच्या प्रस्थापित वानर टोळ्या आहेत. मोगा आणि दाढीवाला या घुसखोर वानरांची टोळी त्यांचा पाडाव करून त्या टोळ्या ताब्यात घेतात ही 'सत्तांतर'ची मध्यवर्ती घटना आहे. या तीन वानरटोळ्यांचे परस्परसंबंध, त्यातून घडून येणारे सत्तांतर आणि त्यामागे उभा असणारा जंगल आणि जीवन यांना

व्यापणारा सत्तासंघर्ष व अस्तित्वसंघर्ष हे 'सत्तांतर'चे आशयसूत्र आहे. या जीवन संघर्षाचे एक रूप अस्तित्वासाठी चाललेला प्राणिमात्रांचा अविरत संघर्ष हे आहे. 'सत्तांतर' ही सृजन आणि संहार, उत्पत्ती आणि नाश यांच्या सदैव गरगरणाऱ्या चक्राची कहाणी आहे. दचकवून टाकणारी मृत्यूची काळपावले या कहाणीत सतत ऐकू येतात. कांचनमृगाचा अंत हे मृत्यूचे अभिजात व करुण रूपदर्शन आहे.

'सत्तांतर'मधील वानरांना नावे नाहीत. व्यंकटेश माडगूळकरांनी वानरांना त्यांच्या स्वभाव आणि वैशिष्ट्यांनुसार नावे दिलेली आहेत. आब राखणारे शहाणपण असलेला मुडा, गरम माथ्याचा बळकट मोगा, साहसी लालबुड्या, आडदांड दाढीवाला, मानिणी तरणी, वत्सल लांडी, धीट व खोडकर बोकांडी, हिकमती काणी, झुंजार थोटी, कामविव्हल उनाडी आणि शहाणी इत्यादी कितीतरी वानरे त्यांच्या रंगरूपासह भावभावनांसह आणि स्वभावाच्या कंगोऱ्यासह आपल्यापुढे उभी राहतात. मोगा, मुडा आणि विशेषतः लालबुड्या यांच्या रूपाने वानरपोरांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा एक सलग चित्रपटच डोळ्यांसमोर उभा राहतो. ही वानरे वेगवेगळ्या वयाची व जीवनाच्या वेगवेगळ्या अवस्था भोगणारी आहेत. यातूनच वानरजीवनाचा एक ललितरम्य आलेख उभा राहतो. वानरांची नावे, त्यांचे इतरांशी असलेले संबंध, त्यांची अखेर, त्यांचे जय-पराजय, त्यांच्या जीवनाचे वेगवेगळे ओघ यातून वानरजीवनाची विशिष्टता आणि विविधता टिपलेली आहे. वानरांची टोळीव्यवस्था, तिचे संकेत, पोर नर वा मादी म्हणून येणारे वानरांचे सलग व विविध जीवनपट, वानरांचा दिनक्रम, अस्तित्वासाठी बाह्यशक्तींशी त्यांना करावा लागणारा झगडा आणि आपापसातील सत्तासंघर्ष या सर्वांचे हे दर्शन आहे. वानंरांचे आणि त्यांच्या समूहांचे सोसण्या-भोगण्याचे, जगण्या-मरणाचे एक समग्र चित्र साकल्याने आपल्या डोळ्यांपुढे उभे राहते.

'सत्तांतर'च्या निमित्ताने व्यंकटेश माडगूळकरातील एका प्रयोगशील लेखकाची ओळख आपल्याला होते. प्राण्यांच्या माध्यमातून मानवी प्रवृत्तींचा अर्थ आणि अन्वय शोधण्याचा किंबहुना जाणवलेला अर्थ मांडण्याचा हा त्यांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. या आकाराने छोट्या परंतु आशयघन कादंबरीत वानरांची जीवनरहाटी, भावसंपदा, संवाद-संघर्ष संबंध यातून त्यांनी माणसाच्या जीवनाची आदिमता जशी सुचवलेली आहे. तशीच आजच्या प्रगत मानवाच्या अंगी असलेली पुरुषता(वानरपण) अनेक स्तरावर दाखविताना व्यंकटेश माडगूळकरांनी मार्मिक भाष्य केलेले आहे. ते म्हणतात- "काळाप्रमाणे संघर्षही सतत वाहतच असतो. त्याला खंड असा नसतोच. असलीच, तर भरती असते, पूर असतो. जेव्हा जेव्हा खाणारी तोंड भरमसाठ वाढतात, गर्दी होते, तेव्हा तेव्हा संघर्ष बळावून उठतो. उपलब्ध अन्नात, भूमीत वाटेकरी निर्माण होतात. तेव्हा संघर्ष उचल खातो. जेव्हा अस्थिरता निर्माण होते, एखादी जात धोक्यात येते, बाहेरून परकं कोणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं, तेव्हा संघर्ष उतू जातो. ज्यांना बोलता येत, ते हा राग, उद्दामपणा, संघर्ष शब्दांतून दाखवतात. ज्यांना बोलता येत नाही, त्यांचे रागलोभ, प्रेम हावभावांतून,

स्पर्शातूनच सांगितलं जातं. संघर्ष पेटला, की शस्त्रास्त्रं वापरली जातात. ज्यांना शस्त्रास्त्रं माहीतच नसतात, ते सुळे, नखं वापरतात. संघर्ष सर्वत्र भरून राहिलेला असतो."('सत्तांतर',पृ.७०) हे भाष्य एकूणच पशू आणि माणसाच्या जीवनावरचे महत्त्वाचे निरीक्षण व भाष्य आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी 'सत्तांतर'मध्ये अनेक सुंदर गतिचित्रे शब्दांकित केलेली आहेत. तसेच आशयातून आलेली रेखाचित्रे हा 'सत्तांतर'चा आणखी एक विशेष आहे. "हजारो वर्ष फिरत आलेलं सत्तासंघर्षाचं हे रहाटगाडगं असंच फिरत राहणार होतं."('सत्तांतर',पृ.७६) अशाप्रकारे 'सत्तांतर'चा शेवट करतात. व्यंकटेश माडगूळकरांच्या या विधानाचा अर्थ सततचा संघर्ष हा विराट अशा जीवनक्रमाचा स्थायीभाव असून तो सृष्टीत सर्वत्र भरून राहिलेला असतो.

'सत्तांतर' या कादंबरीत आरंभापासून ते अखेरपर्यंत वानरांच्या टोळ्यांचे सूक्ष्मपणे मार्मिक चित्रण केलेले आहे. माणसांच्या सनातन गाभ्याचा गर शब्दांच्या नसानसातून भरताना 'सत्तांतर'सारख्या कादंबरी-तून त्यांनी प्राण्याचे विश्व जिवंत केलेले आहे. माकडाच्या प्रत्येक टोळीचे जंगलातील क्षेत्र, टोळ्यांची घुसखोरी, त्यांचे संघर्ष, बचावाच्या भूमिका, मातृप्रेम, नायकत्व, माद्यांसाठी केलेल्या हाणामाऱ्या यातून 'सत्तांतर'मध्ये प्राणीदर्शन गाढच होत राहिलेले आहे. 'सत्तांतर' ही कलात्मकता ओढून चंद्रबळ आणण्याच्या कारागिरीच्या स्वरूपाची वा अनुकरणात्मक कादंबरी नसून कलेच्या मूलभूत आणि उपजत जाणिवांनी नटलेली सर्वोत्कृष्ट कादंबरी आहे. 'सत्तांतर' ही अतिशय सुंदर आणि एकमेवाद्वितीय अशी स्वतंत्र कलाकृती आहे. 'सत्तांतर' ही व्यंकटेश माडगूळकरांची अतिशय मौलिक कादंबरी असून ती त्यांची स्वतंत्र निर्मिती आहे. त्यांनी आपल्या अल्पाक्षरी, चित्रमय भाषाशैलीने स्पर्श,रूप,रस, नाद आणि गंधानिशी मराठी साहित्यविश्वात आपला वेगळा ठसा उमटविलेला आहे. थोडक्यात, व्यंकटेश माडगूळकर यांची 'सत्तांतर' ही संबंध कादंबरी ही वानरांच्या जीवन वर्तनातून मानवी सत्तासंघर्षावर चालू राजकीय स्थितीवर मूकपणे टीका टिप्पणी करते.

## ३.७ आनंद यादवांच्या 'झोंबी'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'झोंबी' ही आनंद यादव यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी सन १९८७ साली प्रसिद्ध झालेली आहे. आनंद यादवांनी वेगवेगळे वाङ्मयप्रकार समर्थपणे हाताळलेले असून त्या-त्या वाङ्मयप्रकारात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेले आहे. 'गोतावळा', 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' 'काचवेल' 'लोकसखा ज्ञानेश्वर', 'एकलकोंडा', 'माऊली', 'नटरंग' आणि 'कलेचे कातडे' इत्यादी उल्लेखनीय कादंबरी त्यांनी लिहिलेल्या आहेत. आनंद यादव यांचा जन्म ३० नोव्हेंबर, १९३५ रोजी कोल्हापूर मधील कागल येथे झालेला आहे. अनेक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवलेले आहे. त्यांच्या अनेकविध कलाकृतींना महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे पुरस्कार मिळालेले आहेत. तसेच त्यांच्या साहित्यकृतींचे अनेक भाषांत अनुवाद

झालेले आहेत. ग्रामीण दरिद्री भारतीय समाजाच्या संघर्षाचे, उत्कट भावविश्वाचे दर्शन घडविणाऱ्या जागतिक परिमाण लाभलेल्या 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' 'काचवेल' या चार आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या लिहून त्यांनी आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांच्या मालिकेचा एक वेगळाच पायंडा मराठी साहित्यात रुजवलेला आहे. 'झोंबी' या त्यांच्या कादंबरीला साहित्य अकादमीचा सन १९९० सालचा पुरस्कार लाभलेला आहे. 'झोंबी'स प्रियदर्शनी अकादमीचा सर्वोत्कृष्ट साहित्य पुरस्कार-१९८८, महाराष्ट्र राज्य शासनाचा-उत्कृष्ट साहित्य पुरस्कार १९८८-८९, देशभक्त पद्मश्री डॉ.रत्नाप्पा कुंभार साहित्य पुरस्कार-१९८९, मारवाडी संमेलन साहित्य पुरस्कार-१९९०, भारत सरकारचा साहित्य अकादमी पुरस्कार-१९९०, दि फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचा-उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार १९८९, प्रवरानगर-विखेपाटील पुरस्कार-१९९१ आणि संजीवनी साहित्य पुरस्कार कोपरगाव-१९९४ असे आठ पुरस्कार लाभलेले आहेत.

'झोंबी' ही आनंद यादवांची ग्रामीण वास्तव चैतन्यमय करणारी आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. आनंद यादवांनी 'झोंबी'मध्ये बालपणापासून ते मॅट्रिकपर्यंतचा जीवनप्रवास वर्णिलेला आहे. 'झोंबी'मध्ये त्यांनी शिक्षणाची कोणतीही परंपरा नसलेल्या एका शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुलाने अगदी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणासाठी घेतलेल्या झोंबीचे चित्रण केलेले आहे. पु.ल.देशपांडे आपल्या रसोद्ग्राही प्रस्तावनेत त्याबद्दल म्हणतात, "तो आपले बालपण आठवत गेला आणि एखाद्या गवयाने राग आळवावा तसा तो आळवीतही गेला आहे ...............त्यामुळे 'झोंबी' ही एक सुंदर ललित कलाकृती झाली आहे." [२३] ती आनंद यादवांच्या बालपणातल्या संघर्षाची व्यथापूर्ण गाथा आहे. मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणासाठी त्यांना अनेक स्तरावर 'झोंबी' करावी लागलेली आहे. 'झोंबी'मुळे मराठी साहित्यात अपरिचित असलेल्या फाळ्याने शेती करणाऱ्या एका सामान्य शेतकरी कुटुंबातील दैनंदिन जीवन संघर्षाचा परिचय झालेला आहे. 'मी' च्या आई-वडिलांच्या विवाहाच्या हकिकतीपासून आनंदाच्या एस.एस.सी. होईपर्यंतच्याच जीवनाचा कालपट त्यात आलेला आहे. ग्रामीण जीवनशैली, कौटुंबिक नातेसंबंधातील ताणतणाव, परिस्थिती आणि परंपरा, ह्या सर्वांतून उद्भवलेल्या भेदक वास्तवाच्या वेदना-कळांचा हा आलेख म्हणजे 'झोंबी' होय. ज्या समाजातून आणि कुटूंबातून 'झोंबी'चा नायक वरती आलेला आहे. त्याचे वास्तवदर्शन त्यातून पुरेशा संयमशीलतेने तर व्यक्त झालेले आहेच, परंतु त्याचबरोबर महाराष्ट्र-कर्नाटकाच्या सीमेवरील एका गावाच्या सामाजिक, आर्थिक व्यवस्था, त्यांचा तेथील कुटुंबाच्या दैनंदिनीवरील परिणाम, त्यातील ताणतणाव आणि संघर्ष व त्यातून उद्भवणाऱ्या अस्वस्थतेचे विचारगर्भ चित्रणही त्यात आलेले आहे.

रतनू-तारा आणि आनंदा (आन्दा) यांना प्राप्त परिस्थितीशी झगडून आपापले इच्छित साध्य करावयाचे आहे. त्यासाठी त्यांनी दिलेल्या झुंजीची ही कहाणी आहे. शिकण्याच्या वेडाने झपाटलेल्या बालपणाचा आत्मशोध हे या आत्मचरित्रात्मक कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. 'झोंबी' ही २९ विभागांमध्ये

विभागलेली कादंबरी आहे. 'झोंबी'तील जीवनपर्वाला "ताराचं लग्न झालेलं ताराला माहित नाही. ती एक वर्षाची असतानां तिचं लग्न झालं. तिच्या पाळण्यालाच बाशिंग बांधलं होतं. रतनू त्यावेळी आठ-नऊ वर्षाचा होता."('झोंबी',पृ.१) या नायकाच्या आई-वडिलांच्या विवाहाच्या हकिकतीने सुरुवात झालेली आहे. 'झोंबी'च्या सुरुवातीला आनंद यादवांचे पूर्वज आणि त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी याविषयी माहिती सांगितलेली आहे. जकाते कुटुंबातील भाऊबंदकीतून, सवतेपणातून उद्‌भवणाऱ्या वैराचे ताणतणाव सुरुवातीला उभे राहतात. कोल्हापूरजवळील 'कागल' या गावात सन १९३५ साली आनंदा रत्नाप्पा जकाते यांचा जन्म झालेला आहे. ताराला दोन मुलीनंतर मुलगा झाल्यामुळे "... सगळयांना आनंद झाला, म्हणून नाव 'आनंद' ठेवल."('झोंबी',पृ.१९) असे त्याचे नामकरण करण्यात आलेले आहे. काम चुकवून झोपा काढणे, थोरामोठ्यांच्या बरोबर उठ-बस करणे, बिनकामाचे गावभर भटकणे, पोटभर खाणे आणि आळस पोसणे ही रतनूच्या सुखाची कल्पना आहे. मार देणं ही दाल्लेपणाची खूण मानणारा नवरा ताराच्या नशिबी येतो. हे कुटुंब वैरभाव, चालीरीती, परंपरा, पत्करलेले दारिद्र्य व अज्ञानात ढोर मेहनत करून इतरांच्या शेती फळयाने (खंडाने) करणारे आहे. या अज्ञानाच्या परंपरेत 'शिक्षण' दाराशी येताच रतनूसारखे व्यवहारी पुरुष मुलगा 'दिवानजी' होऊ पाहण्याच्या स्वप्नाने मुलाला शाळेत पाठवतात. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'आंदा' शाळेत जाऊ लागतो. आन्दा पाचवीत गेल्यावर सगळ्या शेतकऱ्यांना हाताबुडी येणाऱ्या आपल्या पोराबद्दल जे वाटते, तेच रतनू जकात्यालाही वाटते. त्यामुळेच "आन्दा, आता मळ्यातली कामं करण्याजोगा झाल्याचं" लक्षात येताच त्याला शेतीतल्या कामाला जुंपले जाते.

शिकण्यासाठी जिवाचा आटापिटा करणाऱ्या आनंदाची मायबापावर, बहिण-भावंडावर, शेत-मळयावर माया आहे. परंतु त्याचे मन संवेदनाक्षम आणि सृजनशील असल्यामुळे गाणी म्हणणे, सिनेमा पाहणे, नाटकात नकला करणे, पोवाडे रचणे, पाळणे म्हणणे, कविता करणे, निबंध लिहिणे अशा ह्या निर्मितीच्या क्षेत्रात गुंतत असते. शाळा शिकावी, पुस्तके वाचावीत असे त्याला सतत वाटत असल्यामुळेच त्यासाठी त्याला पदोपदी संघर्ष करावा लागतो. म्हणूनच डॉ.एस.एम.कानडजे म्हणतात, " 'झोंबी' ही आनंद यादवांच्या होरपळलेल्या बालपणाची हृदयद्रावक कर्मकहाणी आहे, तशीच ती कलावंताच्या आत्मोद्‌धाराची स्वयंप्रेरित संघर्ष कहाणी आहे. 'झोंबी'तील नायकाचे बालपण हे एका कलावंताचे बालपण आहे. .......... 'झोंबी' ही संघर्षरत : सृजनशील ग्रामीण बालमनाची झुंजार झेप आहे. एका कलावंताच्या आत्मोद्‌धाराची, त्याच्या विकसनशील बालमनाची नाट्यपूर्ण करुण कहाणी आहे."[२४]

शाळेतल्या गमतीजमती, अंगलट आलेल्या खोड्या, मास्तरांचे विविध प्रकारचे स्वभाव, चोरून विड्या ओढण्याचा नाद, खोटं बोलून कातडी बचावण्याची अंगवळणी पडलेली सवय याचे चित्ताकर्षक शब्दचित्र लेखकांने रेखाटलेले आहे. माती खाऊन नाळरोगी झालेली आनंदाची भावंडे यांच्या वर्णनातून

दैन्य आणि दारिद्र्याचे भयावह वास्तव 'झोंबी'मध्ये अनेक स्तरांवर प्रकट होत जाते. वयात आलेल्या बहिणींची कशीतरी स्वतःच्याच मनाची समजूत घालून फसवणुक करीत केलेली लग्ने आणि त्यातील अनेक पदरी दारिद्र्याचे परंपरेच्या झिरझिरीत वस्त्रातून होणारे दयनीय प्रदर्शन यातील कारुण्य फार प्रभावीपणे हा कलावंत प्रकट करतो. प्रस्तुत कादंबरीत आंद्याने शिकण्यासाठी केलेल्या संघर्षाचे चित्रण आहे. त्याचप्रमाणे तारा-रतनूच्या वडिलांच्या पाचव्या पिढीपासूनचा थोडक्यात आलेखही काढण्यात आलेला आहे. 'झोंबी' ही सहाव्या पिढीची सातव्या पिढीशी घडलेल्या संघर्षाची कहाणी आहे. आंद्याने पूर्वा-पार चालत आलेला परंपरासिद्ध शेतीचा व्यवसाय करावा आणि शिक्षण घेण्याच्या फंदात पडू नये असा रतनूच्या हेका आहे. परंतु आंद्याच्या नव्या पिढीला शिक्षणाची तहान लागलेली आहे. त्यामुळे 'झोंबी'चा बराचसा भाग आनंदाने शिकण्यासाठी केलेल्या धडपडीनेच व्यापलेला आहे. तसेच रतनू आणि तारा या दांपत्याची संसारकथा ही 'झोंबी'मध्ये पाहावयास मिळते. एका बाजूला एकटाच शिक्षणाची आवड असणारा आनंदा आणि दुसऱ्या बाजूला त्याचा बाप व अन्य विरोधी घटक यांच्या अटीतटीची रस्सीखेच हे 'झोंबी'चे मध्यवर्ती सूत्र आहे.

आनंदा हा अर्धपोटी राहून शाळेसाठी धावपळ करू लागतो. चिऱ्याला पाणी देताना डोळे पुस्तकाकडे वळवावे लागतात परंतु हातास असणारा चिखल आडवा येतो. ही त्याची मानसिक उलाघाल अस्वस्थ करणारी आहे. या साऱ्या बिकट परिस्थितीतून मार्ग काढत सातवीच्या परीक्षेत तालुक्यामध्ये 'पहिला' आल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर आनंदाला आभाळ ठेंगणे वाटू लागते. भाऊबीजेला ओवाळणी म्हणून बहिणीला एक आणाही देता येत नाही. म्हणून त्याचं हळवं मन होरपळत जाते. जिकिरीच्या वेळी कोर्टामुळे घराची फळी अधिक विस्कटत चालल्यामुळे रतनू काकुळतीला घेऊन "आवंदाचं वरीस तुझी शाळा ऱ्हाऊ दे." असे आनंदाला समजावून सांगतात. तरीही आनंदा अंगच्या अभिनयाच्या बळावर 'फी' साठी नकला करीत शाळा शिकण्याची जिद्द मनामध्ये बाळगतो. आनंदाला शाळेमध्ये विशेषतः हायस्कूलमध्ये वावरणारे सहानुभूतिशून्य, आत्ममग्न शिक्षक, वरच्या सुखवस्तू वर्गातले विद्यार्थी आणि विशिष्ट वयात फारच झोंबणाऱ्या हसणाऱ्या विद्यार्थिनी, जातीयवादी मनोवृत्तीतून आलेला दुस्वास, फी, पुस्तके, लेखनसामुग्री, दारिद्र्य, अज्ञान यांच्या अभावातून निर्माण झालेले अस्वस्थ करणारे प्रश्न यापेक्षा त्याला रतनूशी मोठ्या प्रमाणात झगडत रहावे लागते. आनंदाचे नाईक मास्तर शिक्षणाधिकारी सुर्यवंशी यांना सांगतात, "मुलगा हुशार आहे. पण याचं आणि याच्या वडिलाचं नातं प्रल्हाद-हिरण्यकश्पूच्या नात्यासारखं आहे." हे मिथ्यकथेचे संबंध अखेरपर्यंत मोठ्या ताकदीने आणि नाट्यमयतेनी लेखकाने सर्वत्र दाखवलेले आहेत.

आनंदा शाळेत गेल्यापासून ते एस.एस.सी.पास होईपर्यंतच्या काळातले अनुभव, भोवतीचा परिसर, कुटुंबातील आणि गावातील इतर अनेक व्यक्ती, घरातील कष्ट, दारिद्र्य, दारिद्र्यामुळे घरादाराला आणि मनाला येणारी अवकळा, ग्रामीण भागातील माणसांमध्ये आणि आनंदाच्या आईबापांमध्येही असणारे शिक्षणाविषयीचे औदासीन्य, शिकण्यासाठी आनंदाच्या मनाची होणारी तडफड या साऱ्यांचे ग्रामीण बोलीतील निवेदन यामुळे 'झोंबी'ला एक वेगळीच उंची लाभलेली आहे. लेखकाने आनंदाच्या बापाचे-रतनूचे व्यक्तिचित्रण त्याच्या स्वभावातील विक्षिप्तपणा, संतापीपणा अधोरेखित करीत रतनूला साऱ्या कुटुंबाच्या नियतीचेच प्रतीकरूप देणारे अशा स्वरूपाचे बनविलेले आहे. साऱ्या विरोधी शक्तींशी झोंबी घेत शिक्षणाची पायवाट सुटू न देण्यासाठी धडपड करणारा आणि हळूहळू शिक्षणातून वाङ्मयाचे संस्कार घेत वाङ्मयातून दिसणाऱ्या अद्‌भूत जगाचा आधार घेत आपले ध्येय गाठण्यात यशस्वी होणारा आनंदा हा ग्रामीण भागातल्या नव्या आशावादी तरुणांचा प्रतिनिधी आहे. तसेच त्याचे आईबापही खेड्यातल्या कष्टात हाडे झिजवणाऱ्या, राबणाऱ्या, दारिद्र्याशी टक्कर देत मिटून जाणाऱ्या माणसांचे प्रतिनिधी आहेत. 'माणसानं शिवलेल्या कावळ्याच्या पिल्लाला बाकीचे कावळे चारी बाजूंनी हल्ला करून टोचून मारतात, तशी माझी अवस्था झालेली. माझीच शाळा मला टोची मारायला उठलेली' अशा या झोंबीचे अतिशय वास्तव शब्दचित्र रेखाटताना त्यातील आनंदाची गहिरी वेदना लेखकाने मोठ्या ताकदीने शब्दांकित केलेली आहे.

शेवटी ह्या संघर्षाला अखेरच्या दिवसात यश आल्याचे सुखद चित्र लेखकाने रेखाटलेले आहे. "हायस्कूलच्या विद्यार्थ्यांत तिसऱ्या नंबराने पास झालो होतो. दोन मार्कांनी पहिला वर्ग हुकला होता. गणितात पहिला वर्ग मिळाला होता. तीन विषयांत डिस्टिंक्शन मिळालं होतं.... पैसे भरून गुणपत्रिका घेतली नि हायस्कूलच्या कंपाऊंड बाहेर पडलो. त्या कुंपणाबाहेर पडलो नि हायस्कूलकडे परतून पुन्हा पाहावंसं वाटेना. बेडकासारखा उंच उंच उड्या मारत घराच्या दिशेनं धावलो ....."('झोंबी',पृ.३७९) प्रचंड धडपड आणि प्रामाणिक कष्ट यामुळे आनंदाने बघितलेले स्वप्नातील एक शिखर हाताशी आल्यामुळे त्याचा आनंद गगनात मावेनासा होतो.

समाज परिस्थिती, परंपरा, कौटुंबिक मर्यादा, कष्ट, उपासमार, दारिद्र्य, अज्ञान या सर्वांच्या फळ्या पार करून आणि त्यांचा पराभव करून तो पुन्हा नव्या आकाशाला गवसण्यासाठी उंचच-उंच उड्या मारीत राहतो. 'प्रांजल शिक्षणनिष्ठा' हा 'झोंबी'चा मध्यवर्ती आशयबिंदू आहे. ही लेखकाची एकट्याची कथा नसून त्याच्याबरोबरच त्याच्या कुटुंबाचीही ती कथा आहे. स्वतः लेखक, त्याचे आई-वडिल, बहिण-भाऊ यांच्या रूपाने दारिद्रयात आणि अज्ञानात पिचलेल्या शेतकरी कुटुंबाचे वास्तवदर्शी चित्र 'झोंबी'मध्ये उभे आलेले आहे. रतनूला अनसूया, शेवंता, आंद्या, शिवा, हिरा, धोंडू, सुंदरा, चंदरा, लक्ष्मी, आप्पा, आनसा, दौलत

अशी बारा अपत्ये झालेली आहेत. रतनू-ताराला या गजबजलेल्या प्रपंचाचा कसाबसा गाडा रेटावा लागतो. म्हणूनही रतनू-तारा या दांपत्याची आणि त्यांच्या अपत्यांची होणारी आबाळ आणि हेळसांड, परवड आणि फरपट चित्रित करणारी आत्मकहाणी आहे. गावातील जत्राखेत्रा, उरूस-उत्सव, रीतीभाती, श्रद्धा-समजुती, प्रथापरंपरा, लग्नकार्ये, कोर्टकचेऱ्या, हेवेदावे, त्याकाळातील सामाजिक-सांस्कृतिक जीवनात उमटलेले पडसाद या साऱ्या बाबींचे चित्रण वाचकांचे लक्ष वेधून घेणारे आहे.

पु.ल.देशपांडे यांनी "'झोंबी' म्हणजे बाल्य हरवलेलं बालकांड आहे."[२५] अशा शब्दांत 'झोंबी'चा उल्लेख केलेला आहे. ही कुटुंबकथा ताराच्या भव्य व्यक्तिरेखेमुळे एका वेगळयाच उंचीवर पोहोचते. खऱ्या अर्थाने ती भारतीय स्त्रीच्या यातनांची कर्मकथा आहे. ताराच्या माध्यमातून जुन्याकाळातील स्त्रीजीवनाची कशी प्रचंड वाताहत झालेली आहे याचे हुबेहूब चित्रण केलेले आहे. हिच्या यातनेत सर्व भारतीय समाजाच्या स्त्रीच्या अगतिकतेचे दुःख पूर्णपणे भरलेले आहे. म्हणूनच ही 'आई' एक प्रातिनिधिक भारतीय आई आहे. 'झोंबी'बद्दल प्रा.चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "'झोंबी' या कुटुंबकथेत पोरांच्या पोरवड्याची दुःखमय गाथा आहे. परंपरागत नवरेशाहीचा उन्मत्तपणा आहे. भावंडांतील परस्परांबद्दलची मूक आपुलकी आहे. दारिद्र्याच्या भयावह वास्तवतेत ममतेचं उरी फुटणं आहे. ग्रामीण जीवनातले सर्वग्रासी प्रश्न आहेत. ग्रामीण जीवनाची आर्थिक स्थिती कशी भयावह आहे आणि अखंड घाम गाळूनही श्रमिक मनुष्य कसा हवालदिल आहे याचं प्रभावी चित्रण आहे. आजच्या शिक्षणव्यवस्थेत सर्व स्तरांवर पांढरपेशी संस्कृतीचं वर्चस्व कसं आहे हे जाताजाता सुचवताना हजारो आनंदाचं जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या वास्तवाभिमुख होऊन विचार करण्याची वेळ आली आहे असंही ही कलाकृती सुचवते."[२६] थोडक्यात, 'झोंबी' ही शेतातून शाळेकडे झेप घेणाऱ्या 'आन्दा'ची आत्मकथा आहे. तसेच त्याच्या होरपळलेल्या बालपणाची आणि शिक्षणाची ही संघर्षकथा आहे. 'स्व'च्या आत्मशोधाबरोबर समाजभान ठेवून वास्तवाचे प्रांजळ चरित्र रेखाटणारी एक मोलाची आशयवादी साहित्यकृती म्हणून 'झोंबी'चा उल्लेख केला पाहिजे.

## ३.८ विश्वास पाटीलांच्या 'झाडाझडती'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'झाडाझडती' ही विश्वास पाटील यांची सन १९९१ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. 'झाडाझडती'मध्ये एक प्रदीर्घ विशालपट मांडून, विविध माणसांच्या दुःख-वेदना आणि झुंजीच्या निमित्ताने जटिल होत जाणाऱ्या मानसविश्वाचा धांडोळा घेतलेला आहे. लेखकाने 'झाडाझडती'चे सात भाग करून त्यातून 'जांभळी' गावाचे धरणामुळे उठणे आणि पुनर्वसन होता होता तुकड्या-तुकड्यानी तुटत जाणे अतिशय वास्तव पद्धतीने चित्रिलेले आहे. धरण म्हणजे बुडितक्षेत्रातल्या गावकऱ्यांवर ओढवलेलं जिवंत मरण होय. 'झाडाझडती' ही कादंबरी जांभळी गावच्या धरणग्रस्तांची कहाणी आहे.

'झाडाझडती'च्या आशयसूत्राबद्दल सदा कऱ्हाडे म्हणतात, "'झाडाझडती' ही जांभळीची कहाणी आहे. विस्थापितांच्या पुनर्वसनाची कहाणी आहे. पुनर्वसनासाठी झालेल्या संघर्षाची कहाणी आहे. खैरमोडे गुरुजींच्या नेतृत्वाची कहाणी आहे. पण भावांपैकी केवळ कोणा एकाची नाही. विविध घटितांची ती समग्र कहाणी आहे. अनुभवाच्या विराटपणामुळे या कादंबरीला लाक्षणिक गद्य महाकाव्याचे रूप प्राप्त झाले आहे. 'एपिक' म्हणजे महाकाव्य तसेच 'एपिक' म्हणजे भव्य. या लाक्षणिक अर्थाने 'झाडाझडती'तील अनुभवच विराट आणि भव्य आहे."[२७] धरणामुळे विस्थपित झालेल्या अनेक कुटुंबांची वाताहत 'झाडाझडती'मध्ये लेखकाने प्रभावीपणे मांडलेली आहे.

विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती'मध्ये एक धरणग्रस्तांचं, दुसरं नोकरशाहीचं आणि तिसरं सत्तेचं राजकारण करणाऱ्यांचे जग हे अतिशय हृदयद्रावकपणे मांडलेले आहे. धरणग्रस्तांच्या आणि त्यांच्या पुनर्वसनाच्या समस्या अधोरेखित करणारी ही पहिलीच कादंबरी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. 'झाडाझडती'च्या निर्मितीविषयी बोलताना विश्वास पाटील म्हणतात, "शासकीय अधिकारी म्हणून काम करताना मला धरणग्रस्तांचे दुःख फार जवळून पहावयास मिळाले. सरंजामी वृत्ती अंगात भिनलेले उच्चभ्रु, धनदांडगे, राजकारणी, कुटिल व निष्ठुर समाजकंटक यांच्याकडून गोरगरिबांचे होणारे शोषण पाहून मी व्यथित झालो. दुःखी झालो. त्यांच्या या व्यथावेदनेला कादंबरीच्या रूपाने मी आकार दिला. दुसरं म्हणजे मला माझ्या नेर्ले गावचा, आजुबाजूच्या ग्रामीण परिसराचा, तेथील वास्तवाचा फार मोठा अनुभव पाठीशी होता. मी जर शहरात राहिलो व जन्मलो असतो तर कदाचित एवढी चांगली कलाकृती मी लिहू शकलो नसतो. खेड्यात राहिल्यामुळे लोकसंस्कृतीचे निरीक्षण, त्यांची भाषा, आई-वडिलांकडून मिळालेले लोकसाहित्याचे वरदान, ग्रामीण लोकांचा बेरकीपणा, राजकारण या सर्वांच्या अभ्यासातून 'झाडाझडती' कादंबरी जन्मास आली."[२८] विश्वास पाटीलांची ग्रामीण जनजीवनाशी नाळ जोडलेली असल्यामुळे आणि पुनर्वसन व विस्था-पितांच्या कामाचा प्रचंड दांडगा अनुभव त्यांच्या पाठीशी असल्यामुळेच 'झाडाझडती'सारखी वास्तववादी कादंबऱ्यांच्या परंपरेतील सर्वश्रेष्ठ कादंबरी त्यांना लिहिता आलेली आहे.

जांभळी गावाच्या बाजूला एक मोठे धरण होणार असल्यामुळे या जांभळी गावासह आसपासची नऊ गावे बुडितात येणार असतात. वसंता खैरमोडे गुरुजींच्या नेतृत्वाखाली जांभळीचे लोक 'आधी मरण मगच धरण' अशी ताठर भूमिका घेऊन धरणाला विरोध करतात. गावकऱ्यांच्या या विरोधामुळे व एकूणच शासनाच्या उदासीनतेमुळे सुमारे पंचवीस वर्षे 'धरण होणार' ही फक्त अफवाच राहते. गावे बुडणार म्हणून गावात प्राथमिक सुधारणा करण्याकडेही शासन दुर्लक्ष करीत राहते. खासदार शिंगाडेंच्या मुलाला सर्जेरावला साखर कारखाना काढावयाचा असतो. साखर कारखाना काढावयाचा तर ऊस क्षेत्र दाखवले पाहिजे आणि त्यासाठी या दुष्काळी क्षेत्रात धरण होणे अत्यंत गरजेचे असते.

अचानकपणे एके दिवशी दुसऱ्या गावी बाजाराला गेलेल्या जांभळी गावातील माणसांची धरपकड केली जाते. जांभळी गावातील महिला, म्हातारी माणसे यांच्यावर जबरदस्त दहशत बसविण्याचा प्रयत्न शासनाच्यावतीने केला जातो. धरणासाठी जांभळी गावावर बुलडोझर फिरविला जाऊ लागतो. गावकऱ्यांच्या जमिनी अत्यंत माफक किंमतीत संपादित केल्या जातात. त्यांना खैरापूरसारख्या चांगल्या गावी पुनर्वसनाचे स्वप्न दाखविले जाते. परंतु प्रत्यक्षात दुसऱ्याच खडकाळ (माळरान) जागेवर त्यांचे पुनर्वसन करताना त्यांचे साहित्य, सामानही त्यांना घेऊन जाता येत नाही. जांभळीकरांचे धरणामुळे अतोनात हाल होऊ लागतात. अक्षरशः त्यांच्या आयुष्याची राख-रांगोळी झालेली असते. या सर्व प्रक्रियेत स्वार्थी स्थानिक पुढारी, गुंड, स्थानिक पुढाऱ्यांपुढे लाचार होणारे सरकारी अधिकारी यांच्या साट्यालोट्यात धरणग्रस्तांच्या आयुष्यांची ससेहोलपट पुढे दहा-पंधरा वर्षापर्यंत चालू राहते.

धरणग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी अथक परिश्रम घेणाऱ्या खैरमोडे गुरुजींना मारहाण केली जाते. त्यांच्या विविाहित लाडक्या मुलीची अब्रु लुटली जाते. गुरुजींच्या मृत्यूनंतर त्यांच्या प्रेताचे खैरापूरच्या स्मशानात देखील हाल केले जातात. हैबतीसारख्या निष्पाप मोलमजुराचा दिवसा ढवळ्या खून केला जातो. परंतु खासदार शिंगाडेंच्या आशीर्वादामुळे हैबतीचा खून करणारे खूनी मोकळे राहतात. धरणग्रस्तांचे ज्या ठिकाणी पुनर्वसन केलेले आहे, त्याच ठिकाणी सर्जेराव शिंगाडेला त्या जागेवर दुधाचा मोठा प्लॅन्ट टाकायचा असतो. तसेच तो असेंब्लीच्या तिकिटासाठी इच्छुक उमेदवारही असतो. पालकमंत्री असलेल्या सुब्बाराव आण्णांचा जावई जॉन फर्नांडिसला जांभळी बुद्रुक कॉलनीला एक पर्यटन केंद्र करावयाचे असते. धरणग्रस्तांच्या आयुष्याची झाडाझडती शेवटपर्यंत संपत नाही.

पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्यामध्ये आंबेपूर जिल्हा आहे. या जिल्ह्यातील वाघेठाण तालुक्याची दुष्काळी परिस्थिती हटविण्यासाठी खासदार शिंगाडे पाटील प्रयत्नशील असतात. वाघेठाण तालुक्याचा दुष्काळ कायमस्वरूपी हटवण्यासाठी त्या परिसरात धरण बांधण्याचा निर्णय घेतला जातो. त्यानुसार पाटबंधारे मंत्री येऊन भूमिपूजन करतात. धरणामुळे धरणग्रस्त लोकांचे प्रचंड हाल होणार असतात. म्हणून उद्घाटनाच्यावेळी पालकमंत्र्यांना ओवाळायला आलेली आवडाई, 'त्या पूजेच्या ताटावर पायाची ठेप मारते आणि ताट हवेत उधळून लावते.'('झाडाझडती',पृ.१४) इतक्या तीव्र आवेशाने ती धरणाला विरोध करून 'धरण होऊ देणार नाही' अशी ठाम भूमिका घेते. त्या उद्घाटनप्रसंगी त्यांना उद्देशून "तुमचे संसार फुलायसाठी आमची राखरांगोळी करता? तुम्हांला आयाभैनी, घरसंसार हाय का न्हाय?" असा सवाल करते.

जांभळी बुद्रुक धरणामुळे विस्थापित झालेल्या जांभळी बुद्रुक, जांभळी खुर्द, झांजडवाडी, बिबेवाडी, कातोडवाडी, फणसवाडी, इरलेवाडी व साजुली या आठ गावातील अकरा हजार धरणग्रस्तांच्या

झाडाझडतीची ही कथा आहे. हे समूहचित्रण करण्यासाठी लेखकाने व्यक्तिरेखांचा विशाल पट उभा केलेला आहे. लंगडा गोईंदा, त्याची पत्नी आवडाई, त्यांचा मुलगा हैबती, दत्तक गेलेला दुसरा मुलगा गुणवंता, आवडाईचा मावसभाऊ सुभानजी हे 'झाडाझडती'मधील पहिले मुख्य कुटुंब आहे. जांभळी गावावरून बुल-डोझर फिरल्यानंतर आपल्या घराचे झालेले नुकसान पाहून गोइंदा खचून जातो. हा पहिलाच फटका असह्य होऊन गोईंदा आत्महत्या करतो.

आवडाईच्या घरादारावर, शेतावर सर्वात आधी बुलडोझर फिरविला जातो. मात्र आवडाईला हे सारे सहन न झाल्याने ती ड्रायव्हरच्या अंगावर धावून जाते. आवडाई ड्रायव्हरला विचारते, "लोटकंवाल्या, तुला घरदार, बायकापोरं हायत का न्हाईत? मुडदा बशीवला तुजा. कुठाय त्यो सरकार? कुठाय तो भाड्या? चटणीबरोबर शेंदती त्येला."('झाडाझडती',पृ.२४) आपल्या लंगड्या नवऱ्याबरोबर संसार करणाऱ्या आव-डाईचे लेखकाने अतिशय सुरेख चित्रण केलेले आहे.

विश्वास पाटलांनी धरणांमुळे विस्थापित झालेल्या समुहाचे चित्रण अतिशय वास्तवपणाने शब्दबद्ध केलेले आहे. विस्थापितांच्या व्यथा-वेदना आणि दुःख मांडताना ते म्हणतात, "तुमच्या बागा फुलाव्यात, ऊसमळे झुलावेत, साखर कारखाने निघावेत, यंत्रे चालावीत, तुमच्या घराघरात वीज खेळावी, म्हणून आम्ही आमची गावं आणि आमचं भवितव्य धरणांच्या घशात कोंबलं. विकासाचा नारळ फोडण्यासाठी दगड म्हणून आमची डोकी वापरलीत. खोबरं तुम्हाला मिळालं आणि आम्ही पाण्यासाठी, साध्या स्मशाना-साठी भिका मागायच्या, जिवंतपणी आणि मेल्यावरही झडती चालूच."('झाडाझडती',मलपृष्ठ) म्हणजेच विकासाचे नारळ फोडण्यासाठी दगड म्हणून डोकं वापरलेली ही माणसे आपल्या संसारासह उद्ध्वस्त झालेली आहेत. मोठ्या कष्टाने मांडलेल्या संसाराला स्वतःच्या नजरेसमोर मोडताना पाहण्याचे दुर्भाग्य त्यांच्या वाट्याला आलेले आहे.

जांभळी बुद्रुक येथे होणाऱ्या धरणामुळे साजुली, बिबेवाडी, झांजडवाडी, इरलीवाडी, पुणसावडे ही गावे पाण्याखाली जाणार असतात. सुरुवातीला खैरापूर या दीडशे किलोमीटर अंतरावरच्या गावी या धरण-ग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला जातो. परंतु आधी दाखविलेली सोयीची जागा त्यांना न देता ती बदलून अत्यंत किचकट व दलदलीच्या ठिकाणी त्यांचे पुनर्वसन केले जाते. खासदार शिंगाडेंचा चिरंजीव सर्जेराव मूळ जागा बदलण्यासाठी द्राविडी युक्तिवाद करतो. तो भूसंपादन अधिकाऱ्यांना म्हणतो, "साहेब आम्ही खानदानी मराठा आणि तुम्ही कुलवंत ब्राह्मण. आपला देव आहे, धर्म आहे...... त्या तुमच्या पश्चिमेच्या गावठाणात नाना जातीचे लोक राहणार. कोण आदिवासी, कोण महार, कोण मांग, त्या अठरा-पगड जातींचा वारा पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणार ना? मध्ये आला आमचा महादेव. बाटवता काय

देवाला?"('झाडाझडती',पृ.५५) धरणग्रस्तांना चांगल्या सुख-सोयींपासून वंचित करण्याचे कारस्थान देवा-धर्माच्या नावाखाली शिजवले जाते हे लेखकाने सहजपणे सांगितलेले आहे.

धरणग्रस्तांचे नेतृत्व करणारे जांभळीतले एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे खैरमोडे गुरुजी होय. त्यांची पत्नी हिरा आणि धरणापायी जिचा संसार उद्ध्वस्त झाला आहे आणि जिची अब्रु लुटली जाते अशी त्यांची लेक शेवंता यांच्या संपूर्ण कुटुंबाची धरणामुळे वाताहत झालेली आहे. वीस-पंचवीस वर्षे खैरमोडे गुरुजी आणि जांभळी गावाचे लोक धरणामुळे उद्‌भवलेल्या संकटाशी सामना करतात. कोयना धरणामुळे पुनर्व-सनाचा प्रश्न किती गंभीर असतो, ह्याचा दांडगा अनुभव गुरुजींच्या पाठीशी असल्यामुळे ते लोकांना कळवळून सांगत असतात, "गाव पाठीवर घेऊन जाताना दिवसा चांदण्या मोजाव्या लागतील. आपल्याला कुत्रंसुद्धा विचारणार नाही."('झाडाझडती',पृ.१३) गुरुजींनी असे समजावून सांगितल्यानंतरच ही माणसे किंचित सावध होतात. धरणाच्या परिणामामुळे मनुष्याचा होणारा विनाश गुरुजींनी कोयनेत प्रत्यक्षात पाहि-लेला आहे. धरण होऊन गाव बुडणार असल्यामुळे त्या गावात नवे रस्ते बांधले जात नाहीत. शाळेची डाग-डुजी देखील केली जात नाही. ह्या समाजातील वास्तवाचे एक भयावह रूप लेखकाने 'झाडाझडती'मध्ये उभे केलेले आहे.

दत्तू सरपंच, जिल्हा परिषद सदस्य लाला जाधव आणि दारूड्या कांबळे यासारखी स्वार्थी आणि भ्रष्ट माणसेही याच गावातील आहेत. भ्रष्ट सरकारी अधिकारीवर्गाशी संधान साधून स्वार्थ कसा साधायचा आणि शासनाकडून धरणग्रस्तांना मिळणाऱ्या सवलती त्यांच्यापर्यंत पोहोचू न देता वरच्यावर कशा लाटायच्या हे त्यांना पुरेपूर माहिती आहे. दत्तू करवंद्याने आपली सावत्र आई बनुबाई हिला कागदोपत्री मृत घोषित करून तिच्या वाटणीच्या जमिनीचे सत्तर हजार रुपये गिळंकृत करून तिला लोकांची भांडी घास-ण्याची वेळ आणलेली असते.

भूसंपादन अधिकारी वाघधरेसाहेब अव्वल कारकून चोरगे, पुनर्वसन अधिकारी काकडेसाहेब, पत्रावळेसाहेब अशा भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून स्थानिक नेते धरणग्रस्तांना पुरेपूर लुटतात. आपल्या भूमीतून उखडली गेलेली धरणग्रस्त माणसे हातातून उपजीविकेची साधने निसटलेल्या अवस्थेत उपरी म्हणून खैरापूर-केळापुरात विघटित होऊन पडतात. त्यांच्या शेतातील झाडे, विहिरी यांचा हिशोब न होता, तुटपुंज्या आर्थिक मोबदल्यावर त्यांना विस्थापित केले जाते. हाती आलेल्या पैशात लाभक्षेत्रातल्या जमिनी मिळणे अवघड होऊन बसते. तसेच लाभक्षेत्रातल्या लोकांना हे धरणग्रस्त कटकटीचे वाटत राहतात. लेखकाने धरणग्रस्तांवर होणाऱ्या अन्यायाचे आणि त्यांच्या पिळवणुकीचे प्रभावीपणे चित्रण केलेले आहे. राघू भिवा, नामू पिसाळ, बंडू कोकाटे, बळी आण्णा यांसारखे खैरापूरचे जमीन मालक पैसा आणि स्थानिक सत्ता यांच्या बळावर धरणग्रस्तांना रोजचे जगणेही असह्य करून टाकतात.

धरणग्रस्तांचा सहानुभूतीने विचार करणारे आंबेपूरचे जिल्हाधिकारी अनिल देशमुख आणि त्यांचे सहकारी पवार आहेत. पण त्यांच्या कामात अडथळा आणणारे वजनदार स्थानिक पुढारी आहेत. शासन-दरबारी खैरमोडे गुरुजी या अडाणी धरणग्रस्तांची बाजू लावून धरतात. खैरमोडे गुरुजींचे वागणे-बोलणे हे स्थानिक पुढारी, प्रशासकीय अधिकारी, धरणाचे कॉन्ट्रॅक्टर या कोणालाही आवडत नाही. अल्पबचतीच्या साहेबांनी तर त्यांना भांडखोर, हेकट आणि तिरसट अशी विशेषणे देऊन टाकलेली असतात. मास्तर धरणग्रस्तांची कामे करतात म्हणून त्यांना नोकरीवरून काढून टाकले जाते. जमिनीचे पेमेंट व्यवस्थित होत नाही म्हणून गुरुजी सरकारी अधिकाऱ्यांशी वाद घालतात तेव्हा सर्व अधिकारी एक होऊन 'गुरुजींनी दारू पिऊन चावडी जाळण्याची धमकी दिली'('झाडाझडती',पृ.६५) असा पंचनामा लिहून देतात. गुरुजींशी वैचारिक मुकाबला करता येत नाही तेव्हा खैरापूरकर त्यांना मारहाण करतात. बाबूलाल भांबरेसारखा एक तथाकथित समाजवादी त्यांच्यावर परकीय शक्तीचे हस्तक असा आरोप करतो. तरीही गुरुजी न डगमगता आपल्या कार्याशी एकनिष्ठ राहतात.

बबेराव जाधवाचा भाऊ छगनराव आणि राघू भिवाचा मुलगा धोंड्या गुरुजींच्या लाडक्या मुलीवर (शेवंता) बलात्कार करतात. त्यांच्या मुलींवर ओढवलेल्या या दुर्दैवी प्रसंगामुळे गुरुजी हे अक्षरशः थकून जातात. धरणग्रस्तांना स्मशान मिळालेच पाहिजे म्हणून सतत मागणी करत राहिलेल्या गुरुजींच्या मृतदेहाची खैरापूरकर एक प्रकारे विटंबनाच करतात. 'झाडाझडती' या कादंबरीतील दुःख 'आम्हाला माणूस म्हणून जगवा आणि जगू द्या' असा आक्रोश करणाऱ्या माणसांचे दुःख आहे. प्रा.डॉ.रवींद्र ठाकूर हे 'झाडाझडती' या कादंबरीविषयी म्हणतात, "धरणग्रस्तांच्या जीवनाचे आशयद्रव्य अत्यंत ताकदीने या कादंबरीत ओतलेले आहे. धरणामुळे केवळ गावेच उद्‌ध्वस्त झाली नाहीत तर माणसेही आमूलाग्र उद्‌ध्वस्त झाली. काही परागंदा झाली. काही पुनर्वसनाच्या आशेने जीव तगवीत जगत राहिली. या सर्व गोष्टींची लेखकाने केलेली वर्णने आणि गुंफलेले ताणेबाणे इतके रेखीव आहेत की आजच्या कादंबरीकारांपुढे 'झाडाझडती' ही एक आदर्श अशी लक्षणीय कादंबरी आहे."[२९]

खैरमोडे गुरुजींसारख्या विचारी माणसांच्या हातूनही काही चुका झालेल्या आहेत. धरण होण्या-पूर्वीच दत्तू करवंदे त्यांच्याशी समझोता करून निवडणुकीला गावकऱ्यांची मते मिळवितात. दत्तू करवंद्यांचा धूर्त कावा गुरुजी ओळखू शकत नाहीत. खासदार शिंगाडे धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे सोनेरी चित्र त्यांच्यापुढे सुरुवातीला उभे करतात तेव्हा ते विरघळतात. परंतु खासदार शिंगाडे त्यांना गोड बोलून फसवतात. फसगत झाल्यानंतर अखेरीस ते थकत चालल्यावर कार्यकर्त्यांना लढा अधिक संघटित करायला सांगतात. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाविषयीच्या कायद्याबद्दलची त्यांना संपूर्ण माहिती आहे. सरकारने

धरणग्रस्तांना रग्गड सवलती दिलेल्या असतात. परंतु त्या योग्य पद्धतीने धरण-ग्रस्तांपर्यंत पोहोचतच नाहीत.

खैरमोडे गुरुजी हे पुनर्वसनाबद्दल जिल्हाधिकारी देशमुखसाहेबांना म्हणतात, "महाराष्ट्रात पुन-र्वसनाचा कायदा आहे. ज्याच्या जोरावर आम्ही आमच्या हक्कांसाठी लढतो, भांडतो, पण इतर राज्यांत पुनर्वसनाचा कायदाच नाही साहेब. त्यांनी कशाच्या जोरावर कोणाशी भांडायचं?"('झाडाझडती',पृ.२९९) राष्ट्राने स्वीकरलेली विकासनीतीच मुळात चुकीची आहे, असे गुरुजींचे प्रामाणिक मत मत होते. धरणाला प्रत्यक्ष सुरुवात होण्याआधीच ते जिल्हाधिकाऱ्यांना ऐकवतात, "तुमचं धरण आणि आमचं मरण साहेब" ('झाडाझडती',पृ.३६,३७) किंवा "धरण बांधा साहेब, पण मोठ्या धरणाचा मुका कशाला घेता? छोटी छोटी धरणं बांधा, लोकांची गावंही उठणार नाहीत आणि पाणीही मोठ्या धरणाइतकंच मिळेल. नाहीतर मोठी धरणं साठ-सत्तर वर्षांत गाळानं भरतात, निकामी होतात. तोवर धरणग्रस्तांच्या पिढ्या बरबाद" सरकारचे धोरण कसे फसते ते लेखकाने मोठ्या हिकमतीने सांगितलेले आहे. मोठी धरे बांधून शासनाला खरोखर राष्ट्रातील सर्व घटकांचा विकास साधावयाचा आहे का? या प्रश्नाच्या संदर्भातील चिंतन कादंबरीत निवेदकाचे मुखाने व्यक्त झालेले आहे.

जांभळी गावातील धरणग्रस्तांना स्मशानभूमीसुद्धा मिळत नाही. शाळा, समाजमंदीर अशा सरकारी कामात बांधकाम ठेकेदार आणि अधिकारी भ्रष्टाचार करतात. धरणग्रस्तांच्या जमिनी संपादित करण्यासाठी खासदार, स्थानिक पुढारी आणि वरिष्ठ अधिकारी भूलथापा मारून धरणग्रस्तांना फसवतात. "शांत व्हा, देवांनो, शांत व्हा, धरणग्रस्त म्हणजे धरतीची लेकरं. आम्ही तुम्हाला पोटाशी बांधू, उघड्यावर पडू देणार नाही. तुमचा त्याग आम्ही विसरणार नाही. जेवढी तुमची जमीन जाईल तेवढी जमीन देऊ. घराच्या बदली घर देऊ, फणाला फण आणि खणाला खण देऊ."('झाडाझडती',पृ.३५) असे म्हणणारे नेतेच कालांतराने धरणग्रस्तांचे शोषण करू लागतात. धरणग्रस्तांच्या नोकऱ्या लुबाडणे, दिखाऊपणा म्हणून धरणग्रस्तांना रोजंदारीची कामे देणे, खोटं बोलून गरीब जनतेचे शोषण भांडवलदार, पुढारी आणि गुंड अशी सगळीच मंडळी करतात.

पुढारी, भांडवलदार आणि दलाल यांच्या सोयीसाठी आसपासच्या कार्यकर्त्यांचे, नातेवाईकांचे पोट भरण्यासाठी विकास कामे राबविली जातात. परंतु महत्त्वाच्या जागावरून गरिबांना हुसकावून लावले जाते. धरणाच्या कामात विरोध करणाऱ्यांना विकास कामात अडथळा आणला म्हणून त्यांचा कायमचा बंदोबस्त केला जातो. धरण झाल्यानंतरही या धरणग्रस्तांना सुखाने जगू दिले जात नाही. आपली जमीन, घरदार, समाज, नातीगोती, वातावरण यातून मुळापासून उखडला गेलेला धरणग्रस्तांचा समूह हा कष्टाने मिळाले-ल्या भाकरतुकड्यावर सुखासमाधानाने जगू पाहत असतो. परंतु ह्या जुजबी गोष्टीदेखील मिळत नाहीत.

म्हणूनच त्यांच्या ह्या दुःखाबद्दल लेखक लिहितात, "विकासाला दात असतात, नखं असतात, माज असतो, पण भावना नसतात, मन नसतं."('झाडाझडती',पृ.४६३) खैरमोडे गुरुजी, त्यांची मुलगी शेवंता असू देत वा हैबती असू देत, सर्व याच नखांचे दातांचे अन् माजाचे शिकार आहेत. ही सर्व मंडळी याच शोषक व्यवस्थेचे बळी आहेत. म्हणूनच 'झाडाझडती' या कादंबरीतून येणाऱ्या समस्या ह्या धरणामुळे मनुष्य जीवनाच्या झालेल्या वाताहतीच्या आहेत.

विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती'च्या आशयसूत्राबद्दल मराठीतील ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा म्हणतात, "प्रादेशिक कादंबरीचे एक नवे शिखर 'झाडाझडती'च्या रूपाने वाचकांपुढे उभे राहील. 'पानिपत' प्रमाणेच 'झाडाझडती'चाही आवाका महाकाव्य सदृश्य आहे. पानिपतप्रमाणेच 'झाडाझडती'तही एक सर्वंकष संघर्षाचा, घनघोर लढाईचा व्यापक पट मांडण्यात आलेला आहे. या लढाईला जे निमित्त आहे, ते जांभळी धरणामुळे विस्थापित होणाऱ्या भूमिपुत्रांच्या पुनर्वसनाचे आणि कायद्यानुसार जे मिळणे आवश्यक ते न्याय्य लाभ पदरात पाडून घेण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे आहे; परंतु एकापरीने बारा हजार धरणग्रस्तांचे प्रश्न वा पुनर्वसन हा या कादंबरीचा विषय वरपांगी आहे; खरा संघर्ष महाभारतासारखाच सनातन आहे. मानवी मनातील सारे काही मलाच मिळायला हवे ह्या आत्यंतिक हव्यासातून आणि माणसाचे न्याय्य हक्क हिरावून घेण्याच्या स्वार्थबुद्धीतून हा संघर्ष निर्माण झालेला आहे. एका निःशस्त्र व्यक्तीविरुद्ध प्रचंड ताकद असणारी सत्ता! महाभारतातील पांडवांना सुईच्या टोकावर बसेल इतकीही जमीन देण्याला उन्मत्त कौरव नकार देतात; भूमिपुत्रांनाही जणू तसाच अनुभव येतो."[३०] नोकरशाहीबरोबर खैरापूरचे मूळ जमीन मालक आणि संधिसाधू अन्य नागरिकही धरणग्रस्तांच्या छळवणुकीचे वेगवेगळे प्रयोग चालू ठेवतात. खून, बलात्कार, मारहाण, जनावरे पिकात शिरल्यानंतर त्या जनावरांना बेदम बडवून काढणे, उभे पीक कापून नेणे, त्या उभ्या पिकात जनावरे सोडणे, रात्री-बेरात्री एकट्याला गाठून दम भरणे इत्यादी अनेकविध मार्ग हाताळले जातात. शेवंतावर बलात्कार दिवसाढवळ्या केला जातो. हैबतीच्या पोस्टमार्टेमचा रिपोर्टही फिरवला जातो. त्याला मारणाऱ्या राघूला वाचवायचा प्रयत्न खासदार शिंगाडे करतात.

युगायुगांपासून इथल्या सरंजामशाहीने व भांडवलशाहीने सामान्य माणसांचे शोषण केलेले आहे आणि ते पुढेही अव्याहतपणे सुरूच राहणार आहे. यासंदर्भात वसंत खैरमोडे गुरुजींनी केलेले भाष्य हे अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे. एके ठिकाणी खैरमोडे गुरुजी म्हणतात, "लांब तिकडे गोरी माणसं काळ्या गुलामांना मारझोड करतात असं ऐकतो. तिथे एक बरे असते. मारणारा कोण व मार खाणारा कोण हे एकमेकांना माहित तरी असते. पण आमचा भारत जगावेगळा! आसूड तर कोणी मारीत नाही, पाठीवर वळ मात्र उठतात. कुणा कुणाचा हात धरायचा? भुतासारखी, न दिसणारी पण क्षणाक्षणाला बोकांडी बसून गाळात रुतवून मारणारी, झडती घेणारी एक चिरेबंदी व्यवस्था." खैरमोडे गुरुजींचे हे भाष्य धरणग्रस्तांच्या

व्यथा-वेदनांना अचूकपणे मुखर करणारे आहे. धरणग्रस्तांची ही झाडाझडती अनेक युगांपासून होत आलेली आहे.

'झाडाझडती'चा शेवटही अतिशय सूचक अशा पद्धतीने झालेला आहे. "अजून खूप लढायचं होत. झगडायचं होतं. प्रश्नांचे डोंगर शिल्लक होते. झाडाझडती काय एवढ्या लवकर संपणार आहे?"('झाडा-झडती',पृ.५१९) अशा प्रश्नचिन्हाने या कादंबरीचा शेवट झालेला आहे. हैबतीसारख्या तरणाबांड गडी परमनंट नोकरीसाठी हेलपाटे घालून थकतो. एखादा दिलदार मनाचा सुभानराव सत्तेपुढे लाळ घोटणाऱ्या या व्यवस्थेमुळे मढे होऊनही कुजत राहतो. एखादा कुशाराजा आपल्या लेकीच्या लग्नाच्या काळजीने मोहाच्या दारूच्या आडवाटेने जातो किंवा वाघाच्या कातड्यातून चोरीचा पैसा कमावण्याची चोरटी वाट पत्करतो.

मूळ जांभळी गावाच्या जमिनीवर उभे राहिलेले धरण आणि अधिकाऱ्यांची, नोकरदारांची कॉलनी मोठ्या दिमाखात आणि वैभवात उभी राहते. त्या धरणाच्या पाण्यावर धनिकांचे साखर कारखाने उभे आहेत, मळे बहरले आहेत. त्या जमिनीचे खरे मालक असलेले सगळे सर्वसामान्य धरणग्रस्त कॉलनीला हवे असतात. मूळ जमीन मालक त्या कॉलनीवर नोकरचाकर म्हणून कामे करतात. यासंदर्भात लेखक लिहितात, "....आणि आज हा मुलूख बघावा तर परका. इथून छाती वर काढून कोणी चालू द्यायचं नाही. फरशी पुसायला, भांडी घासायला मात्र आम्हा मावळ्यांना बकुळ मागणी. रानचा राजा कुशासुद्धा घुंघराची काठी घेऊन गुरख्यासारखा तुमच्या दारात उभा राहणार आहे...इथल्या पांढऱ्या इमारती, चमचमत्या गाड्या, सुटाकोटातली माणसं, सारंच परदेशातून अवतरलेलं. जांभळी परिसराच्या नरडीवर पाय ठेवून विकासाचा चकचकीत बूट उभा आहे. पण त्याच्या तळव्याला बारीक मोठं तांबीरलेलं खिळं. त्याची बोचणी, टोचणी, आग नि धग सोसत सोसत आमचा श्वास कोंडला रे?"('झाडाझडती',पृ.४४७)

'झाडाझडती'मध्ये विविध धरणग्रस्तांच्या समूहजीवनाचे एकात्म चित्र घडविलेले आहे. आशा सावदेकर यांनी 'झाडाझडती'बाबत नोंदविलेला अभिप्राय अतिशय सार्थ आहे. "विकासाचा नारळ फोडण्यासाठी दगड म्हणून धरणग्रस्त माणसांची डोकी वापरली गेली आहेत. आणि त्यांना गाडून आज पर्यटन केंद्र चकचकीत रूपात उभे आहे; मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी कमानी तयार आहेत. कोटींचे हिशेब ठेवणारी ही प्रगती आहे. कोट्यावधी रुपयांची धार सोडणारे हॉटेल उद्योग उभे राहणार आहेत. धरणग्रस्तांच्या किरकोळ मागण्यांसाठी हैबतीच्या खुनी माणसांना ताब्यात द्या आणि मग त्यांच्यासाठीच हायकोर्टात चांगला वकील द्या अशी तोड निघते; प्रकल्पाला विरोध करण्याची फॅशन झाली आहे, असे मंत्री सहजपणे बोलतात. कादंबरीचे खरे चित्र येथेच पूर्ण होते. एका समुहाचे भविष्य धरणाच्या पायाभरणीसाठी वापरले गेले आहे. तो समुह आहे तिथेच आहे. त्यांच्या हाडेकातड्यावरील चिंध्या आणि डोळ्यातली निराशा तशीच आहे"[३१] धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी शासनाने खूप चांगले कायदे बनविलेले आहेत. त्या कायद्यांचा

सुयोग्यपणे वापर केल्यास धरणग्रस्तांच्या सगळ्या समस्या सुटतील. परंतु दुर्दैवाने नेते, त्यांच्या हाताखालचे गुंड लोक अन् स्वातंत्र्य युगात नोकरशाहीचं जे व्यक्तित्व निर्माण झालंय ते लोकविरोधी, हिंसक, आत्म-केंद्रित, नीतिहीन व मूल्यहीन असल्यामुळे सर्वसामान्य माणूस या लढाईत एक तर आत्महत्या करतो किंवा त्याची हत्या वा शिकार केली जाते अथवा दगाबाजीनं त्याला संपवण्यात येतं. धरणांमुळे धरणग्रस्तांच्या आयुष्याची राखरांगोळी झालेली आहे. यासंदर्भात लेखक लिहितात, "पंधरा वर्षांच्या जीवघेण्या प्रवासात बहुतेक बाया-बापड्यांची जवानी जळली होती. हाडं ढिली झाली होती. बनुबाईसारखीचं आयुष्य म्हणजे नांगुटीवर वाळत घातलेली चिंधी. देव गेलं, गोईंदा, पांडू येताळा, गुरुजीसारखी देवगुणाची माणसं गेली. नकसा, फुलाची कपाळं पांढरी झाली. शेवंतीला कुकू मानवलं नाही. उलटं बाधलं. आणि आज हा मुलूख बघावा तर परका, इथून छाती वर काढून कोणी चालू द्यायचं नाही. फरशी पुसायला, भांडी घासायला मात्र आम्हा मावळ्यांना बक्कळ मागणी. रानचा राजा कुशा सुद्धा घुंघराची काठी घेऊन गुरख्यासारखा तुमच्या दारात उभा राहणार आहे. हरबा नावाड्याच्या काठीचा डोल गेला. पुण्यवंत सुभानजीचा देह आडवाटेला फोल झाला."('झाडाझडती',पृ.५१६) स्वातंत्र्योत्तर काळातील हे समाजचित्र अनेक आयामांसह इथे प्रभावी-पणे चित्रित झालेले आहे.

विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांच्या जिजीविषा, त्यांचा संघर्ष, शारीरिक कष्टाची तयारी, वांझोटा क्रोध या भाव-भावनांचेही उत्कृष्ट चित्रणही केलेले आहे. धरणांमुळे अनेकांचा संसार आणि घरे विस्कट-लेली आहेत. 'झाडाझडती'मध्ये एका विशाल समुहाचे चित्रण झालेले आहे. धरणग्रस्तांच्या समस्यांबरोबरच त्यांच्या जीवनाचेही दर्शन लेखकाने मोठ्या परिणामकारकतेने रेखाटलेले आहे.

## ३.२.९ नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'राघववेळ' ही नामदेव कांबळे यांची सन १९९५ सालचे साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेली महत्त्वाची कांदबरी आहे. नामदेव कांबळे हे नव्या दमाचे आणि सकस दर्जाचे लेखन करणारे दलित साहित्यिक आहेत. वैविध्यपूर्ण लेखन करणाऱ्या नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ', 'ऊनसावली' आणि 'साजरंग' या कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही कादंबरी म्हणजे मांग जातीची जीवनसृष्टी, गावगाडा आणि श्रमजीवींच्या शोषणाची चित्रकथा आहे. 'राघववेळ' या कादंबरीला बा.सी.मर्ढेकर, ह.ना.आपटे पारितोषिक, ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार आणि साहित्य अकादमी पुरस्कार इत्यादी अनेक मानाचे पुरस्कार लाभलेले आहेत. नामदेव कांबळे यांच्या घराण्यात लेखनीची कुठलीही परंपरा नसताना हा लेखक केवळ प्रतिभेच्या बळावर पुढे आलेला आहे. एखाद्या तरुण लेखकाने एकदम कादंबरी या वाङ्मयप्रकाराला आरंभीच हात घालावा आणि एक चांगली साहित्य कलाकृती सहजपणे उमलल्यासारखी आतून निर्माण होऊन आविष्कृत व्हावी. ही किमया वाङ्मय

व्यवहारात फार क्वचितच घडून येत असते, अशी दुर्मिळ घटना 'राघववेळ' या कादंबरीच्या बाबतीत घडलेली आहे.

नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' ही सन १९९३ साली प्रसिद्ध झालेली पहिली उल्लेखनीय आणि अनेक दृष्टीने महत्त्वाची ठरलेली कांदबरी आहे. या कांदबरीच्या यशानंतर नामदेव कांबळे 'रघू'च्या विकसनाची प्रक्रिया 'ऊनसावली' आणि 'साजरंग' या त्रिखंडात्मक मालिका कादंबरीतून रेखाटण्याचा प्रयत्न करतात. लेखकाने त्रिखंडात्मक कादंबरी लेखनाच्या प्रयोगासह आणि 'रघू' या नायकाच्या जीवनचरित्रासह मातंग जातीचा गावागाड्यातील इतिहासच शब्दांकित केला आहे. या तिन्ही कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी अनेक पातळ्यांवरील भूक हीच आहे. या संदर्भात प्रा.भालचंद्र फडके म्हणतात, "मराठी साहित्यात अभावग्रस्त समाजाच्या वेदनांना प्रथम आकार येत होता. त्यातील पोटाच्या भुकेने तडफडणाऱ्या कुटुंबांचे दुःख बोलके होत होते. मराठी कथा-कादंबऱ्यात कामक्षुधेचे चित्रण अनेक पातळ्यांवर आलेले आहे; पण कुटुंबाला जाळून टाकणारी भूक हा परंपरागत जाणिवेचा विषयच नव्हता. 'राघववेळ' या कादंबरीचा आरंभच भुकेच्या ऋचेने झालेला आहे."[३२] फडकेंच्या या मताच्या आधारे कादबंरीतून व्यक्त झालेल्या भुकेला अनेक पातळ्या असल्या तरी 'पोटाची भूक' नव्या जाणिवेसह अभिव्यक्त होणे ही बाब महत्त्वाची आहे.

'राघववेळ'मधून एक अलक्षित, अस्पर्शित आणि मातंग समाजाची कथा-व्यथा ते साकारतात. 'राघववेळ' ही विधवा वालंबी ह्या मातंग जातीतील स्त्रीची जीवनकहाणी आहे. या कादंबरीत महाराष्ट्रातील मांग जमातीच्या जीवनरहाटीचे प्रत्ययकारी चित्रण आलेले आहे. गावगाड्यात कोणताही हक्क नसलेली, गावाची इडापिडा वाहून नेणारी ही जमात टोपल्या, झाडू तयार करणे, दोरखंड वळणे, बाज विणणे, गावात अमावस्या, ग्रहण किंवा देवीची स्थापना होण्याच्या काळात जोगवा अथवा भीक मागणे या पद्धतीने ही जमात आपला चरितार्थ चालवत असते. भूक, दारिद्रय आणि पोटासाठी करावी लागणारी लाचारी त्यांच्या पाचवीलाच पुजलेली आहे. ही वालंबीच्या व्यथेची कथा आहे आणि म्हणूनच तिच्या पुत्राच्या-रघूच्या व्यथेची आणि धडपडीची ही गाथा आहे. लेखकाने मांग जमातीची ही महागाथा आपली स्वतःची जीवनकहाणी म्हणून न सांगता ती 'रघू'च्या रूपाने सांगितलेली आहे. मांग जमातीतील कौसा, रघू आणि सीताराम या पोरांना वाढवण्यासाठी कष्ट करणारी वालंबी, तिचे कुटुंब आणि तिच्या भोवतीचे समाजवास्तव या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. 'राघववेळ' या कादंबरीचा नायक 'रघू' असला तरी अभावग्रस्त जीवन वाट्याला आलेली आणि रघूच्या शिक्षणासाठी विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेत धडपडणारी दलित समाजातील एक प्रातिनिधिक स्त्री म्हणून वालंबी सुद्धा तितकीच महत्त्वाची आहे.

शिक्षण घेणारा तिचा मुलगा रघू हा हळूहळू बदलतो आहे. आपल्या आणि आपल्यासारख्या इतरांच्या जगण्याच्या अवहेलनेचे, विटंबनेचे भान त्याला अनेक अनुभवांतून येते आहे. दलित स्त्रीच्या

लैंगिक शोषणाचे वास्तव अतिशय संयमाने आणि प्रभावीपणे चित्रित करणारी ही कांदबरी रघु मॅट्रिक होतो या घटनेने संपते. ग्रामीण जीवनातल्या अनेक सामाजिक व सांस्कृतिक तपशिलांतून मांगाच्या जगण्यातील दुःखद भयावहता लेखकाने परिणामकारकपणे चित्रित केलेली आहे. 'वसारी' आणि 'डोंगरकिन्ही' या दोन गावाच्या भोवतीने प्रामुख्याने कथानकाची मांडणी केलेले आहे. वसारीत गावकुसाबाहेर मांगवाड्यात रेखीव टोपले विणणाऱ्या परंतु दम्याने अकालीच मरण पावलेल्या कळणू जाधवाच्या कुटुंबाची ही हृदयद्रावक कहाणी आहे. वालंबी ही कळणूची बायको असून तिला कौसा, रघु आणि सीताराम ही तीन मुले आहेत. हे कुटुंब गावकी आणि भावकी जोपासत केवळ पोटाची भूक शमवण्यासाठी काबाडकष्ट करीत असते. विधवा वालंबीला लहान दीर पायरूआणि त्यांची पत्नी हरणी यांचा तिला गावात राहण्यासाठी भक्कम आधार असतो. कळणूचे निधन झाल्यावर वालंबीच्या खांद्यावर कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी येऊन पडते. कुटुंबाचे हे रहाटगाडगे चालवताना वालंबीची दमछाक होते. या कामात तिन्ही मुलेही तिला आपापल्या परीने मदत करीत असतात. परंतु गावकीचा टोकदार दृष्टिकोन असल्यामुळे काम करूनही पोटाची भूक भागवणे वालंबीला कष्टदायक असते. रघूला शिक्षणाची प्रचंड ओढ असल्यामुळे शिक्षणामुळेच आपला रघू 'साहेब' होईल आणि कष्टाच्या अपमानजनक जगण्यातून त्याची सुटका होईल असे वालंबीला वाटत असल्यामुळे ती रघूबरोबरच सीतारामलासुद्धा शिकवते. 'राघववेळ'मध्ये 'रघू'चे माध्यमिक शिक्षण पूर्ण होते.

वालंबी, सीताराम आणि रघू यांची कुटुंबकथाही रघूच्या शिक्षणाच्या समस्येतून निर्माण झालेल्या प्रसंगांनी अधिक समृद्ध झालेली आहे. कादंबरीच्या पूर्वार्धात मांगांचे सामूहिक जीवन भरघोसपणे चितारलेले आहे, तर उत्तरार्धात या मांग जातीतील रघूसारखे व्यक्तिमत्त्व कसे उभे राहते आणि कोणत्या कौटुंबिक व सामाजिक संघर्षातून वाट काढीत चांगला आकार ग्रहण करते याचे चित्रण आलेले आहे. रघू या सर्व अडचणींवर मात करीत आपल्या बुद्धीच्या जोरावर पहिल्या वर्गात मॅट्रिकची परीक्षा पास होतो. उगवणाऱ्या सूर्याच्या आधीच्या राघववेळेचे हे कुटुंबचित्र-मांगजातीचे चित्र रघूच्या रूपात आशाआकांक्षांच्या परिपूर्तीच्या आगामी उदयकाळाचे चित्र आहे. मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तम यश मिळाल्यानंतर रघू आईच्या पाया पडतो, आणि वालंबीच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू ओघळू लागतात. किंबहूना सारे कुटुंबच या आनंदात बुडून जाते. या कादंबरीच्या अखेरीस वालंबी म्हणते-"झालं माह्या कष्टांच चिज-पाह्य न, पास झाला रघू आपला. तुमचं ऐकलं. कंबर बांधली. चीजच झालं त्यांच. तुम्ही आस्ते आता तर नव्हत व्हतं! खरं ह्ये तुमचं. तुमचीच साया ह्ये लेकरावर, म्हणूनच तर मॅट्री झाला रघू. पण लय सोसलं बरं लेकरानं माह्या."('राघववेळ',पृ.३०६) दलित चळवळीतील सर्व स्त्रियांचे विशेष म्हणजे आपल्या मुलाबाळांनी शिकले पाहिजे यासाठी त्या प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. म्हणूनच कादंबरीच्या शेवटी वालंबी 'आजचा

दिस माह्या जिनगीतला लय आक्रातीचा दीस' असे समाधानाचे उद्‌गार काढते. पण यासाठी वालंबीने आपल्या नवऱ्यापाठोपाठ खूप सोसलेलं आहे. 'रघू लय मोठा शिकन, मोठा सायेब व्हईन' हे स्वप्न वालंबीने उराशी जपलेले असते.

नामदेव कांबळे यांनी पोटाच्या भुकेने तडफडणाऱ्या कुटुंबाचे दु:ख अतिशय परिणामकारकपणे 'राघववेळ'मध्ये मांडलेले आहे. 'राघववेळ' या कादंबरीचा आरंभच भुकेच्या ऋचेने झालेला आहे. "मांगाच्या घरातील पीठ संपले. घरातील दाणागोटा तर केव्हाच संपला होता."('राघववेळ',पृ.१) समाजव्यवस्थेने मांगाच्या ओटीत कायमची 'भूक' घातलेली आहे. उत्पन्नाचे कोणतेही साधन हाती नसल्यामुळे या जातीला आर्थिकदृष्ट्या परावलंबीच राहावे लागते. पायलीभर ज्वारी मिळवण्यासाठी होणारी पायरूची तडफड आणि निराशा तसेच त्याने पर्यवसान गांधी टोपी घातलेल्या देशमुखांच्या वासनेपुढे देहाचा बळी ठेवणाऱ्या पायरूच्या बायकोची शब्दातील व्यथा लेखक सादर करतो. "जेवारी पाह्यजे व्हती. दोन दिवसापासून लेकरं उपाशी ह्येत मालक" अशी देशमुखाला विनवणी करणाऱ्या पायरूला 'जरा भरानं दे भाबीले धाडून' असे देशमुख उत्तर देतात. मांग स्त्रियांच्या दारिद्रयाचा फायदा घेऊन त्यांना आपल्या वासनेचे बळी करण्याचे जमीनदारांचे वा पैसेवाल्यांचे वास्तव लेखकाने प्रभावीपणे व्यक्त केलेले आहे. एखादी हरणी पायलीभर ज्वारीसाठी देशमुखाची वासनापूर्ती नाइलाजाने करते, तर कौशीची सासू गजरी पंडितराव देशमुखाबरोबर रखेलीसारखे संबंध ठेवते. एवढंच नव्हे तर आपल्या मुलाच्या पत्नीला कौशीलाही भुजंगरावाच्या कुशीत ढकलण्याचा प्रयत्न करते. पण सामान्यत: मांग स्त्रियांच्या मनातही वालंबीसारखेच आपलंही शील पवित्र ठेवण्याचा संस्कार असतो. क्वचित मुलांच्या फीसाठी, पुस्तकांसाठी यादव पाटलांकडे शरीर विकण्याचाही मोह वालंबीला होतो. परंतु त्यातून ती स्वत:ला सावरते. तिच्या अंतर्मनाची व्याकुळता तिच्या ग्रामीण अशिक्षित मनाचा तोल सांभाळून लेखकांने मोठ्या संयमाने व्यक्त केलेली आहे.

वालंबीने स्वत:च्या निष्ठा सांभाळून आपल्या वासनेवरती मात केलेली आहे. यासंदर्भात ती जे स्वत:शी बोलते, ते तिचे सुजाणपण व्यक्त करणारे आहे. ती म्हणते- "आपूण रांडव बाई. मन काय आपल्याले नाही? ह्ये न मन ह्ये कुडी हे. चारचौघीसारखी आपूणबी ह्ये. पण मन मारा लागते न माय! पडीक जमीन वहितीले काढली तर तन टाका का धान टाका, उगवतेच ते ...जीव कायबी म्हणे पण कुडीची भूक टाळा लागते. रांडाव बाईला तर इसराच लागते अशा भुकेला."('राघववेळ',पृ.९९) तसेच पुढच्या एका प्रसंगात ती म्हणते, "नोको माय. आजोर जीव जाळला. आपूण-आता त्या जीवाले शेण खाय म्हणांव ? त्या परीस मेलेलं पुरलं. पणं मेल्यानं रघूच्या फीची सोय लागन?......... नोको. काय नाही पडेल त्यात जीवाले सरमासांडी, बाईला कान-कोंडी व्हते. त्यानं मंग कोणी बापासार्क दिसत नाही, भावासार्क वाटत नाही. बाईनं एक नवरा सोडला तर आलम दुनियाची बाईच आसावं. काही बी झालं तर!"('राघववेळ',पृ.२८१) या दोन्ही

प्रसंगातून तिचे मनोगत वाचल्यानंतर तिचे सुजाणपण व्यक्त होते. सगळ्या मांग वेटाळ्यातील तिचे वेगळेपण तर लक्षात येतेच. पण म्हणून ती केवढ्या उंचीची आहे हे ही लक्षात आल्यावाचून राहत नाही. आपल्या स्त्रित्वाचे तर्पण करूनच आपली उंची वाढणार आहे हे त्या अडाणीबाईच्या लक्षात आलेले आहे. तिच्या मनाची सैरभैर अवस्था थोडक्यात पण खूपच मनोज्ञतेने लेखकाने चितारलेली आहे. वालंबीच्या मनातील वादळ लेखकाने मोठ्या सामर्थ्याने चित्रित केलेले आहे.

कौसाची सासू गजरी ही कौसाला ज्या तऱ्हेने छळते, तिच्यात व नवऱ्यात बेबनाव घडवून आणते आणि जेवणात विषारी सरड्याची शेपटी घालण्याचा आळ घेऊन माहेरी घालवते. तो सर्व प्रसंगही ग्रामीण वास्तव आणि ग्रामीण मन यांच्या मर्यादा लक्षात ठेवून लेखकाने कलात्मकतेने चितारलेला आहे. मांगवाड्यातील माणसं, स्त्रिया गावगाड्याच्या चक्रातून वाट्याला आलेल्या शोषणाच्या शृंखलेत अडकलेल्या आहेत. गजरी आणि हरणी या स्त्रिया भुकेसाठी शरीराचा व्यभिचार करून कुटुंब चालवतात. पायरूची बायको हरणी पोटासाठी देशमुखाला आपले शरीर अर्पण करते. हे सर्व पायरूला ठाऊक असूनही तो संताप व्यक्त करीत नाही. उलट त्याला तो मूकपणे संमतीच देतो. "सोताची भूक इसरता आली आस्ती आपल्याले, बायकोलेबी, पण चिल्यापिल्यांची भूक नाही इसरता येत नाही." असा भुकेचा प्रश्न तीव्र असला तरी सर्वच स्त्रिया वालंबीचा अपवाद वगळता, येथे चारित्र्याशी तडजोड करताना दिसतात. पायरू हा वालंबीच्या घराच्या बाबतीत समंजस कर्त्यापुरुषाची जबाबदारी समर्थपणे पेलतो आणि संकटप्रसंगी तो वालंबीला मदत करतो.

धोंडी मागायला निघालेल्या सीतारामचे आणि धोंडीचा हेल धरणाऱ्या मांगांचे वर्णन चित्रमय पद्धतीने केलेले आहे. गावगाड्याचे गावातील वास्तव समग्रपणे रेखाटण्यासाठी लेखकाने मौलिक युक्त्या वापरलेल्या आहेत. 'राघववेळ'च्या पूर्वार्धात मांगांचे सामूहिक जीवन भरघोसपणे चितारले गेलेले आहे. तर उत्तरार्धात मांग जातीमधील रघूचे व्यक्तिमत्त्व कसे उभे राहते आणि कोणत्या कौटुंबिक व सामाजिक संघर्षातून वाट काढीत चांगला आकार धारण करते याचे चित्रण आलेले आहे. 'राघववेळ'ची काही प्रकरणे प्रारंभी निसर्गवर्णन वा सांस्कृतिक विधीचे वर्णन करणारी आहेत. 'राघववेळ'मध्ये वेगवेगळ्या निमित्ताने सगळा गाव कसा जवळ येतो, त्यातून त्यांच्या कृतीउक्ती कशा घडायला लागतात याचे चित्रण आलेले आहे. लेखकाने नवरात्रीच्या इनाई देवीचा म्हणजेच मांगांच्या गौरीच्या पूजनाचा प्रसंग फारच कलात्मकतेने चितारलेला आहे. यात लोकगीतांचा केलेला वापर आणि मांग स्त्रियांनी गायलेली इनाईची कथा मांग जीवनाच्या अनुभवाचा कादंबरीतला पोत विलक्षण बळकट करणारी आहे. 'राघववेळ'मध्ये सामाजिक संक्रमणावस्थेतील वास्तवाचे फार सूक्ष्म आकलन लेखकाने केलेले आहे. विशेषतः मातंग कुटुंबातील मांगांचे आणि त्यांच्या कुटुंबातील कमालीचे दारिद्र्य, त्यांचे वेगवेगळ्या प्रसंगांचे मागणे, त्यांच्या परंपरा

आणि संस्कृती, त्यांचे सामूहिक जगणे लेखकाने फार बारकाईने प्रकट केलेले आहे. हे करीत असताना मातंगामध्ये म्हटली जाणारी गाणी, त्यांच्या श्रद्धा आणि लोकभ्रम यांचेही चित्रण त्यांनी केलेले आहे. विशेषतः इनाईमातेचा उत्सव आणि रात्रभर म्हटले जाणारे तिचे गाणे या सगळ्यांमधून मातंगाचे भावविश्व प्रकट होत जाते.

'राघववेळ'मध्ये नामदेव कांबळे यांनी वैदर्भी बोलीचा वापर मोठ्या समर्थपणे केलेला आहे. अनेक ठिकाणी मांगांच्या पारंपरिक जगण्याच्या संदर्भातील असंख्य नवे शब्द तर येतातच. पण त्यांच्या पारंपरिक व्यवसायाशी संबंधित असणारे व्यावसायिक शब्दही सहजपणे येतात. तसेच वैदर्भीय म्हणींचाही यथायोग्य-पणे वापर लेखकांने केलेला आहे. उदाहरणार्थ- 'पचंल तसं खावावं अन् सोभंल तसं लेवावं."('राघववेळ', पृ.५०), 'दे दान अन् सुटे गिऱ्हाण' ('राघववेळ',पृ.५५) इत्यादी या साऱ्याच प्रयत्नामुळे 'राघववेळ'मधील वास्तव अधिक प्रत्ययकारी झालेले आहे. कलात्मक सौंदर्य हे 'राघववेळ'चे फार मोठे बलस्थान आहे. लेखकाने स्वातंत्र्याच्या पहाटेचे चित्र आणि सामाजिक वास्तवही तितक्याच ताकदीने या कादंबरीत मांडलेले आहे. म्हणूनच मराठी कादंबरी विश्वात 'राघववेळ'ने स्वतंत्र स्थान निर्माण केलेले आहे.

'राघववेळ'च्या या सामर्थ्याबद्दल प्रा.चंद्रकात बांदिवडेकर लिहितात- "दलित साहित्याची भावना-त्मक, संवेदनात्मक, भाषिक आणि दृष्टिकोनात्मक कोंडी फोडून 'राघववेळ' ही कादंबरी मराठी साहित्याचं क्षितिज रुंदावते, भाषेच्या जोडणीतून अलक्षित जगाचे समर्थपणे दर्शन घडवते, साहित्यांतर्गत वास्तवाचं विश्व अधिक समृद्ध करते आणि माणसाच्या संस्कारांना उदात्ततेचा स्पर्श देऊन अपेक्षित बदलाचा मार्ग सुकर करते. म्हणूनच ही कादंबरी एक तोलामोलाची कलाकृती वाटते."[३३] एकंदरीत आजच्या ग्रामीण जीवनाच्या वर्तमान घडामोडींचे तपशीलवार चित्रण नामदेव कांबळेंनी 'राघववेळ'मध्ये केलेले आहे. 'राघववेळ' ही समाज परिवर्तनाची नांदी आहे. कमालीचे दारिद्र्य, भूक आणि उपासमार यांच्यावर मात करीत शिक्षणाच्या संस्काराने दलित पिढी उदयाला येत आहे. या कादंबरी विश्वात रघूची व्यक्तिरेखा अगदी वेगळी आहे. मांग कुटुंबात वाढणारा हा मुलगा वेगळ्या तऱ्हेने विचार करणारा आहे. मांग कुटुंबातील दारिद्र्याची आणि मागतेपणाची त्याला बोच आहे. संस्काराने माणूस कसा बदलत जातो. त्याचे वास्तव चित्र नामदेव कांबळे 'राघववेळ'मध्ये मोठ्या कलात्मक पद्धतीने रेखाटतात. 'राघववेळ'मध्ये वालंबीने रघूच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहिलेले आहे. हळूहळू नव्या जाणिवांचा उदय मातंग समाजामध्ये कसा होत आहे हे चित्रित करणे हाही 'राघववेळ'चा प्रधान हेतू आहे. यात लोकगीतांचा केलेला वापर आणि मांग स्त्रियांनी गायलेली इनाईची कथा मांग जीवनाच्या अनुभवाचा कादंबरीतला पोत विलक्षण बळकट करणारी आहे. 'राघववेळ'मध्ये सामाजिक संक्रमणावस्थेतील वास्तवाचे फार सूक्ष्म आकलन लेखकाने केलेले आहे. विशेषतः मातंग कुटुंबातील मांगांचे आणि त्यांच्या कुटुंबातील कमालीचे दारिद्र्य, त्यांचे सामूहिक जगणे

लेखकाने फार बारकाईने प्रकट केलेले आहे. हे करीत असताना मातंगांमध्ये म्हटली जाणारी गाणी, त्यांच्या श्रद्धा आणि लोकभ्रम यांचेही चित्रण त्यांनी केलेले आहे. विशेषतः इनाईमातेचा उत्सव आणि रात्रभर म्हटले जाणारे तिचे गाणे या सगळ्यांमधून मातंगांचे भावविश्व प्रकट होत जाते.

## ३.२.९ रंगनाथ पठारेंच्या 'ताम्रपट'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारे यांची सन १९९४ साली प्रसिद्ध झालेली कादंबरी आहे. रंगनाथ पठारे हे सन १९८० च्या दशकात उदयाला आलेले एक महत्त्वाचे कादंबरीकर आणि कथाकार आहेत. त्यांनी 'दिवे गेलेले दिवस', 'रथ', 'चक्रव्यूह', 'हारण' 'टोकदार सावलीचे वर्तमान', 'ताम्रपट' आणि 'दु:खाचे श्वापद' या बहुचर्चित कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. समकालीन वास्तववादी आणि आशय व शैलीचा नवीन आविष्कार करणारा लेखक म्हणून रंगनाथ पठारे हे मराठी साहित्यामध्ये सर्वत्र प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'ताम्रपट' या बहुचर्चित आणि बृहत् कादंबरीला सन १९९९ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय जीवनाचे तपशीलवार चित्रण करणारी ही पहिली कादंबरी आहे. 'ताम्रपट' ही खोलवरच्या स्तरावर अपेक्षित असणाऱ्या मूल्यऱ्हासाचे विविधांगी आणि प्रत्ययकारकरीत्या दर्शन घडविण्याची इच्छा असणारी पहिली राजकीय कादंबरी मानावयास हारकत नाही.

'ताम्रपट' ही सन १९४२ ते सन १९७९ पर्यंतच्या महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक घडामोडींचा विस्तृत पट भक्कम विस्ताराने आणि समर्थपणे उलघडून दाखविणारी राजकीय कादंबरी आहे. सत्तास्पर्धा, सहकारी संस्था, शिक्षण संस्था, दलितांचे आणि सामान्यांचे प्रश्न, जातीयता, सरळ आणि तिरप्या माणसांची मानसिक आंदोलने अशा अनेक अंगानी 'ताम्रपट' ही कादंबरी नैतिक आणि अनैतिकतेच्या अनेक धृवांना समर्थपणे स्पर्श करते. 'ताम्रपट'मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीच्या क्षणाच्या रोमहर्षक दर्शनाबरोबरच स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा आलेखही चित्रित केलेला आहे. 'ताम्रपट' ही कादंबरी १९४२, १९५७, १९६२, १९६७ आणि १९७९ या पाच कालखंडात विभागलेली आहे. त्यात 'चलेजाव चळवळ', 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलन', 'पंचायती राज', 'आणीबाणी' आणि 'जनता पक्षांचे सरकार' या महत्त्वाच्या घटनांचा उहापोह केलेला आहे. 'ताम्रपट'मध्ये सन १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यापासून सन १९७९ पर्यंतचा म्हणजे साधारणपणे चाळीस वर्षाचा कालखंड या कादंबरीत आलेला आहे. या चाळीस वर्षातील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक अशा बहुअंगानी विस्तृत जीवनाचा वेध तीन मुख्य व्यक्ती व त्यांच्यासह असंख्य व्यक्तिचित्रणांच्या आणि घटनांच्या अनुरोधाने 'ताम्रपट'मध्ये रंगनाथ पठारे यांनी घेतलेला आहे.

दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुका, वेगवेगळ्या पक्षांच्या वेगवेगळ्या आणि बदलत्या भूमिका, महाराष्ट्रातील राजकारणात पद्धतशीरपणे घुसवलेली जातीय दृष्टी, निवडणुक-प्रचारात शिरलेल्या अप-

प्रवृत्ती, वाढू लागलेली धर्मांधता, दहशतवाद या साऱ्यांचे चित्र 'ताम्रपट'मध्ये पाहावयास मिळते. सन १९४२ च्या इंग्रजांविरुद्धच्या देशभरातील उठावापासून 'ताम्रपट'चा प्रारंभ होतो. नाना सिरूर हे 'ताम्रपट'च्या कथानकाचे मुख्य केंद्र आहे. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सर्व भारतातील सामान्य जनता राष्ट्रीयत्त्वाच्या मंत्राने भारावून गेलेली होती. तुकाराम भोईटे, गुलबा नायक, पांडुरंग तिकोने, गोविंदभाई पानसरे, राधाकिसन, आवडाबाई अशा काही क्रांतिकारकांच्या स्थानिक पातळीवरील उठावापासून कादंबरीस प्रारंभ झालेला आहे. सन १९४२ च्या चळवळीने समग्र लोकसमुह मानस स्वातंत्र्याकांक्षेने जवळ आलेले होते. नाना सिरूर आपल्या सहकार्यांना म्हणतात- "आपण आता कोणाच्याही आदेशाची वाट बघायची नाही. या लढ्यात प्रत्येक सैनिकांने आपल्या विवेकबुद्धीचा वापर करून योग्य तो निर्णय घ्यायचा. परिस्थिती असेल त्यानुरूप सुज्ञपणाचा वाटेल असा रस्ता निवडायचा. आपलं ध्येय एकच-स्वातंत्र्य, पूर्ण स्वातंत्र्य!" ('ताम्रपट',पृ.१३३) या चळवळीतून स्वातंत्र्याचा, स्वयंनिर्णयाचा निर्धार लोकसमूहमानसाने घेतल्याचे चित्र आपल्या निदर्शनास आल्यावाचून राहत नाही. या स्वातंत्र्यलढ्यात विविध सामाजिक स्तरांतील लोक उतरल्याचे प्रातिनिधिक चित्रण प्रारंभीच्या भागात आलेले आहे. पांडुरंग तिकोनेच्या आईच्या दृष्टीने "कोणते तरी गोरे लोक म्हणतेत, ते बाहेरून येऊन इथे राज्य करीत होते, त्यांना इथून घालवून देण्यासाठी काही छातीखोर लोक लढत होते, त्यांत तिचा पांडुरंग होता. तिला त्याचा अभिमान वाटू लागला होता." ('ताम्रपट', पृ.१४५) हे निरक्षर म्हाताऱ्या स्त्रीचे सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीबद्दलचे आकलन आहे. नाना सिरूर या पात्राच्या कृती-उक्ती-निष्ठा हे लेखकाचे राजकीय मूल्यविधान आहे. सन १९४२च्या चळवळीच्या काळात नानांची राजकीय आस्था विकसित झालेली आहे. सत्तेच्या राजकारणापेक्षा समाजकल्याणाचे, जनसामान्यांच्या अभ्युदयाचे, दुर्बलांना अधिक बळ देण्याचे राजकारण नानांनी केलेले आहे. विशिष्ट मूल्यव्यवस्थांशी एकनिष्ठ राहण्याचे राजकारण-समाजकारण नानांनी आयुष्यभर केलेले आहे. सत्य, अहिंसा, करुणा आणि सत्याग्रह ही चतु:सूत्री नानांनी आयुष्यभर महत्त्वाची मानलेली आहेत.

नाना सिरूर यांच्याप्रमाणेच या कादंबरीत स्वातंत्र्योत्तर काळात वेगळ्या वाटांनी गेलेल्या तुकाराम भोईटे आणि बापूसाहेब देशमुख यांच्या व्यक्तित्त्वाची काही मूलभूत वैशिष्ट्येही सांगितलेली आहेत. कोसळत्या काळात मानवी मूल्यांचे निरांजन सतत तेवत ठेवणाऱ्या माणसांचे प्रातिनिधिक रूप म्हणजे नाना सिरूर होय. खजिना लुटणं, युद्धासाठी दारुगोळा नेणाऱ्या रेल्वेचा पूल उडवून अपघात घडविणे, स्वतंत्र रेडिओ केंद्र निर्माण करणे अशा अनेक घटनांचे चित्रण यात आलेले आहे. भूमिगत तरुणांना आधार देणाऱ्या सामान्य भारतीय जनतेच्या आणि त्यांना पकडणाऱ्या पोलिसांच्या संघर्षाचे हृदयद्रावक चित्रण 'ताम्रपट'मध्ये पहावयास मिळते. दादासाहेब भोईटे आणि बापुसाहेब देशमुख हे जनसामान्यांच्या हितासाठी साखर कारखान्याच्या उभारणीतून मोठे सत्ताकेंद्र झालेले आहेत. बापुसाहेब देशमुख तर सर्वस्वी आत्मकेंद्री

आहेत. 'ताम्रपट'मध्ये असलेल्या यशवंतराव चव्हाण, इंदिरा गांधी, शरद पवार, संजय गांधी, साने गुरुजी, एस.एम.जोशी, अच्युतराव पटवर्धन इत्यादीं व्यक्तिरेखांमुळे कादंबरीच्या आशयात मोलाची भर घातलेली आहे.

सन १९५७ या 'ताम्रपट'च्या दुसऱ्या भागामध्ये भारतीय राजकारणाला मिळालेल्या अनैतिक दिशांचे आणि दशेचे वर्णन केलेले आहे. या भागात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, विधान सभेची निवडणूक यशवंतराव चव्हाणांची मजबूत होत जाणारी राजकारणावरची पकड, सहकार चळवळींचे लोन तसेच नानासाहेब सिरूर सारख्या निःस्पृह माणसाला निवडणुकीपासून परावृत्त करण्याचे कुटील कारस्थान इत्यादी बाबींचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मूल्याधिष्ठित राजकारण हळूहळू मागे पडू लागले आणि त्या जागी व्यक्तिकेंद्रित आणि महत्त्वाकांक्षेनी फुलवलेल्या ढोंगी राजकारणाला महत्त्व येऊ लागले. नानासाहेब सिरूर आणि एस.एम.जोशी यांच्यासारख्या तत्त्वनिष्ठ आणि सत्त्वशील माणसालाही मनाविरुद्ध तडजोडी कराव्या लागतात. कम्युनिस्टांच्या संधीसाधु राजकारणाची काहीशी वाटचाल या कादंबरीत व्यक्त झालेली आहे. नैतिकतेची तमा न बाळगणारा आणि भरगच्च पैसा जमवून निवडणुक जिंकू शकणारा हुशार वकील बापूसाहेब देशमुख काँग्रेसकडून निवडणुकीसाठी पसंत केला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वातंत्र्याकांक्षा व स्वराज्य भक्ती यांना ओहोटी लागणारा काळ येथे चित्रित केलेला आहे. सन १९५७ च्या या भागात तुकाराम भोईटे हे प्रारंभी जरी मतपेटीच्या राजकारणापासून बाजूला राहिलेले असले तरी नंतर सहकारी साखर कारखाना आणि पुढे खासदारकी या वळणाने पुढे-पुढेच जात राहतात. नानासाहेब सिरूर यांचे प्रत्यक्ष जनसमाजातील कार्य आणि बापुसाहेब देशमुख यांचे कार्य यातील अंतर्विरोध एकूण बदललेल्या राजकीय स्वरूपावर विदारक प्रकाश टाकतो. विधानसभा आणि लोकसभा तिकिट मिळविण्यासाठी चाललेल्या धडपडींचाही मोठा रोचक उपयोग लेखकाने करून घेतलेला आहे. यशवंतराव चव्हाण यांचे लेखकाने अतिशय जिव्हाळ्याने चित्र रेखाटलेले आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी सर्वच विरोधी पक्ष मोठी चळवळ उभी करतात. परंतु या विरोधकांच्याच व्यापक चळवळींचा उपयोग करून संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश काँग्रेसकडून मिळविण्यात यशवंतराव चव्हाण मुत्सद्दीपणे यशस्वी होतात.

यशवंतराव चव्हाण यांच्या 'सुसंस्कृत राजकारणी' या प्रतिमेचाच विस्तार 'ताम्रपट'मध्ये करण्यात आलेला आहे. काँग्रेसच्या राजकारणात समन्वयाचे, संघटन करण्याचे आणि सांधण्याचे तंत्र यशवंतरावांनी उपयोजिलेले आहे. यशवंतरावांनी जिंकलेल्या निवडणुकीच्या संदर्भातील निवेदकाचे आकलन-भाष्य मौलिक असे आहे. यशवंतरावांनी महाराष्ट्रात एक नवे पर्व सुरु केले होते. ही गोष्ट काही अचानकपणे किंवा एकाएकी झालेली नव्हती. अतिशय हुशारीने आणि मुत्सद्देगिरीने त्यांनी नवी माणसे उभी केलेली

होती. लेखकाने यशवंतरावांचे राजकीय व सांस्कृतिक कार्य शिवाजी महाराजांच्या मुत्सद्देगिरीशी येथे जोडलेले आहे.

लोकशाहीत प्रत्यक्षात निवडणुकीच्या वेळी मतं जातीच्या नावावर मिळविली जातात. म्हणूनच नानासाहेब सिरूर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदाचा राजीनामा देताना लिहिलेल्या पत्रात लिहितात- "सध्या दिसते असे की ज्याला जे मिळते आहे तो ते अधिकाधिक ओढून घेऊ पहात आहे व जो नाडला गेला आहे त्याचा आक्रोश कुणीही ऐकत नाही; अगदी आपले दयाळू सरकारही नाही. सत्तेची गती ही स्वतःला, स्वतःच्या हितसंबंधाना बळकट करण्याकडे असते, कदाचित ते स्वाभाविकही असेल. पण ज्या न्यायोचित सत्तेची; व्यवस्थेची मांडणी आपला विचार मानतो त्यात हे असे स्वाभाविक मानले जाणार नाही."('ताम्रपट',पृ.२८६) अशा प्रकारे नानासाहेब सिरूर हे राजकारणात जसजशा अपप्रवृत्ती आणि स्वार्थलोलुपता वाढत जाते, तसतसे ते या राजकारणापासून अधिकाधिक दूर जातात.

सन १९६२ च्या तिसऱ्या भागात धरणग्रस्त विस्थापितांचे प्रश्न, नानासाहेब सिरूरांचे उपोषण, शिक्षण संस्थांची भरभराट, हिंदू-मुस्लिम विवाह, नाना सिरूर आणि बापूसाहेब देशमुखांची निवडणूक, नानांचा पराभव, राजकारण संन्यास आदी बाबींचा ऊहापोह केलेला आहे. धरणग्रस्तांच्या उपोषणासाठी बसलेल्या नाना सिरूर यांना प्रामाणिक आश्वासन देऊन उपोषण सोडवण्यात यशवंतराव चव्हाण यशस्वी होतात. शंकरराव जोशी तळागाळातल्या माणसांच्या शिक्षणाच्या सोईसाठी कॉलेज काढून त्यात कमालीचे यशस्वी होतात याची सविस्तर माहिती दिलेली आहे. परदेशी स्थायिक झालेल्या नारायण सोनवणे याचाही एक रोचक इतिहास पत्ररूपाने याच भागात सांगितलेला आहे. शाळा मास्तराची नोकरी सोडून कॉन्ट्रॅक्टर झालेल्या आणि भरपूर उर्जितावस्था प्राप्त करून घेणाऱ्या पांडुरंग तिकोनेचाही वृत्तांत कथित केलेला आहे. प्राचार्य टिपणीस यांच्या कार्यतत्पर आणि बुद्धिमान व्यक्तित्वाचीही चांगली उभारणी लेखकांनी केलेली आहे.

नानासाहेब सिरूर आणि बापूसाहेब देशमुख यांच्या सरळ लढतीमध्ये स्वातंत्र्यासाठी कणकण झिजणारे आणि स्वातंत्र्योत्तर काळात सदैव तळागाळातल्या माणसांच्या बाजूने उभे राहणारे नानासाहेब शिरूर यांचा पराभव होतो. अयशस्वी नानासाहेब शिरूर उमेदपणाने विजेत्या बापूसाहेबांचे अभिनंदन करतात. 'अभिनंदन बापूसाहेब!' म्हणत नानासाहेब पुढे झाले आणि साऱ्या इतकेच चकित झालेल्या बापूसाहेबांशी त्यांनी हस्तांदोलन केलं.......नाना काशीनाथला म्हणाले, "निवडणूक संपली. ते वातावरण संपलं. आता बापूसाहेब आपल्या साऱ्यांचे प्रतिनिधी!"('ताम्रपट',पृ.४१२) ही गोष्ट एकूणच देशाच्या राजकारणाच्या स्वरूपावर आणि वाटचालीवर विदारक भाष्य करते. या संदर्भात लेखक लिहितात- "नवे मराठा युग सुरु झाले होते. त्याला मराठी राज्य म्हणणे, जबाबदारीने वागणे असे समजुतीने सुरु झाले होते.

ब्राह्मणादी उच्च जातींचा वरचष्मा आदीच संपला होता. आता सरदार, दरकदार, सरंजामदार अशी मंडळीही नगण्य होऊन मध्यम मराठा वर्गाच्या प्राबल्याचे युग सुरु झाले होते."('ताम्रपट',पृ.४१४) नानासाहेब पक्ष सदस्यत्वाचा  राजीनामा देतात. त्यावेळी निस्सार मोमिन त्यांना पुढे काय करणार आहात असे विचारतो. तेव्हा नानासाहेब सिरूर त्यांना उत्तर देतात- "प्रपंच चालेल इतपत वकिली आणि उरलेल्या वेळात मनाला आवडेल असं कोणतंही काम!"('ताम्रपट',पृ.४३१) अशी ही एका महान तत्त्वाची राजकारणातून माघार साठनंतरच्या एकूणच राजकीय परिस्थितीविषयी खूप काही सांगून जाते.

सन १९६८ या चौथ्या भागात राजकारणात आलेली भ्रष्टता आणि गटबाजीचे राजकारण याचे चित्र रेखाटलेले आहे. दादासाहेबांना 'ताम्रपट' मिळाल्यानंतर आणि त्यांचा नवा बंगला झाल्यावर लेखकाने त्याचे केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे. दादासाहेब हे समारंभपूर्वक दलितांच्या जमिनी परत करतात. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेणाऱ्या दादासाहेबांना 'ताम्रपट' मिळतो. मात्र भुजाडीमामांना तो मिळालेला नसल्यामुळे ते नाराज होतात. अशा सर्व परिस्थितीमध्ये मात्र नानांची तत्त्वनिष्ठा अबाधित राहते. जयप्रकाश सिरूर या त्यांच्या मुलाच्या इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी त्यांच्या स्वातंत्र्यसैनिक असण्याचे सर्टिफिकेट हवे असतानासुद्धा ते त्याला देण्याचे नाकारतात. आजच्या घराणेशाहीच्या आणि भाईभतिजावादाच्या राजकीय पृष्ठभूमीवर नानांचा हा कणखरपणा फारच महान वाटतो.

स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकांची चळवळ या काळात गुंडगिरीचे रूप धारण करते. राजकीय स्वार्थापोटी क्षुल्लक कारणासाठी दंगली घडविल्या जातात. अशा पेटलेल्या दंगलीच्या आगीतही नाना सिरूर जीवाची पर्वा न करता घुसतात आणि एस.आर.पी.ला वाचविण्यासाठी त्याला मिठी मारतात. सुदैवाने अकबरभाईच्या मदतीमुळे दोघेही सहीसलामतपणे घरी परततात. अकबरभाई विषण्णपणे त्यांना म्हणतो, "इन्सान को इन्सान पहेचानता नही, सब हैवान हो गये."('ताम्रपट',पृ.५४५) अशा शब्दांत दंगलीवर मार्मिक भाष्य करतात. 'पद्मश्री' किताब देण्याचा शासकीय निर्णय नानासाहेब यशवंतरावांविषयी आदरभाव व्यक्त करूनही नाकारतात. ते यशवंतराव चव्हाण यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, "साधनशुचितेचे मूल्य मी मानतो. ती सांभाळताना साध्याकडे जाण्यास उशीर होणार असला तरीही ती असावी असा माझा आग्रह असतो. पण माझ्याभोवती उभी राहिलेली जवळपास सारीच माणसे या ना त्या प्रकारे तडजोडी करीत सोयीचे वेगवान रस्ते निवडू लागली आहेत. यात कुठेतरी मी स्वतःच कमी पडू लागलो आहे असे मला वाटत आहे. साऱ्या गोष्टींची बेरीज-वजाबाकी केली की जमेच्या, शिलकीच्या बाजूस निखळ असे जे राहते ते ही संशयास्पद वाटते. अशा अपेशी मनःस्थितीत तुमच्या या किताबाचे ओझे पेलणे मला कठीण होईल. हे कृपा करून समजून घ्या. तुम्ही ते घ्याल अशी मला खात्री वाटते."('ताम्रपट', पृ.५९४) अशाप्रकारे नाना अनेकदा अशा नैतिकतेच्या अत्याग्रही भूमिकेत गुरफटलेले दिसतात.

'सन १९७५' या भागात आणीबाणी, जनता दलाचे सरकार, पुलोदचे सरकार, सहकारी चळवळीचे घट्ट विणले जात असलेले जाळे, विशिष्ट लोकांचे जपले जाणारे हितसंबंध आदी घडामोडींचा सूक्ष्म तपशील आलेला आहे. आणीबाणी या महत्त्वाच्या घटिताकडे लेखक संमिश्र दृष्टिकोनातून पाहतात. विनोबांनी या घटिताला 'अनुशासन-पर्व' असे संबोधले आहे. एकेकाळच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकाची आणीबाणी लादणाऱ्या इंदिराजींच्या चरणी समर्पित भक्ती महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाबद्दल खूपच विदारक भाष्य करते. मॅडमना यशवंतरावांचा महाराष्ट्राच्या राजकारणातील पाय ढिला करावयाचा होता. राजकीय स्वार्थासाठी काँग्रेस पक्षातील काही लोक गुलामगिरीच्या पातळीवर वर्तन करीत असतात. या संदर्भातील लेखकीय भाष्य अतिशय समर्पक आहे. ".....आता तर आणीबाणी आलीय. सारी ताकद एका ठिकाणी एकवटलीय. हंटर घेऊन उभ्या असलेल्या सर्कशीतील रिंगमास्टरसारख्या मॅडम केंद्रस्थानी आणि बाकी सारे त्यांना चळाचळा कापत शेपटी घालून वा नजरेच्या इशाऱ्यासरशी उभारून सारे खेळ आज्ञाधारकपणे करतात."('ताम्रपट',पृ.६७९) हे भाष्य मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या संदर्भात आलेले आहे. एका कॉलेजातील प्राध्यापकाच्या भयाचे म्हणजेच बुद्धिजीवी वर्गाचे काहीसे प्रातिनिधिक चित्रणही याच भागात आलेले आहे. त्याचबरोबर शरदरावांच्या स्वाभिमानी उभरत्या नेतृत्वाकडे लेखकाने अंगुली निर्देश केलेला आहे.

'सन १९७९' या भागात इंदिराजीविरुद्धच्या काँग्रेसशिवाय सर्व पक्षांच्या कडबोळ्याचा, जनता पक्ष्याच्या छोट्याशा राजवटीचा आणि इंदिराजींच्या समाज ताब्यात घेण्याचा काळ इत्यादींचे वर्णन आलेले आहे. राजकारणात नव्याने येऊ घातलेल्या युवा पिढींचेही सुंदर चित्रण 'ताम्रपट'मध्ये लेखकाने केलेले आहे. शैक्षणिक संस्था, राजकीय संस्था, सहकारी संस्था, कुटुंबसंस्था आणि समाज व्यवस्था अशा विविध जीवन क्षेत्रातील मूल्यघसरणीतून आलेली अस्वस्थताही 'ताम्रपट'मध्ये आलेली आहे. राजकीय मूल्यसंघर्षाला करुणामूल्याने उत्तर देता येते, असा आशावाद 'ताम्रपट'मध्ये आहे.

'ताम्रपट'मध्ये रंगनाथ पठारे यांनी सन १९४२ पासूनच्या महत्त्वाच्या टप्प्याटप्यावर झालेल्या सर्वांगीण स्थित्यंतराचा, बदलाचा आणि त्यातून निर्माण झालेल्या संरचनांचा समर्थ आणि सृजनशील वेध घेतलेला आहे. नानासाहेब सिरूर हे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढणाऱ्या एका गटाचे प्रमुख आहेत. नानासाहेब सिरूर हे या कालखंडातल्या अवमूल्यन प्रक्रियेत टिकून राहिलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्याग, क्रियाशीलता, झोकून देऊन काम करणे, सार्वजनिक आणि खासगी जीवनात नैतिकता आणि मूल्यविवेक पाळणे, तत्त्वनिष्ठा पाळणे, हरपल्या श्रेयाचा शोध घेणे इत्यादींचे जसे यात वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे दादासाहेब भोईटेंची जडणघडण आणि त्यातून निर्माण झालेले नेतृत्व, या नेतृत्वाच्या रूपाने त्या परिसरात चाललेले सत्तेचे राजकारण आणि त्यांना छेद देणाऱ्या सद्सदविवेकबुद्धीला जागवताच अस्वस्थ करणाऱ्या

घडामोडींलाही 'ताम्रपट'मध्ये महत्त्वाचे स्थान आहे. संबंध महाराष्ट्रातील या कालखंडाचे प्रातिनिधिक चित्रण 'ताम्रपट'मध्ये पहावयास मिळते. रंगनाथ पठारेंनी 'ताम्रपट'मध्ये उपहास, उपरोध आणि अन्य तत्सम शैलीप्रकारांचा कुशलपणे वापर केलेला आहे. त्यांनी दिलेले 'ताम्रपट' हे शीर्षक ही खूपच समर्पक आणि यथार्थ आहे. मात्र 'ताम्रपट'चा कालपट आणि आशयाचा व्याप पाहता कादंबरीत काव्यात्मक चिंतन कमी आहे.

'ताम्रपट' कादंबरीबद्दल अरुणा दुभाषी यांनी नोंदविलेला अभिप्राय अतिशय संमिश्र अशा स्वरूपाचा आहे. त्या म्हणतात, "'ताम्रपट' कादंबरीचे स्वरूप पाहिले तर तिला राजकीय कादंबरी म्हणणे अवघड आहे. अशा प्रकारचे कोणतेही लेबल 'ताम्रपट'चा संपूर्ण अनुभव व्यक्त करू शकणार नाही. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे 'ताम्रपट'मध्ये महाराष्ट्रातील राजकारणाचे एक चित्र व्यक्त होते. परंतु राजकारण हा तिचा गाभा नाही. तसेच 'ताम्रपट' ही व्यक्तिकेंद्री कादंबरीही नाही. नाना सिरूर या व्यक्तिरेखेच्या मृत्यूबरोबर ती संपत असली तरी नाना सिरूर हा 'ताम्रपट'चा नायक नाही. नाना सिरूर, तुकाराम भोईटे, बापूसाहेब देशमुख या सगळ्याच व्यक्तिरेखा महत्त्वाच्या आणि सारख्याच ताकदीने उभ्या केलेल्या आहेत. म्हणूनच नाना हे सामान्यांपेक्षा वेगळे व उंच वाटले तरी ते असामान्य ठरत नाहीत आणि तुकाराम भोईटे धूर्त, राजकारणी असले तरी खलनायक होत नाहीत. या प्रत्येक व्यक्तिरेखेची नियती ही तिला अटळ अशा दिशेने नेत राहाते. कादंबरीच्या शेवटी यातील प्रत्येक व्यक्तिरेखा आपापल्या परीने आयुष्याची सार्थकता आणि समाधान शोधत राहाते. नानांना ही सार्थकता व समाधान लाभते पण त्यांचे जीवन लौकिकदृष्ट्या पराभूत ठरते. तर तुकाराम भोईटे, बापूसाहेब देशमुख यांना लौकिकदृष्ट्या यश लाभते परंतु आयुष्याची सार्थकता बाह्य गोष्टीतच शोधावी लागते. या दृष्टीने पाहतानाही 'ताम्रपट' या कादंबरीचे व्यापक परिणाम लक्षात येते."[३४]

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारेंची समकालीन मराठी कादंबरीतील एक महत्त्वाची कलाकृती आहे. 'ताम्रपट' हा त्यांचा एक महत्त्वाकांक्षी प्रयोग आहे. रंगनाथ पठारेंची 'ताम्रपट' ही कादंबरी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा एक व्यापक पट आपल्यापुढे कलात्मकतेने उलगडते. 'ताम्रपट'मध्ये मराठ्यांच्या एकूण स्थितीगतीचे अत्यंत सूक्ष्मपातळीवर दर्शन घडविण्यात रंगनाथ पठारे कमालीचे यशस्वी झालेले आहेत. रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' ही मराठीतील अनेक दृष्टीने लक्षणीय ठरेल अशी कादंबरी आहे. तसेच अखिल भारतीय स्तरावरही 'ताम्रपट'ने एक वेगळाच ठसा उमटविलेला आहे.

## ३.२.१० राजन गवसांच्या 'तणकट'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

राजन गवस यांनी 'तणकट' ही कादंबरी १९९८ साली लिहिलेली आहे. राजन गवस हे विसाव्या शतकातील शेवटच्या दोन दशकातील एक महत्त्वाचे साहित्यिक आहेत. प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर कादंबरी लेखन करणारे आघाडीचे कादंबरीकार म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. राजन गवस यांच्या 'चौंडक' (१९८५), 'भंडारभोग' (१९८९), 'धिंगाणा' (१९९२), 'कळप' (१९९७) आणि 'तणकट' (१९९८) या कादंबऱ्यांनी मराठी साहित्यात आपली स्वतंत्र नाममुद्रा उमटविलेली आहे. त्यांच्या 'तणकट' या कादंबरीला सन २००१ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभलेला आहे. राजन गवस यांची 'चौंडक' ही देवदासींच्या जीवनावरची कादंबरी, जोगत्यांच्या प्रश्नासंबंधी 'भंडारभोग', साहित्यिक पर्यावरणातील प्रदूषण व खेड्यात राहून लिहिणाऱ्या तरुणाची घुसमट व्यक्त करणारी 'कळप' आणि दलित चळवळीतील अंतर्विरोध स्पष्ट करणारी 'तणकट' या त्यांच्या सर्वच कादंबऱ्या विषयाच्या वेगळेपणामुळे आणि नाविन्यतेमुळे गाजलेल्या आहेत.

आजमितीस समकालीन ग्रामीण भागातील दलित-सवर्णांच्या जीवनवास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न मराठी साहित्यात अभावानेच झालेला आहे. या पार्श्वभूमीवर राजन गवस यांची 'तणकट' ही कादंबरी उल्लेखनीय आहे. 'तणकट' ही सामान्यपणे आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी कालखंडातील समकालीन वास्तव मांडणारी कादंबरी आहे. राजन गवसांनी 'तणकट' ही कादंबरी 'शाहू महाराज आणि दया पवार नावाच्या आठवणीस.......' अर्पण केलेली आहे. ही अर्पणपत्रिका खूप अन्वर्थक आहे. प्रा.महेंद्र कदम यांच्या मते, "राजन गवस यांनी 'तणकट'मध्ये बदलत्या ग्रामव्यवस्थेचा वास्तवपूर्ण उभा-आडवा छेद घेतलेला आहे. तरीही गावगाड्यातील इतर बलुतेदारांची मानसिकता, मराठ्यांची भाऊबंदकी, गावातील राजकारण, निसर्गाचा एकूण गावगाड्यावर होणारा परिणाम यांचे तपशील कादंबरीत आले असते तर तिची परिणामकारकता अधिक प्रभावी ठरली असती. तरीही बदलत्या ग्रामव्यवस्थचे चित्रण करता-करता वर्तमानाची प्रतिष्ठापना करत 'तणकट'ने दलित, ग्रामीण, प्रादेशिक, नागर कादंबरीच्या भेदरेषा पुसून टाकल्या आहेत. 'तणकट'चे हे यश ठळकपणे नजरेसमोर येणारे आहे."[३५] म्हणजेच बदलत्या ग्रामव्यवस्थेचे सूक्ष्म तपशीलांसह परिणामकारी सादरीकरण 'तणकट'मध्ये आलेले आहे.

राजन गवस यांनी अत्यंत तटस्थपणे खेड्यातील दलित समाजाचे वर्तमान वास्तव मांडलेले आहे. 'तणकट' ही कबीर कांबळे व त्याचा म्हारवाडा आणि त्याचा गाव यांची कथा आहे. परंतु ही कादंबरी केवळ दलित आणि ग्रामीण अशी मर्यादित चौकट न स्वीकारता गाव आणि म्हारवाडा यांच्यातील संघर्षाचे चित्रण करणारी आहे. दलितांच्या वस्तीचे बदलते स्वरूप, तेथेही अस्तित्वात असणाऱ्या सत्तेच्या व्यवस्था, ग्रामव्यवस्थेतील सरपंच, म्हार, मांग, मराठा, लोहार, परीट, न्हावी, कडूचे लेकावळे अशी जात आणि

व्यवसायामध्ये विभागलेली समाजव्यवस्था तसेच या दोन केंद्रांच्या मध्यवर्ती असणारी कबीर कांबळे आणि बाळासाहेब शेडबाळे ही दोन माणसे, त्यांच्या भोवतीची तरणी पोरं, म्हातारी-कोतारी माणसे या सर्वांचे मिळून एक जीवननाट्य लेखकाने 'तणकट'मध्ये उभे केलेले आहे. आजच्या लहान गावांमध्ये असलेले गोंधळाचे वातावरण, नेत्यांचे डावपेचाचे भ्रष्ट आणि कुटील आचरण, विसाव्या शतकाची अखेर येऊनही समाजात अद्यापही खोलवर रुजलेली सर्व पातळ्यांवरची जातिव्यवस्था या साऱ्यांचे नेमके आणि वास्तववादी भान देणारी ही कादंबरी कथानक, पात्रचित्रणे इत्यादी बाबतचा रूढ साचा नाकारते. लेखकाने म्हार, मांग आणि मराठा या समाजाचे अतिशय गुंतागुंतीचे, सूक्ष्म स्तरावरचे समग्र चित्रण 'तणकट'मध्ये शब्दांकित केलेले आहे. 'तणकट'ने केवळ गावगाड्यातील दलित-सवर्ण यांच्यातील संघर्षच अभिव्यक्त केलेला नाही तर दलित व ग्रामीण जीवनातील वास्तवाचा आलेखही मांडलेला आहे.

महार समाजात जन्मलेला कबीर हा संवेदनशील आणि भावनांची कदर करणारा सामाजिक समतेवर श्रद्धा असणारा नायक आहे. ग्रामीण जग, दलितांची वस्ती आणि म्हारवाड्यातील परिसर 'तणकट'ने व्यापलेला आहे. तरणी पोरं, बाया-बापड्या, म्हातारी-कोतारी इत्यादी शेकडो पात्रे 'तणकट'मध्ये पहावयास मिळतात. 'तणकट'मध्ये दलित नसलेला पण दलित वस्तीची दया आपल्या हिकमती व हुकमी करणीने पार पालटू पाहणारा बाळासाहेब शेडबाळे हा अत्यंत लटपट्या आणि तितकाच लाघवी स्वभावाचा आहे. तो गावच्या या वस्तीला नवा उजेड देण्याचे नाटक करीत आपला स्वार्थ आणि वासनांची परिपूर्ती करण्यासाठी धडपडत असतो. तो स्वतः दलितमित्र असल्याचे भासवित गावकऱ्यांना कर्जात साफ बुडवून गावाबाहेर पसार होतो. 'तणकट' ही कादंबरी केवळ या बाळासाहेब शेडबाळ्याची नाही तर ती कबीर कांबळे या एका संवेदनशील आणि विचारी नवयुवकाचीही आहे. महाविद्यालयात शिकणारा कबीर हा दलित असूनही आपल्या मनाला पटेल त्याप्रमाणेच तो वागत असतो. आपल्या समाजातील नाना प्रकारच्या विसंगती अन् लाचार मनोवृत्ती पाहून त्यांच्यापासून तो फटकून वागतो. आपल्या समाजाची झालेली दुर्दशा आणि फरफट त्याला पाहवत नाही. तसेच कबीर ज्या महाविद्यालयात शिकत आहे. तेथील सवर्ण प्राध्यापकांची दलितांवरील रखरख, बाबासाहेब आंबेडकरांचे अकारण ढोल बडवत राजकारण करणारे प्राध्यापक यांचाही खरपूस समाचार लेखकांने याठिकाणी घेतलेला आहे. ह्याच वातावरणातील एक लक्षवेधी पात्र म्हणजे दलित जगाचे रंग-तरंग अचूक टिपणारा कबीरचा मित्र मोहन बल्लाळ होय.

दलित आणि सवर्णांमधील संघर्ष हे आज खेड्यातील एक कटूवास्तव आहे. आजमितीसही खेड्या पाड्यातील दलित समाज सुधारलेला नाही. दलितांच्या भरवशावर बाळासाहेब शेडबाळे सारखे भ्रष्ट लोक दलितांचे नेतृत्त्व करतात, तसेच दलित समाजातील बायकांचेही लैंगिक शोषण करतात. अशा लोकांनाच दादू म्हार, दादबा हेडी, पिचका भीम्या, लंगडा हाऱ्या, गौत्या, पंढऱ्या, डेप्युटी गोपाळा इत्यादी दलित

समाजातील अर्धवट शिकलेल्या आणि अडाणी असलेल्या लोकांची साथ मिळते. याशिवाय अलताप कांबळे, आनंदा कांबळे, जालिंदर बनसोडे, सत्यपाल धर्मरक्षीसारखे शहरातील दलित नेतेही स्वार्थी आणि दलितांचा धंदा करणारेच आहेत. शहरातल्या दलित चळवळी, विद्यार्थी संघटना आणि इतर सांस्कृतिक चळवळी वगैरे या ना त्या कारणाने दलितांच्याच शक्तीचा ऱ्हासच करणाऱ्या ठरलेल्या आहेत. हे समकालीन वास्तव 'तणकट'मध्ये साकार झालेले आहे. 'तणकट'मध्ये ग्रामीण जीवनाच्या राजकारणातील मूल्यभ्रष्टता आणि ग्रामीण भागातील राजकारणाचा दिशाहीन प्रवास शब्दबद्ध केलेला आहे. ग्रामीण जीवनात सहकारी संस्थांचे जाळे विणले जात आहे. काही काळ त्याचा फायदा हा सर्वसामान्य माणसाला होत असल्याचे दिसून येत आहे. परंतु या सहकारी संस्थांच्यामध्ये भ्रष्ट व्यवहार करणाऱ्या माणसांची घुसखोरी वाढत आहे. त्यामुळे पर्यायाने सामान्य माणसांचे शोषण आणि पिळवणूक होत आहे याचेही वास्तव चित्रण या कादंबरीमध्ये राजन गवस यांनी केलेले आहे.

राजन गवस यांनी 'तणकट'मध्ये दलित चळवळींचे अपयशही अधोरेखित केलेले आहे. कबीरच्या म्हारवाड्यात अनेकविध प्रकारची बजबजपुरी माजलेली आहे. 'तणकट'चे अवकाश दूध डेअरीतील भ्रष्टाचार, असहाय्य गरिबांची फसवणुक, महार-मांगातले तंटे, जाहीर मेळावे,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचा गजर, भाषणबाजी करणारा वर्ग व त्यांची टगेगिरी आणि एकमेकांच्या जीवावर अन् घरावर उलटण्याच्या प्रवृत्तींनी व्यापलेले आहे. त्यामध्ये बौद्धधर्मीय असल्याची कृतक् प्रौढी आणि एकीकडे जोपासल्या जाणाऱ्या सनातन प्रथाही आहेत.

कबीर सदोबा कांबळे हा दलित समाजात विशेषतः महार जातीत जन्मलेला नायक खूपच संवेदनशील, भावनांची कदर करणारा आणि सामाजिक समतेवर श्रद्धा असणारा नायक आहे. कबीर हा दलित समाजातील चळवळीपासून आणि चळवळीतल्या भ्रष्ट लोकांपासून स्वतःला नेहमीच अलिप्त ठेवत असतो. ग्रामीण जीवनातील दलित समाजाचे शोषण बाळासाहेब शेडबाळे सारखा माणूस करतो. बाळा-साहेब शेडबाळेने या समाजातील माणसांची आर्थिक फसवणूक केल्यानंतर त्यांचे अनेक प्रश्न सोडविण्या-साठी कबीर स्वतः धडपड करतो. आपल्या समाजातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तो आपल्याच गावातील आक्काबा राणेसारख्या अनुभवी व प्रतिष्ठित लोकांची सतत मदत घेत राहतो. दलित समाजाचे मूळ प्रश्न समजून न घेणाऱ्या आणि दलित समाजातील वास्तवाला दूर नेणाऱ्या दलित चळवळीतील कार्यकर्त्यांपासून दूर राहतो. बदलत्या सामाजिक परिवर्तनामुळे गावा-गावांमध्ये दूध डेअरी, पतसंस्था निघाल्या. दुध डेअरीमध्ये काम करता करता बँकेत नोकरी करणारा बाळासाहेब शेडबाळे हा साठ हजारांचा भ्रष्टाचार करतो आणि डेअरीचे चेअरमन बंडू पाटील व सेक्रेटरी तुळसीदास मिसाळला अडचणीत आणतो. त्यामुळे गावातील सर्वच लोक त्याला वाळीत टाकतात. त्याच वेळी बाळासाहेब शेडबाळे सर्व

महारांना एकत्र करून त्यांची संघटना बांधतो आणि गावाविरुद्ध त्यांना उभे करतो. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे आजच्या दलितांनी कसे विकृतीकरण केलेले आहे, हे पाहण्यासारखे आहे.

संघटित होऊन सवर्णांना धडा शिकवण्यासाठी एकत्र आलेले दलित तरुण वेगवेगळ्या संघटना बांधण्यात, वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळविण्यात आणि स्वतःच्या तुंबड्या भरण्यात मशगुल झालेले आहेत. या संघटनांमध्ये सत्ताकारण घुसल्यामुळे 'संघटित व्हा' हा त्यांचा मूळ हेतूच बाजूला गेलेला आहे. त्यामुळे दादू म्हार, गौत्या, पंढऱ्या, डेप्युटी गोपाळ अशासारखे दलित एकत्र येऊन स्वतःच्या विकासाऐवजी गावाला वेठीस धरतात. त्यामुळे त्यांचा विकास होण्याऐवजी अधोगतीच झालेली आहे. या संदर्भातील थळू आजाचे (तराळ) चिंतन अत्यंत महत्त्वाचे आहे. थळू आजा कबीरला म्हणतो, "लेकरा, असं न्हाई. एकदम तोडून न्हाई जमत गावाला. किती केलं तरी पांढरीतीलच हाईत तीबी. काळीज एकच हाय. त्यास्नीबी न्हाई दुकवायचं. हाळूहाळू गावात बी फरोक झालाय. तुज्यासारक्या पोराला मांडीला मांडी लावून घेत्यात. पोरा, नशीबवान हाईसा. आम्हाला बेलटयाशिवाय थारा न्हवता. आता त्ये गेलं का न्हाई? तसं जाईल सगळं हाळूहाळू. बाबासाबाची पुण्याई. दुसरं काय!"('तणकट',पृ.६९) संपूर्ण गावगाडा बघितलेल्या आणि परंपरांचे नीट आकलन असलेल्या थळू आजाचे हे उद्‌गार म्हणजे गाव आणि म्हारवाडा यांच्यातील दरी संपुष्टात येत असल्याचे निदर्शक आहे. थळू आजाने परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

राजन गवस यांनी खेड्यातील जातीव्यवस्थेचा मुलगामी अनुभव घेतलेला आहे. लेखकाने दलितांमधील उच्चभ्रू लोकांचाही खरपूस समाचार 'तणकट'मध्ये घेतलेला आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन नोकरीच्या निमित्ताने शहरांमध्ये राहणाऱ्या आणि गावातील आई-वडिलांना विसरणाऱ्या नोकरदार मध्यमवर्गीयांच्या विक्षिप्त वागण्यावरही लेखकांने अचूकपणे बोट ठेवलेला आहे. यासंदर्भात तानू म्हातारीची प्रतिक्रिया अतिशय बोलक्या स्वरूपाची आहे. तानु म्हातारीचा एक मुलगा कोल्हापुरात पोलीस म्हणून नोकरीस लागलेला आहे. नोकरीच्या निमित्ताने तिचा मुलगा कोल्हापुरात स्थायिक झाल्यानंतर तो आपल्या म्हाताऱ्या आई-वडिलांकडे अजिबात फिरकत देखील नाही, तेव्हा ती त्याच्यासाठी कबीरला पत्र लिहिण्यास सांगताना म्हणते, "'पयल्यांदा लीव, तुजं पत्र का न्हाई.' आईला पत्र पाठवाय कटाळलास काय? आई मरावी आसं तुला वाटतंय काय? तसं वाटत आसलं तर तसं कळीव म्हणावं. कुठल्या तरी तळ्यात न्हाईतर कुणाच्या तरी भावीत जीव देती. म्हणजी तू मोकळा व्हशील. तुझ्या बायकोला आनंद व्हईल. दोघंजन राजा-राणीगत ऱ्हाशीला. गावाला याला तुला लाज वाटती. खरं, ह्या गावाचं तुकडं खावूनच न्हानाचा मोठा झाला हाईस. पांढरीला इसरलास तर तुझं चांगलं व्हनार न्हाई. शेवटी मेल्यावर तुला पुराय म्हारकीतच आणाय

पायजे. एवढा एकदम मातू नगंस. चार पैसं आनी बायको झाली म्हणजी जय झालं न्हवं. लई लागतंय. राज्याला त्ये सुईची गरज लागतीया. आनी तुजं तरी काय? कदी तरी तुला तुझ्या वागण्याचा पचेताप व्हईल. तवा तुजी ही आई मातीत गेल्याली आसंल .........' तुझी म्हातारी मातीत गेली म्हणून शान लीव." ('तणकट',पृ.२५-२६) तानू म्हातारीची ही शोकांतिका प्रातिनिधिक स्वरूपाची आहे.

दूध डेअरीतील भ्रष्टाचार उघडकीला आल्यामुळे निर्माण होणारा गावातील संघर्ष पुढे गाव विरुद्ध म्हारवाडा या संघर्षात परावर्तित होतो. बाळासाहेब शेडबाळे यांनी दूध डेअरीमध्ये साठ हजार रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची माहिती सर्वांना समजल्यानंतर स्वतःच्या बचावासाठी म्हारोड्याचा विकास करण्याच्या नावाखाली तो गावात जातीय तेढ निर्माण करतो. तणकट म्हणजे 'पिकातील तण' ते जर काढून टाकले नाही तर पिकाचा नाश होतो. तशी समाजातील ही तणकटवृत्ती, विध्वंसक वृत्ती समाजाच्या स्वास्थ्याचा आणि विकासाचा नाश करते. शेडबाळेने गावातील दलितांना एकत्र करून गावाविरुद्ध लढायला तयार केलेले असते. संघटित झालेले दलित पहिल्यांदा गावाविरुद्ध बहिष्काराचे हत्यार उपसून गावात मजुरीला जाण्यास नकार दर्शवितात. यातून संघर्ष निर्माण झाल्यानंतर खोट्या केसेस दाखल करून सवर्णांना छळण्यास सुरुवात करतात. आक्काबा राणे, सरपंच गणू पाटील आणि चेअरमन बंडू पाटील यासारख्या गावातील मातब्बर प्रतिष्ठितांना त्रास द्यायला ते सुरुवात करतात. त्यामुळेच सवर्णांच्या मनातही दलितां-विषयीची जातीय भावना अधिक गडद होऊ लागते. आबा पाटील, गणू पाटील, चेअरमन बंडू पाटील, गज्या मुळीक आदी गावातील लोक म्हारांच्या कारवायांनी अधिक पिळदार जातीयवादी झाल्याचे चित्र आपणास पहावयास मिळते.

आक्काबा राणे हा फार मोठ्या मनाचा दिलदार माणूस आहे. गावातील म्हारांनी वतनदार लोकांना जेरीस आणल्यानंतर आणि त्यांच्या विरुद्ध खोट्यानाट्या तक्रारी नोंदविल्यामुळे गावात पोलिसांच्या गाड्या येऊन गावातल्या वतनदार मंडळींना जेलमध्ये टाकतात. गावातील म्हारांनी कामांवर बहिष्कार टाकलेला असताना देखील आक्काबा राणे सरकार सारख्या माणसांनी शेवटपर्यंत म्हारवाडा वाचविण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. आक्काबा राणे गावाचा समतोल विकास साधण्याचा प्रयत्न करतात. आक्काबा राणे हे दलितांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात गावात चौकशीला आलेल्या फौजदार शिंदेंना म्हणतात, "सायेब, खरं बोलायचं तर आशानं आता उलटं व्हयालंय. आदी कधी आमच्या मनात यायचं न्हाई त्ये आता यायला लागलंय. आशानं काय व्हयाचं."('तणकट',पृ.१०६) दलितांच्या आक्रमक भूमिकेमुळे गावातील सवर्ण लोक अधिकच आक्रमक बनू लागतात.

आक्काबा राणेंना कबीरच्या शिक्षणाबद्दल अप्रुप वाटत असल्यामुळे ते त्याला शिक्षणासाठी सतत प्रेरणा आणि प्रोत्साहन देत असतात. कबीर हा महाविद्यालयाला चालत जात असल्यामुळे ते त्याला

सायकल द्यावयाचे ठरवतात आणि सायकल दुरुस्त करण्यासाठी पैसे देऊ करतात. कबीरला मदत करण्यामागे त्यांचा कोणताही स्वार्थ दडलेला नाही. यासंदर्भात आक्काबा राणे त्याला म्हणतात, "गाव-म्हारोड्याच्या राजकारणासाठी सायकल दिलीया म्हणशील तर तसं नाही. तुझं जरा जरा ऐकून हाय म्हणून तुला संशय वाटंल म्हणून सांगतोय. तुझा आजा आमच्या बांधावर मेला. तुझा पणजा मला पवायला शिकवायचा आणि तुझा बा आमच्यात न्हाणाचा मोठा झालाय. म्हणून ही द्यालोय म्हण वाटलं तर. आनी ह्यावर्षी जोरात आब्यास कर. पुढच्या वर्षी तुझ्या नोकरीचं माझ्याकडं. जा आता."('तणकट',पृ.१६०) या आक्काबा राणेंच्या उद्‌गारातून त्यांच्या निःस्वार्थीपणाची प्रचिती आपणाला आल्याशिवाय राहत नाही. आक्काबा राण्यांच्या या आश्वासक उद्‌गारांमधून कबीरविषयीचे कौतुक आणि त्याच्या तीन पिढ्यां-विषयीची कृतज्ञता व्यक्त होते.

बाळासाहेब शेडबाळेंनी म्हारवाड्याला फसविल्यानंतर आक्काबा शांतपणे गप्प न बसता किंवा म्हारवाड्यातील मंडळी आपल्या कर्माची फळे भोगात आहेत असे न म्हणता कबीरला ते साळोखे वकिलांकडे घेऊन जातात आणि यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी स्वतःचा पैसा खर्च करण्याचीही तयारी दर्शवितात. साळोखे वकील हे आक्काबा राणेंना म्हारांनी सवर्णांना जो त्रास दिलेला आहे त्याची आठवण करून देतात. तरीही आक्काबा राणे हे साळोखे वकिलांना म्हणतात, "पावणं, माणसं आमची हाईत. त्यात अडाणी हाईत. व्हतंय तेवढं करूया. उद्याचं त्येंचं नशीब त्येंच्याबरबर."('तणकट',पृ. २३१) आक्काबा राणे गावातील सर्वांच्याच मदतीला धावून जातात. आपल्या माणसांसाठी जेवढे शक्य होईल तेवढे अगदी सहजपणे करण्याची वृत्ती आक्काबा राणेंच्या मनाचा मोठेपणा अधोरेखित करते.

कबीर हा दलित समाजातील चळवळींपासून आणि चळवळीतल्या भ्रष्ट लोकांपासून स्वतःला जपत जातो. कबीर कॉलेजमधील तरुणांच्या माध्यमातून दलित चळवळीला जोडला जातो. कबीरने सुरुवातीपासूनच चळवळीतल्या लोकांचे चारित्र्य वारंवार तपासून पाहिल्यामुळे त्याला घोर निराशा पत्करावी लागत नाही. त्यामुळे तो चळवळीतील भंपकपणावर वेळोवेळी तिखट प्रतिक्रिया देतो. दलित पुढारी मंडळी प्रत्येक गोष्टीचे फार्स करून आपल्याच लोकांची पिळवणूक करतात. या गोष्टीची कबीरला प्रचंड प्रमाणात चीड आहे. कबीरच्या आचारात, विचारात सुसंगती आणि स्पष्टता आहे. म्हारवाड्यातील कॉलेजात शिक्षण घेणारा कबीर एकटाच असल्यामुळे शिक्षणामुळे त्याच्या जीवनकक्षा विस्तारलेल्या आहेत. दलित चळवळीतील पुढाऱ्यांची भंपकगिरी, प्राध्यापकातील जातीयता आणि पतसंस्थेतील भ्रष्टाचार हे त्याच्या चिंतनाचे विषय आहेत.

आपल्या समाजातील आपलीच जात लपविण्याऱ्या दीक्षित गुरुजींसारख्या समाजाशी नातं तोडणाऱ्या दलितांबद्दल त्याच्या मनात प्रचंड चीड आहे. परंतु शिक्षणाचे संस्कारच माणसाला दलितांपासून

तोडतात असा त्याला आलेला अनुभव थरकावून सोडणारा आहे. शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर त्या पैशातून तो घरात धान्य खरेदी करतो. आपल्या घरची परिस्थिती बदलण्यासाठी तो अहोरात्र काबाडकष्ट करतो. म्हणूनच तो आपल्या पितांबर जगदाळे या मित्राला म्हणतो, "स्कॉलरशीप आल्या आल्या घरात जुंधळ्याचं एक पोतं आणावं म्हणतोय."('तणकट',पृ.६२) या त्याच्या उद्गारातून त्याला आई-वडिलांकडून मिळालेल्या संस्काराची शिदोरी आणि त्यातून त्याचा घडलेला पिंड याची कल्पना आपल्याला आल्याशिवाय राहत नाही. म्हार समाज जेव्हा गावावर बहिष्कार टाकतो तेव्हा तो खूपच अस्वस्थ होतो. परंतु त्यांच्यात सामील न होता स्वतःच्या कुटुंबासह तो गावात कामाला जातो. त्याची भूमिका ही संबंध गावगाडा समजून घेण्याची आणि सर्वप्रथम स्वतः सुधारून नंतर जातीयता नाहीशी करण्याची आहे. त्याच्या या भूमिकेमुळे संबंध म्हारवाडा त्याच्या कुटुंबापासून फटकून वागत असला तरी त्याच्याबद्दल सर्वांच्या मनात प्रचंड आदर आहे. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने दारू पिऊन मिरवणूक काढणाऱ्या तरुणांवर तो वैतागतो.

कबीर हा अतिशय संवदेनक्षम असा होतकरू तरुण आहे. तानू आजीच्या मुलाने स्वतःच्या आपल्या बहिणीला पैसे द्यायचे सोडाच, परंतु त्याने तिला घरात सुद्धा घेतलेले नाही. अथवा मांग जातीत जन्मलेले प्रा.अवचित भालेराव हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भातील व्याख्यानास महार समाजाच्या मुलांना आणावयास कबीरला सांगतात इत्यादी घटनांनी कबीर खूपच अस्वस्थ होतो. पुजारी सरांविरुद्ध म्हारवाड्यातील मुलांना बारदेस्कर सरांनी भडकावलेले आहे हे लक्षात आल्यानंतर कबीर मुलांना समजावण्यास जातो. पण त्याचे कोणीही ऐकूनच घेत नाही. नापास होऊन शाळा सोडणारी मुले समाजाचे कोणते हित करणार, हा त्याचा प्रश्न भविष्याचे संसूचन करणारा आहे. गाव आणि म्हारवाडा हे दोन्ही परस्परावलंबी असल्याची कबीरला जाणीव आहे. कबीरला गावात सवर्णांच्या विरोधात वातावरण गरम करण्याचा सल्ला फणींद्र कांबळे देतात. तेव्हा फणींद्र कांबळेंना कबीर म्हणतो, "........पण खेड्यातल्या म्हारवाड्यात जगायचं म्हणजे तुमचं हे म्हणनं मला पटत नाही. तिथं हरघडी गावातल्या माणसांच्या दारात जावं लागतंय. रोज उठून एकमेकांची तोंडं बघावी लागतात. त्यातच त्येंच्या बांधावर आमचं पोट अवलंबून असतंय. तिथ तुम्ही म्हणता तसा संघर्ष उपयोगी नाही, असं माझं ठाम मत आहे."('तणकट',पृ.११५) या विधानावरून आपणांस कबीरच्या वैचारिक परिपक्वतेचे दर्शन घडते.

कबीरच्या व्यक्तिमत्त्वाशी समांतर असणारी व्यक्तिरेखा म्हणजे मोहन बल्लाळ होय. आपल्या काळात आंबेडकरांचे विचार प्रभावी ठरले याचे कारण देताना मोहन बल्लाळ हा कबीरला म्हणतो, "त्यांच्या वेळी सगळे तुमच्या समाजातले अडाणी होते. म्हणजे शुद्ध गुलाम होते. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यावेळी सर्वत्र गांधीजी होते. म्हणजे त्यावेळी गांधीजींची चळवळ खेड्यापाड्यात पोहोचली होती. त्यांचा लोकांच्या मनावर जोरदार पगडा होता. त्यामुळेच बऱ्या-वायटाची धास्ती होती. यातून बाबासाहेबांच्या

कामाला थोडं तरी बळ मिळालं असेल. आज तेच बाबासाहेब असते तर त्यांना पुन्हा पुन्हा मार खावा लागला आस्ता. नव्हे त्यांचं डोकं औटं झालं असंत."('तणकट',पृ.२०४) बाबासाहेबांचे विचार आणि त्यांचे तत्त्वज्ञान आज जसेच्या तसे अमलात आणता येणार नाही, याचे भान अशा काही उद्गारातून लेखकाने दिलेले आहे.

राजन गवस यांनी 'तणकट'च्या माध्यमातून दलित समाजाच्या उद्धारात दलित चळवळींना आलेले अपयश, दलित समाजाने आंधळेपणाने त्याला दिलेला पाठिंबा आणि या सर्व बाबींकडे संवेदनाशील व विवेकी दृष्टीने पाहणारे तरुण हे चळवळींपासून आणि आपल्या समाजापासून कसे दूर चाललेले आहेत, या गोष्टींवर प्रकाशझोत टाकलेला आहे. कबीर, मोहन बल्लाळ, काशिनाथ, हिरामण इत्यादी मित्रांच्या संवादातून दलितांना आज पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला आहे. कबीरने प्रत्यक्षात ठामपणे मांडलेले विचार व त्याच्या मनात चाललेले विचार यांच्या मांडणीमधून लेखकाने दलित-दलितेतर संघर्षाचा ढोबळपणा नाहीसा केलेला आहे. आक्काबा राणेंच्या रूपाने गावामध्ये, मोहन बल्लाळच्या रूपाने महाविद्यालयात आणि कबीरच्या रूपाने म्हारवाड्यात असे एकेक समंजस पात्र उभे केलेले आहे. दलित संघटनाच आज एकमेकांचे पाय कसे ओढतात आणि दलित पुढारी आपल्याच तुंबड्या कशा भरतात याचेही मार्मिक दर्शन लेखकांने 'तणकट'मध्ये प्रभावीपणे घडविलेले आहे.

दलित समाजाला मिळणाऱ्या सोयी-सवलतींविषयी कबीर आपल्या मित्राला म्हणतो, "आमच्या माणसांना सगळं फुकट पायजे. तेही जलद पाहिजे. फुक्कट काहीही मिळवून घेणं हा आपल्याला फार मोठा आनंद असतो. त्यामुळं जो जो फक्कट देण्याच्या भरभरून घोषणा करील त्याच्या पाठीमागं जाण्यात आमच्या माणसांना मोठेपणा वाटतो. त्यांना सगळं तयार, फुक्कट आणि जलद मिळालं की खूश. घेणं वाईट आणि देणारा तो उपकाराखातर देतो. त्यातून मिंधेपण येणार, हा विचार करायला आमच्या माणसांना सवड नाही. उलट घेण्याची आपली परंपरा बलुत्यासारखीच की. सततच्या अन्यायाचा हक्क म्हणून सवलती ही गोष्ट मला मान्य आहे. पण सवलतीमागची भूमिकाच आम्हाला कुणी सांगितली नाही. त्यामुळं मिळेल ते ओरबाडत सुटायचं, ही प्रवृत्ती आमच्या नेत्यात आली आणि नेते आमच्या माणसांनाच ओरबाडून खात सुटले. फक्त आता ते हुशारी कराय लागले. आपल्या समाजाला ओरबाडून खायचं पण खाण्याआधी, म्हशीला दूध काढण्यापूर्वी भरडा ठेवतात तसं काहीतरी ठेवत राहायचं त्यांनी कमावलंय. आणि हे शहाणपण तुमच्याजवळ नसल्यामुळं माणसं त्यांच्याकडं जातात. तुमच्याकडं येत नाहीत."('तणकट',पृ.२१४) कबीरच्या या उद्गारातून स्वत्व भान हरपत चाललेला दलित समाज आणि दलित पुढाऱ्यांच्या संधीसाधूपणा व दुटप्पीपणावर लेखकाने ताशेरे ओढलेले आहेत. कबीर आणि मोहन बल्लाळ यांच्यामध्ये

होणारी शेवटची चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे. 'तणकट'च्या प्रारंभी राजन गवस यांनी नारायण कुलकर्णी-कवठेकर यांच्या कवितेतील-

"शेवटी तो निष्कर्षाप्रत येतो की
या मातीतलं तणकट जात नाही.
जाणार नाही.
आता तो फक्त गच्चं डोकं धरून बसतो
मेंदूत तणकटाचं बी पडू नये
म्हणून आटोकाट प्रयत्न करतो."('तणकट', अर्पणपत्रिका)

या ओळींच्या माध्यमातून कबीरची मनःस्थिती लेखकाने नेमकेपणाने चित्रित केलेली आहे.

'तणकट'च्या संदर्भात भारती निरगुडकर म्हणतात, "दलित साहित्यात ग्रामीण भागातील दलितांच्या समकालीन जीवनाचा सम्यक वेध घेण्याचा प्रयत्न अभावानेच झालेला दिसतो. या पार्श्वभूमीवर 'तणकट'मध्ये रूढ ग्रामीण व दलित समस्या एकेका प्रसंगाच्या रूपाने किंवा केवळ उल्लेखातून नोंदल्या जातात. कृषीसंस्कृतीच्या संदर्भात माणसामाणसांतील संबंध समंजसपणे टिकवले पाहिजेत व प्रश्नांची नवी मांडणी केली पाहिजे हे भान लेखकाने फार ताकदीने दिले आहे. समकालीन ग्रामीण जीवनावरील विधायक, मार्मिक भाष्य या दृष्टीने मराठी कादंबरीच्या क्षेत्रात 'तणकट'चे स्थान हे निश्चितच वरचे आहे."[३६] थोडक्यात, समकालीन ग्रामीण जीवनावरील विधायक व मार्मिक भाष्य करणारी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सांस्कृतिक विघटनाचा आणि मूल्यऱ्हासाचा विस्तारपूर्वक आलेख राजन गवस यांनी 'तणकट' मध्ये शब्दांकित केलेला आहे.

### ३.२.११ त्र्यं.वि.सरदेशमुखांच्या 'डांगोरा : एक नगरीचा'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

'डांगोरा : एका नगरीचा' ही त्र्यं.वि.सरदेशमुख यांची सन १९९८ साली प्रसिद्ध झालेली कादंबरी आहे. 'बखर : एका राजाची' (१९७२), 'उच्छाद'(१९९८) आणि 'डांगोरा : एका नगरीचा' (१९७८) या तिन्ही कादंबऱ्या 'साईखेड' नावाच्या छोट्या नगरीशी जोडलेल्या आहेत. या तिन्ही कादंबरीत्रयीने सन १९१० ते सन १९६० हा कालावधी व्यापलेला आहे. 'डांगोरा : एका नगरीचा'मधील कहाणी म्हणजेच 'बखर : एका राजाची' या कादंबरीचा पुढला प्रवास आहे. 'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीत सन १९२२ ते सन १९२९ या कालावधीत 'साईखेड' या संस्थानाने भोगलेल्या अनुभवांची कहाणी आहे. सन १९१० ते सन १९२२ या काळातील साईखेडचा राजा रघुवीरसिंहाची कहाणी संपल्यानंतर साईखेड या नगरीची कहाणी सुरु होते. महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमेवरील एका लहानश्या मराठी संस्थानातील ही गुंतागुंतीची कथा सन १९२२ ते सन १९२९ च्या दरम्यान घडत असली तरी त्यातील सुष्ट व दुष्टांच्या संघर्षाचे परिमाण हे आजही प्रस्तुत

आहे. दरबारी राजकारणातील नीतिनियम धाब्यावर बसविणाऱ्या हडेलहप्पी व दुष्ट कारस्थान्यांची भयकारी छाया जेव्हा सर्व संस्थानाला ग्रासू लागते. तेव्हा सारे सरळमार्गी लोकही आक्रसून थंड पडतात आणि दुष्टांची आक्रमक चलाखी अशी की नियतीचे फासेही ते आपल्याच बाजूने पाडून घेतात. अनेकविध स्वभावधर्माच्या असंख्य पात्रांचा विशालपट असलेली ही भव्य कादंबरी सरदेशमुखांच्या 'बखर : एका राजाची' या गाजलेल्या कादंबरीचा पुढचा दिपवून टाकणारा वाङ्मयीन प्रवास आहे. सरदेशमुखांनी 'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीतून मराठी वाचकांपुढे मानवी नीचतेच्या चिवट आक्रमकतेचे नवेच भयावह दालन उघडलेले आहे.

एका संस्थानातील राजकारणाची संयत, सूक्ष्म, जात-धर्मनिरपेक्ष आणि कलात्मक उकल करणाऱ्या 'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीच्या तोडीची दर्जेदार 'राजकीय कादंबरी' मराठीत दुसरी पहावयास मिळत नाही. या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्थानी राजकारणाचे आणि समाजस्थितीचे चित्रण आलेले आहे. इंग्रजी सत्तेच्या वर्चस्वामुळे स्वतंत्र कर्तृत्वाला आणि पराक्रमाला वाव नाही. राज्याचे स्वतंत्र अस्तित्वसुद्धा धड नीट नाही. अशा नाममात्र परिस्थितीत ही माणसे भोगविलास, हेवेदावे आणि क्षुद्र कटकारस्थाने यात रंगून गेलेली असतात. आधुनिकतेचा स्पर्श नसलेली त्यांची प्रजा मात्र अजूनही देवदेवस्की, जादूटोणा असल्या मध्ययुगीन मानसिकतेतच जगत होती. साईखेड या संस्थानात घडणाऱ्या या कथेतून मानवी भावभावनांचे आणि सुष्ट शक्तींवरील दुष्ट शक्तींच्या विजयाचे एक शोकात्म नाट्यरूप धारण करते. राजेपणाची झूल बाजूला ठेवून माणूस म्हणून जगायची इच्छा धरणारा, प्रेमाचा भुकेला राजा रघुवीरसिंह यांच्यासारखा एक कलासक्त माणूस राणी दमंयतीच्या कुटील नीतीपुढे हतबल ठरतो. त्याची ही कुतरओढ आत्महत्येत परिणत होते. संस्थानी वातावरण, इंग्रजांचा हस्तक्षेप, त्यांची कुटील संधीसाधू धोरणे, एतद्देशीयांचे अडाणीपण इत्यादी अनेक बाबींचे या कादंबरीमधून आलेले चित्रण हा तत्कालीन काळाचा वाङ्मयीन दस्तऐवजच आहे.

विसाव्या शतकाचं दुसरं, प्रायः तिसरं शतक हे या काल्पनिक कादंबरीच्या पाठीशी आहे. 'डांगोरा : एका नगरीचा'मधील पात्रे, प्रसंग आणि स्थळे पूर्णपणे काल्पनिक असून वास्तवातील कोण्या हयात वा दिवंगत व्यक्तींच्या चरित्रांशी त्यांचे साम्य केवळ योगायोगाने असण्याचा संभव आहे. खुद्द लेखकानेच 'मनोगता'मध्ये या काळाचा मार्मिक संदर्भ पुरविलेला आहे. त्र्यं.वि.सरदेशमुख म्हणतात- "सन १९२० ते सन १९३० या दशकात एकूण मराठी मुलुखात सामाजिक परिवर्तनाला कारण होणाऱ्या काही महत्त्वपूर्ण घटना होऊन गेल्या. त्यांनी मराठी जाणिवेला एक जागेपण आणि विकसन दिले. तरी इतिहासाचे यथार्थ आलोचन आणि तदनुसार सम्यक वर्तन यांच्या अभावी एक मूढता आली आणि एकूण सामाजिक प्रगतीचा

झोक गेला."[३७] 'साईखेड' या काल्पनिक संस्थानातील घडामोडींचे सखोल तपशीलवार, विराट आणि भयावह चित्र 'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये पहावयास मिळते.

साइखेडच्या मनस्वी राजाच्या आत्मघातानंतर राणीला नजरबंद करून काही मुजोर, सत्तांध व पिसाट अधिकारी वर्गाने या संस्थांनावर फिरवलेल्या वरवंट्यांचे व त्यात भरडल्या गेलेल्या सात्विक प्रजाजनांचे मूक रुदन या कादंबरीत रेखाटलेले आहे. 'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीची सुरुवात-

"करा रे हाकारा
पिटा रे डांगोरा
नगरात कोणी उपाशी? तापाशी?
उपाशी नाही, तापाशी नाही ...
माळ्याचा मळा पिकला आहे
विहिरीला पाणी लागलं आहे!
सूर्यनारायण जेवायास बैसले
पहिल्या घासास केस लागला!
अगं अगं, कोण्या पापिणीचा केस हा?
पापिणी नाही : स्वामिनी नाही
राजाच्या राणीला दळिंदर आलं आहे ...
न्हाली नाही, ल्याली नाही
अंधारकोन्यात बैसली आहे !"('डांगोरा : एका नगरीचा',पृ.१०३)

या डांगोऱ्याने कादंबरीची सुरुवात झालेली आहे. या डांगोऱ्यातून कादंबरीचे मुख्य सूत्र नेमकेपणाने सूचित होते.

कादंबरीचा आरंभ व देसाई आदि मंडळींवरील खटल्याचे प्रसंग अधिकच चित्तवेधक ठरलेले आहेत. अर्थातच त्यात पात्रांच्या मानसचित्रणावर अधिक जोर दिलेला आहे. संत वाहणाऱ्या 'त्या' काळाचा पट अधिक मुखर, अधिक प्रशस्त व गतिमान झालेला आहे. तेथील जातीय हेवे-दावे, राजकारणग्रस्त मने ताकदीने मांडली गेलेली आहेत. अनाचार, कुटीलता, विकारवशता, लाथाळ्या, लाचखोरी, दंडुकेशाही, व्यभिचारित्व आणि दमनसत्र यांचे प्रभावी चित्रण सामर्थ्याने 'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये रेखाटलेले आहे. या कादंबरीत अधूनमधून समकालीन राजकीय वास्तवाची पेरणी केलेली आहे. या साइखेडच्या शब्दरूपाला नामवंत चित्रकार बाळ ठाकूर यांच्या वेधक अन् सूचक मुखपृष्ठांची आणि रेखाटनांची उत्तम साथ लाभलेली

आहे. 'डांगोरा : एका नगरीचा'च्या निमित्ताने वर्तमानात लपलेल्या भूत-भविष्यांचा 'मानवीय'शोध आपल्याला अंतर्मुख करतो हे या कादंबरीचे फलित आहे.

साइखेडची कहाणी सांगताना वास्तवातल्या संस्थानाची निसर्गरूपे व त्यातील विविध छटांचा वापर सरदेशमुखांनी वातावरणनिर्मितीसाठी व त्या बरोबरच पात्रांच्या मनोवस्थांचे प्रभावी दर्शन घडविण्यासाठी केलेला आहे. या कादंबरीतील थेट निवेदनपद्धतीचा वापर वाचकांच्या मनाला भिडणारा आहे. पात्रांच्या बहिरंगासह काही ठिकाणी पात्रांच्या 'स्वागता'मधूनही अंतरंगाचे दर्शन घडविलेले आहे. बऱ्याच ठिकाणी 'फ्लॅश बॅक' पद्धतीचा वापर केलेला आहे. दुष्ट पात्रांची पाताळयंत्री कारस्थाने, सुष्ट पात्रांच्या संघर्षातील तत्त्वशरण अगतिकता आणि सामान्य नागरिकांची घडणाऱ्या घटनांनी झालेली दिङ्मूढ अवस्था या साऱ्यांसह साईखेड जिवंत आणि हतबलही होते. 'साईखेड' या नगरीची कहाणी वाचकाला अंतर्यामी हलवून सोडणारी आणि अस्वस्थ करणारी आहे. ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर 'साईखेड' नगरीच्या जीवनातील सापेक्ष अशी लहानमोठी वादळे, चक्रवात आणि साइखेडच्या भूगर्भात खदखदणारा लाव्हा या साऱ्यांचे एक अद्वितीय रसायन म्हणजे 'डांगोरा : एका नगरीचा' ही कादंबरी आहे. राजाच्या मृत्युनंतर साईखेडमध्ये जी कटकारस्थाने शिजली, अनीती, भ्रष्टाचार यांनी सत्त्वाला, शिवाला आपल्या हैदोसाने कसे त्रस्त आणि परास्त केले त्याचे कथानक 'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये आलेले आहे.

'डांगोरा : एका नगरीचा'च्या सामर्थ्याविषयी कविवर्य चंद्रभूषण कुलश्रेष्ठ म्हणतात- "'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीचे शारीररूपे, सुडौल, नीटनेटके, रेखीव आणि बलवान आहे. त्याहून कादंबरीचे आत्मिकरूप-म्हणजे कादंबरीतून होणारे जीवनदर्शन, तत्त्वचिंतन, मानवी जीवनाचा आध्यात्मिक पातळीवर घेतलेला वेध हे अधिक तेजस्वी, चैतन्यशील आणि वाचकांना वैचारिक पोषणमूल्ये देणारे आहे. दोन्ही अर्थाने यशस्वी होणाऱ्या दुर्मिळ कादंबऱ्यांमध्ये 'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीचा अग्रक्रमाने समावेश करावा लागेल."[३८]

'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीचा पहिला भाग म्हणजे 'बखर: एका राजाची' या कादंबरीचे सारांशात्मक निवेदन आहे. 'डांगोरा : एका नगरीचा'मध्ये राणी अधिकच एकाकी झालेली आहे. ब्रिटीश सरकारने कॅप्टन पॉटिंजरची साईखेडचा प्रशासक म्हणून नेमणूक केलेली आहे. त्याची सरबराई करून केशवभट आणि दौलतराव यांची सुटका करवून घेण्यात राणीसाहेब यशस्वी होतात. राणीसाहेबांना हा सल्ला गुप्त खलित्यातून परागंदा झालेला फौजदार घोरपडे यांनी दिलेला आहे. क्रीडाप्रिय आणि रंगेल पॉटिंजरच्या तैनातीचे चोचले पुरविणे हा राजवाड्याचा नित्यधर्म होऊन बसतो. राणीच्या असह्यपणाचा फायदा घेवून राणीसाहेबांच्या वाईन सेलरचा ताबा तो मिळवितो. संस्थानच्या खजिन्यातून मिळणारा तनखा

त्याची जँहागीर बनते. राणी दमयंती त्याच्याकडून राजे रघुवीरसिंहानी कैदेत टाकलेल्या केशवभटाची रीतसर सुटका करवून घेते आणि दौलतरावाला कैदेतून पळून जाण्याची संधी देण्यात येते. ब्रिटिश सरकारचे प्रतिनिधी हिंदुस्थानात कोणत्या धोरणाने काम करीत असत त्याचा नमुना या ठिकाणी सहज पाहावयास मिळतो. पॉटिंजर आणि घोरपडे यांच्या भेटीचा प्रसंग या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

घोरपडे यांचा साइखेड संस्थानात इन्स्पेक्टर जनरल कमांडर हंबीरराव यांचे असिस्टंट चिफ इन्स्पेक्टर म्हणून झालेला पुनर्प्रवेश हा 'डांगोरा : एका नगरीचा'मधील साइखेड नगरीच्या दुर्दैवाच्या ललाटरेखेचा आरंभ आहे. केशवभट, दौलतराव, घोरपडे आणि त्यांच्या सहाय्याला बखले, खासनीस, थोरात अशा खलांचे जमलेले षटक ही मंडळी माधवराव देसाई, सर्जेराव, सोमशेखर, जाधव, नानाचंद शेठ यांच्या विरुद्ध कपट-कारस्थानांना सुरुवात करतात. खलप्रवृत्तीच्या माणसांचे अत्यंत सूक्ष्म चित्रण हा या कादंबरीचा एक विशेष आहे. शिवाय सात्त्विक प्रवृत्तींच्या माणसांमधील गाफीलपणा आणि आपल्या प्रामाणिकपणाचा अहंकार असे दोष कसे घातक ठरतात त्याचे प्रत्यंतर जीवनातील कटुसत्य स्पष्ट करणारे आहे. फौजदाराने गोपाळ दुमालदाराची हत्या करवून माधवराव देसाई यांना जबाबदार धरावे यासाठी केलेले कपट कारस्थान, फौजदाराची व्यक्तिरेखा अधम प्रवृत्तीचे पातळयंत्री पात्र उभे करणारी आहे. देसाईंच्या समर्थकांनाही फौजदार मुळीच दया दाखवत नाहीत.

सुष्ट-दुष्ट, सात्त्विक-तामसी, नीतिमान-अनीतिमान, प्रामाणिक-भ्रष्टाचारी अशा ठळक विभागणी-मध्ये या कादंबरीतील महत्त्वाची पात्रे मोडतात. या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा आहेत. परंतु त्यातील काही व्यक्तिरेखा अतिशय ठसठशीत उतरलेल्या आहेत. राजे रघुवीरसिंह, त्यांची दुर्दैवी राणी दमयंतीदेवी, सत्तामद काबीज करून इतरांच्या उरावर बसणारे सर्वेसर्वा पुलिस-सुपरिटेंडेंट बाजीराव घोरपडे, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी माधवराव देसाई, साईखेड्याचे सच्चे जागले 'ज्योतिप्रकाश'चे संपादक शंभूराव जाधव, प्रतिपक्षाला चाणाक्ष बुद्धीने अवाक् करणारे बॅरिस्टर चंद्रसेन सुभेदार, त्यांना साथ देणारी कुशल अन् लोभस व्यक्तिमत्त्वाची राजस, तिच्यात गुंतलेला अरविंद .....अशा अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत साकार झालेल्या आहेत. सरदेशमुखांनी या सर्व व्यक्तींच्या बाह्य रेखांकनापेक्षा त्यांच्या आंतरिक चित्रणावर अधिक भर दिलेला आहे. याशिवाय वली मुस्तफा, जंगलनाथ, शेख बुरहानउद्दीन अशा वली नाथांच्यासह महालिंगाप्पा, सोपानबुवा शिराळकर टोपडेबुवा इत्यादी मंडळींच्या कहाण्या चित्तवेधक असून त्या त्यांच्या आत्मशक्तीचा वेगळा कस सांगणाऱ्या आहेत.

इंग्रजी राजवटीचे जनमनावर असणारे दडपण, नगरीच्या फौजदाराची दहशत,राणीची दुर्दशा, नैतिकतेवर अनैतिकतेचा दरारा यातून उभी राहणारी 'साईखेड' या नगरीच्या दुर्दैवाची कहाणी आणि सज्जनांची झालेली दुरावस्था, नगरीत माजलेले अराजक मनाला विषण्ण करणारे आहे. नगरीत

अत्याचाराचा धुमाकूळ घालणाऱ्या घोरपडेची कपटबुद्धी कमालीची तीक्ष्ण आहे. त्यामुळे राणीला नजरबंद अवस्थेत ठेवण्यात तो यशस्वी होतो. बखले, थोरात आणि खासनीस यांच्या सहकार्याने नगरीचे दुर्दैवच उभे करतो. राणी दमयंती हे सर्व कादंबरीभर निष्क्रिय झालेल्या, घोरपडेसारख्या कावेबाजाने आपल्या कपटवाणीने जेरबंद करून टाकलेल्या नगरीच्या प्रमुख सत्ताधीशाचे रूप सूचक आहे. विशेषतः शेवटी घोरपडेच्या भेटीतील तिची अवस्था करुणाजनक आहे. पण देसाई, घाटगे, नानाचंद सारख्यांच्या दुःखास अप्रत्यक्षपणे तीच कारणीभूत आहे हे विसरता येत नाही.

कुटील, बेमुर्वतखोर, कारस्थानी फौजदाराच्या कपटकैचीत सापडलेल्या माधवराव देसाईंवर चाललेला खटला सरदेशमुखांनी व्यवस्थित उभा केलेला आहे. जबान्या, साक्षीपुरावे, माफीचा साक्षीदार इत्यादी गोष्टी रीतसर आणि त्यावेळच्या कायदेकानूनाप्रमाणे आलेल्या आहेत. बॅरिस्टर चंद्रसेनने घेतलेल्या उलट तपासणीतून चंद्रसेनचे वकिली कौशल्य व तीक्ष्ण बुद्धी दिसून येते. राजस-अरविंद आणि राजस-चंद्रसेन यातील परस्पर भावनांचे दर्शन तरलतेने घडत जाते. कोर्टामधील जबान्या व उलट तपासण्यांसाठी काही ठिकाणी सरदेशमुखांनी प्रश्नोत्तरांच्या ऐवजी 'नाट्यछटात्मक' भाषेचा उपयोग चातुर्याने व परिणाम-कारक रितीने केलेला आहे.

सरदेशमुखांची शब्दकळा आणि भाषाशैली ही कधी भेट आशयाला भिडणारी तर कधी तिरक्या बाणांनी लक्षवेधी करणारी आहे. उदाहरणार्थ- "अशा रीतीनं मुल्क राणीचा, अंमल परधानजींचा, हुक्म फौजदाराचा असा मामला साइखेडात पाय रोवून बसला."('डांगोरा : एका नगरीचा',पृ.२१६) अशा एका वाक्यात फौजदार घोरपडेंनी राज्यात माजवलेल्या अराजकाचे वर्णन केलेले आहे.

## ३.२.१२ सदानंद देशमुखांच्या 'बारोमास'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

सदानंद नामदेवराव देशमुख हे मराठी साहित्यातील विशेषतः ग्रामीण साहित्यातील एक महत्त्वाचे ग्रामीण कथाकार आणि कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. सदानंद देशमुख यांनी कथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकाराबरोबरच कविता, व्यक्तिचित्रण आणि ललितलेखन इत्यादी वाङ्मय प्रकारही सक्षमपणे हाताळलेले आहेत. 'तहान' (१९९८) आणि 'बारोमास'(२००२) या त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यांनी त्यांना खऱ्या अर्थाने सुप्रतिष्ठित साहित्यिक म्हणून मान्यता मिळवून दिलेली आहे. 'बारोमास' ही त्यांची साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त या कालखंडातील महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. 'लचांड'(१९९३), 'उठावण'(१९९४), 'महालूट'(१९९५), 'रगडा'(२००६) आणि 'खुंदळघास'(२००८) हे त्यांचे कथासंग्रह आणि 'गावकळा' (२००६) हा कवितासंग्रह तसेच 'मेळवण' (२००८) हा ललितसंग्रह त्यांच्या सव्यसचित्वाची साक्ष देतात. १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकातील आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धाचे सृजनशील व्यक्तिमत्त्व म्हणजे

सदानंद देशमुख हे होय. सदानंद देशमुख हे मराठी ग्रामीण साहित्याच्या चौथ्या पिढीतील दर्जेदार ग्रामीण लेखक आहेत.

सदानंद देशमुखांची 'बारोमास' ही कादंबरी शेतकऱ्यांच्या बारमाही वेदनेची गाथा आहे. 'बारोमास' ही सदानंद देशमुखांची समकालीन सामाजिक वास्तव मांडणारी समस्याप्रधान व शोकात्म कादंबरी आहे. सदानंद देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या जीवनाचे आजचे समकालीन वास्तव आणि शेतकऱ्यांच्या आत्म-हत्येच्या शोधाची करुण कहाणी 'बारोमास'मध्ये मांडलेली आहे. 'बारोमास'ला लेखकाने कटू सत्य म्हणून एक निवेदन जोडलेले आहे. लेखक स्वतः शेतकरी असल्यामुळे आणि शेतीशी निगडित परिवारातून तो पुढे आलेला असल्यामुळे त्याला शेतीचे कटूसत्य कळलेलं असून बदलते कृषी वास्तव त्यांना अस्वस्थ करते आहे. लहरी निसर्ग, निर्दय धनदांडगे आणि व्यापारी, लबाड राजकारणी, धूर्त अधिकारी, संवदेनाशून्य शासनयंत्रणा या सर्व घटकांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. चोहोबाजूंनी होणाऱ्या कोंडीमुळे शेतकरी आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होतो आहे.

भारतीय कृषी संस्कृतीच्या पडझडीची ही दारुण गाथा लेखकाने नानू आजा, सुभानराव आणि एकनाथ या तीन पिढ्यांच्या माध्यमातून सांगितलेली असली तरी मुख्यतः एकनाथच्या सर्वसमावेशी, परिपक्व अनुभवांतून आणि दृष्टिकोनातून सांगितलेली आहे. भारतीय शेतकऱ्यांचे सर्वांगीण चित्र एकनाथ आणि त्याच्या कुटुंबाच्या आधारे लेखकाने 'बारोमास'मध्ये उभे केलेले आहे. 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' ही महाराष्ट्रातील सद्य स्थितीतील एक ज्वलंत सामाजिक समस्या आहे. या समस्येच्या पाठीमागे कारणीभूत असणाऱ्या परिस्थितीचा विचार करता निसर्गाचा लहरीपणा, शासनाचे कृषीविषयक उदासीन धोरण, सिंचनाचा अभाव, मुक्त आर्थिक धोरणाचा शेतीवर झालेला परिणाम, रासायनिक खते, बी-बियाणे, आधुनिक अवजारे, विजेचा वापर यामुळे उत्पादन खर्च वाढलेला आहे. त्यामागे उत्पादनात मात्र किंचित प्रमाणात वाढ झालेली आहे. बँका, सावकारी कर्ज, नापिकी, झालेला उत्पादन खर्च यांच्या ओझ्याखाली खेड्यातला माणूस दिवसेंदिवस खंगतच चालला आहे. भारतीय कृषक जीवनाचे हे शोकनाट्य लेखकाने सृजनशील दृष्टीने साकार केलेले आहे.

एकनाथचा मेहुणा रावसाहेब सावकारी पाशाला कंटाळून आत्महत्या करतो. त्यासंदर्भात लेखक लिहितात-"निव्वळ शेतीवर अवलंबून असणारा हा जातवान शेतकरी नंतर आभाळाच्या लहरीपणामुळे जेरीस आला. खर्चाची तोंडमिळवणी करता करता कर्जबाजारी झाला. बँकेचं कर्ज तुंबलं म्हणून त्याला बाल्याचं कर्ज काढावं लागलं आणि शेवटी अपमानाचं जगणं असह्य होऊन फाशी घेऊन मरावं लागलं. हे सगळं आपली कृषिव्यवस्था मोडून पडल्याचं धगधगतं द्योतक आहे."('बारोमास',पृ.२१६) कृषिव्यवस्था कोलमडून पडली असताना आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देऊन भागणार नाही. तर

शेतकरी आत्महत्याच करणार नाही अशा प्रकारची व्यवस्था शासनपातळीवरून निर्माण करणे गरजेचे आहे, असा आशावाद ही कादंबरी प्रकट करते.

'बारोमास' या कादंबरीचा एम्.ए.बी.एड. असलेला नायक एकनाथ हा विस्कटलेल्या कृषी-जीवनाचा व ग्रामीण व्यवस्थेचा प्रतीक आहे. एकनाथ हा सव्वीस एकर जमिनीचा मालक असूनही तो नोकरीसाठी आवश्यक असलेली डोनेशनची रक्कम जमा करू शकत नाही. यातूनच त्याच्या वैवाहिक जीवनाचा प्रश्नही भयावह उग्ररूप धारण करतो. मोहाडी येथे वीजमंडळात अधिकारी असणारे साहेब आपल्या पदवीपर्यंत शिकलेल्या अलका या मुलीचे लग्न, एम्.ए.बी.एड. असणाऱ्या शेतकरी कुटुंबातील एकनाथ याचेबरोबर, त्यास आज ना उद्या नोकरीस लागेल, या आशेने करून देतात. दोन्ही घरातील सांस्कृतिक अंतर अनेक छोट्यामोठ्या प्रसंगातून लेखकाने दाखवलेले आहे. त्याचा नानूआजा हायब्रीडच्या जमान्यातही स्वतःचे शुद्ध शूचिर्भूत जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. लग्न झाल्यानंतर मात्र संधी मिळूनही डोनेशन भरण्यासाठी शेती विकायला सुभानराव आणि शेवंतामाय तयार होत नाहीत. त्यामुळे आपल्या सुखी संसाराचे स्वप्न धुळीला मिळाल्याची खंत अलका बोलून दाखवते. दुसऱ्या दिवशी सकाळीच अलका बॅग भरून शेजारी राहणाऱ्या ममता वारेकडून बसभाड्यासाठी उसने पन्नास रुपये घेऊन माहेरी निघून जाते.

लेखकाने खेड्यात आणि शहरात राहणाऱ्या दोन कुटुंबातील मानसिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि कौटुंबिक अंतर अतिशय नेमकेपणाने व्यक्त केलेले आहे. अलका सांजोळला काही दिवस राहिलीच कशी, असा प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होतो. शौचाच्या पायखान्यापासून जेवणाच्या, झोपण्याच्या, घरांतील माणसांच्या संबंधापर्यंत अनेक बाबीतून अलकाच्या मानसिक ताणाचा आणि त्यामुळे एकनाथच्या मनातील प्रचंड तणावांचा, मानसिक कल्लोळांचा मोठा प्रभावी आलेख लेखकाने काढलेला आहे. शहरात राहणारी अलका खेड्यात आणि शेतीच्या भकास जीवनाशी समरस होत नाही. एकनाथने शेती विकून नोकरी करण्याचा वा नोकरी मिळतच नाही असे लक्षात आल्यांनतर मोहाडीत एखादा धंदा टाकून आपण सुखी व्हावं, असा विचार अलका करते. तिने पाहिलेल्या स्वप्नांचा चक्काचूर झाल्यानंतर मात्र ती कायमचे एकनाथचं घर सोडून माहेरी जाते आणि शेतीपायी एकनाथचा संसारही बुडतो.

'बारोमास'मध्ये सदांनद देशमुखांनी शेतकरी कुटुंबातील शिक्षणपूर्ण करून बेकार असणाऱ्या बेरोजगार युवकांच्या समस्याही प्रभावीपणे मांडलेल्या आहेत. शिक्षणामुळे खेड्यातला युवक नोकरीच्या माध्यमातून आपल्या ढासळत्या कुटुंबाला सावरेल अशा प्रकारची अपेक्षा असते. परंतु अलिकडच्या काळात ही अपेक्षा फोल ठरत चाललेली आहे. 'बारोमास'चा नायक एकनाथ हा एम्.ए.बी.एड., दिलीप पवार हा बी.ए.बी.एड, मधुकर तनपूरे हा शेतकी पदवी घेतलेला तरुण, गज्या आणि दाम्याचे आय.टी.आय. तसेच तेजस गवई हा डी.एड झालेला तरुण इत्यादी सगळे युवक बेरोजगार आहेत. हे सर्व तरुण गुणवत्ता

असतानाही भ्रष्टाचारी समाजव्यवस्थेच्या विळख्यात बरबाद झालेल्या तरुण पिढीचे प्रतिनिधी आहेत. शेतकऱ्याच्यां मुलांना कसे तरी शिक्षण घेता येते. परंतु नोकरी मात्र लागत नाही. या तरुणांकडे नोकरीसाठी संस्थाचालकांना द्यायला डोनेशन नसल्यामुळे यांना आयुष्यभर बेकारच रहावे लागते. पैसे मिळाल्यानंतर कुठेतरी नक्कीच नोकरी लागेल म्हणून ही सुशिक्षित तरुणांची 'सोनेरी टोळी' सांजोळच्या परिसरात बनूबा मांत्रिकाच्या मदतीने गुप्तधनाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. ही 'सोनेरी टोळी' आपल्याला कधीतरी गुप्तधनाचा हंडा मिळेल म्हणून रात्रीअपरात्री जमिनी खोदत फिरतात. शेवटी ही 'सोनेरी टोळी' रात्री हायवेवर गाड्यांना लुटणारी गुन्हेगार टोळी बनते. म्हणूनच खेड्यातल्या शेतकऱ्यांच्या मुलांसमोर बेकारीची मोठी समस्या उभी राहिलेली आहे.

बेकारीतून वाट्याला आलेल्या सामाजिक,आर्थिक आणि मानसिक स्थितीचा सामना करता करता एकनाथ अगतिक होतो. आई शेवंतामाई, वडील सुभानराव आणि भाऊ मधू हे एकनाथचे कुटूंब आहे. आई-वडील, सासू-सून, बाप-लेक, भाऊ-भाऊ यांच्यातील संघर्षाचे चित्रण करून लेखकाने या कांदबरीतून ग्रामीण कुटुंबव्यवस्थेचे विघटनपर्व अत्यंत बारकाव्यांनिशी साकार केलेले आहे. 'बारोमास'मध्ये सदानंद देशमुखांनी शेतकरी संघटनेची एक दिशा दाखवली आहे. लेखकाने या निमित्ताने शेतकरी संघटनेच्या पुढच्या वाटचालीच्या काही दिशाही दाखविल्या असल्या तरी वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळे किंवा अधिकार मिळवण्याच्या सुप्त इच्छेतून संघटनेत होणाऱ्या विघटनाकडेही लेखकाने बोट दाखविलेले आहे. कृषी व्यवस्थेतलं समग्र दुःख व्यक्त करणारी 'बारोमास' ही कादंबरी मराठीत तर एकमेवाद्वितीय आहेच, पण भारतीय साहित्यातही ती मानाचं पान मिळवणारी ठरेल यात तीळमात्र शंका नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय कृषिव्यवस्थेचे आणि शेतकऱ्यांच्या समग्र जीवनाचं बाह्य वास्तव आणि मनाचं आंतरिक वास्तव यांचा प्रभावी वेध घेणारी ही एक श्रेष्ठ कलाकृती आहे.

अस्मानी-सुलतानी संकटासमोर शेतीव्यवसाय परवडणारा नाहीच असे एकनाथला वाटत असते. खेड्यात आणि शहरात वाढत चाललेली दरी त्याला सतत अस्वस्थ करते. खेड्यातल्या माणसांचे जीवन जगणे, त्यांचे जनावरासारखे कष्ट उपसणे, त्याचा अत्यल्प मोबदला मिळणे यातून ही माणसे खंगत चाललेली आहेत. एकनाथला तेजराव खपकेची वाक्ये आठवतात. "खेड्यातला माणूस पन्नास किलो अन् बाई चाळीस किलोच्या वर भरत नाई. बारोमास जिवापाड राबणाऱ्या ह्या शेतकऱ्याचं मासं गेलं कुठं? सगळं शहरायनं खाल्लं, सरकारनं खाल्लं....व्यापाऱ्यानं अन् नवकरशाहीनं खाल्लं. इथोल्ला कोणताबी माणूस मोजा, पन्नास किलोच्या वर भरणार नाही. अन् गाद्या-गिरद्यांवर लोळणारी, फेराफेरी करून खाणारा क्विंटल, दीड क्विंटल..."('बारोमास',पृ.२१७) ग्रामीण माणसाचे हे शोषित वास्तव एकनाथला अस्वस्थ करते. तो या समाजाच्या आणि स्वतःच्या भविष्याचा विचार करण्याच्याच गर्तेत सापडलेला दिसतो. या

सगळ्या विदारक वास्तवामुळे मधूसारखी खेड्यातली अनेक मुले नव्या जीवन वाटा जगण्यासाठी शोधताना दिसतात.

'बारोमास'मधील नायक एकनाथ हा भारतीय कृषिव्यवस्थेचे प्रतीक आहे. उपोषण करून मृत्यूला कवटाळणारा नानूआजा, एंड्रीन पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणारा सुभानराव, नोकरीच्या सर्व आशा संपल्यावर आणि जीवनमूल्यांची जपणूक जीवनात होणे अशक्य आहे हे अनुभवल्यावर हिंसक लुटारूपणाचा रस्ता पकडणारा मधू, पतिनिष्ठ राहण्याची इच्छा असतानाही उच्चविद्याविभूषित एकनाथच्या जीवनरशैलीशी जुळवून घेऊ न शकणारी अलका, कृषिव्यवस्थेच्या भयावह वास्तवाचा बळी ठरलेला गुणसंपन्न नायक एकनाथ या सर्वांच्या शोकात्म जीवनाची ही करुण कहाणी एखाद्या व्यक्तीच्या दोषांतून निर्माण झालेली नाही, तर ती संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेच्या आंतर्विरोधाची, राजकीय शक्तींच्या उपेक्षेतून, भ्रष्टाचारी आत्मकेंद्रिततेमधून आणि सांस्कृतिक ऱ्हासाच्या प्रक्रियेतून उदभवलेली करुण कथा असल्यामुळेच ती अधिक मूल्यवान ठरलेली आहे. ही सुनेला छळणाऱ्या, एकनाथ व मधू यात मधूची बाजू घेणाऱ्या, मुलीच्या नवऱ्यासाठी सुनेचे दागिने गहाण टाकण्याचा हट्ट करणाऱ्या आणि पुढे जावयाच्या आत्महत्येनंतर त्याच्या मृत्यूला आपल्या मुलाला एकनाथला जबाबदार धरणाऱ्या शेवंतामायची ही शोकांतिका आहे. मराठीतील ज्येष्ठ समीक्षक प्रा.चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात- "भारतीय कृषि-समाज (म्हणजेच एकूण भारतीय समाज), भारतीय कुटुंबव्यवस्था, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय मूल्यहीन राजकीय व्यवस्था, भारतीय शासनतंत्र, भारतीय सांस्कृतिक मूल्यव्यवस्था, न्यायव्यवस्था या सर्वांच्या पडझडीची दारूण शोकात्म अनुभव देणारी ही महाकाव्यीय कादंबरी आहे."[३९]

कृषिप्रधान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देशात शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. समाजव्यवस्थेचा आणि देशाच्याही अर्थव्यवस्थेचा मूळ आधार असलेल्या शेतीच्या जीवनाची ससेहोलपट कुठवर होणार आहे? शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र कुठवर चालणार आहे? शेतकरी संघटना, सरकार, राजकीय नेते, शेतकऱ्यांच्या भल्याचा विचार केव्हा करणार आहेत? शेतकऱ्यांचे आणि शेतीचे मढं तिरडीवर बांधून सरकारला जाग, तरी का येत नाही? असे अनेक प्रश्न 'बारोमास' या कादंबरीत अत्यंत कळवळ्याने उपस्थित केलेले आहेत. म्हणूनच 'बारोमास'ही आजच्या समकालीन शेतकऱ्यांच्या जीवनाचे कटू सत्य मांडणारी लक्षणीय सामाजिक कृती आहे. थोडक्यात, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कृषक समाजाचे वास्तव अधोरेखित करणारी एक महत्त्वाची कादंबरी म्हणून 'बारोमास'चा उल्लेख करावा लागतो.

### ३.२.१३ आशा बगेंच्या 'भूमी'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

आधुनिक मराठी कादंबरीकार आणि कथाकार लेखिकांमध्ये आशा बगे हे एक महत्त्वाचे नाव आहे. विदर्भातील नागपूर येथे वास्तव्य करणाऱ्या आशा बगे सन १९८० पासून सातत्याने लेखन करीत आलेल्या आहेत. आशा बगे यांनी विशेषतः कथा आणि कादंबरी या वाङ्मयप्रकारात लेखन केलेले आहे. 'मारवा' (१९८४), 'अत्तर'(१९८६), 'पूजा'(१९८९), 'ऋतू वेगळे'(१९९९), 'निसटलेले'(१९९९) इत्यादी त्यांचे कथासंग्रह विशेष उल्लेखनीय आहेत. 'मनस्विनी'(१९७८), 'झुंबर'(१९८४), 'त्रिदल'(१९९४), 'धर्मक्षेत्रे' (१९९६), 'सेतु'(२०००), 'आकाश' (२०००), 'भूमी'(२००४), 'भूमिका आणि उत्सव'(२०११) इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहिलेल्या आहेत. आपल्या लेखनातून आशा बगे यांनी आजच्या स्त्रीची मानसिक स्पंदने आणि बदलत गेलेली कुटुंब जीवनाची वीण उलगडून दाखवलेली आहे. आशा बगे यांनी केवळ स्त्रीलिखित मराठी साहित्यातच नव्हे तर एकूणच मराठी साहित्यातही स्वतःची मुद्रा उमटविलेली आहे. आशा बगे यांच्या सन २००४ मध्ये लिहिलेल्या 'भूमी' या कादंबरीला साहित्य अकादमीचे पारितोषिक लाभलेले आहे. त्यामुळे त्यांची 'भूमी' ही कादंबरी अखिल भारतीय कादंबऱ्यांमध्ये उच्च दर्जाची ठरलेली आहे. परंपरेचा धागा न सोडता सनातन नात्यातील नवेपण शोधणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे.

आशा बगे यांची 'भूमी' ही कादंबरी म्हणजे मैथिली या एका पोरक्या पण मनस्वी आणि जीवनाच्या प्रवासात स्वयंसिद्धा ठरलेल्या मुलीची कहाणी आहे. ही संपूर्ण कादंबरी मैथिली ह्या व्यक्तिरेखेभोवती गुंफली गेलेली आहे. मैथिलीच्या बालपणापासून ते प्रौढपणापर्यंतचा काळ या कादंबरीत रंगविलेला आहे. या काळात घडणाऱ्या घटना-प्रसंग, तिच्या जीवनात आलेल्या विविध व्यक्ती या सर्व अनुभवांतून घडत जाणारी मैथिली, तिचा परिस्थितीशी, व्यक्तींशी आणि स्वतःशीही होणारा संघर्ष 'भूमी'मध्ये चित्रित झालेला आहे. आशा बगेंनी 'भूमी'मध्ये स्त्री-पुरुष नात्यांचा पट सूक्ष्मपणे विणलेला आहे. 'भूमी' ही कादंबरी म्हणजे स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्षरत असणाऱ्या एका आधुनिक मैथिलीचे जीवनायन आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर तामिळी ख्रिश्चन आईच्या संस्कारात वाढलेली, आईच्या मृत्यूनंतर मुंबईत आत्याकडे आलेली मैथिली आयुष्यात वेगवेगळ्या नात्यातून जाताना आनंद आणि सुखदुःखाशी संघर्ष करताना बुद्धिवादी स्त्री म्हणून जगताना अशी तिची विविध रूपे वाचकाला अंतर्मुख करतात. 'भूमी' कादंबरीतील मैथिलीबद्दल लेखिका आशा बगे म्हणतात-"ही आहे मैथिलीची भूमी. वाल्मिकींनी जिला मर्यादापुरुषोत्तम रामाच्या पुरुषी संकुचित दृष्टीतून रेखली, त्या मर्यादेतच अडकून न राहणाऱ्या अशा एका आधुनिक मैथिलीची वडिलांच्या मृत्यूनंतर तामिळी ख्रिश्चन आईच्या संस्कारात वाढलेली, कडलूर या समुद्रकिनारी वसलेल्या लहानशा गावातील ही मैथिली तिचं आयुष्य मृत्यूनंतर मुंबईत आत्याकडे आल्यावर अनेक वळणांतून सरकत राहते. पण आयुष्यातला प्रत्येक अनुभव तिला तिच्यातील अंतःस्थ स्वत्वाची जाणीव देत. कधी त्याच्याशीही संघर्ष

करवत, घडवत नेतो. एका अनाथ, हट्टी मुलीचं एका बुद्धिवान, समंजस नि आत्मसामर्थ्याच्या बळावर आयुष्याला समजून घेणाऱ्या एका प्रगल्भ स्त्रीमध्ये रूपांतर करत स्वतःमधल्या सर्जकशक्तीनं स्वतःला उजळत नेणाऱ्या या मैथिलीच्या भूमीचे हे पाझर म्हणजे तिच्या स्वत्वाचेही हुंकार"[४०] असल्याचे गौरवोद्गार आशा बगे काढतात.

'भूमी' ही नायिकाप्रधान कादंबरी असल्यामुळे नायिका मैथिली ही या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. समुद्रकिनाऱ्यावरच्या कडलूर या छोट्याशा गावात मैथिली आणि तिची आई अम्मा राहत असतात. मैथिलीवर दोन भिन्न धर्माचे संस्कार झालेले आहेत. मैथिलीचे वडील हे हिंदू धर्मीय तर आई-अम्मा ही तामिळी ख्रिश्चन आहे. मैथिली ही लहान असतानाच वडिलांचे आणि अजाण झाल्यानंतर आईचे निधन झाल्यामुळे पोरकी होते. तिच्या आईच्या मृत्यूनंतर मात्र तिची आत्या तिला मुंबईला शिक्षणासाठी घेऊन जाते. मैथिलीच्या जडणघडणीत तिच्या आत्याचा सिंहाचा वाटा असतो. मैथिलीला मुंबईच्या वातावरणाशी जुळवून घेण्यास सुरुवातीच्या काळात अनेक संकटाना सामोरे जावे लागते. आजच्या आधुनिक युगातील नोकरी करून घर सांभाळणाऱ्या अनेक स्त्रियांच्या व्यथा मैथिलीच्या रूपाने आशा बगेंनी 'भूमी'मध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. "मी फार आजारी आहे. मैथिलीला तुम्ही इथून घेऊन जा. तिला तिकडे शिकवा. डॉक्टर अंकल, मुंबईची मैथिलीची आत्या आणि अम्माची मोठी बहीण त्रिचना-पल्लीची-अशी तिघांना पत्रं लिहिली."('भूमी',पृ.२१-२२) असा निरोप अम्मा सर्व नातेवाईकांना पाठविते. परंतु आत्या-शिवाय इतर कोणतेही नातेवाईक मैथिलीला मदत करीत नाहीत.

मुंबईत आल्यानंतर मैथिलीच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळते. 'तुझ्यामध्ये विश्रामची बुद्धी असून तुला शिक्षणासाठी मुंबईला आणले आहे' असे तिची आत्या तिला सतत सांगत असते. तरीही मैथिली दहावीत इंग्रजी विषय सोडून इतर सर्व विषयात नापास होते. त्यावेळी "असू दे. आता करशील अभ्यास चांगला. हे पहिलं वर्ष कृष्णार्पण."('भूमी',पृ.२७) असे म्हणून तिची आत्या मैथिलीला समजावून सांगते. आत्या ही मैथिलीला सातत्याने तिच्यावरील जबाबदारीची जाणीव करून देत राहते. उदय हा गोपाळरावांच्या पहिल्या बायकोचा मुलगा मैथिलीला लग्नासाठी मागणी घालतो. पण 'मैथिलीला शिकायचं आहे' या कारणाने आत्या या लग्नाला नकार दर्शविते. मैथिलीचा स्वतःच्या कर्तृत्वावर प्रचंड आत्मविश्वास असल्यामुळे मैथिली अहोरात्रपणे दहावीच्या परीक्षेचा अभ्यास करते. त्यामुळेच तिला दहावीच्या परीक्षेत ऐंशी टक्के मार्कस् पडतात. मैथिली ही जिद्द, चिकाटी, कठोर मेहनत आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर पुढील आयुष्यात यशाची नव-नवीन शिखरे गाठत राहते. आपल्या शिक्षणाच्या खर्चाचे ओझं आत्याच्या कुटुंबावर पडू नये म्हणून आत्याची मुलगी बीनाच्या ओळखीने ग्रंथालयात काही महिने कामाला जाऊन अर्थार्जन करते.

त्या दरम्यानच्या कालखंडातच तिला मराठी आणि इंग्रजी साहित्य वाचनाचा छंद जडतो. त्यामुळेच मैथिलीला तिच्या बौद्धिक क्षमतेचा अंदाज येतो आणि तिला बारावीला अठ्ठ्याऐंशी टक्के मार्कस पडतात. त्यांनतर मैथिली आर्टसमधील इंग्रजी हा विषय घेऊन एम.ए. करण्याचा निर्धार व्यक्त करते. मैथिली महाविद्यालयातील स्नेहसंमेलनामध्ये शेक्सपिअरच्या नाटकातील इंग्रजी प्रवेश सादर करते. या नाटकाच्या छंदामुळे मैथिली, कीर्ती, मिलिंद आणि चेतन यांचा ग्रुप तयार होतो. महाविद्यालयीन जीवनात नाटकामुळे मैथिली आणि मिलिंद यांच्यातील मैत्रीचे रूपांतर प्रेमामध्ये होते. बी.ए.च्या शेवटच्या वर्षात असताना मैथिली आणि मिलिंद दोघेंही एकमेंकाकडे आकर्षित होतात. "मैथिलीवर कुठले संस्कार झाले आहेत? म्हणजे धर्माबद्दल विचारते. आमचं घर जुनं आहे. मिलिंदची आजी आहे. त्यांना चाललं पाहिजे. मिलिंद आमचा एकच मुलगा. कीर्तीचं लग्न जमलंय. यांच्याकडेही पटलं पाहिजे."('भूमी',पृ.८१) असे म्हणत मिलिंद आणि मैथिलीच्या लग्नाला मिलिंदची आई ही, मैथिलीची आई तमिळीयन ख्रिश्चन असल्यामुळे त्यांच्या लग्नाला विरोध करते. त्यानंतर "हे पहा, मी अमेरिकेला जाऊन येतो वर्षभर तोवर सगळी धूळ खाली बसेल. मग एवढा विरोधही राहणार नाही. तू एम.ए. कर."('भूमी',पृ.८२) अशा पद्धतीने मिलिंद हा मैथिलीला तोपर्यंत वाट पाहण्याचा सल्ला देतो. मिलिंद अमेरिकेला गेल्यानंतर मैथिली काही काळ अस्वस्थ होऊन जाते. मात्र त्यानंतर ती स्वतःचा विचार वास्तवाच्या अंगाने करून स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करते. या दरम्यानच्या काळातच ती देवस्थळीबाईंच्या घरी पुस्तकांच्या प्रेमाखातर पडेल ते काम करून देवस्थळीबाईंना घरकामात मदत करते.

मैथिली ही बी.ए.ला इंग्रजी लिटरेचरमध्ये विद्यापीठात सर्वप्रथम आल्यानंतर मित्रा सरांच्या सल्ल्यानुसार ती एम्.ए.(इंग्रजी)ला प्रवेश घेते. मैथिली एम्.ए.ला सुद्धा क्लास मिळवून विद्यापीठात सर्वप्रथम येण्याच्या मान पटकाविते. त्याच सुमारास देवस्थळीबाईंचे निधन झाल्यामुळे दांडेकर हे शंतनूचे स्थळ मैथिलीसाठी सूचवितात. शंतनू हा प्रोफेसर देवस्थळींचा मुलगा आहे. शंतनूचे स्थळ मैथिलीसाठी आल्यानंतर मैथिली त्याबाबत सकारात्मक विचार करून लग्नाला होकार देते. ठरल्याप्रमाणे मैथिली शंतनूचे लग्न अगदी साधेपणाने पार पडते. शंतनूशी लग्न झाल्यानंतर ते दोघेही मुंबई सोडून मद्रासला वास्तव्यासाठी निघून जातात. मद्रासला पोहोचल्यानंतर मैथिली मद्रास विद्यापीठात पीएच्.डी साठी नाव नोंदणी करते. तिला इंग्रजी आणि मराठी साहित्याची आवड असल्यामुळे तिचे लेखन अविरतपणे चालूच असते. डॉ. अरुणाचलम् सरांच्या मार्गदर्शनाखाली 'शेलेंच्या कविता' या विषयावर मैथिली मद्रास विद्यापीठाची 'विद्यावाचस्पती' ही पदवी संपादन करून त्याच विद्यापीठामध्ये प्राध्यापिका म्हणून नोकरीला लागते. मैथिली नोकरीमुळे स्वतःचे एक भावविश्व निर्माण करते. परंतु शंतनूचा मात्र स्वतःवरील आत्मविश्वास ढासळू

लागल्यामुळे कंपनीतील ऑफिसच्या कामात त्याला दुय्यम स्वरूपाची वागणूक दिली जाते. दरम्यानच्या काळात त्यांना 'अंशुमन' नावाचा गोंडस आणि लोभस मुलगा होतो.

मैथिलीचे आणि शंतनूचे फारसे जमत नसावे हे आत्याच्या लक्षात आल्यानंतर 'दरवाजा ठेंगणा असेल तर आपणच वाकून जायचे असते' असे वैश्विक सत्य आत्या मैथिलीला समजावून सांगते. "अंग, तुझं कॉलेज, तुझं लेक्चर, तुझी पुस्तकं या सगळ्यांपासून तू आपलं घर, नवरा दूर ठेवतेस!"('भूमी', पृ.१३०) अशा रोखठोक शब्दांत आत्या मैथिलीला सुनावते. तरीही या दरम्यानच्या कालावधीत मैथिली आणि शंतनु यांच्यातील संवाद कमी होत जातो. कंपनीने शंतनूची बदली पॉंडिचेरीला केल्यानंतर मात्र तो नोकरीचा राजीनामा देतो. शंतनू हा मैथिली आणि स्वत:मधील विवाद अंशुमनजवळ बोलून दाखवतो. अशुंमन व मैथिली या दोघांचे विचार स्वतंत्र आहेत. तरी ही अंशुमन हा आपल्या वडिलांच्याच वळणावर जातो.

बेंगलोर विद्यापीठात इंग्रजी विषयाच्या प्रोफेसरपदासाठीची जाहिरात आल्यानंतर त्या ठिकाणी मैथिली अर्ज करते. त्यानंतर ती बेंगलोर विद्यापीठात नोकरीला लागते. त्या ठिकाणी ती स्वतंत्र घर भाड्याने घेऊन एकटीच राहते. परंतु तिथेही ती तिचे स्वतंत्र वलय निर्माण करते. डॉ.मित्रा, डॉ.अरुणाचलम, डॉ.पद्मनाभन आणि डॉ.सुधीर निरंजन या सर्वांच्या सहकार्यामुळे तिच्या जीवनाला वेगळी दिशा प्राप्त होते. शेवटी अंशुमन आणि नीरजा यांच्या लग्नानंतर ती बेंगलोर सोडून पुन्हा मद्रासला परत येते. हा मैथिलीचा जीवनप्रवास आशा बगेंनी 'भूमी' या कादंबरीत मांडलेला आहे. मराठीतील ज्येष्ठ समीक्षका प्रभा गणोरकर ह्या आशा बगेंच्या 'भूमी' या कादंबरीबद्दल म्हणतात की, "आपल्या आतल्या स्वराला 'ओ' देणारी, स्वत:चा मार्ग शोधणारी, धडपडणारी, कधी हरणारी तर कधी जिद्दीने उभी राहणारी मनस्वी व्यक्तिमत्त्वे, त्यांचा तोल पेलून धरणारे संवाद, संथ परंतु कादंबरीच्या गतीला बाध न येऊ देणारे निवेदन, सुसंवादी वातावरणनिर्मिती ही आशा बगे यांच्या कादंबरीचे वेगळेपण दाखणारी वैशिष्ट्ये आहेत. जीवनाचे कूट, अगम्य, अतर्क्य स्वरूप आणि त्याहूनही अगम्य, अतर्क्य असे मानवी मन यांच्या दुहेरी धाग्यांमुळे ही कादंबरी समकालीन कादंबरीत वेगळे स्थान मिळवते."[४१] हे प्रभा गणोरकर यांचे मत विचारात घेता आशा बगे यांची 'भूमी' ही कांदबरी आजच्या समकालीन स्त्रीवादी कादंबरीमधील एक अव्वल दर्जाची कादंबरी आहे.

'भूमी' मधील मैथिली आपल्या कुटुंबाला सावरण्यासाठी स्वत:च्या भावनांचा त्याग करते. परंपरेनी चालत आलेली कुटुंबव्यवस्था सांभाळत नैतिकदृष्ट्या कुठेही स्वत:चा तोल ढळू देत नाही. तरीही स्वत:चे जीवन स्वतंत्रपणे जगण्याचा प्रयत्न करते. तिच्या भावनांची झालेली घुसमट आशा बगेंनी 'भूमी'मध्ये प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुरोगामी विचारात वाढलेली मैथिली परंपरागत कुटुंबव्यवस्थेला सांभाळण्याचा कसोशीने प्रयत्न करते. आशा बगेंच्या 'भूमी' या कांदबरीबद्दल डॉ.अरुंधती वैद्य म्हणतात

की, "वाङ्मयीन महात्मतेच्या दृष्टीने 'भूमी' ही एक श्रेष्ठ कलाकृती ठरत नसली तरी परंपरा व आधुनिकता यांच्या मनोहर संयोगाने नटलेली ती एक चांगली कलाकृती नक्कीच आहे."[४२] या डॉ.अरुधंती वैद्य यांच्या अभिप्रायावरूनही मराठी स्त्रीवादी कादंबरी विश्वातील आशा बगेंच्या 'भूमी' या कादंबरीच्या योगदानाची कल्पना येते. आजच्या आधुनिक युगातील नोकरी करून घर सांभाळणाऱ्या अनेक स्त्रियांची व्यथा मैथिलाच्या रूपाने आशा बगेंनी 'भूमी'मध्ये कादंबरीत मांडलेली आहे.

## ३.१५ श्याम मनोहरांच्या'उत्सुकतेने मी झोपलो'चे आशयसूत्र आणि वैशिष्ट्ये

श्याम मनोहरांची 'उत्सुकतेने मी झोपलो' ही साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबरी सन २००६ साली प्रकाशित झालेली आहे. श्याम मनोहर हे कथाकार, कादंबरीकार आणि नाटककार म्हणून मराठी साहित्याच्या प्रांतात प्रसिद्ध आहेत. मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे नाव सर्वदूर करण्याचे सामर्थ्य श्याम मनोहरांच्या लेखनात निश्चितच आहे. समकालीन मराठी वाङ्मयीन साहित्य आणि संस्कृतीमध्ये श्याम मनोहरांचे योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. श्याम मनोहर हे मराठी साहित्यक्षेत्रातील महत्त्वाचे आणि सुप्रसिद्ध लेखक आहेत. एक प्रयोगशील लेखक म्हणूनही श्याम मनोहर हे मराठी साहित्याला सुपरिचित आहेत. त्यांचे 'आणि बाकीचे सगळे', 'बिनमौजेच्या गोष्टी' हे कथासंग्रह तसेच 'हे ईश्वरराव.... हे पुरुषोत्तमराव', 'शीतयुद्ध सदानंद', 'कळ', 'खूप लोक आहेत', 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबऱ्या आणि 'यकृत', 'हृदय' व 'प्रेमाची गोष्ट' ही नाटके या प्रकारांतील त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे. एका विशिष्ट जीवन आणि लेखननिष्ठेने दीर्घकाळ कादंबरी लेखनात नवनवे प्रयोग करत आपली वाट कोरत आलेले श्याम मनोहर हे एक मैलाचे दगड ठरावेत असे कादंबरीकार आहेत.

'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीमध्ये श्याम मनोहरांनी आशय आणि अभिव्यक्तीचा एक नवीनच प्रयोग केलेला आहे. या कादंबरीत त्यांनी मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेचा सहृदय, भेदक आणि प्रांजळपणे वेध घेतलेला आहे. ही कादंबरी साधारणतः तीन भागात विभागलेली आहे. 'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे'(पृ.३ते५४), 'कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू'(पृ.५७ते१४९) व 'कुटुंबव्यवस्था आणि पाऊस' (पृ.१५३ ते १८९) या तीन स्वतंत्र भागात ही कादंबरी विभागलेली आहे. ही तिन्ही विभागातील कथानके स्वतंत्र आणि वेगवेगळी असून त्यातील प्रत्येक भागात 'कुटुंबव्यवस्थे'चे चित्रण आलेले आहे.

"व्यक्तीने उल्टासुल्टा विचार करायची देणगी गमावता कामा नये. उल्ट्या विचाराला आपला स्वतःचा न् दुसऱ्याचाही विरोध होतो. उल्टा विचार प्रस्थापित होऊ शकतो, तर पुन्हा उल्टा विचार करून बघायचा. उल्ट्याच्या उल्टा विचार म्हणजे सुल्टा विचार नव्हे. उल्ट्याच्या नाना तऱ्हा असतात. मग भीतीदायक, दुष्ट, भंपक विचारही छानपणे हाताळता येतात. मनाचा घट्टपणा कमी होतो. मन जेव्हढे सैल तेव्हढे जीवनाचे झिरपणे अधिक."('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.०३) या परिच्छेदातून 'उलट-सुलट विचार-

मानवी मनाचे सैलावणे व जीवनाचे झिरपणे' हे एक सूत्र या कादंबरीत सांगितलेले आहे. समकालीन भिन्न भिन्न पार्श्वभूमी लाभलेल्या तीन कुटुंबांचे आणि त्यातील स्ववादी वा विसंवादी नाते 'उत्सुकतेने मी झोपलो'मध्ये रेखाटलेले आहे.

'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे' या पहिल्या विभागात सुबोध आणि सुमाधुरी या पती-पत्नींची गोष्ट सांगितलेली आहे. हे उच्चभ्रू मराठा जातीतील कुटुंब आहे. अमरावतीची सुमाधुरी पुण्यात 'मास कम्यु-निकेशन' या विषयात एम्.ए. करत आहे. माधुरीच्या वडिलांचे जुने वडिलोपार्जित घर आहे. पाच फुट चार इंच उंच, बळकट बांधा आणि गहूवर्णी रंगाची माधुरी जीन्स-पँट-टीशर्ट घालून पुण्यात अनेक नवीन गोष्टी शिकत असते. माधुरीला चित्रपटांची प्रचंड आवड असल्यामुळे ती चित्रपटसृष्टीत करिअर करून इच्छिते. सुमाधुरी आणि सुबोधच्या लग्नप्रसंगाचे तसेच माधुरीचे नाव बदलून लग्नात सुमाधरी ठेवणे हे प्रसंग उल्लेखनीय आहेत. माधुरीचे नाशिकमधील सुबोधशी मोठ्या थाटामाटात मराठा पद्धतीने विवाह होतो. सुमाधुरी ही एका अर्थाने सृजनशील निर्मितीसाठी आसुसलेली आहे. परंतु लग्नानंतर मराठा समाजातील रीतीरिवाज आणि माणसांचे परस्परसंबंध जोपासताना सुमाधुरीच्या निर्मितीक्षमतेचा कोंडमारा होत जातो. कुटुंबव्यवस्थेमध्ये निर्मिती म्हणजेच चांदणे नाही अशी साधारणतः आशय असलेली ही गोष्ट आहे. माधुरी ही लग्नानंतर सुमाधुरी होते म्हणजेच ती सर्वार्थाने निर्मितीच्या, सर्जनशीलतेच्या कुटुंबव्यवस्थेत गुदमरण्या-ची अवस्था आहे. पहिल्या भागात मराठा समाज, राजकीय सत्तास्पर्धा आणि राजकीय जीवन यांचा तिरकस वेध श्याम मनोहरांनी घेतलेला आहे. सुबोधचे सुमाधुरीवरील खरे प्रेम आणि साचेबंदपणाच्या रेट्यामुळे भांबावलेले प्रेम यांतील अंतर लेखकाने अचूकपणे नमूद केलेले आहे. या पहिल्या भागातील कुटुंब-निर्मितीच्या साचेबंद निरागसतेला उपहासाचे भाष्य आहे.

कुटुंबसंस्थेमध्ये कडेकोट व्यवस्था असल्यामुळे, क्रांती आणि मुक्तीला पुष्ट करणारे पर्यावरणच उपलब्ध नसल्यामुळे सुद्धा सुमाधुरीची गोची झालेली आहे. कुटुंबसंस्थेत ज्ञानाला, सृजनाला जागा नाही हे सांगण्यासाठी लेखकांनी 'चांदणे' हे प्रतीक म्हणून वापरलेले आहे. कुटुंबव्यवस्थेच्या संदर्भात 'चांदणे' हे सृजनशीलतेचे प्रतीक आहे. परंतु या कुटुंबसंस्थेत तिच्या निर्मितीशीलतेला अथवा सृजनशीलतेला अजिबात वाव मिळत नाही. म्हणूनच सुमाधरी म्हणते- "निर्मिती हॉटेलातल्या गॉसिपमधनं, सेमिनारमधनं, सभामधनं......अशी घराबाहेर ठेवायची पद्धत पडलीय. ती घालवून निर्मितीला कुटुंबातच जागा करून दिली पाहिजे."('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.५४) याशिवाय 'चांदणे' हे चांदणे म्हणून सुद्धा सुमाधुरीला हवे हवेसे वाटू लागते.

'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे' या पहिल्या भागात माधुरीच्या शिक्षणापासून लग्न आणि मातृत्त्वा-पर्यंतचे कथानक लेखकांने मोठ्या आत्मीयतेने अन् बारकाव्यांनिशी सांगितलेले आहे. तिला एकदा तरी

टेरेसवर एकट्याने चांदण्यात जाऊन उभे राहावे असे वाटत असते, असेही श्याम मनोहर सूचवतात. त्याचा संबंध तिच्या सृजनाच्या स्वप्नांशी जोडणे ऐच्छिक आहे. एकट्याने गच्चीत चांदण्यात जाऊन उभे राहताही येऊ नये इतके तिचे स्वत:पुरते असणे कुटुंबव्यवस्थेत चिरडले जाते हे ही चांदण्याच्या स्वप्नाइतकेच महत्त्वाचे आहे. 'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे'मध्ये सुमाधुरीच्या सृजनाला जागाच राहिलेली आहे. तिला मुक्ती किंवा क्रांतीची गरज भासत नाही. सुबोध, सासू, वैनी सारेच समजूतदार असूनही तिची ही करुण अवस्था होते, हेच खरे कुटुंबव्यवस्थेचे दारुण फलित आहे. या कुटुंबव्यवस्थेत चांदणे फक्त निमित्तमात्रच आहे. तसेच सुमाधुरी म्हणते त्याप्रमाणे 'कल्पकता, सौंदर्याची जाण, वर्ल्ड व्ह्यू' हे सुद्धा निमित्तमात्रच आहे. पुरुषाच्या अन् कुटुंबव्यवस्थेच्या अवकाशात सृजनाला स्थान नाही हे खरे तिचे दु:ख आहे. यात स्त्रीमुक्तीचा रंग अजिबात आलेला नाही ही उल्लेखनीय बाब आहे. 'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे'मधील हे भाष्य अतिशय मौलिक स्वरूपाचे आहे.

'कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू' या दुसऱ्या भागात विलास, वनिता आणि हर्षद यांच्या कुटुंबाची कथा सांगितलेली आहे. या भागाचा प्रारंभच -

"आम्ही कोण?
फुलपाखरू
छान किती दिसते!
फुलपाखरू ......."('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.५७)

या काव्यात्मक ओळीने तर शेवट-

"आमच्यात अभ्यास करायची पद्धत नाहीय. नाहीतर आम्ही विलासचा अभ्यास केला असता. तुमच्यात अभ्यास करायची पद्धत आहेय. तुम्ही कराल विलासचाही अभ्यास. शिवाय-इतका कडक उन्हाळा पडलाय. ह्या ऋतूत आम्ही नसतो. तुम्ही असता......"('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.१४९) फुलपाखराच्या या 'मनोगता'ने झालेला आहे. विलासला फुलपाखरांची विशेष आवड असल्यामुळे त्याला फुलपाखरांविषयी संशोधन करावयाचे आहे. विलासचा संशोधन पेपर इंटरनॅशनल जर्नलमध्ये स्वीकारला जातो. तेव्हा वनिता, हर्षद, डॉ.नारखेडकर, डॉ.करवले, संजय या सर्वांनाच अतिशय आनंद होतो. याच भागातील लेखात प्रयोगशाळेतील वातावरण, तिथले विद्यार्थी, प्राध्यापक, गावाकडली वडीलधारी माणसं, त्यांच्या भिन्न जीवनसरणी, शहरातील सुशिक्षित वा उच्चशिक्षित आई-वडील व त्यांच्यातील वैचारिक भिन्नतेने निर्माण होणारा दुरावा व त्याची घटस्फोटात होणारी परिणती, त्याचा महाविद्यालयीन मुलांच्या जीवनावर होणारा परिणाम, माणसांची देवधर्म व ज्योतिषविषयक कल्पना इत्यादींचे बाबींचे सुरेख चित्रण केलेले आहे.

महाविद्यालयीन जीवनात आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये विलासचा लेख प्रसिद्ध झाल्याचे चित्र पहावयास मिळत असले, तरी त्या-त्या विश्वातील जीवघेणी स्पर्धा आणि किरट्या राजकारणाचे उल्लेख न करताही त्याचे रेखाटन श्याम मनोहर समर्थपणे करतात. विलास आणि वनिता या बहिण-भावंडांच्या प्रसंगात लेखकाची भाषाशैली विलक्षण कोवळी अन् हळुवार बनलेली आहे. ध्येयवेड्या विलासला शेवटी महत्त्वाचा शोध लागतो. तो वनिताला म्हणतो- "वनिता, मोठ्ठा प्रॉब्लेम सुचलाय संशोधनाला. छोट्या प्रॉब्लेमावर संशोधन करण्यात अर्थ नसतो. मोठा प्रॉब्लेम म्हणजे, जीवनाचा ......नव्हे, जीवनाचा नाही, सृष्टीशी निगडित असतो मोठा प्रॉब्लेम"('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.१४५) वनिता ही आपल्या संशोधक चुलतभावामध्ये पहिल्यापासून गुंतलेली असते. परंतु आपल्या संस्कृतीने अशा प्रकारचे नाते निषिद्ध मानलेले आहे. विलासच्या एकत्र कुटुंबाचे झालेले विघटनसुद्धा आजच्या कुटुंबसंस्थेचे प्रातिनिधिक रूप आहे. विलासचे एकत्र कुटुंब फुटणे ही या दुसऱ्या भागातील कलॅमिटि आहे. हर्षदच्या आईचे-सुषमाचे परपुरुषाशी संबंध आहेत. आईच्या अफेअरच्या कल्पनेने हर्षद सतत पछाडलेला आहे. त्या जाणिवेचा झाकोळ त्याच्या मनावर कायम असतो. हर्षदचे विलासची चुलतबहिण वनिता हिच्यावर असलेले प्रेमसुद्धा अतिशय संधिसाधू वृत्तीचे आहे. विलासचा मित्र हर्षदचे कुटुंब हे ही त्याचेच पर्यायी रूप आहे. विलासचे एकत्र कुटुंब फुटताना पाहत हर्षद स्वतःच फुटत जातो. तसेच वनिता मात्र संशोधन करणाऱ्या माणसाशी कसे वागावे या संभ्रमात अडकलेली आहे.

या दुसऱ्या भागात कुटुंबसंस्थेला बसत असलेल्या हादऱ्यांची कहाणी सांगताना लेखक श्याम मनोहर काही मुलभूत प्रश्नही उपस्थित करतात. एकत्र बांधलेल्या कुटुंबसंस्थेला हादरे बसताना घटकांनी इतरांपेक्षा निराळ्या असलेल्यांशी कसे जोडत ठेवावे हा तो मुलभूत प्रश्न आहे. श्याम मनोहरांना शोध घेणे आणि शोध लागणे या गोष्टींचे प्रचंड कुतूहल आहे. या शोध लागण्याचे आणि शोध घेण्याचे कुटुंबसंस्थेतील स्थान ते शोधतात. शिवाय कुटुंबातल्या इतरांनी 'संशोधन करू पाहणाऱ्यांबरोबर कसे वागायचे' याचा ही शोध ते घेत राहतात. 'कुटुंबसंस्था आणि फुलपाखरू' हा दुसरा भाग घटनाप्रधान असूनही हर्षद, विलास आणि वनिताच्या सुट्या सुट्या समस्यांनी जटिल होत जातो. सतत पडेल वाटणारा विलास आणि आईच्या अफेअरच्या कल्पनेने पछाडलेला हर्षद हे दोघेही कुटुंबव्यवस्थेकडे दुरस्थ होऊनच पाहत राहतात. आयुष्याची आणि कुटुंबव्यवस्थेची ही जटिलता तसेच त्याबरोबर येणारा खोटेपणा विलासला सतत पडेल, हर्षदला दुःखी आणि वनिताला एकटा पाडत जातो. कुटुंबव्यवस्थेत फुलपाखरूपण जोपासता येत नाही ही खंत सतत मनाला बोचत राहते. हा दुसरा भाग विघटनाच्या अटळतेचे चित्रण तटस्थपणे करतो. हर्षदला छोट्या कुटुंबामुळे मिळणारे स्वातंत्र्य आणि विलासला ज्ञानामुळे मिळणारी इतरांपासून निराळे होण्याची संधी श्याम मनोहर दाखवतात.

'कुटुंबव्यवस्था आणि पाऊस' हा कादंबरीचा तिसरा भाग आहे. या भागात लेखकांनी जगण्याच्या गाभ्याला आणि मूलभूत तत्त्वज्ञानाला मृदू आणि कोवळ्या आत्मीयतेने स्पर्श केलेला आहे. सदुसष्ट वर्षाचा एक विधुर म्हातारा त्याच्या एकमेव लेकीशी आणि तिच्या सासरच्या कुटुंबाशी जोडलेला आहे. हा सदुसष्ट वर्षाचा म्हातारा कुटुंबामध्ये, समाजात एकट्याने जगताना सतत कुटुंबव्यवस्थेविषयी विचार करीत असतो. हा एकाकी म्हातारा स्वगताच्या पद्धतीने कुटुंबव्यवस्थेविषयी मौलिक भाष्य करतो. उदाहरणार्थ- "नवऱ्याने बायकोला नमस्कार करायची पद्धत कुटुंबव्यवस्थेत असायली हवी."('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.,१६७), "एकटे होऊन जीवनाचा विचार करण्याचे आकर्षण जबरदस्त असते. ह्या आकर्षणाला कुटुंबव्यवस्थेत जागा हवी."('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.,१८२), 'कुटुंबव्यवस्थेत मैत्रीची गोष्ट वरचेवर होत नाही.' ('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.,१९७ )…..असे या म्हाताऱ्याचे कुटुंबव्यवस्थेविषयी काही महत्त्वाचे विचार आहेत.

तसेच म्हाताऱ्या नायकाचे त्याच्या एकुलत्या एका लेकीवर जीवापाड प्रेम आहे. परंतु त्याला पावसाळ्यात ब्रॉंकायटिसचा असह्य त्रास होत असल्यामुळे त्यावरचे वारंवार त्याचे येणारे भाष्य आहे. "पावसाळा लवकर जाणे-आयुष्य लवकर जाणे-मरण लवकर येणे-पावसाळा सावकाश जाणे-आयुष्य सावकाश जाणे-मरण सावकाश येणे-पण ब्रॉंकायटिसचा त्रास होणे."('उत्सुकतेने मी झोपलो',पृ.१५७) अशा अन् इतक्या सुलभ अभिव्यक्तीत जगण्याचे पेच अन् महातत्त्वे मांडत ही कादंबरी कळत नकळत आध्यात्मिक होत जाते.

प्रभा गणोरकर ह्या श्याम मनोहर यांच्या 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीविषयी म्हणतात- "ही कादंबरी म्हणजे सृजनाच्या अविरत उर्जेतून निर्माण झालेला एक प्रयोग आहे. श्याम मनोहरांनी या कादंबरीत मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेचे जणू सूक्ष्मदर्शक यंत्रातून निरीक्षण केले आहे. कुटुंबव्यवस्थेचे अवमूल्यन न करता, तिच्या मर्यादा आणि संवेदनक्षम ज्ञानाची आस असलेल्या माणसांची, या व्यवस्थेत जगतानाची तगमग त्यांनी अत्यंत तरलपणे व्यक्त केलेली आहे. कुटुंबव्यवस्थेचे, पर्यायाने समकालीन समाजाचे बारकाव्यांनिशी तपशीलवार अंतर्च्छेदन करीत जात, त्यातील सूक्ष्म सांस्कृतिक राजकारण, ज्ञान, कला, अस्सल आध्यात्मिक आच आणि कल्पकता यांचा अभाव ते उलगडत जातात. भरपूर पात्रे, प्रसंग असूनही कथानकाची चौकट टाळणारे कथन आणि केवळ श्याम मनोहरांचीच असणारी, आत्मीयतेचे मृदू पोत असलेली, तरीही अंतःस्तरावरल्या गर्भित चिकित्सेने वाचकाला कुंठित करणारी शैली ही त्यांच्या सर्वच लेखनाची वैशिष्ट्ये या कादंबरीत जाणवतात."[४१] असे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य प्रभा गणारेकर यांनी नोंदवलेले आहे.

'उत्सुकतेने मी झोपलो'च्या तिन्ही भागात कुटुंब निर्माण होणे, कुटुंब फुटणे आणि एकाकीपणा या घटकांचा वेध घेतलेला आहे. निर्मिती, विघटन आणि एकाकीपण या अवस्थांतल्या कुटुंबाचे दर्शन घडवताना निवेदनाचा सूर याच क्रमाने उपहासगर्भतेकडून निर्मळ साध्या मनःपूर्वकतेकडे जाताना दिसतो. हे 'उत्सुकतेने मी  झोपलो' या कादंबरीचे फार मोठे यश आहे असे म्हणावे लागेल.

## ३.१६ निष्कर्ष

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त चौदा कादंबऱ्यांतील आशयसूत्रांचा आणि वैशिष्ट्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यानंतर मराठी कादंबरीचे बरचसे विकसित झालेले रूप आपणास पहावयास मिळते. या कादंबऱ्यांमधून समकालीन वास्तवातील विविध प्रश्न हाताळलेले आहेत. या कादंबऱ्यांमधून मराठी अस्मिता आणि संस्कृती यांचे होणारं दर्शन फारच विलोभनीय आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कादंबरीचा इतिहास आणि मराठी कादंबरीच्या विकासातील टप्प्यांचे यथार्थ आकलन होण्यासही निश्चितच मदत झालेली आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचा एक स्वतंत्र आकृतीबंध निर्माण झालेला आहे. या आकृतीबंधात लेखकानुसार आणि आशयपरत्वे विविधता दिसून येते. या पुरस्कारप्राप्त कादंबऱ्यातील आशयसूत्रे आणि आविष्कारपद्धतीमध्ये खूपच नाविन्यपूर्णता आणि प्रयोगशीलता आहे. या चौदा कादंबऱ्यांचा अभ्यास केल्यानंतर मराठी कादंबरी वाङ्मयाच्या सामर्थ्यांची आणि बलस्थानाची प्रचिती आपणाला आल्याशिवाय राहत नाही. या सर्व कादंबऱ्या ह्या विविध उपप्रकारांचे प्रातिनिधिक दर्शन घडवितात.

❖ 'ययाति' ही वि.स.खांडेकरांची एका सुप्रसिद्ध पौराणिक उपाख्यानाचे धागेदोरे घेऊन गुंफलेली स्वतंत्र कलाकृती आहे. नैतिक आणि सामाजिक मूल्यांच्या घसरगुंडीच्या या काळात खरा महत्त्वाचा प्रश्न लेखकाने 'ययाति'मध्ये हाताळलेला आहे. अर्थ व काम यांच्या स्वैर संचारावर आणि नग्न वर्तनावर ज्या समाजात धर्माचे नियंत्रण नसेल-मग तो धर्म जुन्या काळच्या ईश्वर-श्रद्धेसारखा अथवा कर्तव्यनिष्ठेसारखा असो किंवा नव्या काळातल्या समाजसेवेसारखा अथवा मानवप्रेमासारखा असो- त्या समाजाचे अधःपतन आज ना उद्या झाल्याशिवाय राहत नाही, घ्ययातिङच्या कथेची ही चिरंतन स्वरूपाची शिकवण आहे. वि.स.खांडेकरांच्या संपूर्ण साहित्यविश्वात घ्ययातिङला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. पौराणिक कथेच्या आधाराने एक सर्वोत्तम ललितकृती कशी निर्माण करता येते, याचा आदर्श वस्तूपाठच घ्ययातिङच्या रूपाने लेखकाने घालून दिलेला आहे. लेखकाने सांगितलेल्या प्रमेयानुसार घ्ययातिङ ही कादंबरी ययातिची कामकथा, देवयानीची संसारकथा, शर्मिष्ठेची प्रेमकथा आणि कचाची भक्तिगाथा आहे.

❖ रणजित देसाईंच्या 'स्वामी'ने मराठीमध्ये ऐतिहासिक कादंबरीच्या नव्या पर्वाची मुहूर्तमेढ रोवलेली आहे. घ्स्वामीङच्या रूपाने रणजित देसाईंनी आपल्या प्रतिभेचे सर्व गुणविलास पणाला लावून मराठी ऐतिहासिक कादंबरीच्या प्रांतात एक नवीन युग सुरु केलेले आहे. रणजित देसाईंची घ्स्वामीङ ही इतिहासाशी इमान राखणारी, पण इतिहासाहून वेगळी स्वतंत्र अशी अस्सल कलाकृती आहे. लेखकाने ऐतिहासिक कादंबरी असलेल्या घ्स्वामीङमध्ये सत्य आणि कल्पित यांचा सुंदर मिलाफ कसा साधला पाहिजे याचा आदर्श वस्तूपाठच घालून दिलेला आहे. 'स्वामी'चे कथानक एकूण अकरा वर्षांचे (जुलै, १७६१ ते नोव्हेंबर १७७२) असून ती मध्ये माधवरावांनी वयाच्या सोळाव्या वर्षी पेशवाईची वस्त्रे परिधान केल्यापासून ते वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी माधवरावांच्या झालेल्या मृत्यूपर्यंतचा काळ यात आलेला आहे. घ्स्वामीङमधील रमा-माधवांचे भावविश्व हेच तिच्या लोकप्रियतेचे व यशाचे गमक आहे. रमा-माधवाचे कौटुंबिक भावजीवन अलगदपणे उलगडून दाखविणारी ही कादंबरी मराठी साहित्यविश्वामध्ये अतिशय अजरामर, लोकप्रिय व यशाची अनेक शिखरे सर करणारी ठरलेली आहे.

माधवरावांच्या राजकीय कर्तृत्वाचा आलेख लेखकाने अत्यंत हृदयस्पर्शी शब्दात रेखाटलेला आहे. रमाबाईच्या सहगमनाचा प्रसंग अधिकच अर्थपूर्ण व हृदयस्पर्शी आहे. 'स्वामी'मधील रमाबाईची व्यक्तिरेखा सर्वार्थाने माधवरावांची सहधर्मचारिणी शोभावी, अशीच हुबेहूबपणे रेखाटलेली आहे. इतिहास आणि साहित्य यांचा अद्‌भूत व रोमहर्षक संयोग मराठीमध्ये सर्वप्रथम 'स्वामी'च्या रूपाने साकार झालेला आहे. माधवरावांच्या आयुष्यातील अकरा वर्षे खूप मोठ्या विलक्षण वेधकतेने आणि सामर्थ्याने लेखकाने 'स्वामी'मध्ये उभी केलेली आहेत. माधवराव बल्लाळ उर्फ थारेले माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीचे व कर्तबगारीचे सुंदर चित्रण 'स्वामी'मध्ये एकवटलेले आहे. माधवरावांचा मृत्यू हा पानिपतावरील मराठ्यांच्या पराभवापेक्षाही अधिक जबर असा मराठी साम्राज्यावरील आघात असल्याचे उद्‌गार ग्रँट डफ ह्या इतिहासकाराने काढलेले आहेत. साहित्य अकादमीने 'स्वामी' च्या रूपाने मराठी चरित्रात्मक ऐतिहासिक कादंबरीच्या काहीशा उपेक्षित दालनाकडे लक्ष वेधल्यामुळे या महत्त्वाच्या ऐतिहासिक कादंबरीचे दालन समृद्ध व संपन्न होण्यास निश्चितच मदत झालेली आहे. माधवरावांच्या कारकिर्दीचे तपशीलवार वर्णन आणि माधवरावांच्या स्वभावाचे अनेक पैलू चित्रित करताना लेखकाने फार मोठी परिश्रमशीलता, साक्षेप, संयम व योजकता दाखविलेली आहे.

❖ श्री.ना.पेंडसेंनी 'रथचक्र'मध्ये नियतीचा आणि माणसाचा संघर्ष एका सामान्य स्त्रीच्या संघर्षाच्या रूपाने सांगितलेला आहे. सामान्य स्त्रीच्या जीवनाचे चक्र हे नियतीशी संघर्ष करीत असताना पदोपदी चिखलात रुतत राहते आणि ती स्त्री पराभूत होऊन निरर्थक आपले जीवन संपवू पाहते, असे लेखक 'रथचक्र'मध्ये दाखविण्याचा प्रयत्न करतात. एका आईने आपल्या मुलाचे भले होण्याकरिता केलेली धडपड व त्यात तिचा झालेला जय-पराजय हे 'रथचक्र'चे सर्वसामान्य पण आदिम तत्त्वाकडे जाणारे कथासूत्र आहे. कोकणातल्या एका ब्राह्मण कुटुंबातल्या कोंदटलेल्या वातावरणात जगणारी एक अनामिका ही 'रथचक्र'मधील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. संन्यासी वृत्तीच्या नवऱ्यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीत होणाऱ्या अवहेलनेचे दुःख आयुष्यभर पदरी घेऊन जगणाऱ्या कोकणातील एका स्त्रीची ही कथा आहे.

❖ गो.नी.दांडेकरांनी 'स्मरणगाथा' या आत्मचरित्रात्मक कादंबरीमध्ये वयाच्या तिसाव्या वर्षा-पर्यंतचे आपले जीवनचरित्र अभिव्यक्त केलेले आहे. लेखकाने एका वैचित्र्यवेड्या, हटयोगी, भरकटलेल्या पण सद्वृत्तीप्रवण जीवाची कहाणी अतिशय प्रामाणिक आणि प्रांजळपणाने रेखाटलेली आहे. दांडेकरांनी तिसाव्या वर्षापर्यंतच्या आयुष्यात जीवनाशी दिलेला लढा, त्यातून त्यांच्या व्यक्तित्त्वाची जडणघडण, माणसांच्या अनेक तऱ्हा, निसर्गाची विशाल पार्श्वभूमी, जीवनव्यवहाराकडे पाहणारी निकोप दृष्टी या सगळ्यांतून स्मरणसाखळीच्या रूपाने 'स्मरणगाथे'मध्ये आपले जीवनानुभव शब्दबद्ध केलेले आहेत. घरातून पळून गेल्यानंतरचा तीस वर्षांपर्यंतचा काळ म्हणजे त्यांच्या दुःखाचा आणि वेदनेचा प्रवासच आहे. गो.नी.दांडेकरांनी मराठी साहित्याला एका अतिशय आगळ्या वेगळ्या जीवनानुभवाचे दर्शन घडविलेले आहे.

❖ व्यंकटेश माडगूळकरांच्या 'सत्तांतर'मधील आशयविश्व खूपच वैविध्यपूर्ण आहे. समकालीन वर्तमान काळातील प्रश्नांना हाताळत असताना 'सत्तांतर'ही कादंबरी सृष्टीतील आदिम वैश्विक प्रश्नांकडे आणि सत्याकडे वळते हे तिचे मोठेपण आहे. मराठी कादंबरीच्या इतिहासात 'सत्तांतर' शिवाय संपूर्णतः जंगल-प्राणीजीवनाचे सूक्ष्मचित्रण करणारी एकही कादंबरी आढळत नाही. या ग्रंथाच्या निर्मितीसाठी लेखकाने प्राणीशास्त्रातील अनेकविध संदर्भग्रंथ हाताळलेले आहेत. त्यातून मिळविलेली शास्त्रीय माहिती आणि व्यंकटेश माडगूळकरांची उत्तुंग प्रतिभा यांचे सुयोग्य मिश्रण म्हणजे 'सत्तांतर' होय. वानरांच्या शास्त्रीय माहिती शिवाय कादंबरीच्या कथानकाची गुंफण, पात्र चित्रणे व त्यांचा विकास, निसर्गवर्णने, वातावरणनिर्मिती, रंग, गंध, ध्वनी, रूप, संवेदना जागृत करणारी भाषा आणि कादंबरीच्या

विशिष्ट बांधणीतून ध्वनित होणारे अनेकविध सूचितार्थ ही माडगूळकरांच्या प्रतिभेची स्वतंत्र निर्मिती आहे. वैश्विक सत्य सांगणारी ही कादंबरी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. व्यंकटेश माडगूळकरांची 'सत्तांतर' ही कादंबरी वानर आणि मनुष्य यांच्या काम तसेच सत्ताकांक्षेच्या समान आंतर्बंधाची कथा आहे.

❖ आनंद यादव यांच्या 'झोंबी'मध्ये शिक्षणाची कुठलीही परंपरा नसलेल्या एका शेतकऱ्याच्या कुटुंबातील मुलाने अगदी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणासाठी घेतलेल्या झोंबीचे चित्रण आलेले आहे. आनंदाला अल्पवयातच जे भोगावे लागते, सोसावे लागते, ते पाहता त्याचे आत्मकथन सत्य आणि भावना यांच्या उभ्या-आडव्या धाग्यांच्या ताण्याबाण्यात विणलेल्या वस्त्रासारखी आहे. 'झोंबी' ही आनंद यादवांच्या बालपणातल्या संघर्षाची व्यथापूर्ण गाथा आहे. आनंद यादवांची ग्रामीण वास्तव चैतन्यमय करणारी 'झोंबी' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी गुणवत्तेच्या दृष्टीने आणि लोकप्रियतेच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ ठरलेली आहे. मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणासाठी त्याला अनेक स्तरावर प्रचंड झोंबी करावी लागलेली आहे, त्याचा जिवंत आलेख त्यांनी 'झोंबी'मध्ये शब्दबद्ध केलेला आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबाची दशा आणि दुर्दशाही त्यांनी हुबेहूबपणे रेखाटलेली आहे. शिक्षणाच्या वेडाने झपाटलेल्या बालमनाचा आत्मशोध हे या आत्मचरित्रात्मक कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. 'झोंबी' ही संघर्षरत सर्जनशील ग्रामीण बालमनाची झुंजार झेप आहे. एका कलावंताच्या आत्मोद्धाराची, त्याच्या विकसनशील बालमनाची नाट्यपूर्ण करुण कहाणी आहे. 'झोंबी' ही कादंबरी म्हणजे ग्रामीण वास्तव चैतन्यमय करणारी पहिली मौलिक आणि मूल्यवान आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. आनंद यादवांच्या 'झोंबी'ने ग्रामीण कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेले आहे यात शंका नाही. 'झोंबी'च्या रूपाने ग्रामीण भागातील अस्वस्थपणाचा स्फोट होऊन खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनातील भयावह वास्तव परिस्थितीची दशा आपणाला पहावयास मिळालेली आहे.

❖ विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती'मध्ये धरणग्रस्तांचे दु:ख विलक्षण ताकदीने मांडलेले आहे. धरणामुळे अनेक कुटुंबांच्या आयुष्यांच्या झालेल्या वाताहतीचा विषय 'झाडाझडती'मध्ये लेखकाने अत्यंत हृदयद्रावक पद्धतीने मांडलेला आहे. धरणग्रस्तांच्या यातना आणि संघर्षमय अवस्था मांडत असतानाच लेखकाने सध्याच्या व्यवस्थेवर विदारक भाष्य केलेले आहे. धरणांमुळे धरणग्रस्तांच्या आयुष्याची झालेली राखरांगोळी ही अतिशय संवेदनशीलतेने 'झाडाझडती'मध्ये शब्दबद्ध केलेली आहे. खैरमोडे गुरुजी ही या कादंबरीतील मध्यवर्ती

व्यक्तिरेखा आहे. धरणग्रस्तांच्या जीवनाची झालेली ससेहोलपट आपल्यापर्यंत लेखकाने कमालीच्या ताकदीने पोहचविलेली आहे. धरणग्रस्तांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन न झाल्यामुळे त्यासंबंधी निर्माण झालेल्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी कमालीच्या ताकदीने केले आहे. धरणांचे प्रकल्प, प्रकल्पामागील राजकारण, विस्थापन, पुनर्वसितांचे प्रश्न, त्यांची शासकीय पातळीवर होणारी अडवणूक इत्यादी अनेकविध प्रश्नांना 'झाडाझडती'मध्ये वाचा फोडण्याचे काम विश्वास पाटलांनी केलेले आहे. धरणाच्या प्रकल्पाची आखणी केल्यानंतर बुडिताखाली येणाऱ्या क्षेत्रातील गावांच्या विकासाकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, धरणाच्या कामाला प्रत्यक्ष प्रारंभ झाल्यानंतर उभारल्या गेलेल्या इंजिनिअर्सच्या कॉलन्यांचे थाट, विस्थापितांच्या पुनर्वसन कामात कधी अजाणता होणारे घोटाळे, विस्थपितांच्या नेत्याला दिला जाणारा त्रास, पुनर्वसित विस्थापितांविरुद्ध सत्ता-धनपिपासू मंत्र्यांचे राजाकरण इत्यादी विषयी विस्तृत माहिती त्यांनी सांगितलेली आहे.

❖ नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ'मुळे केवळ दलित कादंबरीच्याच नव्हे, तर एकूणच मराठी कादंबरी वाङ्मयाच्या कक्षा अधिक विस्तारलेल्या आहेत. 'राघववेळ'मध्ये मातंग समाजातील वालंबीच्या कुटुंबाचे समग्रपणे चित्रण केलेले आहे. नामदेव कांबळेंची 'राघववेळ' ही कादंबरी म्हणजे मातंग जमातीची जीवनरहाटी, गावगाडा आणि श्रमजीवींच्या शोषणाची चित्रकथा होय. वसारी गावातील मातंगांच्या जगण्याचा वेध घेत घेत सांगितलेली ही हृदयस्पर्शी कथा आहे. लेखकाने 'राघववेळ'मध्ये वास्तवाचे फार सूक्ष्म आकलन केलेले आहे. मातंग कुटंबातील कमालीचे दारिद्र्य, त्यांचे वेगवेगळ्या प्रसंगीचे मागणे, त्यांच्या परंपरा आणि संस्कृती, त्यांचे सामुहिक जगणे देखील लेखकाने फारच बारकाईने 'राघववेळ'मध्ये मांडलेले आहे. मातंग समाजामध्ये दृढ झालेल्या श्रद्धा आणि लोकभ्रम, विशेषतः इनाईमातेचा उत्सव आणि रात्रभर म्हटली जाणारी तिची गाणी या सगळ्यांमधून मातंगांचे भावविश्व प्रकट झालेले आहे. मातंगांबरोबरच गावातील संपूर्ण सवर्ण समाज, शेती, शेतीचे चक्र यांचेही मोठे परिणामकारक चित्र 'राघववेळ'मध्ये व्यक्त झाल्याचे आपणास दिसून येते. 'राघववेळ'ही मातंग समाजातील विधवा वालंबीची कथा आहे. तसेच तिच्या पुत्राच्या-रघूच्या व्यथेची आणि धडपडीची ही गाथा आहे. वालंबी, सीताराम आणि रघू यांची कुटुंबकथा ही रघूच्या शिक्षणाच्या समस्येतून निर्माण झालेल्या प्रसंगांनी अधिकच समृद्ध बनलेली आहे. 'राघववेळ'मध्ये रघूची चिंतनशीलता त्याच्या अनुभवातून विकसित झालेली आहे. रघुच्या विद्रोहाची धार गावगाड्यातील रूढींमुळे आणि कुटुंबातील कर्तव्य भावनेने कशी हिंस्रतेच्या पातळीवर नेण्यापासून रोखलेली आहे,

याचे शक्तीशाली दर्शन लेखकाने 'राघववेळ'मध्ये घडविलेले आहे. नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ'मध्ये मांग जातीत जन्मलेल्या रघू या एका हुशार मुलाची शिक्षणासाठी चाललेली धडपड व्यक्त करून संपूर्ण मांग जमातीचे वास्तव चित्रण साकार केलेले आहे.

❖ 'ताम्रपट' ही रंगनाथ पठारेंची स्वातंत्र्यप्राप्तीच्या क्षणाच्या रोमहर्षक दर्शनाबरोबरच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचा आलेख चित्रित करणारी पहिली बृहद राजकीय कादंबरी आहे. 'ताम्रपट'चे १९४२, १९५७, १९६२, १९६७, १९७५ आणि १९७९ असे सहा विभाग करण्यात आलेले आहेत. या सहा विभागांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, सहकार, शिक्षण, जातीयता, धर्मांधता, दहशतवाद आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास इत्यादी ठळक घटनांचा वेध घेतलेला आहे. लेखकाने 'ताम्रपट'च्या माध्यमातून विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचा पट अतिशय कलात्मक पद्धतीने साकार केलेला आहे. 'ताम्रपट'ही कादंबरी म्हणजे एकूणच भारतीय समाजाच्या स्वातंत्र्योन्मुख परिवर्तनाचे प्रतीकात्मक चित्रण आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थितीगतीचे चित्र 'ताम्रपट'मध्ये लेखकाने मोठ्या सामर्थ्याने शब्दांकित केलेले आहे. 'ताम्रपट'च्या पहिल्या भागात इंग्रजांच्या विरोधात सुरु झालेल्या चलेजाव चळवळीचा रोमहर्षक इतिहास, दुसऱ्या भागात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, विधानसभा निवडणुका, यशवंतराव चव्हाणांचे राजकारणातील वाढते प्रस्थ, सहकार चळवळींचे लोण, तिसऱ्या भागात धरणामुळे विस्थापित झालेल्यांचे प्रश्न, नानांचे उपोषण, शिक्षणसंस्थांची भरभराट, हिंदु-मुस्लिम विवाह, नाना व बापूसाहेबांची देशमुखांची निवडणूक, नानांचा पराभव, राजकारण संन्यास इत्यादी घटनांचा समावेश आहे. तर 'ताम्रपट'च्या चौथ्या व पाचव्या भागामध्ये देशाच्या राजकारणाला आलेली अवकळा, भ्रष्टता, गटबाजी, आणीबाणी इत्यादी ठळक घडामोडींचा आणि शेवटच्या भागात जनता दलाचे सरकार, पुलोदचे सरकार या घटनांचा उहापोह केलेला आहे.

❖ 'तणकट' या कादंबरीमध्ये राजन गवस यांनी गावगाड्यातील दलित-सवर्ण यांच्यातील संघर्ष अभिव्यक्त करून दलित व ग्रामीण जीवनातील वास्तवाचा आलेख रेखाटलेला आहे. समकालीन ग्रामीण भागातील दलित-सवर्णांच्या जीवनवास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न आजमितीस अभावानेच झालेला आहे. त्या पार्श्वभूमीवर राजन गवस यांची 'तणकट' ही लक्षणीय कादंबरी आहे. 'तणकट' ही समकालीन ग्रामीण जीवनावरील विधायक व मार्मिक भाष्य करणारी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक-सांस्कृतिक विघटनाचा व मूल्यऱ्हासाचा

विस्तारपूर्वक आलेख चितारणारी कादंबरी आहे. तसेच लेखकाने 'तणकट'मध्ये दलित समाजातील सुशिक्षित व आपली जात लपविणाऱ्या तसेच समाजाशी नातं तोडणाऱ्या दलितांचाही खरपूस समाचार घेतलेला आहे. सांस्कृतिक जीवनातील एका महत्त्वाच्या प्रश्नावर मार्मिक भाष्य करणारी ही कादंबरी गाव आणि गावकुसाबाहेरील जीवन यातील ताण-तणाव, क्रिया-प्रतिक्रिया, साद-प्रतिसाद यांनी साकारलेली आहे. शेडबाळेसारख्या तणकटांमुळे दलित समाजाची झालेली शोकांतिका लेखकाने अतिशय सुरेख पद्धतीने मांडलेली आहे. ग्रामीण जीवन आणि गावकुसाबाहेरील जीवन यांचा छेद घेत असतानाच दलित कार्यकर्ते, पुढारी व चळवळीतील संधीसाधू वृत्तींमुळे गावाची आणि दलित समाजाची झालेली शोकांतिका लेखकाने 'तणकट'मध्ये साकार केलेली आहे. विघातक व विध्वंसक तणकटांमुळेच विजेच्या दिव्यांनी (सवलती व सोयीसुविधांमुळे) झळाळणारा म्हारवाडा अंधारात एकटाच अश्रू ढाळत बसतो. म्हारवाड्याचे हे चित्र आपणाला अंतर्मुख आणि चिंतना-भिमुख केल्याशिवाय राहत नाही, हेच 'तणकट'चे फार मोठे सामर्थ्य आहे.

- 'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीत त्र्यं.वि.सरदेशमुखांनी सन १९२२ ते सन १९२९ पर्यंत साइखेड या संस्थानाने भोगलेल्या अनुभवाची कहाणी सांगितलेली आहे. त्र्यं.वि.सरदेशमुख यांनी 'डांगोरा : एका नगरीचा' या कादंबरीमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्थानी राजकारणाचे आणि समाजस्थितीचे चित्रण केलेले आहे. एका संस्थानातील राजकारणाची संयत, सूक्ष्म, जात, धर्मनिरपेक्ष आणि कलात्मक उकल करणाऱ्या या कादंबरीच्या तोडीची दर्जेदार राजकीय कादंबरी मराठीत अन्यत्र पहावयासही मिळत नाही.
- सदानंद देशमुख हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांची 'बारोमास' ही कादंबरी मराठी ग्रामीण साहित्यात मैलाचा दगड ठरणारी आहे. 'बारोमास' ही आजच्या शेतीयुगाशी निगडित असलेल्या शेतकऱ्यांची, त्यांच्या सुशिक्षित पण बेरोजगार असलेल्या मुलांची आणि खुद्द शेतीचीही करुण शोकगाथा आहे. गेल्या दोन-तीन दशकात औद्योगिकी-करणामुळे शेतकऱ्यांच्या आयुष्याची जी धुळधाण उडाली आहे ती 'बारोमास'मध्ये प्रभावीपणे मांडलेली आहे. भारतीय शेतकऱ्यांचे सर्वांगीण चित्र एकनाथ आणि त्याच्या कुटुंबाच्या आधारे लेखकाने केलेले आहे. भारतीय कृषीव्यवस्थेत, संस्कृतीत वाढलेल्या लेखकाने ही कलाकृती लिहिलेली असल्यामुळे तिला वास्तवाचा परीस स्पर्श झालेला आहे. सदानंद देशमुख हे स्वतः शेतकरी असल्यामुळे आणि शेतीशी निगडित परिवारातून ते पुढे आले असल्यामुळे त्यांना शेतीचे कटू सत्य कळलेले आहे. सदानंद देशमुख शेतकऱ्यांच्या मोठ्या

प्रमाणावर होणाऱ्या आत्महत्या त्यांना अंतर्मुख करतात. शेतकऱ्यांच्या जीवनाचे आजचे समकालीन वास्तव आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या शोधाची करुणकहाणी 'बारोमास'मध्ये लेखकाने प्रभावीपणे मांडलेली आहे. ग्रामीण जनजीवनाशी समरस झाल्याने आणि शेतकऱ्याचा मुलगा असल्यामुळे आपल्या शेतकरी बापाची दुर्दशा पाहून अस्वस्थ झालेल्या सदानंद देशमुखांनी आपल्याच लोकांचे आणि मातीचं दु:ख 'बारोमास'मध्ये समर्थपणे मांडलेले आहे. आजच्या समकालीन शेतकऱ्यांच्या जीवनाचे कटूसत्य मांडणारी 'बारोमास' ही लक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती आहे.

- ❖ आशा बगेंची 'भूमी' ही कादंबरी नायिकाप्रधान असून ती सृजनशील आहे. 'भूमी'मधील मैथिली ही स्वाभिमानी, तडफदार, स्वयंसिद्धा असली तरी चाकोरीबद्ध कुटुंबव्यवस्थेच्या बाहेर पडू शकत नाही. आशा बगेंनी मैथिलीच्या व्यक्तिरेखाटनाबरोबरच शंतनू, अंशुमन यासारख्या इतर पुरुषांचेही व्यक्तिचित्रण प्रभावीपणे केलेले आहे. पुरुषांच्यावर कोठेही अन्याय होऊ न देता शब्दांच्या साहाय्याने त्यांना प्रकाशात आणण्याचे आव्हानात्मक काम केलेले आहे. आशा बगेंची पात्रे ही पदरी आलेले दु:ख भोगत राहतात, पण बंडाची भाषा कधीच बोलत नाहीत. त्यांची 'भूमी' ही कादंबरी म्हणजे एका आधुनिक मैथिलीचे जीवनायनच आहे. मैथिलीला सतत तडजोड करावी लागल्यामुळे तिचे दु:ख मोठे होण्याला संधीच मिळालेली नाही. मैथिली ही आधुनिक विचारसरणीची असली तरी ती परंपरा आणि संस्कृतीला खूप महत्त्व देते.
- ❖ श्याम मनोहर यांनी 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीमध्ये मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेचा भेदक आणि प्रांजळ वेध घेतलेला आहे. समकालीन शहरी मध्यमवर्गीय कुटुंब व्यवस्थेवर परिणामकारकपणे भाष्य करणारी ही कादंबरी आहे. कुटुंबव्यवस्थेचा निरनिराळ्या अंगाने विचार करून त्यातील वास्तव उलगडण्याचा प्रयत्न या कादंबरीत केलेला आहे. लेखकाने कुटुंबव्यवस्था केंद्रस्थानी ठेऊन कुटुंबव्यवस्थेच्या चौकटीत वावरणाऱ्या व्यक्तींचे जगणे न्याहाळलेले आहे. समकालीन शहरी मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेचा पेच श्याम मनोहरांनी खूप वेगळ्या धाटणीने मांडलेला आहे.

## ३.१७ समारोप

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या आशयसूत्रांमध्ये वैविध्यता व नाविन्यता आहे. या कादंबऱ्यांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यानंतर मराठी कादंबरी वाङ्मयप्रकाराने घेतलेली झेप आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. या सर्व कादंबऱ्या प्रखर वास्तववादी आणि समाजातील ज्वलंत प्रश्नाला भिडणाऱ्या आहेत. या कादंबऱ्यांची मुखपृष्ठे अतिशय मार्मिक व अर्पणपत्रिकाही खूपच बोलक्या

आहेत. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त या मराठी कादंबऱ्यांनी एक आकृतीबंध निर्माण केलेला असून त्या आकृतीबंधात लेखकानुसार आणि आशयपरत्वे वैविध्यता आढळून येते. या कादंबऱ्यांनी अखिल भारतीय स्तरावर मराठी कादंबरी वाङ्मयाचे प्रतिनिधित्व केलेले आहे. या सर्व कादंबऱ्या मराठी कादंबरी वाङ्मय प्रकारातील त्या-त्या उपप्रकाराला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरलेल्या आहेत. थोडक्यात, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे आशयविश्व हे समृद्ध व संपन्न आहे. बहुआयामी व बहुढंगी आणि बहुरंगी आशयसूत्र हे या कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य आहे. अंतर्मुखता, चिंतनशीलता आणि अस्सल जीवनानुभव हा या कादंबऱ्यांचा गाभा आहे. या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबऱ्यांचे अवलोकन केल्यास मराठी कादंबरी वाङ्मयाच्या विकासाचा एक चढता आलेख आपल्या दृष्टोत्पत्तीस येतो.

## ३.१८ संदर्भ आणि टिपा


१. खांडेकर वि.स., ययाति, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, २७ वी आवृत्ती : ऑगस्ट, २००८, पार्श्वभूमी-ययाति, पृ.४१७

२. चुनेकर सु.रा., अंतर्नाद, जुलै, २००६, पृ.२७

३. खांडेकर वि.स., ऊनि., पृ.४०६

४. जोशी सुषमा, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कादंबरीकार (कथासूत्र व कादंबरीकार) अक्षता प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती- सप्टेंबर २०११, पृ.६७

५. दडकर जया, वि.स.खांडेकर : सचित्र चरित्रपट, २ ऑक्टोबर २००१, पृ.२३३

६. चुनेकर सु.रा., अंतर्नाद, ऊनि, पृ.२९

७. वडेर प्रल्हाद, देशीवाण : साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कादंबऱ्यांचा रसास्वाद, ललित, मे, १९९७, पृ.५४

८. बांदिवडेकर चंद्रकांत, देशीवाण (साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या आधुनिक भारतीय कादंबऱ्यांचा रसास्वाद), अक्षर प्रकाशन, मुंबई-१३, पहिली आवृत्ती-मार्च २००२, पृ.७७

९. पेंडसे श्री.ना., रथचक्र, मौज प्रकाशनगृह, मुंबई-०४, सातवी आवृत्ती- जून, २००४, प्रस्तावना, पृ.२८

१०. बांदिवडेकर चंद्रकांत, ऊनि, पृ.१०१

११. बांदिवडेकर चंद्रकांत, मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती : मार्च, १९८३, पृ.९४

१२. शोभणे रविंद्र, कादंबरीकार श्री.ना.पेंडसे, ऋचा प्रकाशन, नागपूर-१५, पहिली आवृत्ती- मार्च, १९९६, पृ.८८

१३. नातू म.गं., श्री.ना.पेंडसे यांच्या कादंबऱ्या : एक आकलन, प्रतिष्ठान, मार्च, १९९६,पृ.११

१४. पेंडसे श्री.ना., 'रथचक्र', ऊनि., प्रस्तावना, पृ.२५

१५. देसाई रणजित, 'स्वामी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रस्तावना, सोळावी आवृत्ती, जानेवारी, २००६, पृ.९

१६. तत्रैव, पृ.१५

१७. शहा विभा, मराठी ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथमावृत्ती : सप्टेंबर, १९९८, पृ.२२३-२२४

१८. कुलकर्णी द.भि., सत्यकथा, ऑगस्ट, १९७०, पृ.३७

१९. घांडगे मीरा, 'स्वामी : एक शोध', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, जानेवारी, २००१ : पृ.१०३

२०. तत्रैव, पृ.२७

२१. गोखले द.न., चरित्र-चिंतन, मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४,पहिली आवृत्ती, २०००,पृ.१११

२२. बांदिवडेकर चंद्रकांत, देशीवाण, ऊनि., पृ.२६२

२३. यादव आनंद, झोंबी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, जानेवारी,२००१, प्रस्तावना, पृ.०९

२४. कानडजे एस.एम., 'आनंद यादव : साहित्य आणि जीवन', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-०८, प्रथमावृत्ती : मार्च, १९९५, पृ.९४

२५. यादव आनंद, झोंबी, ऊनि., प्रस्तावना, पृ.९

२६. बांदिवडेकर चंद्रकांत, देशीवाण, ऊनि., पृ.३८४-३८५

२७. कऱ्हाडे सदा, ललित (मानाचे पानः झाडाझडती), मार्च, १९९३, पृ.२९

२८. निंबाळकर सुवर्णा नाईक, 'शोध झाडाझडती'चा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३८, प्रथमावृत्ती- मार्च, २००२, पृ.१६-१७

२९. ठाकूर रवींद्र, मराठी ग्रामीण कादंबरी (इ.स.१८८० ते इ.स.२०००), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती- १९९३, पृ.२०४

३०. सारडा शंकर, ग्रंथसंवत्सर, पुष्प प्रकाशन, पुणे- ४७, प्रथमावृत्ती- १९९३, पृ.११-१२

३१.	राजाध्यक्ष विजया (संपादक), मराठी कादंबरी आस्वादयात्रा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-१६, पहिली आवृत्ती- २००८, पृ.३२२ ते ३२३

३२.	कांबळे नामदेव, 'राघववेळ', देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा.लि., पुणे-३०, पाचवी आवृत्ती : २००८, प्रस्तावना, पृ.६

३३.	बांदिवडेकर चंद्रकांत, देशीवाण, ऊनि., पृ.४४९

३४.	राजाध्यक्ष विजया (संपादक), ऊनि.,पृ.३९२

३५.	कदम महेंद्र, 'कादंबरी : सार आणि विस्तार', अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती-नोव्हेंबर, २००७, पृ.११८

३६.	राजाध्यक्ष विजया (संपादक), ऊनि.,पृ.४४७

३७.	सरदेशमुख त्र्यं.वि., 'डांगोरा : एका नगरीचा', मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, पहिली आवृत्ती- एप्रिल १९९८, मनोगत, पृ.०८

३८.	कुलश्रेष्ठ चंद्रभूषण, ललित, जुलै, १९९९, पृ.१५

३९	बांदिवडेकर चंद्रकांत, 'बारोमास : विराट अनुभवाची महाकाव्यीय अभिव्यक्ती', 'अंतर्नाद', एप्रिल, २००५, पृ.४०

४०.	बगे आशा, 'भूमी', मौज प्रकाशन गृह, मुंबई-०४, पहिली आवृत्ती-१० डिसेंबर, २००४ मलपृष्ठ

४१.	ढेरे अरुणा (संपादन), 'स्त्रीलिखित मराठी कादंबरी' (१९५०-२०१०), पद्मगंधा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, ८ मार्च, २०१३, पृ.११०

४२.	वैद्य अरुंधती, 'भूमी : एक आधुनिक मैथिलीचे जीवनायन', युगवाणी, एप्रिल-मे-जून, २००७, पृ.१८

४३.	श्याम मनोहर, उत्सुकतेने मी झोपलो, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-२६, पहिली आवृत्ती-२००६, मलपृष्ठ